# ख्रिस्तायन

नाताळ ई - अंक ♦ वर्ष नववे ♦ २५ डिसेंबर २०१९ ♦ संपादक ख्रिस्तोफर रिबेलो



**BASSEIN CATHOLIC CO-OPERATIVE BANK LTD**

ESTD. 1918

(SCHEDULED BANK)




and

Prosperous New Year

Corporate Office: Catholic Bank Building, Papdy Naka, P.O. Papdy, Vasai - 401 207
Contact No.: 0250-2322053/0250-2322449 | Toll-free: 1800 233 6000 | www.bccb.co.in

# ख्रिस्तायन

नाताळ ई-अंक      वर्ष नववे

२५ डिसेंबर २०१९


संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो

सहसंपादक – एडवर्ड डिसोजा

संपादन साहाय्य

फ्रँक मिरांडा      स्मिता ख्रिस्तोफर रिबेलो

नेल्सन दोडती      सुनिल बा. डिमेलो

तांत्रिक सहकार्य

स्वप्निल लुईस रिबेलो



© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन


## संपर्क / अभिप्राय

आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा


ख्रिस्तोफर रिबेलो :- chrisrtayan25online@gmail.com (9819436078)



## आभार

आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे " ख्रिस्तायन" तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.



या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही

# अंतरंग ...

संपादकीय...

## कथा / ललित लेख :-

**जन्म श्रद्धेचा** – रे. फा. फ्रान्सिस दिब्रिटो
**फा. दिब्रिटो – सर्वसमावेशक** - संदीप राऊत
**ख्रिस्तजन्म** - फा. (डॉ.) रॉबर्ट डिसोजा
**तुम्ही कितीही बोटं** - वर्जेश सोलंकी
**पर्यटनातील पत्रकारिता !** - जॉन कोलासो
**'कादोडी' बोलीभाषा** - जोसेफ तुस्कानो
**आमच्यात अवयवदानाचा** – पुरुषोत्तम पवार
**सिनेमातले ख्रिश्चन** - सॅबी परेरा
**मुस्कान....** -- सुहास बिऱ्हाडे
**जीवंत मानवी देवांचे...** - फ्रान्सिस आल्मेडा
**'दीड दमडी ना'** - नेहा किशोर सावंत
**ख्रिसमसच्या आधी...** - पास्कल लोपीस
**शहंशाह** – सॅविन तुस्कानो
**मूल्यांची पायमल्ली...** - नोएल निर्मळकर
**नाळ वसई गोव्याची** – डॉ. नॅन्सी डिमेलो
**श्रद्धा आणि विवेक** – नोबेल मेन
**हिंदोळा आठवणींचा** - ॲलेक्स मच्याडो
**नंदू** - आयवन क्रास्टो
**जखमांची फुले** - सचिन मेंडिस
**बकेट लिस्ट** - एमेल आल्मेडा
**पुस्तक परीचय : रॉ** - बेन्सन कोरिया
**नवा नाताळ** – बेर्नादेत रूमाव
**स्मृतिलुब्ध आठवणी** - जोसेफ तुस्कानो
**पांडुरंगच माझा !** सोनल डिकुन्हा
**मी गप्प राहिलो** - सायमन मार्टिन
**येशू-परमेश्वराचा...** - फा. डॉ. एलायस रॉड्रिग्ज
**कौटुंबिक व्यवहार** - ॲड. विल्यम फर्नांडिस
**सुखाचा शोध** - डॉ. नरेश नाईक
**देवबाप्पाकडून....** - प्रा. स्टीफन आय. परेरा
**मेरी माग्दालेना** – फा. मायकल जी
**करीअरविषयी बोलू काही...** प्रकाश आल्मेडा
**विचार तर कराल !** – अतुल आल्मेडा
**कावड** - जॉन गोन्सालवीस
**लिहितो आहे......** --- फेलिक्स डिसोझा
**लफडं** - डॅनिअल मस्करणीस
**घायल्या कामाला ऊबी** - बॅप्टिस्ट वाझ
**रेणुका** - अझम्प्शन लोपीस
**मुलांच्या तारूण्यांतील.....** – डॉ. ट्रिजा परेरा
**प्रेमाची किंमत...** – तेरेजा डिसोजा
**एक कंटाळवाणी गोष्ट** -- सुनिल बी. डिमेलो
**रिटायरमेंट होम** -- सायमन रॉड्रीग्ज
**आठवणीतील वाट** -- बर्नड लोपीस
**एका मेलेल्या पोष्टाची...** - सिरील मिनेझीस.
**काजव्याचे चांदणे** - पेट्रेशिया गोन्सालवीस

'रिकामं घरटं' – संगीता वाझ

एक नाताळ.. - फा. आसिस रॉड्रिग्ज

धोतींग – वेरोनिका लोपीस

गूरूजींस पत्र - इनास तुस्कानो

वेदना जाणावयाला... - सुनिता परेरा

वसईतील महिला - अनिशा डिमेलो

अंत्या ..... -- अमर म्हात्रे

आयना- एक देवदुत - कल्पना रॉड्रिग्ज

आएगा आनेवाला - मॅक्सवेल लोपीस

पाणी पाणी रे....! - ऑल्विन रॉड्रिग्ज

मेरी ख्रिसमस! - फ्रँक डॉ. मिरांडा

अंकासंबंधी प्रतिक्रिया - संदीप रॉड्रिग्ज

## कविता / चारोळया :-

इग्नेशियस डायस

आयवन क्रास्टो

मेल्सीना तुस्कानो

डॉ. रिबेका दोडती

फ्रँक डॉ. मिरांडा

महेश लीलापंडित

रेश्मा सुनील परेरा

ब्रायन मेंडिस

फा. आयझॅक डिसोझा

राजन व्ही. डीमेलो

संगीता वाझ

पद्मजा भरत पाटील

जीम (फिलिप) रॉड्रिग्ज

ॲलेक्स मच्याडो.

सुनिल सोकाळकर

**कलाकुसर** :- पॉल डिमेलो, ऑस्टिन डाबरे, अर्नेस्ट रॉड्रिग्ज, रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज, लिओनार्ड रिबेलो, ऑल्विन कोरिया, मॅक्सवेल गोम्स, ॲलिस्टन डायस

---

घरांची नांवे
सुबक अक्षरात स्टीलमध्ये
जाहिरात 'निर्मिती'
डिझाईन-प्रिंटिंगसहित
संपर्क:
'निर्मिती' आर्टस्
बामणभाट, सांडोर, बंगली-पापडी रोड.
फोन: ७०५७१४८४०६

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित) वाघोली

रजि. न. टीएनए/ व्हीएस् आय/ आर एस् आर /सीआर /४२९/८८-८९ दि. ९-१२-८९ दि. ९.१२.१९८८

# कोकण विभागातील अग्रेसर पतपेढी

आपल्या व्यावसायीक व कौटुबिक विकास योजनेसाठी पतपेढी सेवा

१२ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत

ज्येष्ठ नरगरीकांच्या ठेवीवर - द. सा द. शे. ७.६५% व्याजदर

सर्वसाधारण सभासदांस द. सा द. शे. ७.४० % व्याजदर
८.७५% ते १२: व्याजदर विविध सुलभ कर्ज योजना
द.सा.द.शे ७.७५ सरळव्याज

घरबांधणी/ फ्लॅट खरेदी द. सा द. शे. ९.२५ % व्याजदर

शॉप, गाळे, मशिनरी खरेदी द. सा द. शे. १०.५० % व्याजदर

रू ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण द. सा द. शे. १२ % व्याजदर

नियमित कर्ज भरणा करणाऱ्यांना व्याजात २% रिबेट
३० सप्टेंबर २०१९ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे

| | |
|---|---|
| भागभांडवल रू ११.३८ कोटी | कर्जे रू १०८.५९ कोटी |
| ठेवी रू २५४.३३ कोटी | गुंतवणूक रू १९३.९३ कोटी |
| एकूण व्यवसाय ३६३ कोटी | सभासद संख्या १४५२६ |

ढोबळ एन.पी.ए. १.४१ %

## दि. ३१.०३.२०१९ अखेर नफा रू ६.७१ कोटी

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी | नालासोपारा पं. |
|---|---|---|---|---|---|
| ८६०५६९४२५५ | ७२६१९१९०१२ | ०८५५०९१०२६४ | ७२६१९१९०१३ | ०८५५०९१०६४३ | ७८७५५८९५५०८ |

लता फोस
मुख्य कार्यकारी अधिकारी

मॅथ्यू डिसोजा
उपाध्यक्ष

सिल्वेस्टर ए. दोडती
अध्यक्ष

व संचालक मंडळ

# संपादकाच्या लेखणीतून...

वाचक मित्र-मैत्रिणींनो, सर्वप्रथम नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा.

आम्हा ख्रिस्ती धर्मीयांमध्ये आनंदाचं उधाण घेवून येणारा हा सण. डिसेंबर महिन्याची सुरुवात झाली की एका बाजूने गुलाबी थंडी हळूहळू वातावरणात आपले जाळे विणत जाते आणि दुसरीकडे आगमनकाळाच्या सुरुवातीने आम्हा ख्रिस्ती लोकांची लगबग सुरू होते. वर्षभराच्या दगदग आणि कंटाळवाण्या रुटीन जीवनाला थोडा वेळ दूर सारून गुलाबी थंडीच्या गारव्यात आनंदाची रजई ओढण्याचे हे दिवस असतात. दुख, कष्ट, रोजची कामानिमित्त आणि संसाराचा गाडा हाकताना होणारी ससेहोलपट विसरून क्षितिजापल्याड लुकलुकणाऱ्या तेजस्वी ताऱ्याचे अवलोकन करत जो तो बाळ येशूच्या स्वागतासाठी तयारीला लागतो. नाताळ सणाच्या या धामधुमीत आम्हीही सामील झालो आहोत आणि आपणासाठी हा नाताळ अंक रूपी फराळ घेऊन आलो आहोत. नाताळ सणानिमित्ताने प्रकाशित होणारा "ख्रिस्तायन" हा पहिला व एकमेव ऑनलाइन नाताळ अंक आहे.

मंडळी, यावर्षी विशेष आनंद होत आहे, हा अंक आपल्यासोर पेश करताना.., ज्यांचे साहित्य वाचून सर्जनशील लेखन काय याची ओळख झाली, ज्यांनी लिहिण्यास प्रोत्साहन दिले, ज्यांच्या कार्यातून समाजसेवेची आवड निर्माण झाली ते फा. फ्रान्सिस दिब्रिटो हे उस्मानाबाद येथे होणाऱ्या ९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. काही वर्षाअगोदर मी हे स्वप्न पाहिलं होतं... हा.. मी स्वप्नच म्हणेन कारण फा. दिब्रिटो हे एक ख्रिस्ती धर्मगुरू असल्यामुळे अध्यक्षपदाच्या निवडणुकीला काही उभे राहणार नाही आणि एका ख्रिस्ती धर्मगुरू बिनविरोध निवडून यावा असा माहोलही नव्हता. पण माझे स्वप्न प्रत्यक्षात अवतरले, आता एखाद्या वर्षी वसईत हे साहित्य संमेलन व्हावे. ह्या अंकात आम्ही त्यांच्या नित्य सहवासात असलेले ज्येष्ठ विज्ञान लेखक जोसेफ तुस्कानो, परिक्षक संदीप राऊत व युवा 'निर्मिती'कार सोनल डिकुन्हा यांच्या त्यांच्याविषयीच्या आठवणी उधृत केल्या आहेत. फा. दिब्रिटो यांना उत्तम आयुरारोग्य लाभावे ही सदिच्छा.

आम्ही या अंकात वसईतील नव कवि-लेखकांच्या साहित्यकृतीं तसेच प्रतिभावंत चित्रकारांच्या चित्रांना प्राधान्य देत असतो. त्याचबरोबर प्रथितयश लेखक-कवींचाही या चळवळीत आम्हाला सहभाग मिळत असतो. या अंकात सामील असलेल्या लेखक-कवींची नवे बघितली तर आपल्या लक्षात येईल, ही लोकं आपापल्या क्षेत्रात नावाजलेले आहेत आणि आपली सामाजिक बांधीलकीही जपत आहेत. पुस्तक परीक्षण, प्रवास वर्णन तसेच काही विशेष विषयांवरचे लेखही समाविष्ट आहेत.

आम्ही हा अंक 'पीडीएफ' स्वरुपात देत आहोत, त्यामुळे आपणास अंक वाचण्यासाठी पूर्ण वेळ ऑनलाइन असण्याची गरज नाही. त्याचबरोबर या अंकाचे आता अँड्रॉईड ॲप म्हणूनही आगमन झाले आहे. प्ले स्टोअर वरुन आपण हा अंक डाऊनलोड करून नंतर आपल्या सोयीप्रमाणे अगदी मोबाईलवरही वाचू शकता. आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत..

नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!

Merry Christmas & Happy New Year.

# जन्म श्रद्धेचा

■ रे. फा. फ्रान्सिस दिब्रिटो

तो माझा एक चांगला मित्र. ज्ञानाचा उपासक. विज्ञानाचा पूजक. निखळ बुद्धीवादी. उच्चविद्याविभूषित. देवधर्म आणि पूजाअर्चा यापासून चार पावले दूर. तसा तो सुखी होता. सरस्वती आणि लक्ष्मी त्याच्यावर सारख्याच प्रसन्न. सुविद्य पत्नीची सुयोग्य साथ. सप्तपदीला वर्षे लोटली, पण अजून घरात पाळणा हलला नव्हता. दोघांच्या मनात सल, पण दोघेही व्यासंगात दंग. तो स्वत: नास्तिक, पण तिच्या व्रत वैकल्याला त्याचा ना विरोध, ना पाठिंबा.

आणि एक दिवस तो अचानक भेटला. त्याच्या कपाळावर आठयांचे जाळे अधून-मधुन दिसायचे. चर्चा करताना त्याची मुद्रा गंभीर व्हायची. पण त्या दिवशी यक्षिणीची कांडी कशी काय फिरली देव जाणे. त्याचा चेहरा फुलला होता. त्याच्या तेजस्वी, घाऱ्या डोळ्यांतून प्रकाश ओसंडून वाहात होता. शरदपौर्णिमेत तो जणू न्हाऊन निघाला होता. त्याच्या सर्वांगातून आनंद निथळत होता. तो हर्षातिरेकाने चिंब झाला होता.

माझे दोन्ही हात घट्ट दाबीत, तो मला म्हणाला, "मला मुलगा झालाय." माझ्याकडे, माझ्या प्रश्नाकडे त्याचे लक्षच नव्हते. तो बोलतच होता, "परवाच झाला जन्म. खूप गोड आहे माझा लबाड... डोळे अगदी माझ्यासारखे घारे... उजव्या गालावरील तीळ तिच्याकडून घेतलाय चोरानं. नाक कसं, जशी मोगरीची कळी. जिवणी म्हणजे गुलाबपुष्पाची पाकळी. पोवळ्यासारखी अंगकांती...

जन्मावेळी मी हजर होतो. हिला जास्त त्रास झाला नाही... त्याच्यावरची नजर हटतच नाही. वेड लावणारं रूपडं. ६ पौडाचं बाळ पण पूर्ण माणूस. माणसाची छोटा छोटी आवृत्ती... नाकी डोळी नीटस, कुठे व्यंग नाही. ही कलिका हळूहळू विकसित पावेल... फुलेल, बहरेल...

खरं सांगू आम्हा दोघांचा सहभाग, आमचे योगदान किती क्षुल्लक... दोन टिंबे... त्यातून निर्माण झालंय हे जिवंत शिल्प... आम्ही त्याचे आईबाप. दोन निमित्तं. त्यातून घडविला चमत्कार त्या महाकलाकरानं... गॉड इज ग्रेट..."

माझ्या मित्राचा तो फुललेला चेहरा माझ्या मनावर कुठंतरी कोरला गेलाय. सृजनाच्या सोहळ्याचा, सौंदर्याच्या जन्माचा तो साक्षीदार झाला होता. जीवनाच्या गूढतम रहस्याचा तो वारकरी बनला होता. त्याच्यासाठी देवदुर्लभ, आगळावेगळा असा अनुभव. जीवन ढवळून काढणारी एक अनुभूती.

त्याच्या एकाकी जीवनात आशेची पहाट उगवली. त्या घरातील घड्याळाची जीवघेणी टिकटिक बाळाच्या रडण्याच्या आवाजात जाणवेनाशी झाली.

जन्म हे गुढच. नव्याची निर्मिती. विस्मयकारक तितकीच, अद्भुत. वेडा कुंभार बनून विठ्ठल घडे घडवित असतो. प्रत्येक घडा अद्वितीय, अतुलनीय. त्यासाठी तो आपले सारे कसब आणि कौशल्य पणाला लावतो.

मानवाचे सहकार्य घेऊन विधाता नव्या रूपांना जन्म देतो. नाताळ हा एका जन्माचा सोहळा. संत पॉल सांगतो, मानवच नव्हे तर सारी सृष्टी दुभंगलेपणाच्या अनुभवामुळे कण्हत, विव्हळत होती. तारणाऱ्याची प्रतिक्षा करीत होती.

"मुक्तिदात्याला पाठवून दे" असे साकडे पृथ्वी परमेश्वराला घालीत होती. वैराण वाळवटांत एकाकीपणे भटकणाऱ्या माणसाला आधार हवा होता. जीवनाला अर्थ हवा होता, दिशा हवी होती. आणि मसिहा अवतरला. त्यावेळी आकाशात नक्षत्र झळकलं. स्वर्गातून देवदुतांनी गौरवगीते गायिली, भावपुष्पे वाहिली. कारण जन्म म्हणजे आनंद, जन्म म्हणजे आशा, जन्म म्हणजे उत्सव, जन्म म्हणजे सोहळा. ख्रिस्तजन्मामुळे सृष्टीला आनंदाचे उधाण आले.

या मंगल घटकेची नोंद घेताना एक तारा अवकाशातच थबकला. बाल ख्रिस्ताच्या रडण्याच्या पहिल्या सुराने बेथलहेमच्या माळरानावरील भयाण शांततेचा भंग झाला. बाळाचा विलाप आणि मरियामातेचे अंगाईगीत ऐकून शेताशिवारातून मेंढपाळ धावले. साधेभोळे, गरीबगरजू, शोषित, गावकुसाबाहेर वस्ती करणारे मेषपाल. तसेच, दूर देशातून ज्ञानी राजे आले. ग्रहगोलांच्या हालचालीचे सूक्ष्म निरीक्षण करणारे, विज्ञानाची कास धरणारे खगोलशास्त्रज्ञ. त्यांच्या कानी ते सुर पडले. सत्याच्या शोधासाठी त्यांनी प्रस्थान मांडले. त्यांची पावले गोठ्याजवळ थांबली.

त्या विनम्र शोधकांना गव्हाणीत काय आढळले? गवताच्या गादीवर शांतपणे पहुडलेलं एक राजस बालक, त्या कोवळया अर्भकाच्या भुवयावर विसावलेले दिव्य वैभव आणि त्याच्या चेहऱ्यावर अनुपम तेजोवलय. पाडस डोळ्यांच्या त्या देवपुत्राला पाहून त्यांचे हात आपोआप जुळले गेले आणि मुखातून शब्द निघाले, "इम्मानुएल - देव आमच्या संगती आहे !"

नवजात बालक विश्वाच्या पोकळीत जन्म घेत नाही, ते जन्मते मानवतेच्या भरल्या, नांदत्या कुटुंबात. विश्व-कुटुंबाचे ते एक घटक बनते. मानवी जीवन म्हणते नाते संबंधाची एक अखंड मालिकाच. स्नेहबंधाचे जरतारी वस्त्र. धाग्यात धागा गुंतलेला. अस्तित्ववादी म्हणतात, "टुबी इज टुबी रिलेटेड." जीवन म्हणजे नाते संबंध आणि सर्वांत सुंदर, सर्वांत मंगल नातेसंबंध देवाबरोबरचा. तो जुळवला त्या अमृतपुत्राने. अनेक नात्यानी माणूस परस्पराशी निगडीत असला तरी खोल अंतरी तो एकटाच असतो. विश्वाच्या विराट पसाऱ्यात आणि गजबजलेल्या घरातही निष्पर्ण वृक्षावरील एकटया दुकटया पक्षाप्रमाणे माणूस एकटा असतो. पण एकटे असणे वेगळे आणि एकाकी असणे वेगळे. एकटेपणामुळे मिळणाऱ्या एकांतात प्रतिभावंताच्या प्रज्ञेला बहर येतो. कवी कलावंताना नव्या निर्मितीची प्रेरणा मिळते. एकाकीपणा मात्र महाभीषण. मेषपाल आणि ज्ञानी राजे एकांताचे आस्वादक. चिंतांनामुळे त्यांना अंत:प्रेरणा झाली. पलीकडच्या पर्वताआड उगवलेल्या 'सूर्यापूत्राची' चाहूल त्यांना सर्वप्रथम लागली.

मेषपालांना आणि ज्ञानी राजांना बाळख्रिस्ताचे दर्शन घडले. माणसामधील दोन मूलभूत प्रवृत्तीची ही दोन प्रतिके. चिकित्सक, अभ्यासूवृत्ती आणि साधाभोळा श्रद्धाभाव यांची भेट झाली बेथलहेमच्या गुहेत.

विद्वानांना ज्ञानियाचा राजा भेटला, मेषपालांना भक्तीच्या भुकेल्या भगवंताचे दर्शन घडले - एका असहाय्य, दुर्बल, दारिद्रय रेषेखाली जन्मलेल्या बालकात. त्या बालदर्शनाने, त्यांच्या हृदयात श्रद्धेचे दीप प्रज्वलित झाले. त्यांच्या आनंदाला भरते आले. त्यांच्या चितवृत्ती खुलल्या, फुलल्या. जगी आलेले मुर्तीमंत प्रेम पाहून, "मम झाले, मन धाले" अशी त्यांची अवस्था झाली. श्रद्धेचे फळ त्यांना पाहायला मिळाले, याचि देही याचि डोळा.

श्रद्धाविहीन माणूस खूप खूप एकाकी असतो. त्याच्या डोक्यावरचे छप्परच जणू कुणी विस्कटून टाकलेले असते. तो वर पाहू शकत नाही. हात जोडू शकत नाही. जगायचं का आणि कशासाठी यांच्या भ्रांतीत तो भोवंडून गेलेला असतो. एकाकीपणाची शून्यवत पोकळी त्याला खायला उठते. किर्केगाडने म्हटले आहे की हाडाच्या नास्तिकवाद्यापुढे आत्महत्या हाच एक पर्याय उरतो !

पण श्रद्धावंताचे तसे नसते. अस्तित्वाच्या मूलस्तोत्रावर ज्याची निष्ठा असते, जीवनातील श्रेयस आणि प्रेयस यांच्यावर ज्याचा विश्वास असतो, सत्यं, शिव आणि सुंदरमवर ज्याची श्रद्धा असते असा माणूस एकटा असला तरी एकाकी नसतोच. चालविशी हाती धरोनिया असा प्रत्यय त्याला येत असतो.

बुध्दीवाद आणि श्रद्धा या दोन पंखच्या बळावर, रिचर्ड बाखच्या समुद्रपक्ष्याप्रमाणे, माणूस अनंत अवकाशात भ्रमण करू शकतो. सूर्यबिंब भेदण्यासाठी झेप घेऊ शकतो. निखळ बुध्दिप्रामाण्याचा वसा पुरेसा नाही. त्यातून आत्मप्रौढीचा असुर जन्माला येण्याची जास्त शक्यता. तसेच, केवळ भाबडी श्रद्धा असली तरीही अनर्थ घडू शकतो व श्रद्धेलाच मग सती जावे लागते.

श्रद्धेला चिकित्सकपणाचे कोंदण हवे आणि बुद्धिवादाला श्रद्धेची साथ. Fides Quaerens intellectum म्हणजे बुद्धिवादाच्या शोधात श्रद्धा असा विचार महान ख्रिस्ती धर्मपंडित मांडतात. श्रद्धा आणि बुद्धिविलास, तसेच धर्म आणि विज्ञान यांची क्षेत्रे वेगळी असली तरी त्यात द्वैत नसावे. प्रभूख्रिस्ताचे एक वचन आहे, "निर्मळ नजरेचे परमसुखी, त्यांना देवांचे दर्शन घडेल." जीवनाच्या प्रवाहात आपली नजर अनेकदा दुषित होते, अंधुक बनते. ग्रह, आग्रह, दुराग्रह, पूर्वग्रह, भीती, संशय यांच्या प्रचंड ओझ्याखाली माणूस दडपला जातो. भूतकाळाची भीती आणि भावीकाळाची विवंचना याच्या कात्रीत माणूस साापडतो. लहान बालके या सगळ्यापासून दूर असतात. त्यांची नजर स्वच्छ असते.

ती जीवनाचा खरा आस्वद घेऊ शकतात. म्हणूनच ख्रिस्त म्हणाला, की तुम्ही बालकासारखे झाल्याशिवाय तुम्हाला स्वर्गराज्यात प्रवेश मिळणार नाही. देव असून तो स्वत: बालक झाला. जे. कृष्णमूर्तींनी सांगितलेली एक गोष्ट. एक गुरू दररोज आपल्या शिष्यांना प्रवचने द्यायचे. एकदा ते प्रवचनासाठी उभे राहिले असता जवळच्या झाडावर एक पक्षी येऊन बसला व त्याने सुर लावला. मनसोक्त गायल्यावर तो क्षणभर थांबला आणि मग उडून गेला. गुरु म्हणाले, "आजचं प्रवचन संपलं"

आपण सारे प्रवाशी तिमिरातून तेजाकडे प्रवास करणारे. आपल्या उरावरची मणामणाची ओझी आणि बेथलेहेमच्या गुहेपाशी एक स्वप्न गव्हाणीत पहुडलेलं जीवंत प्रवचन होऊन, त्याचे गीत गाण्यासाठी आपल्यालाही नवा सुर लाभू दे !

# स्मृतिलुब्ध आठवणी

**■ जोसेफ तुस्कानो, बोरीवली (प)**

*आपल्या समाजाचे मानबिंदू आणि स्फूर्तीस्थान असलेले आणि ९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आलेले फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांच्या काही सुखद, मैत्रीपूर्ण आठवणी संपादकाच्या विनंतीनुसार उधृत करत आहे.*

१९७४च्या सप्टेंबरमधली ही गोष्ट आहे, तेव्हा तरुण फादर फ्रान्सिस श्रीरामपूरच्या सोशल सेंटरमध्ये कार्यरत होते आणि फा. आब्रिओ (नंतरचे बिशप) संपादित करत असलेल्या 'सुवार्ता' मासिकात टोपण नावाने (विनय वसईकर) लिखाण करत. एकदा त्यांनी एक हृदयस्पर्शी कथा लिहिली होती. एका मुलानंतर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केलेल्या तरुण जोडप्याची शोकांतिका त्यात मांडली होती. तेव्हा, मी आणि जिवलग मित्र, रिचर्ड नुनीस(पाली/ मेलबर्न) आम्ही फादरांना हुडकून काढले होते. त्यावेळी फादरांनी लगोलग प्रतिसाद देणारे नि आश्वस्त करणारे पत्र लिहिलं होतं.....

'२३-०९-७४

प्रिय ज्यो,

तुझं पत्र मिळालं. प्रथम ओळखच पटली नाही. तू ओळख दिली आहेस, तरी अजून चेहरा डोळ्यासमोर येत नाही. हरकत नाही, एक दिन मिलेंगे. पत्र अगदी सुंदर लिहिलं आहेस, अगदी लेखकासारखे, अभिनंदन, keep it up.

तुला लिखाण करण्याची आवड आहे असं म्हणतोस. फार छान ! खूप खूप लिखाण कर. सध्या तू सेकंड ईअरला आहेस, अजून अभ्यासाचा खूप मोठा टप्पा पुरा करायचा आहे, तेव्हा तुझे प्रथम कर्तव्य अभ्यास आहे......'

तिथून आमच्या मैत्रीचा सिलसिला सुरू झाला होता.

###

अगदी प्रारंभापासून फा. दिब्रिटोंना समाजातील तरुणाईबद्दल तळमळ व आस्था होती. आपल्या व्यस्त जीवनातून वेळ काढून ते होतकरू तरुणांना पत्रे लिहीत व त्यांचा हौसला बुलंद करीत. प्रसंगी, कान पिचक्याही देत तसेच मदतीचा हात पुढे करत, याचा अनुभव मी स्वत: घेतला आहे.

मी एम. एस्सीला प्रवेश घेतला तेव्हा त्यांनी २८ ऑक्टोबर १९७६ला पत्र पाठवून माझा हौसला वाढवला होता. :

'तुला एम. एस्सीला प्रवेश मिळाल्याची बातमी रिचीकडून कळली. अभिनंदन. या परीक्षेत तू फर्स्टक्लास मिळवलास तर तूला मी फर्स्टक्लास बक्षीस देईन. By The Way, तुझ्या खर्चाचं कसं काय चाललंय? पैशाकरीता काही अडू देऊ नकोस, तशी अडचण असेल तर कळवावे, निसंकोचपणे...'

###

निखळ मैत्रीच्या प्रेमाने ओथंबलेली त्यांची येणारी पत्रे तेव्हाच्या आम्हा तरुणाईला खूप प्रोत्साहीत करत. २७ ऑक्टोबर १९८३चे त्यांचं पत्र बघा :

'सुवार्तेच्या, तुझ्याकडून खूप खूप अपेक्षा आहेत. तू सुवार्तेचा खास लेखक आहेस (आणि गौरवसुद्धा ! )

मी खाऊन पिऊन दालमेद (as they say in Gass). काम खूप आहे पण तुमच्यासारखी माणसं अवतीभवती आहेत हाच आनंद आहे. तुझ्या गुलाब फुलाला आमचा सलाम !'

###

१९८०च्या ऑगस्ट महिन्यात माझे पितृछत्र हरपले तेव्हा फादरांचे जर्मनीहून पत्र आले :

'तीर्थरुप वडलांच्या निधनाची दुख:द बातमी कळली. हे दु:ख काय असते याची मला कल्पना आहे. महिन्याभरापूर्वी तू मला त्यांच्या आजाराविषयी माहिती दिली होती व त्यावेळी मी तुला लिहिलेलं पत्र आठवत असेलच, तेव्हा असे काही unthinkable घडेल असं वाटलं नव्हतं.

पण वस्तुस्थितीचा स्वीकार करायला हवा. खूप मोठी जबाबदारी तुझ्यावर येऊन पडलीय, तिचा प्रेमाने स्वीकार कर. लिखाण चालू आहे का ? रिची भेटला होता का ? मी उद्यापासून व्हिएन्नामार्गे रोमला निघत आहे. आपली भेट (पत्ररूपाने) रोमला.'

###

फादरांनी मला नि रिची (रिचर्ड)ला पाठवलेली पत्रे आमच्यासाठी ठेवा आहे. कधी 'उदास गमते' तेव्हा मी ती पत्रांची जुनी फाईल काढून बसतो. तारुण्यातच स्मृतिलुब्ध आठवणी मैत्रीचा खळखळता निर्झर होऊन मन:पटलासमोरून अवखळ वाहत जातो. विमनस्क मन शांत होते कारण फादरांच्या विचारांतील आपुलकीची जादू मन पुन्हा पुन्हा भारून टाकते. तो एक मंतरलेला प्रलय असतो, एवढं मात्र नक्की !

'सुवार्ता'त मालिका रुपाने प्रसिद्ध झालेले 'परमाचार्य पोप' हे माझं पुस्तक २००० साली प्रकाशित झाले होते. ते मी फादरांना अर्पण करत म्हटलं होतं

***मित्रवर्य रे. फा. फ्रान्सिस दिब्रिटो***

***सतत अस्वस्थ ठेवणाऱ्या***

***तुमच्या शाबासकीला... !***

त्यांचा त्वरीत कृतज्ञताभरा प्रतिसाद पत्रारुपाने मिळाला :

‘प्रिय ज्यो, ‘आपले पोप’ हे पुस्तक मला समर्पित करून तू मला प्रेमाचा जबरदस्त धक्का दिला आहेस. आपली मैत्री खूप जुनी आहे, तेव्हा ‘आठवर’ होतो, म्हणून तुम्हाला (रिचर्ड व तुला) खूप खूप लिहिले. आता संसार वाढले आहेत. कधी कधी एकाच वेळेला दोन दोन संसार करावे लागतात.

तू बहूप्रसव झाला आहेस. किती लिहितोस, अभिमान वाटतो तुझा, आता महत्वाचं – महिन्यातून दोन दिवस घराबाहेर पडायचं- पुण्याला वगैरे. – वर्षातून १५ दिवस थंड हवेच्या ठिकाणी रजेला जायचं हे प्रॉमिस देणारं पत्र लगेच पाठव. गुलाबला व मुलांना आशीर्वाद

आपला

फ्रान्सिस’

फादरांचं हृदय सानेगुरूजींचं आहे. मुलांवर संस्कार होण्यासाठी ‘सुवार्ता’चे संपादक असताना चांगलंचुंगलं बालसाहित्य ते पेश करत. त्यासाठी माझ्यासारख्या मित्रांना ते ‘फतवे’ धाडीत. बालविज्ञान कथा, ललित , बालकथा, तसेच लाकडी बाहुला, परमाचार्य पोप, the little scientist, Gonsalo Garcia अशा मालिका माझ्याकडून त्यांनी लिहून घेतल्या. याबाबतीत त्यांच्या दूरदृष्टीला आणि समाज घडणीला तोड नाही.

फादर जरी आध्यात्मिक नेते असले तरी त्यांची विज्ञाननिष्ठा देखील प्रखर आहे. हरित वसईला वाचविण्यासाठी त्यांनी त्यामुळे कंबर कसली होती.

###

हरित वसईचा पहिला अभूतपूर्व मोर्चा १ ऑक्टोबर १९८९ रोजी काढला गेला होता. त्यानंतरची आंदोलने सर्वश्रूत आहेतच. पण हा मोर्चा आटोपला तेव्हा फादर, दादा (मार्कूस डाबरे), सायमन (मार्टीन) आम्ही काही मंडळी जीवन दर्शन केंद्रात, ‘सुवार्ता’च्या कार्यालयात विचारविनिमय करत बसलो होतो. तेव्हा थकले भागले फादर म्हणाले : ‘मुलीला सासरी पाठवल्यागत कसं एकाकी नि सुन्न वाटतंय...’

हरित वसईचं आंदोलन त्यांना लेकीसारखं वाटत होतं, हेच खरं !

# फा. फ्रान्सिस दिब्रिटो - सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्व

■ संदीप राऊत, वसई

फादरशी न माई वळख साधारणपणे 1982 साली जाली. माना माय मित्रान सुवार्ता माशिका ऑफिस मनद नेलं. तटे फादर भवलते. फादरजून माई चौकशी केली. माला ईसारलं, ‘तुला वाचनाय आवड हय का? तू काय वाशिते? तू काय करते? त्याअर मी मा जक्ल हांगतलं. मी तवा मा कॉलेजचं शिक्षण खपवून नोकरीला लाग्लता. माना पण वाचनाबिचनाइ आवड होतीस. त्यास काळात फादरजून पण सुवार्ता या संपादक पदाई सूत्र घेतलती. मदनंमदनं हीनवारा नयते हुटीया दिया मी जासा केंद्रात. का कोण जाणे पण फादर पण माना बारीक सारीक लिहणं बिहणं काम देऊ लागले. लेखाई प्रूफ तपासाला देऊ लागले. एकदा त्याईन, ज्या मित्रान माना तटे केंद्रात नेलं त्याला फादरजून हांगतलं की, अरे, ह्याला होडू नको हं! ह्याला साहित्याई आवड आहे.

१९८३ साला सुवार्ता मेळावा घ्यायसा ठरला. तवा माई पण कटे कटे वळखी होत्या. माये डॉ. पालव म्हणून मित्र व्हते. त्या वळखीअरनं मीन गोव्यातशे शिक्षणमंत्री डॉ. गोपाळराव मयेकर ह्यांना फादरशा हांगण्याअरनं त्या मेळाव्यात व्याख्यान द्यायाला वार्तलं. टो सुवार्ता मेळावा गिरिजच्यास सेंट झेवियर चर्चच्या सभागृहात घेतलता. त्या मेळाव्यात डॉ. गोपाळराव मयेकर याई ज्ञानेश्वरीवरती व्याख्यान दिलतं. त्यास मेळाव्यात संत साहित्याय अभ्यासक डॉ. यु. म. पठाण याईपन संत वाङ्मयार व्याख्यान दिलतं. या जकल्या आठवणी माया अजून समोर हत. ये जक्लं फादरमुळेस घडून आलतं. चर्चमंद ज्ञानेश्वरीअर व्याख्यान इ गोष्ट त्या काळात जरा दुर्मिळस व्हती. पण ख्रिस्ती धर्म पण किती सहिष्णू हय त्ये त्या उदाहरणातनं दिखून आलं. तवाशा बिशप हाऊसशी पण परवानगी व्हती. तवापासुन सुवार्ता मेळावा म्हंजे उत्तमोत्तम व्याख्यानाई मेजवानी देणारी पर्वणी ठरू लागला. फादरशा काळात कोणकोण बडी मंडळी व्याख्यान देऊन गेली. राम शेवाळकर, डॉ. अभय बंग, शिवाजीराव भोसले, यशवंत पाठक, डॉ. अनिल अवचट. कवडी नावं घ्याअशी. आज जो फादरना उस्मानाबादशा ९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना अध्यक्ष पदाआ मान न जबाबदारी दिली गेलेअ त्याई बीजं नं सुरवात त्यास काळापासून जाली अहेल अहयं माला वाटते.

त्यास काळात फादराअ लेखनपण बहरत याअला लागलतं. ‘ओॲसिसच्या शोधात',पोप जॉन पॉल, दैनिक सकाळ अहया पेपरातनंत्याई खूप लेखन केलं. आपलं धर्मगुरू पदाअ काम हंबाळून त्या पदाअर नं कामाअर कोहणास अन्याय नं करता ते सामाजिक कार्याकरता ते रस्त्याअरटी उतरले. आज जी वसई हिरवी दिखते ती त्या हारक्या माहणा प्रयत्नामुळेस. हरित वसईत संरक्षण समितीया माध्यमातनंत्याई वसईत ३० वहरापूर्वी क्रांतीस केलती. त्या काळात एक मोठ्ठा मोर्चास त्याई काडील्ता. त्यांना धमकी भिम्कियें फोनपण याशे. त्याअर एकदा मीन त्यांना हांगतलं की, 'फादर तुमाना घबरा नय वाटे का?' त्याअर ते बोलले की, 'मी मरणाला घबरे नय. ख्रिस्तानं माया खांद्याअर खुरूस दिलाय मंग मी क्याला आनं कोणाला घाबरू?' फादरचं हे वाक्य मालापण प्रेरणा देऊन गेलं. माला वाटते खऱ्या अर्थानं फादर "मासे नय पण माणसे धरणारा माहणू हय."

फादरशा मेरे म्हाहण कमावने पक्की खुबी हाय. एकदा त्याई म्हाहणू पकडीला का त्या हातसा तो म्हाहणू हुटाचास नय. केवळ वसईचस नय पण जगभरात त्याई सगे होयरे हत. महाराष्ट्रात तुमी कटेइ कोहण्याइ मोठ्या म्हाहणा मेरे जा नं हांगा वसईतनं आलाय. त्याअर ते हांगतील अरे मंजे ते आमशा फादर दिब्रिटोअ गाव. ये जकलं धन फादरजून आपल्या कर्तृत्वान कमावून ठेअलाय. फादर चतुरस्त्र व्यक्तिमत्व हय. त्याअ वक्तृत्व, लेखन, समोरशा व्यक्तिअरी संवाद सादण्याई कला, त्याआ शेअऱ्याअरसा विद्वत्त तेज ये जक्लं त्याअ मोठपण हांगून जाते.

फादरशी बीजी एक गोष्ट माला हांगाशी हय. मायी पोरी बारकी ओथी नं आमी फादरना भेटाला त्याआ संपादक काळात जीवन दर्शन केंद्रात जाशे. एकदा फादर बोलले, मी आता शार मयने तुमाला दिखासा नय, मी सालला इटलीला त्याअ बोलणं माया पोरीनं आयकिलं नं ती रडाला लागली. फादरला पण जरा गलबळूनस आलं. फादरजून पुडे काय करावं, इटलीतनं आल्यार त्याई त्याअ सकाळ पेपरशा सदरात 'शर्वरीचे अश्रु' अहया लेख लीइला. अहे ये फादर. फादरशा आयुष्यात सुखदु:खाआ बऱ्यास गोष्टी घडल्या. त्या गोष्टी त्याई आपल्या आत्मचरित्रात मंजे "नाही मी एकला" ह्या पुस्तकात हांगतल्यात. त्याटनं आपल्याला कळते हयो म्हाणू अवडा मोठा हय. बऱ्याचदा त्याला प्रॅक्टिकल वागाला लागते. धर्मगुरू म्हणून नं समाजधुरीण म्हणून कठोर रयाला लागते. तरीपण हयो माणू अंतरमनातनं कवडा संवेदनशील हय ये मा हारका अनेकाइ अनुभवलं हयेल. फादरशा डोळ्यात बऱ्याचदा मीनं अश्रु आलेले पाहिल्यात. फादर कोहणीस गोष्ट आयकिली न बीज्या कानानं होडून दिलं अहयं करीत नय. त्या गोष्टीअर गंभीर होऊन इसार करतात. फादरशी प्रवचनं न त्याई भाषणं वक्तृत्व आयकीणं यो एक अनुभवस अते. भाषण करण्या आदी फादर त्या विषयासा कवडा अभ्यास करतात ते मी मा डोळ्यांनं बगिले. फादरसा अजून एक गुण माला आवडते. तो अहया की एखाद्या गोष्टीसा संदर्भ त्यांना माइती नयेल ते, आपल्याला इसारतील की बाबा ये म्हंजे काय? ते म्हंजे काय? ये इसारण्यात त्यांना कव्वास कमीपणा वाटे नय.

आपल्या घरातला म्हाणू कवडा मोठा हय, ये त्या घरांच्या जकल्यास लोकांना कळेल अहयं नय. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाये अध्यक्ष म्हणून त्याई निवड जाली यो केवळ वसईकराया अभिमानाआ विषय न्हवून अखिल सारस्वताआ न भागवत धर्माआ अभिमानाआ विषय हय. त्यहया इसार कराला गेलं ते मराठीकरता न संतसाहित्यकरता वसईशा धर्मगुरूइ योगदान दिले. वसईचे आजचे आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो याइते ज्ञानेश्वरीअर PH. D. केलेय. ख्रिस्तपुराणकार फा. थॉमस स्टीफन्स याअ ख्रिस्तपूराण म्हंजे ज्ञानेश्वरीस हय. फा. नेल्सन फलकाव याइ ख्रिस्तपुराण सुबोध करून दावडिले. जये फा. दिब्रिटोइ बायबलसा सोप्पा अर्थ हांगातला. या लेखा निमितान माला अटे एक गोष्ट नक्की हांगाशी हय की वसईतस सर्वधर्म मैत्री आयोग इ चळवळ आर्चबिशप डॉ. फेलिक्स मच्याडो याईनस यशस्वी करून दावडिले, न पोपमहाशया संदेश जनमानसात रूजविला हय. आतापर्यंत इ जी परंपरा सालत आले, त्याये टप्पे म्हंजे फा. थॉमस स्टीफन्स, बाबा पद्मनजी, रेव्ह. नारायण वामन टिळक न आताया काळातशे जक्ले धर्मपंडित या जकल्या प्रतिनिधित्व करणारे आदरणीय रेव्ह. फा. फ्रान्सिस दिब्रिटो अहयस माला हांगाव अयं वाटते.

फादरबद्दल लिआवं तवडं कमीस हय. एका लेखात मावणारा तो म्हाणू नय. तवा फादरशा पुडशा वाटचालीला सुभेच्छा देवून न ख्रिस्तायन या अंकाला पण शुभेच्छा देवून यो बोलीभाषेसा लेख आवरता घेते.

# पांडुरंगच माझा !

■ सोनल जोसेफ डिकुन्हा, ९८९२७०६०१०

१० ते १२ जानेवारी २०२० दरम्यान धाराशिव, उस्मानाबाद येथे ९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन रंगणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी आपले वसईकर फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांची निवड झाल्याचे आपण सर्वच जाणून आहोत. ही आपल्यासाठी अभिमानाबरोबर माझ्या बालपणीच्या साहित्य चळवळीची आठवण जागृत करणारी आहे. आमचे वडील स्व. जोसेफ डिकुन्हा यांना अलीकडेच देवाज्ञा झाली. या निमित्ते त्यांच्या साहित्य तसेच कला क्षेत्रातील कार्यावर पुस्तकरुपी आठवण जपण्याचा आम्ही प्रयत्न केला. त्या निमित्ते वडिलांच्या संग्रहातील अनेक साहित्यिकांची त्यांनी निर्मिती केलेली पुस्तकं तसेच त्यांनी साकारलेली मुखपृष्ठे जवळून अभ्यासण्याची संधी मिळाली. यात प्रामुख्याने वसईचे ख्रिस्ती मुखपत्र 'सुवार्ता' हे अगदी लहानपणीच्या पाटीवर कोरलेल्या आठवणीतील एक.

सध्याच्या आधुनिक संगणकाच्या जगात जी प्रकाशन क्रांती प्राप्त झाली आहे ती तितकीशी १९८०च्या काळात नव्हती. मुंबईहून अक्षरजुळणी केलेले साहित्य वसईला आणून ते तपासणे, पुन्हा चुका असतील त्या दुरुस्त करण्याकरिता मुंबई गाठणे ही साहित्य चळवळ सुरूच असायची. त्यातच महिनाअखेर अंक निघालाच पाहिजे ही 'डेड लाईन' असल्याने अनेकवेळा कटिंग पेस्टिंग करून इकडंच साहित्य तिकडे करण्याचा प्रयोग हा आमच्या घरातच रात्रभर होत असल्याने फा. दिब्रिटो यांचं एक वेगळच आकर्षण असायचं. पूर्ण दाढी (पुढच्या काळात फ्रेंच दाढी) असलेला एक सडपातळ माणूस, त्यांच्या मांडीवर 'पांडुरंग...पांडुरंग' बोलत - खेळवत माझे गाल खेचून लाड करणारा हा माणूस धर्मगुरू आहे इतकं समजण्याची मला 'अक्कल' नक्कीच नव्हती. पण जस-जसा मोठा होत गेलो तस-तसा हा इसम कुणी मोठी हस्ती आहे हे समजायला लागले होते. तपकिरी झब्बा व झोळीमधला हा माणूस सामान्य नसून क्रन्तिकारी आहे हे त्याच्या चालण्यावरून लक्ष्यात यायला लागलं होतं. अनेक क्रन्तिकारी मोहिमेत आपलं सुरक्षित असं हक्काचं घर आमचं घर हे त्यांना वाटत असल्याने त्यांचा सहवास अगदी जवळून लाभला तो साहित्याकडे ओढणारा ठरेल हे कधी स्वप्नातही वाटलं नव्हतं. सुरक्षा कवच त्यांच्या भवती होती पण निवडक लोकांबरोबर वडिलांनाही त्यांना सरळ भेटण्याचा प्रवेश होता, त्यांच्या हातात माझा चिमुकला हात, त्यांच्या तणावपूर्ण कार्यालयत प्रवेश करताना आजही स्मरणात आहे.समोर हसणारा दयानंद भोसले - सच्चा साथी दिसत आहे. तरीपण फादरांची हास्य चेहेर्यानं 'पांडुरंग...पांडुरंग' बोली आजही कानी आहे. या क्रांतिकारी माणसानं भ्रष्टाचार, अन्याया विरुद्धात लढण्याचं, आवाज उठवण्याचं शिक्षण ह्याच कोवळ्या वयात दिलं.

समज आली, वडिलांच्या व्यवसायात आलो, जाहिराती साकारू लागलो तर फादरांचा वडिलांना फोन. सोनलला पाठव. दिलेल्या वेळेवर त्यांच्या कार्यालयात पोहोचलो. ‘आपलं टू कलर काम असतं पण त्याला

फोर कलर इफेक्ट आला पाहिजे, साकार मुखपृष्ठ.’ वेळ कमी होता पण त्यांनी दाखवून दिलेला विश्वास काहीही झालं तरी पडू द्यायचा नाही हा मनी निश्चय होता. साकारलं पहिलं मुखपृष्ठ. वडिलांना फोन आला, 'पांडुरंगाने तुझी कला घेतली आहे' या वाक्याने जीवन परिवर्तनाचं झालं.

त्याकाळातील अनेक आठवणी आहेत पण एप्रिल २००५ मधील पोप जॉन पॉल द्वितीय यांच्या निधनाचा तो क्षण न विसरण्यासारखा आहे. येणारा अंक त्यांना समर्पित करण्यात आला होता. इतक्यात नवीन पोपची अधिकृत घोषणा झाली. सकाळी ०३.३०च्या सुमारास फादरांचा फोन. 'पांडुरंगा उठ, पोप बेनेडिक्ट सोळावे यांची नेमणूक झाली आहे. पूर्ण अंक बदलायचा आहे. रंगीत पानं तू बघणार. कामाला जायचे नाही. सर्व जमा कर व सरळ ये कार्यालयात'. तेव्हा वसईत इंटरनेट क्रांती इतकी 'फास्ट' नव्हती तरी पण जे मिळालं त्यातून दोन्ही पोप महाशयांचा जीवन प्रवास दर्शविणारा सुंदर स्मरणीय अंक साकारण्यात आला. 'पांडुरंगा, यू आर मय प्रॉमिसिंग बॉय.' या वाक्याने वेळ, त्याचा खरा उपयोग व दिलेले वचन पाळण्याची सवय त्यांनीच मला लावली. पुढे त्याच्या पुस्तकांचीही मुखपृष्ठे साकारण्याचं भाग्य लाभले.

इतिहासाचे चक्रही कसं असतं बघा. १९७५ला आई-वडिलांच्या लग्नप्रसंगी ज्यांनी आशीर्वाद दिले त्यांची बदली सांडोर चर्चला बरोबर माझ्या लग्नावेळी झाली, अर्थात आशीर्वादही त्यांनीच दिला व काळाचं चक्र पुन्हा फिरू लागलं. 'सांडोरला आलोय, आता इथे मिळून काम करायचं.' या फादरांच्या वाक्यावर मी आधीच नमूद केलं होतं 'इकडचं वातावरण थोडं वेगळं आहे, इकडे आपल्यामध्ये ‘त्यांच्या’ हितासाठी फूट पडणारी काही स्वार्थी लोक आहेत.' आणि तेच झालं. मतभेदातून थोडा दुरावा झाला पण मन व नातं या प्रकरणाने आम्ही कधीच वेगळं होऊ दिलं नाही. म्हणूनच वाढणाऱ्या पिढीला फा. दिब्रिटो यांचं आकर्षण व सहवास लाभला. आमच्या जॉनाथनला तर लहानपणी मिस्सावर फा. दिब्रिटो बरोबर आणखी तीन धर्मगुरू मिस्सा साजरी करतांना दिसले तर हा चिमुकला भर मिस्सामध्ये किंचाळत सुटला "चार चार दिब्रिटो, चार चार दिब्रिटो." आमच्या मुलांची नावं त्यांनीच सुचविलेली. समाधान व आनंद आहे वाढणाऱ्या पिढीला त्यांची ओळख आहे. आई-वडिलांमुळे संबंध 'दिब्रिटो' परिवाराशी नातं कुटुंबीयांसारखेच आहे. सुख-दुःखात साथ देणारे हक्काचं हे नातं पुढेही टिकून राहणार याला उगवता सूर्य साक्षीला आहे.

१७ फेब्रुवारीला फा. दिब्रिटोंच्या पुस्तक प्रकाशन सोहळयास जाण्याच्या तयारीत असताना बाबाना अस्वस्थ वाटू लागले, त्यांच्यावर एंजियोप्लास्टी करण्यात आली. माझ्या प्रत्येक कार्यात जे जोडपं असायचं, त्यांना आग्रहाचं आमंत्रण करूनही ते उपस्थित नाहीत या विचाराने फादरांना थोडं आश्चर्य वाटलं. पण त्यांना जेव्हा हे कळले त्याच रात्री १० वाजता फादर वडिलांच्या भेटीला आले. इतकं 'बॉण्डिंग' आमच्या परिवाराशी त्यांचं आहे. ती भेट त्यांची शेवटची ठरली - काही दिवसातच वडिलांना देवाज्ञा झाली, आमच्याबरोबर फादरही सुन्न झाले. आता वेळात-वेळ काढून ते त्यांच्या हक्काच्या घरी येऊन नातवंडांना आजोबांची निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न करीत असतात. इतिहास चक्रात जे मला मांडीवर घेऊन खेळणे असायचे ते आता चारही नातवंडं घेऊन करीत असतात. जगासाठी ते संमेलनाच्या अध्यक्ष असतील पण माझ्यासाठी ते माझे 'पांडुरंगच' आहेत.

# ख्रिस्तजन्म कोणासाठी आणि कशासाठी ?

■ फा. (डॉ.) रॉबर्ट डिसोजा, पसायदान, नाळे

संत फ्रान्सिस डिसेल्स ह्यांनी संत जेन डी शांटाल हिला लिहीलेल्या पत्रात म्हटले होते की, ‘‘बेथलेहेमच्या रानात रात्रीच्या वेळी मेंढपाळ आपली मेंढरे राखीत बसलेले होते त्यावेळी त्यांच्याभोवती अकस्मात मोठा प्रकाश झळकला. प्रभूचे तेज त्यांच्याभोवती पसरले. त्यांना देवदूत दिसला. त्यांना मोठी शुभवार्ता कळली. काही वेळातच त्यांना स्वर्गीय संगीत ऐकू येऊ लागले. मात्र येशूबाळ कुठे होते? ते त्या झगमगाटात नव्हते, ते त्या सुमधुर संगीतात नव्हते ते तर पहुडले होते एका गाईच्या गोठ्यात, काळोखात, थंडीत कुडकुडत आणि अश्रूभरल्या नयनांनी रडत. जेन, यावरून एक गोष्ट लक्षात घे, तू कुठे शोधतेस येशूला? रंगीबेरंगी उजेडात की काळ्याकुट्ट काळोखात ? श्रीमंतीत की गरिबीत ? ऐषारामात की दु:ख-कष्टात ? सुखासीनतेत की हाल-अपेष्टांत ? जवळच्या माणसात की परक्यात ?’’

संत फ्रान्सिस डिसेल्स ह्यांच्या या विचारांचा धागा पकडून यंदाचा नाताळ साजरा करीत असताना स्व:ताला प्रश्न विचारू या, ख्रिस्त कुठे आहे ? तो कोणासाठी आला ? मी कोणासाठी जगतो? कशासाठी धडपडतो? मला सापडलाय का तो ख्रिस्तबाळ ? पहिल्या ख्रिसमसच्या रात्री शेकोटीभोवती शेकत असलेले मेंढपाळ धावत निघाले व बेथलेहेमच्या गोठ्यापाशी पोहोचले तेव्हा कुठे त्यांना खिस्ताचे दर्शन झाले. याचा अर्थ ख्रिस्ताचे दर्शन घेण्यासाठी या जगातील ‘ऊब देणाऱ्या शेकोट्यां’चा त्याग करायची तयारी ठेवायला हवी.

## ख्रिस्त गरिबांसाठी आला

ख्रिस्तजन्माची पहिली शुभवार्ता गोर-गरीब मेंढपाळांना देण्यात आली, असे आपण लुककृत शुभवर्तमानात वाचतो. मात्र ख्रिस्त केवळ त्याच्या जन्माच्या वेळीच गरिबांचा विचार करीत नाही. तो आयुष्यभर गरिबांच्या बाजूने पसंतीचा कौल देत राहिला. त्याच्या पहिल्या प्रवचनातील पायाभूत शब्द होते : परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे आणि दीनांस शुभवार्ता देण्यासाठी त्याने मला अभिषेक केला आहे.’’ आयुष्यभर तो दीन-दलितांची सेवा करण्यात मग्न राहिला. रंजले-गांजलेले, मेंढपाळ नसलेल्या मेंढरांसारखी ज्यांची गत झालेली होती असे भुकेने कासावीस झालेले लोक पाहून त्याला त्यांचा कळवळा आला. ‘ जे दीन ते धन्य !’ अशी त्याची धारणा होती म्हणूनच की काय तो एका गरीब सुताराच्या घरी ‘दीन दासीच्या’ पोटी जन्माला आला.

पोप फ्रान्सिस ह्यांची पोपपडी निवड झाली तेव्हा त्यांच्या शेजारचे कार्डिनल त्यांच्या कानात कुजबुजले, ‘‘गरीबांना विसरू नका’’ म्हणून दिनांचा कैवारी असिसीचा संत फ्रान्सिस ह्याचे नाव घेतले. यंदाचा नाताळ साजरा करीत असताना आपण गोरगरिबांची, मिशनची, संत विन्सेंट डी पॉल संस्थेची, विधवा संघटनांची, अनाथाश्रमांची, भिकाऱ्यांची, कुपोषित बालकांची आणि आपल्या शेजारच्या गरिबांची आठवण ठेवणार आहोत का?

## ख्रिस्त श्रीमंतांसाठी आला

ख्रिस्ताचा जन्म बेथलेहेमात झाला तेव्हा पूर्व दिशेला जो तारा दिसला त्यामुळे पूर्वेकडचे तीन ज्ञानी राजे त्याचा मागोवा घेत बेथलेहेमला पोहोचले त्याआधी ’’यहुद्यांचा राजा जन्माला आला आहे तो कुठे आहे ?’’ अशी

विचारणा त्यांनी जेरूसलेमला हेरोदाच्या राजवाड्यात जाऊन केली. मात्र तिथल्या वडीलजनांनी आणि शास्त्र्यांनी मीखा ५:२च्या आधारे ख्रिस्ताचा जन्म बेथलेहेम येथे होणार आहे असे दाखवून दिल्याने ते तीन राजे बेथलेहेमला जाऊन पोहोचले. त्यांनी आपले वैभव व ऐश्वर्य बाळराजाच्या पायापाशी ठेवले. त्याच्या दर्शनाने तृप्त झालेले हे राजे दुसऱ्या मार्गाने आपल्या देशास परतले म्हणजे येशूबाळाच्या दर्शनाने त्यांचे अवघे जीवन बदलून गेले.

ख्रिस्त श्रीमंतांसाठीही आला असला तरी हे श्रीमंत म्हणजे नक्की कोण? त्यात हेरोदाचा समावेश होईल का? त्यात श्रीमंत तरुणाचा समावेश होईल का? मोठमोठ्या रकमा मंदिराच्या दानकोशात हाकणाऱ्या धनवानांचा त्यात समावेश होईल का? द्रव्यलोभाने आंधळया झालेल्या श्रीमंत मुर्खाचा त्यात समावेश असेल का? मोठमोठी आसने व मानाच्या जागा पटकावण्यासाठी धडपडणाऱ्या श्रीमंतांचा त्यात समावेश असेल का? उलट अशा श्रीमंतांचा स्वर्गात समावेश होणे यापेक्षा उंटाला सुईच्या नाकातून जाणे सोपे असल्याचा निर्वाळा येशूने दिला. मग येशू कोणत्या श्रीमंतांसाठी आला? लुक ८ : १-५ मध्ये येशूला पैशा-अडक्याने मदत करणाऱ्या स्त्रियांचा उल्लेख आहे. येशूच्या अंत्यविधीसाठी सुगंधी तेलाचे शंभर रतल मिश्रण घेऊन येणाऱ्या योसेफ अरीमथाईकरचा उल्लेख आहे. तो धनवान असून येशूचा गुप्त शिष्य होता. येशूच्या अखेरच्या भोजनाकरीता माडीवरची खोली (श्रीमंतीचे प्रतीक) उपलब्ध करून देणारा माणूस श्रीमंत होता. अशाच श्रीमंतांसाठी येशू या जगात आला. अविनाशी जीवन मिळविण्यासाठी नाशवंत धनाचा वापर करण्याचा सल्ला त्याने दिला. जागतिक श्रीमंती स्वर्गाच्या मार्गाकडे घेऊन जाणारी आहे की स्वर्गाच्या मार्गावरील धोंड बनलेली आहे हे या ख्रिसमसला आपण तपासून पाहणार आहोत का ?

### ख्रिस्त दु:खितांसाठी आला

आपल्या पहिल्याच प्रवचनात त्याने आपल्या कार्याचा जाहीरनामा प्रकट केला. ‘धरून नेलेल्यांची सुटका, जे ठेचले जात आहेत त्यांची मुक्तता, आंधळयांना दृष्टीचा लाभ’ अशी आपल्या कार्याची यादी त्याने जाहीर केली आणि प्रत्यक्षात आजारी, दुःखी, विकलांग, वृद्ध, निराधार, कुष्ठरोगी, उपेक्षित, दुर्लक्षित, मरणासन्न इतकेच काय प्रिय व्यक्तीच्या निधनामुळे दुःखी-कष्टी झालेले (लाझरसच्या बहीणी, नाईनची विधवा आणि सभास्थानाचा अधिकारी याईर) अशा सर्वांच्या दुःखात तो सहभागी झाला.

नाताळचा सण म्हटला म्हणजे आनंदीआनंद, उत्सव, रोषणाई, नाच-गाणी, खाणे-पिणे, कपडेलत्ते आणि भेटवस्तू ! मात्र एकीकडे देवदुतांचे ‘ग्लोरिया’ गायन व स्वर्गीय तेज ह्यांचे दिव्यत्व पसरलेले असतानाच दुसरीकडे दुःखी-कष्टी लोकांच्या जीवनात निराशेचा, शोकाचा, अज्ञानाचा, दारिद्र्याचा अंधार आहे हे आपण लक्षात घेणार आहोत का? येशू-जन्माच्या वेळी बेथलेहेमच्या लहान मुलांची कत्तल करण्यात आली. त्यांच्या मात्यापित्यांच्या आकांताचा सुर हेदेखील एक आगळेवेगळे नाताळ गीत (कॅरल) कधी होईल बरे ? जेव्हा आपल्या सांत्वनपर शब्दांचा धीर व दिलासा देणाऱ्या स्पर्शाचा आणि प्रसंगी मार्गदर्शन व सहाय्य करणाऱ्या हाताचा, हृदयाचा सुर त्यात मिसळेल तेव्हाच ना ?

### ख्रिस्त आनंद साजरा करण्यासाठी आला

गोरगरीब व वयोवृध्द ह्यांना येशु बाळाचे दर्शन झाले. मेंढपाळ आनंद करीत निघून गेले. १२० वर्षाचा सिमोन संदेष्टा शांती समाधान पावला. ८४ वर्षांची विधवा हन्ना सर्वांना इस्रायलच्या मुक्तीची सुवार्ता सांगू लागली.

जो मोठा आनंद सर्व जगाला होणार होता त्याची शुभवार्ता देवदूतांनी मेंढपाळांना दिली. तेही हर्षभरीत झाले पुढे येशू सणावाराला जाऊ लागला. काना येथे लग्नाला गेला. मत्तय व जक्कय यांच्या घरी मेजवानीस बसला. इतरांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवण्यासाठी देव मानव झाला धरतीवर आला, मानवात शिरला. 'माझा आनंद तुमच्यामध्ये असावा आणि तुमचा आनंद परिपूर्ण व्हावा ही त्याची धारणा होती. आनंद करा उल्हास करा, कारण स्वर्गात तुमचे प्रतिफळ मोठे आहे.

मात्र येशूने साजरा केलेला आनंद आणि तो व्यक्त करण्याची त्याची पद्धत अनुकरणीय आहे. एका पश्चातापी पापी माणसाबद्दल होणारा आनंद येशू साजरा करतो. हरवलेले मेंढरू, नाणे, मुलगा सापडल्याबद्दल तो आनंदित होतो. जगात तुम्हाला दुःख होईल परंतु तुमचे दुःखच तुमचा आनंद होईल हे सांगत असतानाच तो प्रसूत होणाऱ्या स्त्रीचे उदाहरण देतो. त्या वेदना आनंदाचे उगमस्थान असतात. बाळाला पाहताच ती आपले दुःख विसरून जाते. कोणाचे तरी वाईट झाल्यामुळे होणाऱ्या आसुरी आनंदासारखा तो आनंद नसतो. तो केवळ शारीरिक, बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक, भावनिक स्वरूपाचा नव्हे तर आध्यात्मिक स्वरुपाचा आनंद असतो. ह्या ख्रिसमसला आपल्याला कोणत्या प्रकारचा आनंद हवा आहे? तो कसा मिळणार आणि आपण तो कसा साजरा करणार?

**ख्रिस्त सर्वांसाठी आला**

येशु जरी बेथलेहेमला जन्मलेला असला तरी तो संपूर्ण सृष्टीला सुवार्तेची घोषणा करण्यासाठी आला होता. जरी तो एका विशिष्ट काळात, रोमी साम्राज्यात जन्माला आलेला असला तरी त्याचे साम्राज्य सार्वकालिक स्वरूपाचे आहे. जरी तो यहूदी म्हणून जीवन जगला तरीही तो शोमरोनी, रोमी शताधिपती, शिमोन कुष्ठरोगी, परुशी निकोदेमस, शोमरोनी स्त्री, मत्तय जकातदार, ग्रीक भाषिक हेलेण्णी, अशा सर्वांशी एकरूप झाला. जरी व्यवसायाने तो सुतार असला तरी शेती, मासेमारी, द्राक्षमळे, रानेवने, व्यापारी, मेंढपाळ, शिक्षक, अधिकारी, राजे-महाराजे ह्या सर्वांच्या जीवनशैलीविषयी आत्मीयता बाळगून होता. त्याने बालकांना कवटाळले, स्त्रियांना सन्मार्गावर आणून प्रेषित कार्यावर पाठविले, पुरुषांना उत्तम भोजनाने तृप्त केले, तरुणांना आव्हान केले, विवाहितांना मार्गदर्शन केले, शिष्यांना अधिकार दिला, कुष्ठरोग्यांना समाजात आणले, पाप्यांना नवजीवन दिले, अशाप्रकारे सर्व वयोगटातील, स्तरांतील, सर्व प्रकारच्या व स्वभावाच्या लोकांसाठी आपण आलेले आहोत हे त्याने दर्शविले.

इतकेच नव्हे तर रानातील फुले, आकाशातील पाखरे, समुद्रातील मासे, मोहरीचे दाणे, अंजिराची झाडे-पाने, द्राक्षवेल, जैतुनाचा डोंगर, गालीली समुद्र, यार्देनची नदी, अरण्यातील जागा, यहुदियाचे वाळवंट, गाढव, बैल, उंट, डुक्कर, कुत्रा, कोल्हा, कोंबडा, मीठ, पीठ, शेळ्या, मेंढ्या, कोंबडीची पिल्ले, विंचू, सर्प, अंडे, भाकरी आणि वाळू व सडक अशा निसर्गातील सर्व गोष्टींचा समावेश त्याने आपल्या शिकवणुकीत केला. चमत्कारानंतर काही फुकट जाऊ नये म्हणून उरलेल्या तुकड्यांच्या बारा टोपल्या त्याने भरून घेतल्या. पर्यावरणाविषयी जागृत असलेला येशु अन्नाची नासाडी होऊ देत नाही ही बाब आपण सणसोहळे साजरे करताना लक्षात घेणार आहोत का ? प्रभू येशूची ही सर्वसमावेशक, संवेदनशील व लवचिक मनोवृत्ती आपण या नाताळला धारण करणार आहोत का ? हा नाताळ कोणासाठी व कशासाठी साजरा करणार आहोत ? यावर मनन करूया.

आपणा सर्वांना हा नाताळ व येणारे नूतन वर्ष सुखासमाधानाचे जावो.

# मी गप्प राहिलो

• सायमन मार्टिन

ते तुला म्हणतील
आमच्याबरोबर ये, आपण रक्तपात करण्यासाठी टपून बसू
निष्पाप मनुष्याचा आपण बळी
घेऊ तू आमचा भागीदार हो
म्हणजे आपण आपली घरे लुटीने
भरून टाकू.
तू आपले पाऊल त्यांच्या वाटेवर पडू देऊ
नकोस जे निष्पापांच्या रक्तपातासाठी कारण
होतात त्यांचा प्राणघात ठरलेला आहे.

***

तसं लिहिण्याने कुणाचंही पोट भरत नाही, पण असतो एकेकाला एखादा नाद. त्यातच अडकून पडलो. लिहीत राहिल्याने आत खोलवर जाता येतं, आपल्यालाही तपासता येतं. पण ते सहजशक्य नव्हतं हेदेखील लिहायला लागल्यावरच कळलं.

लेखक कुणाचं तरी भागध्येय रेखाटत असतो. तो घडलेलं तर मांडत असतोच, पण जे घडणार आहे त्याचंही सूतोवाच करीत असतो. डोळ्यादेखत अशा काही घटना घडल्या की आपण फारच धीट आहोत याची जाणीव झाली. त्यावर लिहायला हवे होते. लिहून तर काहीही झालं नाही.

मृत्यू झालेला होता, पण आत्मा माझ्याजवळच घुटमळत राहिला. लिहिणाऱ्याला, बोलणाऱ्याला जबाबदारी झटकता येत नाही. माझ्यातल्या लेखकाला मी बोललो नाही, कारण माझी वाचा हरवली होती. मी लिहिलं नाही कारण मला लकवा लागला होता. म्हटलं तर ही कारणं तशी तकलादू असतात. आपण बोलायला हवं होतं, हेच सत्य आहे.

काय झालं असतं? मेलेला जीव परत येणार होता? ती बाई जिवाच्या आकांताने लढत होती. शहर वाढलं तसं जमिनीला सोन्याचे भाव आले. सर्व मोक्याच्या जमिनी गोरगरीब आदिवासींच्या होत्या. कित्येक शतकं त्यांचे पूर्वज येथल्या मातीत राबले होते. येथेच त्यांनी रक्त आटवून शेती फुलवली होती. ही जमीन म्हणजे त्यांचं सर्वस्व होतं आणि अचानक टोळधाड आली आणि त्यांनी जमिनी हस्तगत केल्या. हाती हत्यारं असलेल्यांनी मालकीचे बोर्ड लावले. गरीब हवालदिल झाले. डोळ्यादेखत सर्वस्व लुटलं जात होतं, पण आधार कुठेच दिसत नव्हता. बाई कित्येक वर्षांपासून येथेच लढत होत्या, सुख चैनीचं आयुष्य अव्हेरून दिवसरात्र न्यायासाठी झटत होत्या. या एका बाईचाच तर आधार होता तेथल्या गोरगरिबांना. आता खऱ्या अर्थाने लढाई सुरू झाली होती.

बाईला निरोप पाठविण्यात आले, जिवाची काळजी असेल तर यातून बाहेर पडा, शांत बसा. सर्व उपाय झाले, हेदेखील की गप्प राहण्याचे काय? त्यासाठीदेखील रक्कम ठरविण्यात आली. पण काही माणसं पाठीवर 'नॉट फॉर सेल' असा बोर्ड लावूनच जन्माला आलेली असतात. पैशाने यांना विकत घेता येत नाही आणि ते विक्रीयोग्य नसतात. हीच तर अडचण असते. एरवी फारच स्वस्तात सौदे होत असताना काही दिडक्यांच्या बदल्यात आत्म्याचा लिलाव करण्यासाठी रांगा लागलेल्या असताना अशी एखादी क्षुल्लक साधारण व्यक्ती बाजारात बसलेल्यांची झोप उडवते. एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार. त्या अंगारावरून चालताना अवघं आयुष्य पोळलं तरीही घेतला वसा टाकत नाहीत. हीच तर असते माणसांच्या अभ्युदयाची आशा एकमेव. बाईला काही कमवायचं नव्हतं. बाईच्या काळजात विस्थापितांचं दुःख काटा होऊन सलत होतं.

गप्प राहण्याचा प्रश्न नव्हता. बाई बोलायच्या थांबल्या नाहीत आणि एक दिवस रक्ताची चिळकांडी उडाली. बाईवर अडतीस वार करण्यात आले. बाईला संपवण्यात आलं. ज्यांच्या जमिनी होत्या, ज्यांच्यासाठी बाई लढत होत्या त्यांना आधीही नव्हता आवाज आणि आता तर सर्वच शांत झालं. हजारो एकर जमिनीची मालकी बदलली. मारेकरी मोकाट राहिले. काही गेलेही असतील गजाआड, पण बाई जिवानिशी गेल्या. ज्यांनी आवाज उठवायचा त्यांनी आतून तह केले. काही काळ माझ्या शहरात थोडीफार हलचल झाली असेल तेवढीच. हळूहळू विस्तव विझला. ज्यांनी आवाज उठवण्याचा प्रयत्न केला, त्यांना गप्प करण्यात आलं. मोर्चे निघाले नाहीत असं नाही. निषेधही नोंदवला गेला, पण त्यांच्या साम्राज्यावर ओरखडादेखील उठला नाही. तुम्ही आवाज उठवणार असाल तर तुमची अशीच गत होणार आहे, हेच ठसविण्यासाठी जेथे एक वार पुरला होता तेथे असंख्य वार करण्यात आले.

तेव्हाच जाणवलं की, लेखकाचा आवाज एवढा मोठा व्हावा की ऐकणाऱ्याच्या कानाचे पडदे फाटावेत. धरणी दुभंगून जावी आणि त्यांचे महाल गडप व्हावेत. कविता लिहिणं तसं किती सहज सोपं असतं, पण डोळ्यादेखत कवितेची हत्या होते तेव्हा लिहिणारा मी त्या गावचाच नाही असं भासवून शांत झोपलेला असतो या गुन्ह्याला काय शिक्षा आहे? म्हणजे कन्फेशन करून पापमुक्त होता येतं का? ते वाचून दाखवतात माझ्यावरचे जे आरोप. ते सर्व मला मान्य आहेत. यापुढे कुणाही बाईची लेखक जिवंत असताना खांडोळी होऊ नये. किंवा खांडोळी होत असताना लेखक जिवंत असू नये. जर आपण बोलणारच नसू तर आपल्या हाती जे धारदार शस्त्र आहे त्याला गंज लागल्यावाचून राहणार नाही. आज मी माझ्यावरचा लेखक असण्याचा शिक्का पुसून टाकत आहे. मी माझे सर्व अंगरखे ज्यावरून मला तुम्ही ओळखत होता ते उतरवून अलमारीत ठेवत आहे. हा पेन ज्याचा सूळ करून त्यावर मला खिळवून ठेवत आहे. आता येणारे जाणारे माझं प्रेत पाहून म्हणतील, लेखक असूनही हा गप्प राहिला.

***

सातत्याने विचार करायचा असतो, आपल्या अपराधामुळे अन्य कुणी घायाळ तर होत नाही ना? आपल्या दुष्कृत्यामुळे दुसराच कुणी तरी ठेचला जात नाही ना? आपल्यासाठी अन्य कुणी शिक्षा तर भोगत नाही ना? मग आम्ही सुखी कसे होऊ शकतो? आम्हाला शांती कशी मिळू शकते? आमचं घर कधीही कोलमडू शकतं. आपलं पाप मोठं आहेच, पण देवाची कृपा अधिक थोर आहे याची सदैव आठवण ठेवावी.

# तुम्ही कितीही बोटं मोडा!

**--- वर्जेश ईश्वरलाल सोलंकी**

तुम्ही कितीही बोटं मोडा. दुगाण्या द्या. शिव्याशाप द्या. अदालत ये नतीजे पहोंची है की सरकार हे कनवाळू असतं. गरीबोंका अमिताभ असतं. ते नेहमी म्हणत असतं. 'तूम मुझे मत दो मै तुम्हे आजादी दुंगा" माझ्या हातात एकदा सत्ता द्या पाहा मग आम्ही कसे पत्ते पिसतो. एकदा पाच वर्ष देऊन पाहा बघ कसे आम्ही तुमचा कायापालट करतो. किती विश्वास असतो तुमच्यावर! श्रद्धेने ते तुमच्या खांद्यावर हात ठेवतात. प्रेमाचा वर्षाव करतात. तुम्ही उगाच काहीबाही बोलत असता! 'एक जिलेबी तेलमे फलाणा पार्टी जेल मे. ' सरकार कधी जेलमध्ये जातं का तिथे गुन्हेगार जात असतात. ते तर राजप्रसादात असतात. तुम्ही दिलेल्या सिंहासनावर बसून तुमची दुखणीखुपणी ऐकत बापडी बसलेली असतात.

तरी तुम्ही कधी त्यांचे ऐकता कधी सपशेल कानाडोळा करता. मुद्दामुन तुम्हाला हवे तसे घडवून आणता. कारण कुलूपाची चावी तुमच्याकडे असते. कोणाचे दार खोलायचे व कोणाचे बंद करायचे ह्याची पासष्टावी कला तुम्हाला भारी अवगत असते. सरकार येता राहतं.

काही वर्षापूर्वीची सरकारं 'डीडी नॅशनल' होती व आजची 'सबसे तेज.'

अगदी तुमच्या हातातल्या मोबाईल स्क्रीनवर. कुठेही काही बनाव, राडा झाला, लोचा झाला, कुठेकाही खुट झालं, तुम्ही चौकन्ने!. बेटींगचा उद्योगही निवडणूकीच्या काळात जोरात! त्याला इतकी मते मिळाली व ह्याला इतकी. आता मायनस कर. एका मताच्या मागे माझे शंभर रुपये. चल अकाऊंटमध्ये ट्रान्सफर कर! सरकार कुणाचेही येवो तुम्ही आपले प्लसमध्ये.

तर काय सरकार गडगडतं. तुमचं एक मत भारी पडतं. त्रिशंकू सरकार बनतं! कधी पुन्हा मतदान करावं लागतं. कधी पोटनिवडणुका होतात. त्यांचे मनसुबे सगळे उधळलेले असतात. किती स्वप्ने त्यांनी तुमच्यासाठी पाहिलेली असतात. क्षणात त्याचा चकनाचुर झालेला असतो. किती मस्त अजेंडा बनवलेला असतो. पदरचे घालून तर कधी इकडून तिकडून उधार मागून प्रचाराचा खर्च उचललेला असतो. सगळ्या गोष्टी आचारसंहितेत राहून उरकलेल्या असतात. तुम्ही म्हणता कशी जिरवली! आमच्याशी पंगा. सरकार इकडच असो किंवा तिकडचं ते नेहमी म्हणत असतं पाहा गरीबांसाठी कशा एकेक योजना आणतो.गरीब! गरीब! हा शब्द गुळगुळीत करुन टाकलेला असतो!

मला तुम्ही ओळखलतं नसणार!. मी सव्वाशे करोड ह्या देशाच्या आबादीतला! तुमच्यासारखाच! म्हणजे ह्या सार्वभौम देशाचा नागरिक. मतदाराचा अधिकारवाला.मला वाटेल त्याला मी मत देईन म्हणणारा! गावखात्यात ह्याला देईन केंद्रात त्याला देईन. फलाण्या ठिकाणी त्याला देईन. मला काय खालून दिलं तर तुम्हालासुद्धा देईन असं म्हणणारा मी मतदार! ऐनवेळी चुकीचं बटण दाबून मतदान केंद्रातून निघालेला अंगठेबहाद्दर असलेला मतदार! आधारकार्डधारक ही माझी ओळख व घराच्या पत्त्याच्या सगळ्या खुणा व दाखले माझ्याकडे आहेत.

१९४७ला स्वातंत्र्य माझ्या देशाला मिळालं त्यानंतर तीस वर्षानंतर माझा जन्म झालेला. माझ्या जन्माच्यापूर्वीही सरकार होतं. देशावर ब्रिटीश राजवट होती.निजामांची संस्थान होती. पोर्तुगीज लोक पण होते गोरेगुबरे बसमध्ये जागा अडवावी तसे बॅगावगैरे ठेवून होते. हिप्पी व निग्रोसुद्धा होते. कुठेकुठे गांजा व अय्याशी करित टोळक्याने मस्त फिरताना दिसायचे. ह्या स्वातंत्र्याने सर्वांना सामावुन घेतलं होतं. मात्र माझ्या देशाला स्वातंत्र्य मिळालं होतं. माझ्या पूर्वजांनी सुटकेचा निश्वास टाकला की नाही टाकला माहित नाही. ते व्यापारी होते. निर्वासित

होते. कामधंद्यासाठी सारखे गावं बदलायचे. त्यांना इतिहासही नव्हता व भूगोलही नव्हता. तसं पाहिलं तर माझ्या पूर्वजातून कोणीच स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला नव्हता. ते बनिये होते. माल विकायचे. कापडाच्या बदल्यात गहू व मीठ घ्यायचे. त्यांनी इंग्रज सरकारच्या लाठ्या खाल्ल्या नव्हत्या. सत्याग्रह केला नव्हता.ब्रिटीशांनी जो कायदा केला त्या सीमेरेषेखाली जगत वाटचाल केली होती. पण स्वातंत्र्याची पहाट होताच 'वंदे मातरम' व 'गांधीगीरी' सगळ्यांनी बासनात गुंडाळून टाकलेली.

ह्या देशात जसं अधिकृत सरकार होतं तसं अनधिकृत सरकारसुद्धा होतं. त्याला सगळे समांतर सरकार लोक म्हणायचे. गावपंचायत होती. माफियाराज होतं.त्यांचे त्यांचे घटनाबाह्य कायदेकानून होते.तरी अधिकृत सरकारकडून त्याला मान्यता होती. सरकारमान्य देशीदारु दुकानासारखी.असं काय चालू होतं व ह्यात माळेतल्या दो-यासारखं लोकांनी निवडून दिलेलं सरकार होतं. सदोदित दोलायमान.

सरकारशिवाय तसा देश चालूच शकत नाही. ते दुबळं असलं तरी ते असतच. त्याशिवाय काही तरणोपाय नसावा. माझ्या जन्माआधीच्या सरकारनेही नारा दिलेला 'हरितक्रांती'. त्यानंतर आलेल्या सरकारने स्लोगन बनवलं. 'जय जवान जय किसान.' त्यानंतरच्याही निवडून आलेल्या सरकारने हाळी दिली 'गरीबी हटाव.' पुन्हा दुस-या सरकारने टुम काढलेली 'इंडिया शाईनिंग'. पुन्हा एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर आलेल्या सरकारने सर्वसामान्यानांना उद्देशून मंत्र दिला 'चक दे इंडिया. निरनिराळया सरकारची अशी घोषवाक्ये होती. त्यातून त्यांना काहीतरी सुचवायचं होतं. जनताही सरकारकडे न पाहता ह्या घोषवाक्यांच्याकडे पाहत उभी राहयची व आपला रोजचा रस्ता पार करायची.

ह्या सर्वांवरुन एक नजर फिरवली तर लक्षात येईल तुम्हाला, पाहा सरकार किती कनवाळू असतं. गरीबांचा मसिहा असतं. शेतक-यांच्या पाठीशी असतं. उद्योजकांचा आधारस्तंभ असतं. तरुणांच्या वृद्धीसाठी सतत झटत असतं. वृद्धांची काठी असतं. सतत ते गरीबी व गरीबांचाच विचार करत असतं. तुम्ही उगाच म्हणता ते धनदांडगे व श्रीमंताच्या मागे असतं. सरकार येण्याआधी व नंतरही किती त्यांच्यात उत्साह हसतो. लाखोंच्या समुदयाला कसे ते आव्हान करतात.तुम्ही जे सांगितलं ते मी केले का नाही. तुम्हालाच विचारतात. त्यांच्या प्रश्नाच्या लाटेवर तुम्ही नंदीबैलासारखं डोकं घुमवता. गरीबांचे पाय धूण्यास, त्यांच्या झोपडीत जाऊन चटणीभाकर खायलाही सरकार मागेपूढे पाहत नाही, आपादग्रस्तांच्या मध्ये उभे राहून ते सेल्फी काढतात. प्रोटोकॉल बाजूला सारुन लोकल ट्रेनमध्ये येऊन तुमच्याशी गप्पा मारतं. सरकारला तुम्ही हवे असता. तुमच्याशिवाय त्यांना रात्री झोप येत नाही. सर्वसामान्य जनता हा शब्द ते दिवसातून कितीतरी वेळा बोलत असतात. किती ममत्व असतं.

राजप्रसादातल्या सोन्याच्या मुद्रा पूर महापूर, नैसर्गिक आपत्ती आली की कसं काही हातचं न राखता कोषागारातून गोरगरिंबावर उधळत राहतात. तुम्ही च्यायला भिका-याला पाच रुपये देऊ की दहा की चिल्लर अशा विचारात गर्क असता. पण सरकार ते मागेपूढे पाहत नाही. तुमच्या सारखे मोजत नाही बसत. अशावेळी ते पाहत नाही की किती मुद्रा उधळल्या. तुम्ही नाही का छमछम मध्ये लाचार व मजबूर गणिकेवर नोटा उधळता! साधूबाबांवर पैशांचा पाऊस पाडतात, दहीहंडी किंवा गणपती उत्सवात लाखाचे दान देता, गरीबांसाठी किती करु म्हणून सरकारचा जीव अगदी काकुळतीला आलेला असतो. पण तुम्हाला ते पाहवत नाही. वेटरला कुणा धनिकाने पाचशेची नोट टिप म्हणून दिली तर तुमची जळजळ होते. त्याने उंची गाडी घेतली तर तुमच्या गांडीतून धूर निघतो. त्याने कोठे फार्म हाऊस घेतलं तर तुमच्या आतल्या भिंतीना भगदाडं पडतात.

सरकारचं व्हीजन स्पष्ट असतं. सगळे त्याला समान असतात. एकाच तराजूत ते सर्वांना तोलतात. पण नाही ! तुम्हाला ते पटतच नाही. तुम्हाला वाटतं ते अल्पसंख्याकांचच लांगून चालन करतात. त्यांच्याच पोटावरुन हात फिरवतात. अमूकएक वर्गाला झटकन सबसिडी देतात. तमूकाला आरक्षण व नोक-या देतात.फलाण्याचं कर्ज माफ

करतात. आपल्याला काय बाबाजीका बुल्ला! आतल्याआत तुम्ही चिडता, कुढता! बदलेकी आगमध्ये झुलजता. सरकारच्या मनात असं काहीच नसतं. जो रडला त्याला दूध पाजलं. ज्याने पत्र लिहिलं त्याला उत्तर दिलं, ज्याने आरडाओरडी केली त्याला झोके देऊन शांत झोपवलं. तुम्ही ह्यातलं काहीच केलेलं नसतं. सरकारला कसा समजणार तुमचा प्रॉब्लेम?

सरकारला कधीच भ्रष्ट आचार आवडत नसतो. तुम्ही पाहा ना कुठल्याही कचेरीत कायदेकानून, अटी व शर्तींची  एक मोठी नियमावली भिंतीवर टांगलेली असते. सरकार असे बोर्ड व बॅनर वर लाखोंचा खर्च करते. का तर ते तुम्ही वाचावेत त्या नियमाचे काटेकोररित्या पालन करावेत, पण ते सगळं आचरणात आणावं असे बिलकूल तुम्हाला वाटत नसते. तसली सवय आपण अंगवळणी पडू दिलेली नसते.

कुणीतरी म्हणतं सौदीमध्ये पाहा कसा कडक कायदा आहे. सिंगापूरला रस्त्यावर तुम्ही थुंकलात तर इतका दंड आहे, जपानला सिग्नल तोडला तर जेलची हवा खावी लागते! अमेरिकेत जायचं म्हटलं तर पन्नास कागदं!  नि आपल्याकडे कायदा आहेच नाही. खरं म्हणजे आपल्याकडलं सरकार तुम्हाला सांभाळून घेत असतं. ते मनात म्हणत असतं पोर आज नाहीतर उद्या सुधारेल. कशाला त्याला उठाबशा काढायला लावा. गांडीवर छड्या द्या!

सरकारच्या ह्याच भोळेपणाचा तुम्ही नेमकेपणाने फायदा घेतलेला असतो .सरकार किती अजीजी व विनवण्या करत असतं. महामार्गावर नियम फलक लावून वेगमर्यादा, इथे गाव आहे, इथे शाळा आहे असं वारंवार सुचवत असतं. पण तुम्ही घरातूनच लेट निघालेले असता. लवकर कार्यस्थळी पोहचायचं असतं. बॉस वाट पाहत असतो. बेदरकारपणे गाडी हाकत असता! ठोकाठोक करुन ट्रॅफिक जाम करता!. फ्लायओव्हर हा क्रायओव्हर झालेला असतो. सद्य सरकारची आईबहीण एक करायला तुम्हाला आयतं निमित्त मिळालेलं असतं. देशात काही कायदाकानूनच नाही म्हणून मोठमोठ्याने ओरडत असता. अक्राळविक्राळ झालेल्या शहराची तुम्ही आयमाय काढता! बाहेरुन धडकलेल्या गर्दीच्या लोंढयावर आग बरसवता.

तुमची लाहीलाही झालेली असते.  सांगायचा मुद्दा असा की सरकारी कचेरीतून तुम्हाला दाखला लवकर हवा असतो. दोन दिवसात द्यायचा असतो. सरकारने तो दाखला हवा आहे व मॅनडेटरी आहे हे सरकार ज्या दिवशी आलं तेव्हांच फर्मान काढलेलं असतं. स्वतःच्या खिशातले पैसे काढून, बाजुवाल्याकडून उधार घेऊन ब्रॅन्ड ॲम्बेसडर निवडलेला असतो. तो सरकारी दूत पण तुमचा आयकॉन, नव्या पिढीचा आदर्श. शौचालयाच्या भिंतीवर, बसच्या छाताडावर, शहराच्या मध्यभागी, एखाद्या वृत्तपत्राच्या कोप-यातून तुम्हाला माहिती देण्याच्या प्रयत्नात असतो. पण तुम्ही नेहमी घाईत! वेळ कुठे आहे? तुमच्याकडे मान वर करुन पाहायला! तुमचं लक्षचं नसतं. गर्दीत कोणी पाकीट मारेल, धक्का मारेल ह्याच्या भितीने तुम्ही पसार होत असता! अगदी शेवटच्या क्षणी तुम्हाला समजतं की पॅनकार्डला आधार कार्ड लिंक करायचे आहे म्हणून, परवा आय.टी. रिर्टन भरण्याची शेवटची तारीख आहे म्हणून, पंतप्रधान आवास योजनेचा फॉर्म भरण्याची मुदत संपली आहे म्हणून, सगळं शेवटच्या दिवशी तुम्हाला आठवलेलं असतं! मग तुम्ही चरफडता! घाई करता!  मुलाच्या ॲडमिशनसाठी डोमिसाईलचा दाखला, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमिलेअर, जातपडताळणी अनिवार्य आहे हे तुमच्या गावातच नसतं. सरकारी दूत बोंबलून थकलेला असतो. स्चच्छता अभियानच्या नटीच्या फिगरकडे पाहत तुम्ही पानाची पिचकारी मारलेली असते तीही तिच्या नाजूक हातातल्या नव्या झाडूवर. काय करणार सरकार!. जाम लघवी आलेली असते. लोकांनीपण मुतूनमुतून मुतारी हाऊसफुल्ल केलेली असते! राईट टु पी म्हणून सरकारने काढलेली योजना एका बेवड्याने दारु पिऊन काढलेली असते. ड्रिंक करुन ड्राईव्ह केलेली असते. साधे सिग्नलचे नियम माहित नसतात!

सरकारही हतबल असतं. हैराण असतं. कधीकधी स्वतःच झाडू घेऊन तेही रस्त्यावर निघालेलं असतं. तुम्ही म्हणता हे पाहा कसे स्टंट करताहेत! आधी घरातला कचरा काढा म्हणावं व लोकलट्रेनच्या खिडकीतून

बिसलेरी बॉटल क्षणार्धात बाहेर फेकलेली असते. सांगण्याचा मुद्दा असा की कितीही सरकारने बोर्डबॅनर, जाहीरातीमागे पैसा खर्च केला तरी तुम्ही काही भ्रष्ट आचार सोडायला तयार नसता. काकुळतीला येऊन त्याला चिरीमिरी द्यायचा प्रयत्न करता. वरुन हुकूम असतो त्यांना लाच घेतली तर नोकरीवरुन काढले जाईल पण काय करणार! आपण त्याच्या अंगचटीलाच लागलेले असता. 'सर काहीही करा पण दाखला करुन द्या नाहीतर माझ्या मुलाचे ॲडमीशन होणार नाही.' अधिकारी मग 'दयाघन' बनतो. लगेच स्वाक्षरी करतो. तुम्ही त्याचे आभारसुद्धा न मानता चालू पडता.

आता ह्या गोष्टीला सरकार काय करणार! कोणाकोणाच्या मागे सीसीटीव्ही लावणार! 'मोबाईल कानाला लावून बाईक चालवणा-यांचे मोबाईल खेचा' पाहा ही वर्तमानपत्रातली बातमी. 'दारुच्या नशेत एका महिलेने ट्रॅफिक हवालदारावरच गाडी चढवली' ही दुसरी बातमी.सरकारने नियम बनवलेले आहेत. वीसवेळा गाडी घेताना बजावलेले आहेत. पण तुम्ही विदाऊट परीक्षा देऊन पास होऊ शकतो का? अशी गळ एजंटला घालता. तुम्हाला वेळ नसतो. ऑफीसात जायचे असते. बॉस सुट्टी देत नाही. बायकोला घरकामातून फुरसत नसते. किती बहाणे! किती पळवाटा. दुनिया झुकती है झुकानेवाला चाहिए असे म्हणत तुम्ही घराच्या पाय-या उतरलेल्या असता!

आम्हाला कोण काय करणार! आम्ही इथले स्थानिक आहोत! सगळीकडे आमच्या ओळखी आहेत! तिथल्या पोलीस ठाण्यातला मेजर आपला खास मित्र! त्या सरकारी अधिका-याबरोबर आपली सेटींग! माझं नाव सांग त्याला तुझं काम होऊन जाईल! पैशे मला आणून दे रोज संध्याकाळी क्लबमध्ये आम्ही असतोच.पाहा तुमची सल्तनत केव्हढी मोठी. तुमच्यासमोर सरकार किस झाड की पत्ती. तुमचा एक फोन गेला लगेच जामीन! तुमच्या एका फोनवर कितीतरी उलाढाली.सरकारपेक्षा झटाझट तुमच्या हालचाली. सरकारला तुम्ही ताकास तूर लागू देत नाही. ते आहे की नाही ह्याचासुद्धा तुम्ही विचार करत नाही. मी आहे ना! मॅनेज करतो सगळं. तुमच्यासारखा मॅनजेर खरे म्हणजे हवा असतो. तो धडाधड चुटकीसरशी सगळया गोष्टी लफडीकज्जे वासलात करुन बासनात गुंडाळत असतो.घटना व कायद्याला तुम्ही जुमानत नाही व सरकारने एखाद्या घटनेचा कान पिळला तर तुम्ही ओरडायला लागता. घटनेला हात लावायला तुम्हाला कोणी सांगितलं! घटना म्हणजे काय तुमच्या बापाची जागीर काय? घटना म्हणजे मधाचा पोळा असावा व त्याला हात लावला की दुनियेच्या सगळया माशा भणभण करायला लागतात. आजुबाजुंवर खुंखार हल्ला चढवतात. तरी येऊन-जाऊन तुम्ही सरकारवर तोंडसुख घेत असता! ती मजा लुटत असता.

सरकारने बजेट काढलं. किती तुम्हाला दिलं. तरी विरोधक बनून बोटं मोडत असता. हे सगळं धनदांडग्यांसाठी, मूठभर लोकांसाठी! वर्तमानपत्रातल्या बारा पानामधून दहा पानं त्यावर खर्ची घातलेली असतात. मोठमोठे अर्थतज्ञ आता काहीतरी गंभीर होणार आहे, देशाची अर्थव्यवस्था आता डबघाईला येणार आहे, जलजला येणार आहे. काही गोष्टी तुम्हाला समजत पण नसतात.अशावेळी सामान्य वाचक वर्तमानपत्रातल्या बातम्या कधी नव्हे ते वाचतो. घाबरतो. घाबरुन सरकारला आतल्याआत शिव्या देतो.मादरचोदांनी अर्थव्यवस्थेची आय घातलेली आहे. लोकल ट्रेनमध्ये, ऑफिसच्या कॅन्टीनमध्ये ब-याच अर्थतज्ञांची निर्मिती होऊन त्यावर सांगोपांग चर्चा चालू असते. सद्य सरकारला गाडून टाकण्याचा विकल्प शोधायला हवा! हे असेच होत राहिले तर काही खैर नाही बुवा! तुम्हाला झाट माहित नसतं!

तुम्ही म्हणता हे सरकार आयघालं आहे. ह्यांना अजून जनतेची नस सापडलेली नाही आहे.पाच वर्षे झाली.पंधरा वर्षे झाली. अजुन काहीच कायापालट नाही. रस्त्यावर पावसाळयात नेहमी खड्डे असतात. नदीनाले वाहत नाही. सरकार टेन्डर काढतं. कंत्राटदारांना कंत्राट देतं. कंत्राटदार कमी पैशात, कमी पगाराचा इंजिनियरचं डोकं वापरुन, सिमेंट ऐवजी मातीचं मिश्रण करुन, ऑडीटरला हाताशी घेऊन. ओके चा स्टॅम्प मारतं. बिल पास करणा-

याला तुम्ही चिरीमिरी देता. रस्ता पुन्हा पावसाळ्यात खस्ता खात असतो. तुम्ही पुन्हा सरकारला शिव्या मारायला मोकळे. पेप्सी पितात, आईसक्रीम खातात, बिसलेरी ढोसतात, कुरकुरे खातात, दुधाच्या पिशव्या, आणखीण कायकाय गटारात फेकतात. पाणी तुंबून राहतं. सरकार मेनहोलमध्ये माणसांना उतरवतं. जेसीबी लावून गाळ काढतं. पुन्हा बिसलेरीच्या बाटल्या, प्लास्टीकच्या पिशव्या. पुन्हा सरकार गाळ उपसतं. धोधो पाऊस पडतो. शहर पाण्याखाली असतं. घरांतला टीव्ही,फ्रीज पलंग कागदावर तरंगत असतात.नदीनाल्याचे तोंड प्लास्टीकने तुम्ही बंद केलेले असते हयाचे सगळे खापर सरकारवर फोडून तुम्ही रिकामे झालेले असतात.

कुणी एकदम म्हणत सद्य सरकार फॅसिस्ट आहे. चार रस्त्यावर येऊन, जंतरमंतर मैदानात, शिवाजी पार्कमध्ये येऊन तुम्ही ओरडता. कुठे आहे सरकार! तुमचा संताप झालेला असतो. सरकारने दिलेलं पारितोषिक त्यांच्या तोंडावर फेकून दिलेलं असतं. तुम्ही राजधर्म पाळलेला असतो. सरकारची ऐसी की तैसी... सरकारच्या अस्तित्वाचाही शोध सुरु असतो. तुम्ही मंत्रालयासमोर जाळून घेतलं. तिस-या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्येचा प्रयत्न केला, दूधाच्या व फळाच्या गाड्या रस्त्यावर सांडून चक्का जाम केला,लोकसभा व विधानसभेत आकांडतांडव केला,घरातल्या पंख्याला गळफास लावला, आंदोलनातून परतताना सरकारी मालमत्तेची नासधूस केली, भाषणातून आम जनतेला चेतवलं तरी सरकार शांत असतं, विवेकी असतं, ढिम्म असतं, भीमासारखा अंगुठा दाबून ठेवलेला असतो. की आणखीण काय तुम्हाला कशाचाच पत्ता लागत नसतो! सरकार म्हणत असतं आमचा प्रयत्न चालू आहे. थोडा अवकाश द्या सुरळीत आणू सगळं. आधीच्या सरकारने जी घाण केली आहे ती काढण्यातच आमच्या पायाला गोळे येत आहेत. उम्रे दराजसे लाए थे चार दिन दो दिन आरजूमे दो दिन इंतजारमे निकल गए. सरकारसारखा सहिष्णू प्राणी जगात नसावा. तुम्हाला मात्र सरकारच्या कानामागे पेटवायची असते.

आम जनतेला सरकारनं अमिताभ बच्चन असावं किंवा गरीबोंका रखवाला मिथुन असावं किंवा हिम्मतवाला जितेंद्र असावं किंवा गाणं गात हिरोईनला पटवणारा शशीकपूर असावं असं सारखंसारखं वाटत असतं.

सरकार म्हणजे पाच वर्षाची फिल्म.70 एम.एम.चा इस्टमनकलरचा पडदा. जे चाललय त्यावर विश्वास ठेवायचा नाही. जे चाललं नाही आहे ते दाखवायचं पाहा हेच ते!

कुठल्याच काळात व जगात  सरकारला वन्समोअर म्हणून कुठल्याच नागरिकांनी कधीच दाद दिलेली नसते.तेच सरकार पुन्हा आलेलं आहे हेही काहींना माहित नसतं.तोच पंतप्रधान बोडक्यावर बसलेला आहे ह्याचही सामान्य ज्ञान नसतं. पब्लिक म्हणतं ठिक आहे आता तरी सुधरा. त्याच चूका पुन्हा नका करु. मतदारबापांना नवा माल हवा असतो. नवा चेहरा हवा असतो. फ्रेश लाईम ज्युस हवं असतं. गरीबोंका रखवाला हवा असतो.

असो काय ते पण सरकारला मतदार हवे असतात आणि मतदारांनाही सरकार हवं असतं.

# येशू - परमेश्वराचा चेहरा

■ फा. डॉ. एलायस रॉड्रिग्ज, (9423908787)

माझ्या प्रिय बंधुभगिनींनो, संत पॉल आपल्याला सांगतो, प्रभू येशू ख्रिस्त ही अदृश्य देवाची परिपूर्ण अशी दृश्यमान प्रतिमा आहे. अर्थात स्वत: प्रभू येशू ख्रिस्त म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर आपल्याबरोबर आहे. येशूच्या जन्माच्या वेळेला ही गोष्ट स्पष्ट करण्यात आली. देवदूताने मरियेला सांगितले, तुला पुत्र होईल, त्याचे नाव तू इम्यानुएल म्हणजेच 'परमेश्वर आपल्या बरोबर आहे,' असे ठेव. परमेश्वर प्रत्यक्ष दिसत नाही; प्रत्यक्ष भेटत नाही. परंतु जो परमेश्वराचा पुत्र आपल्याकरिता मनुष्य झाला त्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये आपल्याला परमेश्वर भेटतो, दिसतो. हा येशू आता मरणावर विजयी होऊन पुनरुत्थित अवस्थेमध्ये आपल्यामध्ये हजर आहे. त्याच्या पवित्र आत्म्याच्या रूपाने तो श्रद्धावंत माणसाच्या अंतकरणामध्ये वस्ती करतो. म्हणूनच येशू आपल्यामध्ये आहे.

आपल्याला अनेक वेळेला एखादया मुलाकडे पाहून वा मुलीकडे पाहून तिच्या आईची, त्याच्या आईची व वडिलांची आठवण होते आणि लोक सांगू लागतात की, हा अमक्याचा मुलगा असावा. ही अमक्याची मुलगी असावी. का? तर त्यांच्या चेह-यांमध्ये खूप साम्य असते. अगदी त्याचप्रमाणे येशूच्या व्यक्तिमत्वामध्ये परमेश्वर प्रकट झालेला आहे. परमेश्वर उघड झालेला आहे. परमेश्वर दिसत असतो. आपण प्रभू येशूला जाणून घेतले पाहिजे. प्रभू येशूचा आणखी सखोल अभ्यास करायला हवा.

प्रभू येशूचे अंत:करण, प्रभू येशूची मानसिकता चांगल्या प्रकारे समजून घेताना पहिल्या प्रथम आपल्या लक्षात येते की, तो दुस-यांकरिता जीवन जगला. आपल्याला जर प्रभू ख्रिस्तासारखे व्हायचे असेल तर मग आपणदेखील नि:स्वार्थीपणाने दुस-यांकरिता जीवन जगायला शिकले पाहिजे. जितक्या प्रमाणात माणूस स्वार्थी राहतो, स्वत:च्या कुटुंबाच्या अत्यंत मर्यादित वर्तुळाचा विचार करत राहतो, तितक्या प्रमाणात तो येशू सारखा बनत नाही तर हयाच्या उलट, जेव्हा माणूस अधिकाधिक दुस-यांकरिता जीवन जगू लागतो, जशी येशूने केली तशी नि:स्वार्थीपणे सगळ्यांची सेवा करायला लागतो, जे गरजवंत आहेत, अडीअडचणीत आहेत त्यांची सेवा करू लागतो तेव्हा मनुष्य खरोखर येशूसारखा होऊ लागतो. तसेच येशू म्हणतो, तुम्ही क्षमा केली तरच स्वर्गीय पिता तुम्हाला क्षमा करील. म्हणूनच आपण आपल्या जीवनामध्ये क्षमेला मह-त्व देतो. आपल्या घरच्या लोकांना, आपल्या आजूबाजूच्या लोकांना जर आपण क्षमा केली नाही तर आपण आपलेच जीवन अवघड करून ठेवतो, हे आपल्या लक्षात येते का? अनेक प्रकारचे आजार, अनेक प्रकारचे तणाव आपण उगीच वाढवत राहतो. येशू स्वत: म्हणतो, साताच्या स-तर वेळा क्षमा करा. येशूप्रमाणे आपण क्षमा करायला लागतो, तेव्हा आपले जीवन येशूच्या जीवनासारखे होऊ लागते. येशूने सर्वात मोठी आज्ञा म्हणून प्रीतीच्या आज्ञेचा उल्लेख केला आहे. आपण जेव्हा प्रेमपूर्ण जीवन जगू लागतो तेव्हा ख्रिस्तासारखे जीवन जगू लागतो.

समारोप

प्रभो येशू, तू परमेश्वराची दृश्य आणि परिपूर्ण प्रतिमा आहेस. आम्हाला परमेश्वराच्या प्रतिमेप्रमाणे घडवले आहे. परंतु पापामुळे आम्ही ही प्रतिमा डागाळतो. आम्हाला तू क्षमा कर. तुझ्या पवित्र आत्म्याच्या कृपेने, सामर्थ्याने आम्हाला तुझ्यासारखे जीवन जगण्याकरिता तू प्रेरित व समर्थ कर. ही प्रार्थना आपण आपल्या प्रतापशाली नावाने करू या. आमेन.

# पर्यटनातील पत्रकारिता !

- **जॉन कोलासो, गिरिज**

तुम्ही व्रत म्हणून स्वीकारलेल्या व्यवसायाचे प्रतिबिंब दैनंदिन जीवनातही उमटत असते. तसे माझ्या पत्रकारितेचेही झालेले आहे! आयुष्याची सुमारे चाळीस वर्षे या व्यवसायात काढलेली असल्याने जीवनातील काही प्रमुख घडामोडींची नोंद पत्रकारितेच्या दृष्टिकोनातून पाहण्याची सवय जडलेली आहे. याचे ठळक उदाहरण म्हणजे मी ऑफिसच्यावतीने किंवा व्यक्तिगत कोठेही बाहेर गेलो की केवळ पर्यटक म्हणून न फिरता माझ्यातील पत्रकारिताही सदैव सोबत असे. त्यात्या ठिकाणचे नाविन्य केवळ पाहणे, त्याचा आनंद लुटणे असे न होता, त्यात्या ठिकाणचे महत्त्व पत्रकारितेच्या दृष्टीने टिपणे हा माझा छंदच बनला आहे...

एअर इंडियाने दक्षिण भारतातील, विशेषत: केरळमधील नागरिकांना आखाती देशांत नोकरीनिमित्त जाण्यासाठी अत्यंत कमी दरात एअर इंडिया एक्सप्रेस या आपल्याच उपकंपनीतर्फे केरळमधील तिरुअनंतपूरम ते दुबई अशी सेवा सुरू केली... या सेवेचा शुभारंभ  करताना त्यावेळचे केंद्रीय नागरी हवाई खात्याचे मंत्री प्रफुल्ल पटेल यांच्यासमवेत पत्रकारांना घेऊन पहिल्या विमानाने तिरुअनंतपूरमवरून उड्डाण केले. अशा या शुभारंभाच्या विमानात मंत्र्यासोबत जाण्याचा मान 'महाराष्ट्र टाइम्स'च्या वतीने मला मिळाला. विमानाने उड्डाण केल्यानंतर दुबई विमानतळ येईपर्यंत मंत्र्यासोबत गप्पा मारण्यात इतर पत्रकार मग्न होते... मीही त्यात थोडावेळ सहभागी झालो... पण मला उत्सुकता होती ती या विमानाच्या कॉकपिटमध्ये जाण्याची... विमान कसं चालवितात... हे पाहण्याची माझी अनेक काळापासूनची सुप्त इच्छा होती आणि ती पूर्ण करण्याची संधी आयती चालून आली होती... मी ती संधी साधली. सोबत मंत्री आणि एअर इंडियाचे वरिष्ठ अधिकारी असल्याने विमानातील कर्मचाऱ्यांना माझी इच्छा बोलून दाखविली आणि त्यांनी सहज मान्य केली.... मला आणि माझ्या इतर काही पत्रकार मित्रांना घेऊन तो कर्मचारी कॅप्टनची परवानगी घेऊन कॉकपिटमध्ये घेऊन गेला... विमानाच्या कॅप्टनचे नाव होते गुप्ते... म्हणजे मराठी माणूस... विर्लेपार्ले येथे राहणारे... मग काय त्यांनी आम्हाला कॉकपिट आणि विमान कसे चालते... विमान 'ऑटो पायलट'वर ठेवल्यावर कसे आपोआप धावते... तसेच कॉकपिटमधील दिसणारी असं'य घड्याळे... म्हणजे नेमके काय... त्यांचे कार्य कसे चालते... टेकऑफ आणि लँडिंगच्या वेळची यंत्रणा कोणती... विमानतळावरील नियंत्रण टॉवरशी वैमानिकाचा संपर्क कसा सतत चालू असतो... इत्यादी तपशीलवार माहिती कॅप्टन गुप्ते यांनी पुरविली... आम्हा पत्रकारांच्या माहितीत मोलाची भर पडली... त्यामुळे साहजिकच अंतनपूरम ते दुबई या विमानसेवेच्या शुभारंभाची बातमी देताना कॅप्टन गुप्ते यांच्या नावाचा ठळक उल्लेख करून त्यांचे कौतुक केलेच!

तीन-साडेतीन तासांच्या विमान प्रवासांनंतर दुबईला आम्ही सर्व उतरल्यावर आमचा मुक्काम तेथील फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये होता... पोचता संध्याकाळ झाली होती. पहिला दिवस आरामचा... दुसऱ्या दिवशी संध्याकाळी शुभारंभानिमित्त, आम्ही मुक्कालाच असलेल्या हॉटेलच्या सभागृहात मंत्री प्रफुल्ल पटेल तसेच दुबई सरकारचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम ठेवण्यात आला होता. त्यामुळे दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत आम्ही सर्व पत्रकार मोकळे होतो... माझा रूम पार्टनर लोकसत्ताचे प्रतिनिधी प्रसाद मोकाशी होते. त्यांची बहीण त्यावेळी दुबईमध्येच राहत होती. तिला भेटण्यासाठी त्यांना जायचे होते... मला पहाटे लवकर उठण्याची सवय...

सकाळचे सर्व सोपस्कार उरकून मी बाहेर हॉटलच्या पायरीवर बसून 'सकाळची दुबई' न्याहळत होतो. इतर आमचे सहकारी पत्रकार हॉटेलमधील फाइव्ह स्टार सेवेचा उपभोग घेत होते... हॉटेलच्या लॉबीत असलेल्या भारतीय कर्मचाऱ्यांशी मी गप्पा मारल्या.... दुबईतील जीवन... विशेषत: नोकरीनिमित्त दुबईत आलेल्या भारतीयांचे जीवन कसे असते हे समजून घेण्याचा प्रयत्न केला. दुबईत किती महागाई आहे... विशेषत: घरांची भाडे कशी अव्वाच्या सव्वा आहेत... सुट्टीच्या दिवशी सर्व भारतीय काय करतात इत्यादी माहिती त्यांच्याकडून मिळत होती. त्यातील अनेकांनी मला सांगितले की, त्यापैकी अनेक जण पोटभाडेकरू म्हणून राहतात... एखाद्या बंगल्यात किंवा फ्लॅटमध्ये दोन किंवा तीन फॅमिली राहातात... तसे केले तरच घरभाड्याचा प्रश्न काही प्रमाणात आटोक्यात येऊ शकतो... कारण पूर्वीप्रमाणे मोठ्या पगाराच्या नोकऱ्या आता आखाती देशांत मिळत नाहीत. परिणामी पोटभोडकरू मिळविण्यासाठी काही जण तेथील वृत्तपत्रांत जाहिरातीही देतात... अशी माहितीही मिळाली... मग मी उत्सुकतेने हॉटेलमध्ये आलेली स्थानिक वृत्तपत्रे चाळू लागलो आणि खरचं... आपल्याकडे विवाह स्थळासाठी जशा जाहिराती देण्यात येतात... अगदी त्याच स्वरूपाच्या जाहिराती पोटभाडेकरू शोधण्यासाठी दुबईत वास्तव्याला असलेल्या भारतीयांनी दिलेल्या होत्या... 'पाहिजे मूळचा गोव्याचा... मंगलोरियन... शाकाहारी... धुम'पान न करणारा....' वगैरे स्वरूपाच्या...

माझ्यातील पत्रकारिता सज्ज झाली आणि 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये पहिल्या पानावर माझ्या नावाने बातमी प्रसिद्ध झाली... तिचे शीषर्क होते... 'दुबईतील भारतीय शोधताहेत पोटभाडेकरू!'... बातमीत दुबई, शारजा, अबुधाबी येथील भारतीयांचे जीवनमान, घरमालकांनी भाडे कसे वाढविलेले आहे... एकाच फ्लॅट वा बंगल्यात अधिक माणसे राहत असल्याने तेथील नागरी सुविधांवर कसा प्रतिकूल परिणाम होत आहे... तरीही लोकांच्या आर्थिक अडचणी लक्षात घेऊन तेथील नागरी प्रशासन मानवतावादी द्रृष्टिकोनातून अशा प्रश्नावर काही प्रमाणात कसे डोळेझाक करीत आहे... इत्यादीही तपशीलही होता...

दुबईतील वृत्तपत्रे चाळत असताना आणखी एका बातमी मला सापडली ती म्हणजे तेथील सरकार समुद्रात भराव करून सुमारे ३०० कृत्रिम बेटे तयार करून तेथे टोलेजंग इमारती बांधण्यासाठी बिल्डरना ती विकणार आहे... त्यामध्ये 'द वर्ल्ड' नावाने एक प्रमुख बेट असून त्यावर प्रत्यक्ष 'पृथ्वी'च अवतरणार आहे... म्हणजे पृथ्वीची प्रतिकृती तेथे बनविण्यात येणार आहे... त्यात आशिया, आफ्रिका, युरोप, अमेरिका, ऑस्ट्रेलिया अशी पाचही खंड आणि या खंडातील प्रत्येक देश तेथे वसणार आहेत. या 'पृथ्वी'वर आपापल्या देशात घर खरेदी करण्याची संधी परदेशी नागरिकांना मिळणार आहे. 'द वर्ल्ड' प्रमाणेच 'पाम दुबई' व 'द पाम्स' ही आणखी दोन बेटे तयार करण्यात येणार असल्याची तपशीलवार माहिती मला संध्याकाळी विमानसेवा शुभारंभाच्या कार्यक'मास उपस्थित असलेल्या काही दुबई सरकारच्या अधिकाऱ्यांकडून मिळाली... ही माहितीही मग 'दुबईच्या समुद्रात बेटांची बहार!' या शीर्षकाने महाराष्ट्र टाइम्सच्या पहिल्या पानावर बातमी झळकली आणि त्यानंतर महाराष्ट्र टाइम्सच्या रविवारच्या पुरवणीत लेखाच्या स्वरूपात तिला ठळक स्थान मिळाले... या बातम्या फक्त 'महाराष्ट्र टाइम्स'लाच मिळाल्या होत्या... आमच्या सोबत मुंबईतील इतर वृत्तपत्रांचेही पत्रकार होते... त्यांना या बातम्या मिळू शकल्या नव्हत्या...

'दुबईतील भारतीय शोधताहेत पोटभाडेकरू!'... या बातमीबद्दल सांगायचे म्हणजे माझे रूम पार्टनर असलेले लोकसत्तेचे श्री. प्रसाद मोकाशी यांची बहीण त्यावेळी दुबईत पतीच्या नोकरीमुळे मुक्कामाला होती, तीही

अशीच पोटभाडेकरू म्हणून राहत असतानाही श्री. मोकाशी यांना ही बातमी मिळू शकली नाही किंवा बातमीचे महत्त्व लक्षात आले नाही.

दुबई दौऱ्यात अशाप्रकारे मला दोन विशेष बातम्या मिळाल्या... या शिवाय तिरुअनंतपूरम ते दुबई विमान सेवा ही बातमी प्रसिद्ध झालीच त्याच बरोबर दुबईतील 'डेझर्ट सफारी' विषयी 'खेळ मांडियेला वाळवंटी ठायी...' हा लेखही महाराष्ट्र टाइम्सच्या रविवार पुरवणीत प्रसिद्ध झाला. या लेखात दुबईतील 'शॉपिंग'समवेत डेझर्ट सफारी कशी चित्ताकर्षक आहे... वाळूतून टोयोटा कंपनीच्या लँड क्रूझर कशा धावतात... सहा-सात तासांच्या प्रवासात लँड क्रूझर गाडीत बसलेल्या पर्यटकांच्या पोटात कसे भीतीचे गोळे येतात या विषयीही माहिती होती. ही डेझर्ट सफारी म्हणजे एक प्रकारचे साहसी पर्यटनाचा प्रकारच आहे... हे महाराष्ट्र टाइम्सच्या वाचकांच्या लक्षात आणून दिले.

माझा दुबई दौरा म्हणजे पासपोर्टच्या आधारे केलेली माझी पहिली 'परदेशी वारी' होती. या निमित्त एक किस्सा सांगण्यासारखा आहे. महाराष्ट्र टाइम्सच्या संपादकपदाची धुरा ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर यांनी हाती घेतल्यावर त्यांच्याकडे त्यांचे अनेक मित्र आमच्या मटाच्या ऑफिसमध्ये त्यांना भेटायला येत असत... त्यांच्यांशी आमच्याही ओळखी होऊ लागल्या. श्री. केतकर यांच्या मित्रांत श्री. उमाकांत तासगावकर यांचा समावेश आहे. श्री. तासगावकर यांचा पर्यटन व पासपोर्ट काढून देण्याचा जोड व्यवसाय आहे. त्यांच्या स्वभाव मित्रत्वाचा... मैत्री टिकविण्याचा व सर्वांना आपल्यापरीने मदत करण्याचा आहे. श्री. केतकर यांनी ऑफिसमध्ये आम्हा सर्व सहकाऱ्यांशी श्री. तासगावकर यांच्यांशी ओळख करून दिली आणि सांगितले की, पत्रकारांना परदेशी जाण्याचा योग कधीही येऊ शकतो, त्यामुळे सर्वांनी पासपोर्ट काढून ठेवा... आणि या कामी तुम्हाला श्री. तासगावकर मदत करतील. मग काय सर्वांनी एकापोठापाठ पासपोर्ट काढण्याची घाई सुरू केली. ऑफिसमधील बहुतेकांचे पासपोर्ट काढून झाले... मी पासपोर्ट काढण्याच्या फंद्यात पडलो नाही... आपल्याला काही परदेशवारीचा योग येणार नाही... असेच मी समजत होतो.. कारण त्यावेळी माझ्यापेक्षा वरिष्ठ अनेकजण होते... त्यांचा क्रम पहिला लागणार आणि आपल्याला काही संधी मिळणार नाही... असा मी समज करून घेतला होता...

सर्वांचे पासपोर्ट काढून झाले आणि त्याला बराच काळ लोटला परंतु मी काही पासपोर्ट काढून घेतला नाही, ही बाब श्री. तासगावकर यांच्या लक्षात आली, ते ऑफिसमध्ये आले असता मला भेटले आणि मला विचारले, 'तुम्ही पासपोर्ट काढून का घेत नाहीत... तुमच्याकडे पासपोर्ट आहे काय?' मी म्हटले, 'माझ्याकडे पासपोर्ट नाही... आणि काढूनही घेणार नाही... कारण ऑफिसमध्ये मी अत्यंत ज्युनिअर आहे... परदेशात जाण्याची मला कोठे संधी मिळणार?'... त्यावर श्री. तासगावकर यांचे उत्तर, 'हे बघा कोलासो, मी ज्यांना ज्यांना पासपोर्ट काढून दिलेला आहे, त्या सर्वांना परदेशात जाण्याचा योग आलेला आहे... तुम्हीही काढून घ्या...', मग त्यांनीच पुढाकार घेऊन माझा पासपोर्ट काढून दिला...

आता पासपोर्ट काढून नऊ वर्षे लोटली तरी मला काही परदेशवारीची संधी मिळाली नाही... श्री. केतकर संपादक असेपर्यंत तर मुळीच संधी मिळाली नाही... श्री. केतकर यांच्यानंतर श्री. भारतकुमार राऊत संपादक झाले.... काही महिन्यानंतर एक दिवस ते त्यांच्या केबिनमधून बाहेर आले आणि आम्हा सर्वांना उद्देशून मोठ्या आवाजात विचारले... पासपोर्ट कोणाकडे आहे...? सर्व सहकाऱ्यांत चुळबुळ सुरू झाली... कोणीही 'माझ्याकडे पासपोर्ट आहे' असे सांगत नव्हते... तेव्हा श्री. राऊत यांनी एकेक सहकाऱ्याचे नाव घेऊन विचारणा सुरू केली... प्रत्येकाचे

उत्तर 'आहे, पण त्याची मुदत संपली आहे...', मग मला विचारले तर मी सांगितले हो माझ्याकडे आहे... कारण मी पासपोर्ट उशिरा काढल्यामुळे माझा पासपोर्ट संपण्यास एक वर्षाचा कालावधी शिल्लक राहिला होता... 'अरे व्वा...' असे सांगत श्री. राऊत यांनी दुबई दौऱ्याची माहिती मला दिली... आणि अशाप्रकारे पासपोर्टची मुदत संपायला एक वर्ष असताना माझ्या नशिबी परदेश दौऱ्याचा योग आला... त्यामुळे साहजिकच मला श्री. तासगावकर यांची आठवण आली... व त्यांना फोन करून ही 'शुभवार्ता' कळविली.

अचानक पदरी पडलेल्या या दुबई दौऱ्याचे फलितही उत्तम झाले... मी दौऱ्याच्यावेळी खरेदी काही केली नाही पण माझ्यासारख्या पत्रकाराला दोन चांगल्या बातम्या मिळाल्या... आजही माझे काही सहकारी या बातम्यांचे कौतुक करतात...

दुबई हा माझा 'पहिला परदेश दौरा' असला तरी माझ्या 'फॉरन रिटर्न' शुभारंभ नेपाळ दौऱ्याने झालेला आहे. माझ्या कल्याणच्या मित्रांच्या सोबत आणि 'युथ हॉस्टेल'च्या मार्फत केलेला तो गिर्यारोहण म्हणजे 'ट्रेक'च्या निमित्ताने केलेला होता. 'पोखरा व्हॅली ट्रेक' नावाने हे गिर्यारोहण होते. या ट्रेकला सुरुवात होण्यापूर्वी आम्ही मित्रांनी काठमांडूसह प्रमुख पर्यटनस्थळांची भ्रमंती करण्याचे ठरविले आणि ट्रेक सुरू होण्यापूर्वी पाच दिवस आधीच काठमांडूला गेलो. त्यावेळी भारत आणि नेपाळ या दोन्ही देशांत तणाव निर्माण झाला होता. नेपाळने भारताऐवजी चीनशी संग करण्यास सुरुवात केली होती... आणि नेमका त्याचवेळी भारत आणि नेपाळ यांच्यातील रस्ता वाहतूकसंबंधीचा करार संपुष्टात येऊन तो नव्याने करण्याची वेळ आली होती. परंतु नेपाळ चीनसमवेत जाण्याच्या तयारीत असल्याचे लक्षात आल्यावर भारत सरकारने हा करार करण्याचे लांबणीवर टाकले होते... परिणामी नेपाळला जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा होणे बंद झाले होते...

नेपाळला भारताशिवाय दुसरा रस्तामार्ग नाही. दुसरा हवाई मार्ग असला तरी तो दैनंदिन वस्तूंच्या वाहतुकीसाठी महाग ठरत होता... चीनमधून पुरवठा शक्यच नव्हता... त्यामुळे भारताच्या या ताठर भूमिकीबद्दल तेथील वर्तमानपत्रांत आणि टीव्हीवर भारत सरकारवर जोरदार टीका करण्यात येत होती... नेपाळ सरकारही आपल्या देशातील जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईबद्दल भारताला दोष देत होते. त्यावेळी नेपाळमध्येही घरोघरी टीव्ही नव्हते... त्यामुळे कि'केटच्या सामन्यांचे धावते समालोचन ऐकावे तसे नेपाळी नागरिक झाडाखाली बसून ट्रान्झिस्टरवर बातम्या ऐकत असत... त्यांच्या लक्ष एकच होते... भारत रस्ता वाहतुकीवरील बंदी कधी उठवणार याचकडे... नाक्यानाक्यावर क्रिकेटचा स्कोर बोर्ड लावावा त्याप्रमाणे भारताने घातलेल्या बंदीचा आज कितवा दिवस... हे ठळकपणे नेपाळी नागरिकांना दाखविण्यासाठी फलक लावलेले असायचे... त्यामुळे नेपाळी नागरिकांचा भारत व भारतीय पर्यटकांबद्दलचा तिरस्कार, द्वेष दिवसेंदिवस वाढत होता... हे सर्व माझ्या लक्षात आले... माझ्यातील पत्रकार मला स्वस्थ बसू देईना... या प्रकरणी अधिक माहिती मिळविण्यासाठी मी काठमांडू येथील 'रायझिंग नेपाळ' या दैनिकाच्या कार्यालयात गेलो... तेथे उपसंपादक होते... त्यांच्यापैकी एका उपसंपादकास भेटलो आणि 'मी मुंबईहून 'टाइम्स'मधून आलोय', असे सांगून माझे टाइम्सचे ओळखपत्र दाखविले... त्या उपसंपादकाने मला त्याच्या कार्यालयात न बसविता... ऑफिस इमारतीच्या टेरेसवर घेऊन गेला आणि हवी ती माहिती... तपशील दिला... तेथील सर्वसामान्य नागरिकांचे कसे हाल होतात... ते सांगितले. ते ऐकून मी बातमी पाठविण्यासाठी अधिक आतूर झालो...

ऑफिसला... महाराष्ट्र टाइम्सला ही बातमी आणि सविस्तर वार्तापत्र पाठविले पाहिजे... पण कसे...? कारण १९८७ च्या सुमारास इतक्या लांबून झटपट बातमी व बातमीपत्र पाठविण्याची स्वस्त व सहज सोय नव्हती... काय करावे, कशी बातमी पाठवावी... समजत नव्हते... अस्वस्थता वाढत होती... दुसऱ्या दिवशी सकाळी काठमांडूमधील दुकानात जाऊन काही फुलस्केप कागद आणले आणि काठमांडूमधील जीवनाबद्दल तपशीलवार बातमी वजा बातमी पत्र लिहून काढले... एका पोस्टपाकिटात घातले पाकिट फुगले... तेथील पोस्टाचे स्टँप घेऊन ते पाकिटावर चिकटविले आणि महाराष्ट्र टाइम्सच्या मुंबईच्या पत्त्यावर हे वार्तापत्राचे पाकिट पाठविण्यासाठी काठमांडूच्या पोस्ट ऑफिसच्या कार्यालयात दिले... ही प्रक्रिया पूर्ण झाल्यावर माझे मन एकदाचे शांत झाले... महाराष्ट्र टाइम्सला बातमी मिळो की न मिळो... मिळाल्यावर ती प्रसिद्ध होवो की न होवो... याचे आता मला कर्तव्य नव्हते... कारण पत्रकार म्हणून माझे कार्य झाले होते... ट्रेक पूर्ण करण्यास मी मोकळा झालो होतो...

बातमी महाराष्ट्र टाइम्समध्ये जरी प्रसिद्ध झाली तरी ती मला नेपाळमध्ये कळण्यास काही मार्ग नव्हता... कारण संपर्काचे साधन नव्हते.... परंतु... ही बातमी वजा बातमी छापून आल्याचे आम्हाला असे कळले... झाले असे की आम्ही ट्रेक वगैरे संपून मुंबईच्या परतीच्या मार्गाला लागलो. आमची ट्रेन सकाळी अकाराच्या सुमारास इगतपुरी स्टेशनला आली, ट्रेन थांबली असता प्लॅटफॉर्मवर वर्तमानपत्रे घेण्यासाठी उतरलो... जवळच्याच पेपर स्टॉलवर 'महाराष्ट्र टाइम्स' मिळाला... गाडीच्या डब्यात परतल्यावर मित्रांनी 'महाराष्ट्र टाइम्स' चाळायला घेतला आणि त्यांनाही धक्का बसला... पान तीनवर माझे नेपाळचे वार्तापत्र ठळकपणे झळकले होते... मी हा उपद्व्याप कधी केला होता, त्यांना काहीच माहीत नव्हते... कारण ते काठमांडूला बाहेर फिरायला गेलेले असताना हॉटेलच्या रूममध्ये बसून माझी 'पत्रकारिता' चालू होती...

माझ्या या बातमीपत्रामुळे महाराष्ट्र टाइम्सच्या वाचकांना नेपाळमधील सत्य परिस्थिती सविस्तर समजण्यास मदत झाली... त्यावेळी महाराष्ट्र टाइम्सचे संपादक गोविंद तळवलकर यांनी तसेच इतर सहकाऱ्यांनी तसेच वसईतील ज्येष्ठ पत्रकार आणि रेडिओ व दूरदर्शनचे माजी वृत्तसंपादक श्री. यशवंत जोशी यांनी माझ्या या वार्तापत्राबद्दल माझे कौतुक केले...

नेपाळमधील 'पोखरा ट्रेक' करण्याचा माझा मुख्य हेतू होता तो म्हणजे हिमालयाचे दर्शन घेणे! शालेय जीवनापासून मला हिमालयाचे फार आकर्षण होते. गंगा नदी भारतीयांची 'माता' समजली जाते तर हिमालय 'बाप'! या हिमालयात अनेक थोर ऋषींना तपश्चार्यानंतर झालेले दिव्य ज्ञान... असा हा हिमालय १९६२ साली संकटात सापडला असता त्याच्या मदतीसाठी महाराष्ट्राचा 'सह्याद्री' धावला होता... हिमालय म्हणजे 'सागरमाथा'... हिमालयामुळे भारताची उत्तरेकडील सीमा सुरक्षित बनली आहे... हिमालयाचे एव्हरेस्ट शिखर जगात सर्वांत उच्च शिखर आहे... हे सर्व ऐकून मला हिमालयात जाण्याची, त्याचे दर्शन घेण्याची फार मोठी आस लागलेली होती. त्यामुळे आम्ही जेव्हा ट्रेकसाठी निघालो तेव्हा मी लहान मुलांप्रमाणे त्याच्या दर्शनासाठी अधीर झालो होतो... रेल्वे गाडीतून गोरखपूर रेल्वे स्टेशनला उतरलो आणि तेथून नेपाळच्या सीमेवर जाण्यासाठी आम्ही बस पकडली. नेपाळच्या सीमेलगत बस थांबली आणि मला बसमधून खाली उतरण्याची घाई झाली... बसमधून उतरून बाहेर 'हिमालय दर्शन'साठी धावलो... तर पदरी निराशा... कोठेच हिमालय दिसत नव्हता... माझा असा समज होता की सर्वोच्च शिखर म्हणून समजण्यात येणारे 'एव्हरेस्ट' नेपाळच्या कानाकोपऱ्यातून कुठेही दिसत असणार... पण घोर निराशा... सीमेवरील 'नो मॅन लँड' ओलांडून नेपाळच्या सीमेत प्रवास केला आणि एव्हरेस्ट दर्शन न झाल्याने

नाराज झालेल्या मनाला मात्र आपण आयुष्यात प्रथमच 'फॉरेन टूर' करीत असल्याचा सुखद आनंद चाटून गेला... ट्रेकच्या निमित्ताने पुढे झालेल्या हिमालय दर्शनाचा सोहळा... तेथील निसर्ग दर्शन... खळखळत्या नद्या, विविध हिमशिखरे... त्यांचे सकाळ, दुपारी, संध्याकाळी होणारे चित्ताकर्षक दर्शन... इत्यादी मनात टिपून नंतर तो महाराष्ट्र टाइम्सच्या वाचकांसाठी लिहिण्याचा मोह काही आवरला नाही.

सहकुटुंब युरोप पर्यटन करण्याची संधी मी घेतली. इटलीहून सुरू झालेल्या आमच्या या दौऱ्याचा समारोप लंडनमध्ये झाला. लंडनमध्ये स्थायिक असलेला आमचा पुतण्या नितीन कोलासो यांच्या घरी काही दिवस मुक्कामही केला. या युरोप दौऱ्यात अनेक देशांतील पर्यटनस्थळांना भेटी दिल्या... त्यामुळे भारतात परतल्यावर लेख लिहिण्यासाठी पुष्कळ सामग्री मिळाली. लंडनमध्ये नोकरी व शिक्षणाच्या निमित्ताने वास्तव्यास असलेल्या वसईतील युवकांना भेटलो... त्यांच्यांशी बोलून हे युवक कसे राहतात... काय करतात... या विषयावर महाराष्ट्र टाइम्समध्ये लेख लिहिला... लंडनवाले वसईकर म्हणून...

भारतातच भिकारी असतात... हा माझा समज खोटा ठरला तो या युरोप दौऱ्यामुळेच... या पर्यटनामुळे मला युरोपयीन देशांत कसे भिकारी भेटले... त्यांची भिक्षा मागण्याची काय पद्धत आहे... इत्यादींचे निरीक्षण करून मी 'भिकाऱ्यांनी जपलेली संस्कृती!' असा एक लेख लिहिला. त्यात रोममध्ये रोमन सैनिकाच्या वेषात हातात उपसलेली तळपती तलवार घेऊन तासनतास उभे असलेले भिकारी... 'लिबर्टी पुतळयाच्या वेषात रस्त्याच्या कडेला उभे असलेले व पायाजवळ भिक्षापात्र ठेवलेले भिकारी... लंडनच्या मेट्रो ट्रेनमध्ये भिक्षा मागणारी तरुणी... हॉलंडला रस्त्यावर गिटार वाजवत भिक्षेच्या अपेक्षेने पर्यटकांचे लक्ष वेधू पाहणारे भिकारी... असे नाना तऱ्हेचे हे भिकारी होते. अशाप्रकारे केवळ भारतातच भिकारी असतात असे नव्हे तर परदेशांतही त्यांचे दर्शन घडते हे वाचकांच्या निदर्शनास आणून देणे मला शक्य झाले होते.

आम्ही लंडन दौऱ्यात जगवि'यात शेक्सपिअरच्या गावाला भेट दिली होती. स्टँडफर्ड अपॉन ॲव्हन हे त्यांच्या जन्मगावाचे नाव. ते लंडनपासून सुमारे ११० किमी अंतरावर आहे. शेक्सपिअरची पत्नी ॲना हिचे घरही तेथून जवळच आहे. या दोन्ही ठिकाणी आम्ही भेट दिली. या वास्तुंना ४०० वर्षे लोटून गेलेली असूनही त्यांचे जतन सुंदररीत्या करण्यात आलेले आहे. या घरांच्या परिसरात असलेल्या बागायतीची देखभाल करणारे नोकर आजही ४०० वर्षांपूर्वीचा वेशभूषा करतात... या सर्वांचे फोटो दर्शन मला महाराष्ट्र टाइम्सच्या वाचकांना करून देण्याची संधी मिळाली.

लंडनच्या जगप्रसिद्ध वॅक्स म्युझियममध्ये अनेक सुप्रसिद्ध व्यक्तींचे पुतळे पाहायला मिळतात... हिंदी चित्रपट अभिनेता शाहरूख खान यांच्या पुतळयाजवळ आलो असता सोबत असलेल्या पुतण्या नितीन कोलासो याने लक्षात आणून दिले की, या जागी अभिनेत्री ऐश्वर्या हिचा पुतळा होता... तो काढून शाहरूख खानचा पुतळा बसविण्यात आला आहे... पुतण्याने त्याच्या संग्रही असलेल्या ऐश्वर्याच्या पुतळयाचा फोटोही दाखविला... मग मला महाराष्ट्र टाइम्सला बातमी देण्याचा मोह आवरता आला नाही... या बातमीचे शीर्षक होते... 'लंडनच्या वॅक्स म्युझियममधून ऐश्वर्या गायब!' सोबत ऐश्वर्या आणि शाहरूख खानचे फोटो!

याशिवाय रोमचे वर्णन करणारा 'रोम'हर्षक प्रवास, पॅरिसची संध्याकाळची संस्कृती चित्रित करणारा इव्हनिंग इन पॅरिस असे काही लेखही लिहून वाचकांना युरोपचे पर्यटन दर्शन घडविले...

जमशेदपूर येथे दरवर्षी 3 मार्च रोजी टाटा उद्योगाचे संस्थापक व उद्योग महर्षी जमशेदशी टाटा यांच्या जयंतीनिमित्त मोठा सोहळा आयोजित केला जातो आणि कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांचे सप्ताहभर सांस्कृतिक, क्रीडा असे जंगी कार्यक्रम होतात... या निमित्ताने जमशेदपूरला सप्ताहभर राहण्याची संधी मिळाली आणि या सर्व कार्यक'मांचे आखोदेखा हाल पाहिले... आणि मराठी वाचकांनाही त्याची सचित्र झलक दाखविण्याचा प्रयत्न केला.

माझ्या पर्यटनातील पत्रकारितेच्या या काही ठळक आठवणी, स्मृती जागविण्याचा प्रयत्न वाचकांसाठी केला आहे... वाचकांना त्या आवडतील, अशी आशा आहे.

---

# कौटुंबिक व्यवहार आणि नातेसंबंध

▪ **ॲड. विल्यम फर्नांडिस (मो. 9890297300)**

सर्व सजीवात मनुष्याला मोठया प्रमाणात बुध्दी, भावना प्राप्त झालेली आहे. मनुष्य बुध्दीने विचार करतो, मात्र त्याला प्रेम, आकर्षण, राग, लोभ, द्वेष, असूया अअशा भावनाही आहेत, त्याला स्मरण, विस्मरण याचीही देणगी आहे. त्यामुळे मनुष्य समाजात, कुटूंबात राहतो. अपरिहार्यपणे नातेसंबंध निर्माण होतात. नातेसंबंध भावनेवर अवलंबून असतात, मात्र त्याच बरोबर मनुष्याला व्यवहारही चुकत नाही आणि त्याची खरी गोची येथेच होते.

भावना व व्यवहार याचा त्याला मेळ घालता येत नाही आणि नातेसंबंधात कलह निर्माण होतो, तो होउ नये म्हणून मनुष्याने संतुलितपणे विचार करुन प्रसंगी भावना तर प्रसंगी व्यवहार याचा सांगड घालणे आवश्यक आहे. रक्ताच्या नातेसंबंधात, भावंडात, पती-पत्नीत, कुटूंब व नात्यात कुठलाही व्यवहार करावयाचा असला, तर त्याच्यात पुर्ण पारदर्शकता व स्पष्टता असावी. शक्यतो त्याचे लिखाण असावे, बॅकेंव्दारे देणे-घेणे व्यवहाराच्या नोंदी असाव्यात, पावत्या दयाव्यात-घ्याव्यात, कौटूबिक वाटप, हक्कसोड, बक्षिस, मृत्यूपत्र इ. चे वकिलाच्या सल्ल्याने लिखाण असावे. मोजणी संदर्भात शासकीय सर्वे करुन हद्दी निश्चित कराव्यात.

पैशाच्या देवाण-घेवाणीत चार्टड अकांउटचा सल्ला घ्यावा. व्यवहारात पती-पत्नी, सज्ञान मुले यांना सहभागी करावे, साक्षीदार म्हणून त्यांच्या सहया घ्याव्यात. संस्कृती,  चालीरिती व रुढी परंपरा यानुसार जरी विवाहीत बहिणी माहेरच्या मिळकतीत हक्क घेत नसल्या तरी परिस्थितीनुसार त्यांना त्यांचा हक्क देण्यास मागेपुढे करु नये. रोख पैशाचा व विना लिखाणाचा व्यवहार टाळावा. लिखाण केले, सही करायला सांगितले, बॅकेमार्फत पैसे दिले-घेतले म्हणून राग मानू नये, कटुता ठेऊ नये, कारण त्यामुळे नातेसंबंधात भविष्यात कटुता येत नाही. अर्थात तातडीच्या परिस्थितीत हे सोपस्कार बाजूला करुन मदत करणे हे अत्यंत आवष्यक आहे.

कुटूंबात, नातेसंबंधात कोणाची आर्थिक उन्नती होत असेल,  तर त्याबाबत असूया निर्माण होऊ देऊ नये आणि ज्याची उन्नती झाली असेल त्यांने त्याबाबत गर्व करु नये. भावना व व्यवहार याचें योग्य ते संतुलन राखले तर मनुष्याला विना वादविवाद जीवन जगणे कठीण नाही.

# मिश्किल आणि खुमासदार 'कादोडी' बोलीभाषा

■ जोसेफ तुस्कानो, गास, वसई

मराठी मायबोलीशी निगडीत साठावर बोलीभाषा उपलब्ध आहेत. जागतिकीकरणाच्या रेट्यात ह्या बोलीभाषा नामशेष होऊ लागल्या आहेत. इच्छाशक्ति व आस्थेचा अभाव तसेच आपली बेफिकिरी या गोष्टी बोलीभाषेच्या संवर्धनातील अडसर ठरले आहेत. या बोलीभाषेतले शब्द प्रमाण मराठी भाषेत आणून तिची खुमासदारी वाढवता येईल. पण लक्षात कोण घेतो? बोलीभाषा म्हणजे अडाणीपण ही अंधश्रद्धाही सुशिक्षित मनावर पगडा टाकून आहे. हा न्युनगंड तथाकथित सुशिक्षित मनावर का बरे?

महाराष्ट्राची प्रमाणभूत लिपीबद्ध भाषा म्हणजे मराठी होय. वसई तालुक्यात निरनिराळ्या समजाचे लोक राहतात. मराठी ही सर्व समाजाची प्रमाण भाषा असली तरी ते घरीदारी स्थानिक बोलीभाषा वापरतात. या बोलीभाषा लिपीबद्ध करणे अवघडच आहेत नि त्यांचा नोंदी करण्यात वापर झाला नसावा. या विभागातील पानमाळी, कोळी, भंडारी, आगरी, ईस्ट इंडियन व सामवेदी यांच्या बोलीभाषा बऱ्याच वेगळ्या आहेत. उदा. 'इकडे-तिकडे' या प्रमाणभूत मराठी शब्दासाठी या वेगवेगळ्या बोलीभाषेत (अनुक्रमे) अटे-तटे, अंवार-तंवार, अंय-तंय, अयला-तयला, अथ-तथ व सामवेदी-कादोडी बोलीभाषेत 'अडॅ-तडॅ' असे शब्द वापरले जातात.वास्तूत: सामवेदी-कादोडी बोली ही एकसंघी आहे. कारण ती एका विवक्षित मर्यादित विभागात वापरली जाते. तरीही, त्यातील काही गावात काही विशिष्ट शब्द व शब्दप्रयोग वापरले जातात. जे दुसऱ्या गावात आढळत नाहीत. ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या सामवेदी (कुपारी) समाजात लॅटिन व पोर्तुगीज शब्दांचा समावेश झालेला आहे.

सामवेदी-कादोडी भाषा काहीशी रांगडी आहे असं काहींना वाटतं. मालवणी भाषेप्रमाणे, या भाषेतदेखील (प्रेमळ) शिव्या वापरात आहेत. 'श्याsss मायला'' अशा शिवीचा सर्रास वापर आहे. पण यात राग नसून कौतुक जास्त असते. ही भाषा उत्तर कोकणातली असली तरी कोकणी नाही.

सामवेदी-कादोडी भाषेत गोष्टींना ''कानी'' म्हणतात. तर म्हणीला 'मनी' म्हणतात. पाणी व आणि चा उच्चार 'पानी व आनी' नातीगोती, व्यवसाय, घरदार, प्रवास (गाडीघोडा), घरगुती आहार, देवधर्म प्रवृत्ती, स्वभाव, विसंगती, शरीराचे अवयव, अंक (गणितातले), कालमान, पशुपक्षी, किडामुंगी झाडपान, अशा नाना विषयांवर विविध प्रकारच्या शेकडो म्हणींनी ही बोलीभाषा समृद्ध आहे.

उदा: १. 'हांग्या गॅलॉ तॉ टांग्या गॅलॉ' (सांगायला गेला तो टांगायला गेला). ज्या कामाची सूचना द्यायला गेला, त्या कामाची जबाबदारी अंगाशी आली.

२. 'जॅआ घारा दानॉ तॉ शानॉ' (ज्याच्या घरी दाणा, तो शहाणा). घरात भरपूर अन्नधान्य, हे शहाणपणाचे लक्षण.

३. 'बायकांइ अक्काल सुलीपुडॅ' (बायकांची अक्कल चुलीपुढे). बायकांची अक्कल स्वंयपाक घरापुरती मर्यादित.

अशा निरनिराळ्या अर्थपूर्ण म्हणीसोबत असंख्य वाकप्रचारांची रेलचेल या बोलीभाषेत आढळते. म्हण ही स्वयंपूर्ण असते, तसा वाकप्रचार स्वयंपूर्ण नसतो. एखाद्या संदर्भातच त्याला जिवंतपणा येतो.

उदा: १. ‘आथाला डॉळॉ अहनॅ’ (हाताला भोक असणे). हातात पैसा न टिकणे.

२. ‘घोडयोर बॅहॅनॅ’ (घोड्यावर बसणे). अति उताविळ होणे.

३. ‘उटी खॉसॉन’ (ओटी खोचणे). कामाला सज्ज होणे.

आधी भाषा बनते मग तिचे व्याकरण तयार होते. सामवेदी-कादोडी बोलीभाषा मर्यादित क्षेत्रामध्ये बोलली जाते. ती आजपर्यंत मराठी वाङ्मयासारखी अक्षर बद्ध झाली नाही; ग्रंथीत झाली नाही. परंतु, ती मराठी भाषेची एक बोली असल्याने तिला मराठी भाषेसारखे व्याकरणाचे अंग आहे.

गेली सहा वर्षे उत्तर वसईतील जीम (फिलिप) रॉड्रिग्ज या तरुण शिक्षकाच्या अध्यक्षतेखाली ‘सामवेदी ख्रिस्ती (कुपारी) संस्कृती मंडळ ‘कुपारी संस्कृती महोत्सव’ (नाताळ सणाच्या दुसऱ्या दिवशी) साजरा होत आहे. गतवर्षीचा ‘सव्वो’ महोत्सव होता. या महोत्सवाला हजारो लोक उपस्थित असतात. धर्मगुरू, समाजसेवक, सामान्यजन हातात हात घालून महोत्सवाचा आनंद लुटतात. पारंपारिक वेषात नटतात, सांस्कृतिक कार्यक्रम, पुस्तक प्रकाशन, बॅंडबाज्याचे संगीत, परंपरागत खाद्यपदार्थांची विक्री ई. भरगच्च कार्यक्रम होतात ती सायंकाळ कुपारी संस्कृती वा कादोडी भाषा यांनी भारावून गेलेली असते. इथे त्या सिंधी संमेलनासारखे नसते बरं का ! सिंधी संमेलनासंबंधी एक इंग्रजी व्यंगचित्र आहे. एक तरुणी सोबतच्या व्यक्तिला सांगते, ‘I feel at home. Everyboday speaks English here’. पण आमच्या सामवेदी महोत्सवात सगळं ‘कोपातच्या कोपात’ (सुशेगात नि आलबेल) चाललेलं असतं. जगभर बेगडी विकासाच्या भुलथापांद्वारे संस्कृती आणि बोलीभाषांचे शिरकाण सुरू असताना, या भयचकीत वास्तवाने अस्वस्थ होऊन आपली बोलीभाषा आणि संस्कृतीच्या संवर्धनासाठी सरसावलेला उत्तर वसईतील सामवेदी ख्रिस्ती कुपारी समाजातील सुशिक्षित तरुण वर्ग, हे चित्र आश्वस्त करणारे आहे.

उत्तर वसईतला हा ख्रिस्ती समाज मूळचा शेतकरी. त्यांचे मागचे जीवन शेतीशी निगडीत. दैनिक जीवनात विहिरीतून पाणी ओढणाऱ्या ‘रहाट’ला अनन्यसाधारण महत्त्व. खाद्यपदार्थ, पंचपक्वान्ने शेतीत पिकविलेल्या धान्य, भाजीपाल्यातून तयार केलेले. त्यामुळेच तर सहाव्या महोत्सवाच्या यशानंतर सकलांचे लालित्यपूर्ण आभार मानताना, अध्यक्ष जिम लिहितात : ‘आपलॉ महोत्सव यशस्वी कऱ्यादो कुनॅ कुनॅ राटाई माळ ओविली... बांडयो बांदिल्यो... बैलाला डॉपान लाविला... बैल हांमटीलॅ... राट फिरविलॉ...! राटायो बांडयो.. कय रित्यो.. कय झरल्यो.. कय भरल्यो.. पान हिपणा आलामत झाला.. बो भारीस ! कुनॅ जाता फिरविला.. दळान कॅला... खरास कुन-कुन अड्याला बड्या जाले.. गाड्याआ साकाला माखांड लाविला... कुनॅ पॅडॉ जकीला... कुनॅ-कुनॅ आपल्या महोत्सवागराडी मिनशे दगड काडले... बैल आंबडिलॅ.. भाकरी, आळूवड्यो, फुगे, रव्याशे लाडू, हिंगोळयो, वालाय भाजी, बुंबलाआ आटवान, रॅवाळा-दॉदाल घाटीला... सामट्यो खापश्यो मोराय लाडू, दोद्याई कनेरी, पानमोडयो हिज्विल्यो... रातदिह आपला रगात आटवॉन जमेदॅ ताहा काम कॅला. पान कुपारी महोत्सवाआ जक्कॉन भरलेला गाडा पल्ल्यापार न्यासा काम आपुन कॅला... आपला अभिनंदन आन आपल्या सहयोगाबद्दल खुब-खुब आभार पन!’

अकस्मात तूफान उठावे आणि त्या तुफानाने समाजाला व्यापून मंत्रमुग्ध करावे, तद्वतच ‘कुपारी संस्कृती मंडळाद्वारे आयोजित कुपारी संस्कृती महोत्सवाबाबत म्हणावे लागेल. ‘पाशीहार’ हा जुन्या काळातील बायकांच्या

गळ्यातील हार. दरवर्षी महोत्सवानिमित्त जो वार्षिकांक निघतो, त्याचे शीर्षकदेखील ‘पाशीहार’ ठेवले गेले आहे. हा साहित्यिक दागिणा समाजाचे भूषण बनला आहे. एकप्रकारचा आरसाच तो.!

ख्रिस्तोफर रिबेलो हा तरुण गेली आठ वर्षे “कादोडी” या नावाने बोलीभाषेतील अंक संपादित करीत आहे. सुरवातीला त्रैमासिकाचे रुप असलेला हा अंक आता “नाताळ विशेषांक” म्हणून प्रिंट आणि ई-अंक अशा दोन्ही स्वरुपात प्रकाशित होतो. गेल्या नाताळचा अंक हा त्याचा एकहाती चौदावा अंक होता. त्यातले लेख, कथा, कविता, स्फुट, बातम्या सारं काही कादोडी भाषेत असतात.

२०१८च्या फेब्रुवारीत मुंबईतील डोंबिवलीला भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात या कादोडी बोलीभाषेतील चार-पाच कवींना कविता सादर करण्यात आमंत्रित करण्यात आले होते. तो या बोलीभाषेचा सन्मानच होता. त्यात कवी सचिन मेंडिस, सॅबी परेरा, बर्नड लोपीस, राजन डिमेलो आणि कु. मेल्सिना तुस्कानो ह्यांनी भाग घेतला. आमच्या बोलीभाषेचा हा पहिला सन्मान होय.

समाजातील या तरुण मंडळींनी लवकरच कादोडी बोलीभाषा संमेलन आयोजित करण्याचा घाट घातला आहे. त्या उपक्रमाला शुभेच्छा. सामवेदी बोलीभाषेचा एक छोटासा ओढा आज ग्रंथीत मराठी भाषेच्या मुळप्रवाहाकडे निघालाय ही आनंदाची बाब आहे. त्याचे स्वागत करूया.

(लेखक राज्य शासनाचा 'भाषा सल्लागार समितीचे सदस्य'आहेत)

संदर्भ: - १. सामवेदी बोलीभाषा लोकसाहित्य, रेव्ह. फा. फ्रान्सिस कोरिया, श्री. पॉल रुमाव, श्री. बावतीस दाबरे. सप्तर्षी प्रकाशन, वसई १९९२

२. सामवेदी ख्रिस्ती समाज: सांस्कृतिक इतिहास

रेव्ह. फा. फ्रान्सिस कोरिया, श्री. पॉल रुमाव, श्री. बावतीस दाबरे. सप्तर्षी प्रकाशन, वसई १९९८

३. पाशीहार – कुपारी महोत्सव विशेषांक (२०१२, १३, १४, १५ व २०१६)

सामवेदी ख्रिस्ती कुपारी संस्कृती मंडळ, उत्तर वसई

४. महाराष्ट्र टाइम्स – वसई-विरार पुरवणी, ७ फेब्रुवारी २०१७

५. लोकसत्ता (लोकरंग पुरवणी) १९ फेब्रुवारी २०१७

६. कादोडी (खाजगी वितरण) संपादक – ख्रिस्तोफर रिबेलो

नाताळशा हनाव विशेषांक, २५ डिसेंबर दरवर्षी

अकरावो अंक – २५ डिसेंबर २०१६

# सुखाचा शोध

■ डॉ. नरेश नाईक. Nareshnaik55@gmail.com/ mob. 7350508310

मी शाळेत असताना एकदा 'सुखी माणसाचा सदरा' या विषयावर निबंध लिहायला दिला होता. त्या निबंधात मी काय लिहिलं होतं ते आता अजिबात आठवत नाही. पण तेव्हापासून आयुष्याच्या वेगवेगळ्या वळणावर हा सदरा मला सतत खुणावत राहिला. हा सदरा कसा असतो, तो कोण शिवून देतो याविषयी शालेय वयापासून माझ्या मनात कुतूहल होतं. पुढे वय वाढत गेलं, जगण्याचं क्षेत्र विस्तारत गेलं तसं तसं हे कुतूहल शमत गेलं. पण यातूनच माणसाच्या सुखी होण्याच्या धडपडीचं वेगळं वास्तव मात्र मला सतत खुणावत राहिलं.

हातात खर्च करण्यासाठी भरपूर पैसे असतील तर आपल्याला हवी तशी मौजमजा करता येते आणि त्यातून आनंद मिळवता येतो अशी माझी कल्पना होती. म्हणूनच बंगला, गाडी, नोकर-चाकर, उत्तम नोकरी किंवा व्यवसाय-उद्योग ही सगळी सुखाची साधनं आहेत असाच माझा समज झाला होता. आणि यात माझी काहीच चूक नव्हती. कारण माझ्या आजुबाजूच्या लोकांचाही हुबेहूब तसाच समज होता. पुढे कमावता झाल्यावर यातल्या काही गोष्टी खरेदी केल्या, थोडी मौजमजाही केली. पण त्यातून मिळालेला आनंद फार काळ टिकला नाही. कारण खरेदी केलेल्या वस्तू जुन्या झाल्या तसा त्यातला आनंदही जुना जुना होत गेला. आणि गाडी पुन्हा मूळ पदावरच आली.

भौतिक वस्तूंमधून मिळणारा आनंद त्या वस्तूंबरोबरच जुना होत जातो हे सत्य उमजल्यावर मी पुन्हा सुखाचा शोध सुरू केला. आणि खराखुरा आनंद हा अध्यात्मातूनच मिळतो असं कुणीतरी सुचवलं. मग मी त्या दिशेने प्रयत्न सुरू केले. खरंतर देवाधर्माच्या बाबतीत मी पहिल्यापासून एकदम नास्तिक. एकतर देव प्रत्यक्ष दिसत नसल्यामुळे म्हणा किंवा शिक्षणामुळे विज्ञानवादी दृष्टिकोन तयार झाल्यामुळे म्हणा पण मला सगळ्या गोष्टी वैज्ञानिक प्रयोगाच्या कसोटीवर घासून पुसून स्वीकारण्याची सवय लागली होती. त्यामुळे प्रयोगाच्या कसोटीवर देवाचं अस्तित्त्व सिद्ध करणं तसं कठीणच होतं. तरीही आजुबाजूचे लोक देवावर एवढा विश्वास ठेवतात म्हणून मीही देवळात जाऊ लागलो. पण स्वभावतःच विज्ञाननिष्ठ असल्यामुळे मूर्तीत देव आहे यावर विश्वास ठेवणं अवघड वाटू लागलं. पण कुणीतरी सांगितलं की, मनात श्रद्धाभाव असेल तर दगडातही देव दिसतो.

त्यानंतर माझा मूर्तीत देव शोधण्याचा प्रयास सुरू झाला. पहिले काही दिवस देवाच्या मूर्तींचं निरीक्षण करण्यात घालवले. मूर्तीचा आकार, रंगरूप हे सगळ नजरेत भरण्यासारखं असलं तरीही त्यात देव आहे हे काही मनाला पटेना. मग इतर लोक करतात तशी देवाची प्रार्थना सुरू केली. देवाच्या मूर्तीसमोर सकाळ संध्याकाळ प्रार्थना करूनही माझ्या मनात देवाविषयीचा श्रद्धाभाव काही जागा झाला नाही. आजुबाजूचे लोक देवासमोर (म्हणजे ज्या मूर्तीला ते देव मानतात तिच्यासमोर) डोळे मिटून प्रार्थना करताना किंवा मनातल्या  मनात जप करताना पाहून मी आतून अस्वस्थ होत होतो. पण त्यातूनच यातली मेख माझ्या लक्षात आली. जेव्हा आपली तर्कबुद्धी जागृत असते तेव्हा आपल्याला डोळे मिटून कशावरही विश्वास ठेवणे अवघड जाते. थोडक्यात तार्किक दृष्टिकोनातून आपण देवावरच्या श्रद्धेकडे पाहू शकत नाही. म्हणजेच तार्किक दृष्टिकोन आणि देवावरची श्रद्धा आपल्या मनात एकाच वेळी नांदू शकत नाहीत. मग एवढे लोक हजारो वर्षापासून देवावर श्रद्धा का ठेवून आहेत? त्यांनी आपल्या तर्कबुद्धीला सुट्टी दिलेली आहे का? की त्यांच्यात तर्कबुद्धीच जागृत झालेली नाही?

कुणीतरी सांगितलं की, याचं उत्तर तुला धर्मात मिळेल. मग मी धर्माकडे त्या दृष्टीने पाहू लागलो. जगात वेगवेगळे धर्म आहेत व प्रत्येक धर्माचा स्वतंत्र देव आहे. कधी काळी माणसाचं दैनंदिन आचरण हाच केवळ धर्माचा गाभा होता. पण आज प्रत्येक धर्माच्या केंद्रस्थानी त्यांचा त्यांचा देव आहे. देव व धर्म हे एवढे एकजीव झाले आहेत की त्यांना एकमेकांपासून वेगळे अस्तित्वच राहिलेले नाही. म्हणून जे लोक देवावर श्रद्धा ठेवतात त्यांना त्या धर्माच्या चौकटी मान्य कराव्या लागतात आणि जे धर्म मानतात त्यांना त्या धर्माच्या देवावर श्रद्धा ठेवावी लागते. आज सगळे देव धर्माच्या केंद्रस्थानी आहेत. माणसासारखं देवालाही धर्माच्या चौकटीने बंदिस्त केले आहे आणि चरणा-या गुराला जमिनीत खुंटा ठोकून बांधून ठेवतात तसं धर्माने श्रद्धेच्या धाग्याने माणसांना देवापाशी जखडून ठेवलं आहे.

आज सुखसंपत्ती, मनःशांती, पुनर्जन्म, मेल्यानंतर स्वर्गप्राप्ती अशा प्रलोभनात ही श्रद्धा अडकलेली आहे. आपलाच धर्म व पर्यायाने आपलाच देव श्रेष्ठ या धारणेने श्रद्धावानांत आणि धर्माधर्मातही एक विचित्र स्पर्धा निर्माण झाली आहे. एखाद्या परधर्मीयाने आपल्या देवावर श्रद्धा ठेवली तरी ती व्यक्ती जोपर्यंत आपला धर्म स्वीकारत नाही तो पर्यंत आपण त्या व्यक्तीच्या श्रद्धेवर विश्वास ठेवत नाही. यातून देवाला आपण आपल्याच धर्माशी जखडून ठेवतो हे या श्रद्धावानांच्या लक्षात येत नाही का? एका बाजुने आपल्या धर्माचा सर्वदूर प्रसार व्हावा ही अपेक्षा बाळगतो. पण दुस-या बाजुने आपणच आपल्या देवाला धर्माचं कुंपण घालून त्यात बंदिस्त करतो. या मानसिकतेमुळेच देव, धर्म आणि श्रद्धा यात सतत संघर्ष घडत असतो.

या संघर्षामुळेच माणसाचं मन देवाधर्मापासून दूर जात अलगदपणे भौतिक सुखाच्या आश्रयाला जाते. माणसाचं शरीर हे सतत उपभोगाला महत्त्व देत असते. त्या उपभोगाच्या अनुभवांची साठवणूक करून ठेवणं हे त्याचं वैशिष्ट्य आहे. त्यामुळे आपल्या देहाने भोगलेले भोग आठवणीच्या रूपाने स्मृतिकोशात साठवून ठेवण्याची आपल्याला सवय लागते. जेव्हा जेव्हा आपल्याला त्या भोगाची आठवण येते तेव्हा तेव्हा आपल्या शरीरात त्यातून मिळालेल्या सुखाच्या संवेदना जागृत होऊ लागतात. आणि तेच सुख उपभोगण्यासाठी आपण पुन्हा पुन्हा त्या अनुभवाकडे वळत जातो.

भौतिक सुखाचंही एक वैशिष्ट्य आहे. एकदा त्यांचं व्यसन जडलं की ती आपल्याला प्रचंड आत्ममग्न करीत जातात. त्यामुळे इतरांशी होणारा आपला संवाद हळुहळू आटत जातो. परिणामी आपल्या सामाजिक संवेदना बधीर होत जातात. आणि त्यापुढची पायरी म्हणजे आपल्या वाट्याला येणारं मानसिक वैफल्य. अर्थातच अशा प्रकारच्या वैफल्यावर मात करण्यासाठी धर्मगुरू किंवा आध्यात्मिक गुरू पुन्हा देवावरच्या श्रद्धेचाच मार्ग दाखवतात. आपल्या जगण्यातील सगळ्या गोंधळाचं मूळ इथेच दडलेलं आहे.

आज सगळं जग दोन गटात विभागलेलं आहे. देवा-धर्माच्या श्रद्धेने भारलेले लोक मंदिर-मशिदीच्या गर्तेत अडकले आहेत. तर भौतिक सुखाच्या अधीन झालेले लोक मानवी मूल्ये तुडवीत भौतिक विकासाला डोक्यावर घेऊन नाचत आहेत. पण सतत नाविन्याला चटावलेलं मानवी मन यातही सुखी होताना दिसत नाही. देवा-धर्माच्या श्रद्धेत गुदमरलेले लोक हळुहळू भौतिक सुखाकडे वळतात. तर भौतिक सुखाने विफलता आलेले लोक पुन्हा देवाला शरण जातात.

यातला तर्कनिष्ठ लोकांचा गट या दोन्ही गटांच्या मध्ये सापडला आहे. तो संख्येने अल्प आहे. म्हणूनच बहुसंख्यांकांच्या मेळ्यात अल्पसंख्यांकांची जशी गळचेपी होते तशी या तर्कनिष्ठांची अवस्था झालेली आहे. विशेष म्हणजे परस्पर विरोधी असूनही वरील दोन्ही गटांना आपलाच मार्ग माणसाला अंतिम सुखाच्या शोधाकडे घेऊन जाईल असा विश्वास वाटतो. आणि यातच माणसाच्या जगण्यातील संघर्षाचे बीज दडलेले आहे.

# "आमच्यात अवयवदानाचा रिवाजच आहे"

■ पुरुषोत्तम पवार, वसई

अवयवदान क्षेत्रातील सामाजिक कार्यातला विचार करण्यास प्रवृत्त करणारा माझा आणखीन एक अनुभव

२२ जून २०१९ रोजी सकाळी अकरा वाजता जिल्हा रुग्णालयातील एका डॉक्टरांचा फोन आला 'पवार साहेब आमच्या रत्नागिरीमध्ये एका खासगी रुग्णालयांमध्ये एका चाळीस वर्षाच्या महिलेचा मेंदू मृत्यू झालेला आहे'. एखादा रुग्ण मेंदू मृत झालेला असल्यास नातेवाईकांना ते अवयव दान करू शकतात हे सांगण्याची कायदेशीर जबाबदारी इस्पितळाची असते त्यानुसार नातेवाईकांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे कळले.

प्रसंग गंभीर, वेळ फारच थोडा. अशा युद्धजन्य परिस्थितीत आम्हा समन्वयकांना फार संयमाने व परिस्थितीचे गांभीर्य राखून काम करावे कागते. मी लगेच संबंधित न्यूरोसर्जन ना संपर्क साधून पेशंट कोमात नसून खरोखरमेंदू मृत आहे ना? याची खात्री करण्याबद्दल सुचवले. त्या अनुभवी डॉक्टरने रुग्ण निश्चित मेंदू मृत असल्याचे मला समजावले. कितीही खात्री असली तरी एखादा पेशंट मेंदूमृत आहे याची तपासणी परीक्षा करून ते जाहीर करण्याची जबाबदारी त्या हॉस्पिटलशी सम्बंधित नसलेल्या व सरकारने नेमून दिलेल्या बाहेरील दोन डॉक्टरांच्या टीमनेच जाहीर करावी लागते. त्यानंतर नातेवाईकांनी तयारी दाखवल्यास सहा तासांच्या अंतराने सरकार पुन्हा दुसरे दोन डॉक्टर पाठवून पेशन्ट मेंदूमृत असल्याची खात्री करून मगच जाहीर करतात.

प्रसंगावधान राखून मी वसई येथून लगबगीने महाराष्ट्र शासनाची अस्थापना असलेल्या झेडटीसीसी च्या अधिकृत प्रवक्त्यांना, रत्नागिरी येथे एक मेंदूमृत पेशंट असल्याची माहिती दिली. अवयव प्रत्यारोपणासाठी किंवा अवयव काढून घेण्यासाठी संबंधित डॉक्टर व हॉस्पिटल हे गव्हर्नमेंट ऍथोरिटी कडे रजिस्टर असणे गरजेचे आहे याची कल्पना त्यांना दिली असता ते हॉस्पिटल एन टी ओ आर सी (नॉन ट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्रीवल सेंटर) म्हणून रजिस्टर नसल्याचे कळले. लगेच सरकारी नियमानुसार अशा हॉस्पिटलला ठराविक पद्धतीच्या अर्जाद्वारे एका दिवसासाठीची तात्पुरती परवानगी ई-मेल द्वारे प्राप्त करता येते याची सुधारित कायद्यायानुसार ची माहिती पुरवून सर्व तयारी पूर्ण करून घेण्यात यशस्वी झालो. पेशंट AB+ve रक्तगटाचा असून रक्ताच्या सर्व चाचण्या उत्कृष्ट आढळल्या. शरीरात कोणत्याही प्रकारचा जंतुसंसर्ग नसून सर्व अवयव सुस्थितीत व दान करण्यायोग्य अवस्थेत असल्याचे संबंधित डॉक्टरांकडून खात्री करून घेतली.

आम्ही सादर केलेल्या बाबींची खातरजमा करून मुंबई येथील झेड टी सी सी च्या अधिकाऱ्यांनी ए बी पॉझिटिव्ह रक्तगटाच्या प्रतीक्षा यादीतील रुग्णांची यादी तपासण्यास सुरुवात केली. अवयव मिळण्याची वाट पहात असलेल्या रुग्णांना तयार राहण्याचा कॉल दिला गेला...

इकडे रुग्णालयामध्ये मृत व्यक्तीच्या नातेवाईकांची गर्दी जमण्यास सुरुवात झाली, येणारा प्रत्येक जण आपले डोके चालवू लागला व वेगवेगळ्या सूचना करू लागला. रुग्ण मृत असता तर यांनीत्याला वेंटिलेटरवर कशाला ठेवला असता? त्याला आपण कोल्हापूरला हलवल्यास तो वाचू शकेल, अवयव दान करण्याची काय गरज? अशा प्रकारचे वेगवेगळे प्रश्न व सल्ले येऊ लागले. प्रत्येक जण आपण तज्ञ असल्यासारखे सल्ले देऊ

लागल्याने नातेवाईक बिथरले व संभ्रमित अवस्थेत गेले. अवयवदान देहदान महासंघाचे रत्नागिरी जिल्हा समन्वयक उपसमन्वयक व इतर कार्यकर्ते घटनास्थळी पोहोचलेले होतेच परंतु तेथे उपस्थित असलेल्या नेते मंडळींनी आमच्या कार्यकर्त्यांना निर्णय घेणाऱ्या नातेवाईकांपर्यंत पोहोचूच दिले नाही.

सामान्यपणे ऑपरेशन केल्यानंतर ज्या प्रमाणे टाके घालून जखम बंद करतात त्याप्रमाणे ऑपरेशन करून देह चार-पाच तासाने आपल्या ताब्यात मिळेल. मृतदेह विद्रूप होणार नाही व रीतीरिवाजाप्रमाणे अंतिम क्रिया करता येतील अशा प्रकारची सर्व माहिती उपस्थितांना देऊन सुद्धा केवळ अज्ञानाने व तथाकथित उपस्थित तज्ञ मंडळींच्या विकृत सल्ल्यामुळे आज किमान आठ व्यक्तींचा जीव वाचवणारे अवयवदान होऊ शकले असते. पण ते अवयव शेवटी अग्नीच्या भक्ष्यस्थानी गेले.

अवयवांच्या प्रतिक्षे मध्ये प्रत्येक क्षणाला मृत्यूच्या समीप जाणारे अगतिक जीव मात्र तसेच तडफडत मृत्यूला सामोरे जाणार. दुसऱ्या बाजूला त्यांचा जीव वाचवू शकण्याची क्षमता असलेले जिवंत अवयव , जाळून टाकू पण कोणाला देणार नाही असे म्हणत समाजातील आमचेच बांधव जर अवयव असेच वाया घालवणार असतील, तर आम्ही तळागळातील लोकांपर्यंत अवयवदानाची योग्य माहिती पोहोचवण्यात कमी पडलो असेच म्हणावे लागेल. त्यामुळे अवयवदान  हि काळाची गरज बनलेली असून याबाबत समाजात अधिक जनजागृती होणे आवश्यक आहे. जेणें करून आपण स्वतः आपल्या प्रिय व्यक्तीचा जीव अवयव प्रत्यारोपण करून वाचवू शकतो. त्याचप्रमाणे काही आकस्मिक दुर्घटना झाल्यास आपल्या जवळच्या नातेवाईकांचे समुपदेशन करून ब्रेनडेड प्रकारचे अवयवदान आपण करू शकतो. जिवंतपणी माणसाने माणसासाठी;  माणसासारखे वागावे व मृत्युनंतर देखील कोणातरी अभाग्याला जीवनदान द्यावे. जागृत व्हा ! आपण तरी योग्य वेळेला आपली भूमिका समंजसपणे निभवू या.

शरीरातील सर्व अवयव नीट काम करत आहेत, फक्त एखादा अवयव निकामी झाला आहे. अवयव निकामी होतो म्हणजे त्यावर कोणत्याही प्रकारचा उपाय होणे शक्यच नाही, एन्ड ऑर्गन डॅमेज म्हणजे मृत्यू काही दिवसातच निश्चित आहे याशिवाय अन्य कारणाने सुद्धा जीव गमवावा लागणारे लाखो भारतीय दरवर्षी प्राणास मुकतात. आपल्या आजू बाजूला अवयव निकामी झाल्याने मृत्यूच्या दारात लोटले गेलेले अवयवांच्या प्रतिक्षेत असलेले आपलेच समाज बांधव आशाळभूत नजरेने, असहाय्यपणे अवयव मातीमोल झालेले पाहून शेवटपर्यंत मृत्यूच्या छायेत राहतात. शेवटी मरण पावतात. यात कोणता आला सुज्ञपणा? दर वर्षाला पन्नास लाखांच्या वर व्यक्ती अवयवांच्या प्रतीक्षेत मरण पावत आहेत. त्यांच्या भल्यामोठ्या प्रतीक्षा यादीत दर दहा मिनिटाला आणखी एकाची भर पडते आहे. भारतातील दूषित वातावरण, उच्चवर्णीय असल्याचा आभास निर्माण करताना स्वतःच्या आरोग्याकडे केलेले दुर्लक्ष, सर्वसामान्यांना मिळत असलेले निकृष्ट अन्नधान्य ते देखील अनेक प्रकारच्या विषारी औषधांच्या फवारणी केलेले. अशा अनेक कारणामूळे अवयव निकामी होण्याचे प्रकार वाढले आहेत. मृत्यू पंथावर असलेल्यांना अवयव जरूर मिळावेत, पण यापूर्वी अवयव निकामी होऊ नयेत यासाठीची काळजी घेण्याला अधिक प्राधान्य देण्याची गरज आहे. तरीसुद्धा दुर्दैवाने या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणाने अवयव निकामी झाल्यास त्यासाठी अवयव प्रत्यारोपण हा जीव वाचवण्याचा एकमेव मार्ग उरतो. त्यासाठी मेंदू मृत होणाऱ्या प्रत्येकाने किंवा त्याच्या कुटुंबीयांनी अवयव दान करण्याचा निर्णय घेण्यासाठी सामाजिक जागृती होणे गरजेचे आहे. यासाठी अवयवदान क्षेत्रात सामाजिक कार्य करणाऱ्या देहमुक्ती मिशन, द फेडरेशन ऑफ़ ऑर्गन अंड बॉडी डोनेशन , मोहन

फाउंडेशन या सारख्या अनेक सामाजिक संस्था आपले सर्वस्व अर्पून काम करत आहेत. त्यापैकी जवळच्या कार्यकर्त्याला भेटून अवयव दानाविषयी इत्यंभूत माहिती समजून घ्या.

जशा प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात तसे काही विघ्नसंतुष्ट लोक कोणाला तरी त्रास देण्यासाठी त्याचा मोबाईल क्रमांक टाकून चार किडनी उपलब्ध आहेत कोणा गरजवंताला मिळावी असे वाटत असेल तर मेसेज फॉरवर्ड करा अशा सारखे मेसेज व्हाट्सअँप वर पाठवून उपद्रव करतात. आम्ही मात्र तिथे सदसद्विवेक बुद्धी न वापरता मेसेज फॉरवर्ड करून चळवळीला बदनाम होण्यास नकळत हातभारच लावतो. कृपया असे मेसेज फॉरवर्ड करू नयेत. कोणताही अवयव असा कोणालाही देता येत नाही. अगदी घरातल्या रक्ताच्या नातेवाईकाला देखिल किडनी किंवा लिव्हर द्यायचे असले, सर्व चाचण्या जुळत असल्या तरी सरकारच्या सख्त तपासण्या व परवानगी शिवाय कोणताही डॉक्टर किंवा हॉस्पिटल प्रत्यारोपण करूच शकत नाही. या बाबतीतले कायदे आता फार कडक झाले आहेत. त्याची अंमलबजावणी देखील काटेकोर आहे. फार चांगली बाब आहे. त्यामुळे घोटाळे थांबतील. पण मागणारे हजारो, लाख्खो व पुरवठा इतका कमी मग काय 'मरता क्या नही करता' ?

जगातल्या इतर देशांच्या तुलनेत आणि आपल्या देशातील गरजेच्या मानाने आपण खूपच मागे आहोत. दर दहा लाख नागरिकांच्या मागे आपल्या देशात फक्त 0.08 जणच अवयव दान करतात, तर स्पेन, सिंगापूर, बेल्जियम अशा देशांत दर दहा लाखांत 20 ते 48 लोक करतात. अमेरिका आणि ब्रिटन सारख्या देशांमध्ये, जवळजवळ 40 टक्के कुटुंबे मेंदूमृत रूग्णाच्या अवयवांना देणगी देण्यास सम्मती देतात, तर भारतात अशा दानाचा दर 2 टक्क्यांपेक्षा कमी आहे. समाजात जागृती सुरू झाली आहे. पूर्वी वर्षाला नऊ हजारापर्यंत होणाऱ्या अवयव दानाचा आकडा वाढून आता तेरा लाखा पर्यंत पोचला तरी भारताच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तो अगदीच अत्यल्प आहे. ही परिस्थिती आता तरी बदलली पाहिजे त्यासाठी कोणी बाहेरून येऊन ती बदलेल हे शक्य नाही, आम्हालाच पुढाकार घ्यावा लागेल. आपल्या जवळपास कोणाचा मृत्यू झाल्यास प्रथम त्यांचे सांत्वन करून, अतिशय नम्रतेने, कुटुंबाला विश्वासात घ्यावे. अवयवदानाची शक्यता धीटपणे समजावून एका उदात्त दानासाठी प्रेरित करावे. सफल झालेल्या अवयवदानाच्या आशीर्वादाने समृद्ध व्हावे. चांगल्या प्रथा स्वीकारून त्या प्रथा रूढ करणे हे प्रगत समाजाचे लक्षण आहे. म्हणून प्रत्येकाने निश्चय केला पाहिजे की, मी माझे अवयव वाया घालवणार नाही. अशी परिस्थिती यावी आणि म्हणावं हल्ली आमच्या समाजात कोणाचंही मरण झालं की पहिले किमान नेत्रदान व त्वचादान तरी करतातच करतात. कारण 'आमच्यात तो रिवाजच आहे '.

भारतात विविध राज्ये आहेत त्यांच्या विविध मान्यता आहेत दक्षिण भारतात खूप चांगला प्रतिसाद मिळत असला तरी उत्तर भारतात अत्यन्त अल्प प्रतिसाद मिळतोय, त्यातही विविध धर्म त्यांच्या वेगवेगळ्या मान्यता यामूळे एकसूत्री जागृती कार्यक्रम प्रभावीपणे राबवता येत नाही. एकाबाजूला जिथे लोक तयार आहेत तिथे पर्याप्त वैद्यकीय सुविधा उपलब्ध नाहीत.

मृत्यूचा सराव केल्यास आनंदमय जीवनाचे दार उघडते. जसे आज एक चांगली बातमी आहे की आपण सारे जीवंत आहोत, आणि वाईट बातमी ही की नंतरच्या क्षणी आपण जिवंत असू याची खात्री नाही. कधी पर्यंत जगू ते सांगू शकत नाही. मृत्यू प्रत्येकाला हमखास येणार आहे. तो सांगून येत नाही. अचानक येतो. ज्या ठिकाणी आहे तेथेच; त्याक्षणी सर्व समाप्त. उद्या नाही; संध्याकाळी नाही, थोड्यावेळाने सुद्धा नाही, जिथे आहे तिथे फुल स्टॉप. म्हणून त्याची भीती वाटते आम्ही मात्र तरीदेखील आजचा प्रत्येक आनंद उद्यावर ढकलतो, प्रत्येक गोष्ट,

प्रत्येक आनंद.. कमावलेले पैसे .. इत्यादी यांचा संग्रह करून ठेवतो नंतर आनंद घेऊ, नंतर वापरु. अरे पण आज रात्री झोपल्यानंतर जर मी सकाळी उठू शकलो नाही तर? माझ्या सर्व महत्त्वाच्या वस्तू कागदपत्रे, माझे वैयक्तिक व्यवहार हे मी कोणालाही कसे सांगणार? मी ठरवलेल्या चांगल्या गोष्टी, मला करायचे असलेले सारे सत्कर्म तसेच राहून जातील. त्यावेळी माझा कोणताही इलाज चालणार नाही. म्हणून रोज सकाळी उठल्यानंतर स्वतःला पहिला एक प्रश्न विचारावा की, मी का जिवंत आहे ? जीवनाचा उद्देश काय आहे ? माझे ध्येय पूर्ण करण्यासाठी मी मिळालेल्या प्रत्येक संधीचा पूरेपुर फायदा घेतोय का? माझा उद्देश पूर्ण करण्यासाठी आज तरी मी प्रयत्न करणार आहे का? तुम्ही जगता तरी कोठे नीट? फक्त दिवस ढकलत पुढे चालला आहात मृत्यू जवळ. मरायचं सर्वांनाच आहे, पण मरावसं कोणालाच वाटत नाही. अरे तर मग जगून तरी घ्या; आपण नीट जगत सुद्धा नाही? उघडा डोळे, जगा नीट. सर्व काही आलमबेल असून सुद्धा अनेकांना रात्रीची झोप देखील घेता येत नाही. चला आनंदी राहूया. ठरवून टाका कि माझ्याकडे जे आहे तेवढ्यावर समाधानी राहून मी आत्तापासून भविष्याचं योग्य नियोजन करून पूर्ण आनंद घेत जगायला सुरुवात करणार आहे.

परमेश्वर करो, कोणावरही असे संकट न येवो मृत्युच्या दारा मध्ये अचानक पणे उभा राहिलेला आपलाच आप्तस्वकीय जेंव्हा आढळतो त्या वेळेस कुटुंबीय हादरून जातात व अनेक अडचणींचा सामना त्यांना करावा लागतो. मानसिक तसेच त्याच्या आजाराच्या खर्चासाठी सुद्धा मोठा खर्च आ वासून उभा रहातो. फार मोठी चिंता लागून राहिलेली असते अशा वेळेस त्याला अवयव मिळावा यासाठी शोध सुरू होतो. हे संकट माझ्यावर येणार नाही याची काय खात्री ? मागणाऱ्यांच्या यादीत आणखी एकाची भर पडते. मागणाऱ्यांची यादी रोज वाढतच आहे हो, पण देणारे? कोणीच नाही? कधी द्यायचंय ? सारं जगून झाल्यावर. आता काहीच कामाचं नसलेलं हे पार्थिव शरीर. त्यातून एखादा अवयव द्यायचाय. पण नाही , आम्ही संपूर्ण देह मातीत मिसळू पण कोणा गरजवंताला देणार नाही. काय ही मानसिकता ? मी मागणारा होणार नाही, देणारच होईन हा निग्रह करणे गरजेचे आहे.

अवयव दान आपण जिवंतपणे करू शकतो मेंदूमृत्यू झाल्यानंतर करू शकतो किंवा नैसर्गिक मृत्युपश्चात सुद्धा करू शकतो. अवयवदानाला वयाची मर्यादा नाही त्याचे अवयव सुस्थितीत असणे हाच त्याचा मुख्य निकष आहे. त्यासाठी फॉर्म भरून ठेवण्याची आवश्यकता आहेच असे नाही. फक्त नातेवाइकांना अवयवदानाची आपली अंतिम इच्छा पूर्ण करावी हे समजावून सांगण्याची गरज आहे. दिल्याने कमी होत नाही उलट वाढतेच. अवयवदानाच्या नुसत्या संकल्पाने सुद्धा आपल्या शरीरातील पेशी तंदुरुस्त व्हायला सुरुवात होते व आपले आरोग्य सुदृढ राहते. केलेल्या कोणत्याही कृतीच्या संकल्पा सोबतच फळ मिळायला सुरुवात होते. अरे देऊन तर बघा.

देहदान व अवयव दान यामध्ये मधील मूलभूत फरक समजून घेणे हे खूप गरजेचे आहे. नैसर्गिक मृत्यूमध्ये देहदान करण्यासाठी संपूर्ण देह शरीर विज्ञान शास्त्राच्या अभ्यासासाठी शासकीय रुग्णालयांमध्ये आपल्या नातेवाईकांनी प्रत्यक्ष नेऊन दान द्यावा लागतो. त्या पूर्वी दोन डोळे (डोळ्यावरील काळी दिसणारी पारदर्शक काच), त्वचा दान करता येते. ही दाने स्वीकारण्यासाठी डॉक्टरांची टीम घरी येते. त्याशिवाय बोनमॅरो, हाडे, विविध टिशू ई. दान करून सुमारे पन्नास रुग्णांना व्याधीमुक्त करू शकतो. मृत्युसमयी महाभयंकर रोग किंवा संसर्गजन्य व्याधीमुळे मृत्यू झाला असेल, आत्महत्या किंवा बुडून मृत्यू झाला असल्यास, विषप्राशन केले असल्यास, गळफास घेऊन मृत्यू झालेले असल्यास नेत्रदान त्वचादान किंवा देहदान करणे शक्य होत नाही.

या पैकी कोणतेही एक, दोन किंवा सर्व दान प्रक्रिया मृत्यूच्या वेळेपासून सहा तासाच्या आत पूर्ण व्हाव्या लागतात. नाही तर महादान आपल्या नशिबात नाही असे समजून, परंपरागत क्रिया कर्म करत राहावे.

अवयव दानामध्ये रुग्ण मेंदू मृत झालेला असेल आणि ज्यावेळेस व्हेंटिलेटरवर म्हणजेच कृत्रिम उपकरणांच्या आधारे हृदय प्रक्रिया चालू ठेवलेली असेल त्या वेळेसच अवयवदान करणे शक्य होते अशा अवस्थेमध्ये हृदय, दोन किडन्या, दोन फुफ्फुसे इंटस्टाईन (आतडे) पॅंक्रियास, लिव्हर यासारखे आठ अवयव दान करून किमान आठ व्यक्तींना नवीन जीवनदान म्हणजेच पुनर्जन्म देऊ शकतो . "मेंदू मृत प्रकारच्या अवयवदानाबद्दल सर्वसामान्य लोकांमध्ये अनेक गैरसमजुती आहेत त्या दूर करण्यासाठी खालील बाबी लक्षात घेतल्या पाहीजेत.....

1. कुठल्याही वयोगटातील व्यक्ती अवयवदान करू शकते.
2. लहान मोठ्या वैद्यकीय आजाराने ग्रस्त असलेला व्यक्तीही अवयव दान करू शकतो.
3. अवयवदान केल्यामुळे शरीराची कुठलीही विटंबना होत नाही .
4. कोणत्याही धर्माचा अवयवदानास विरोध नाही.
5. एकदा अवयवदानाचा निर्णय व दाताकार्ड घेऊन नोंदणी केल्यानंतर अवयवदानाचा निर्णय हा संबंधित दाता परत घेऊ शकतो. महत्वाचे म्हणजे कुटुंबाच्या संमती शिवाय हि प्रक्रिया पूर्ण होत नाही.
6. ब्रेन डेड झालेला व्यक्ती काहीही झाले तरी, पुन्हा जिवंत होऊ शकत नाही.
7. सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर मृत शरीर आपणास पुढील अंत्यसंस्कारासाठी ताब्यात मिळते.
8. अवयव दान व प्रत्यारोपणाच्या प्रक्रियेत प्रतीक्षा यादी कधीच डावलली जात नाही ; त्यामुळे आपले दान खऱ्या व प्रतिक्षेतील गरजवंतालाच मिळेल याची खात्री असते. उदा. तत्कालीन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्रीयुत विलासराव देशमुख यांना अत्यंत तातडीने अवयव प्रत्यारोपणाची गरज असून देखील यादी डावलून अवयव मिळाले नाहीत.

१९९४ पूर्वी अवयवदाना बाबत कडक कायदा नसल्यामुळे अनेक प्रकारचे घोटाळे उघडकीस येत होते. अवयव दानासाठी भारतामध्ये १९९४मध्ये पहिला कायदा आला त्याचा मुख्य उद्देश अवयव दानावर सरकारचं नियंत्रण असावं, त्याचे व्यापारीकरण होऊ नये, योग्य व्यक्तीलाच अवयवदान मिळावे इत्यादी त्याच्यानंतर वेळोवेळी त्या कायद्यामध्ये सुधारणा करून आवश्यक ते बदल करण्यात आले. आज सारे कठोर नियंत्रणा खाली आहे.

अवयव दानातील सर्वात प्राथमिक व सोपे दान म्हणजे नेत्रदान. हे रक्तदाना पेक्षाही सोप्पं आहे सुमारे वीस ते पंचवीस मिनिटात अंगठ्याच्या आकाराची डोळ्यावरील पारदर्शक काच तेवढी काढली जाते, रक्त येत नाही, चेहरा विद्रूप होत नाही. एवढ्या छोट्याश्या कृतीमुळे कमीत कमी दोन जणांना दृष्टीचा लाभ होऊ शकतो. बस्स मदत करण्याची भावना हवी. जिवंतपणी आपण आपल्या स्वतः वर, स्वतःच्या शरीरावर प्रेम करतो आपल्या प्रिय नातेवाईकांवर, कुटुंबावर, सर्वांवर प्रेम करतो एकमेकांना मदत करतो, उपयोगी पडतो, परंतु शरीराचा ज्या क्षणापासून काहीही उपयोग नाही अशी अवस्था म्हणजे मृत्यू. त्या नंतर देखील मी नेत्रदान, त्वचदान, देहदान, अवयव दान करून उपयोगी होतच रहाणार ही भावना मनाला फार मोठा आनंद देणारी आहे. हे सारं तेंव्हाच शक्य आहे जेंव्हा आपण आपली इच्छा जवळच्या नातेवाईकांना आग्रहपूर्वक सांगून ठेवली असेल तेंव्हाच. नाहीतर अजाणतेपणी

आपले नातेवाईक त्या मृतदेहाचा कोणालाही उपयोग होऊ न देता मृतदेहाची ठरलेल्या रिवाजा प्रमाणे विल्हेवाट लावून टाकतील. मनुष्य जन्मातील परमोच्च दान करण्याची आपली इच्छा आहे, पण आपल्या मनातील चांगले विचार व त्यावर घेण्याच्या निर्णयाला बाधक ठरणारा आणखी एक घटक म्हणजे आपले कुटुंबजन व जवळचे नातेवाईक. कारण दानाच्या निर्णायक घडीला ते अति भावनिक होतात. एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की नेत्रदानाच्या इच्छापत्र किंवा फॉर्म भरलेल्या पैकी फक्त एक टक्का लोकांचेच प्रत्यक्षात नेत्रदान होत असते ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

भारतीय समाज हा सामाजिक, धार्मिक अंधश्रद्धांच्या परंपरागत गैर समजुतींमध्ये मध्ये अडकून बसलेला आहे. एखादा अवयव मृत्यूनंतर दान केल्यानंतर पुढील जन्मा मध्ये तो अवयव आपल्याला मिळणार नाही, पुनर्जन्म मिळणार नाही.. अशा सारख्या अनेक निरर्थक अंधश्रद्धांच्या जोखडां मध्ये तो अडकलेला आहे. पुनर्जन्म हा प्रत्येकाच्या विश्वासाचा वैयक्तिक प्रश्न असला तरीदेखील मृत झालेला अवयव दुसऱ्याच्या शरीरात पुन्हा जिवंत राहून खऱ्या अर्थाने पुनर्जन्म होऊन ती व्यक्ती जिवंतच राहते. मरण पावलेली कोणतीही गोष्ट या जगात पुन्हा जिवंत होऊ शकत नाही तरी देखील अवयव दानाने हे शक्य होते हे वैद्यक शास्त्राच्या प्रगतीचे खूप मोठे यश आहे.

गरीबातील गरीब व्यक्ती सुद्धा अविचारी श्रीमंतापेक्षा हे महादान करू शकतो. जे देण्यासारखे आहे ते सर्व द्या. आपण आनंदाचे क्षण जगायचे सोडून त्याचे गाठोडे बांधून रोज कुरवाळत बसतो. आणि आपलेच नातेवाईक नंतर गाठोडं जाळून टाकतात किंवा गाडून टाकतात, मातीमोल करून टाकतात. जगून घ्या आणि वाटून द्या. अवयव दान करा. केलेले कोणतेही सत्कृत्य वाया जात नाही. देणाऱ्यालाच मिळतं, नुसतं मागणाऱ्याला नाही. प्रत्येकाने आपले आरोग्य जपायचे आहे, आयूष्यात खुप काही शिकायचे आहे. प्रत्येक क्षण जगायला शिकायचं आहे प्रत्येक क्षणात द्यायला आणि घ्यायला शिकायचे आहे भरपूर कमवायचे आहे कमावलेले पुण्य वाटायचे आहे. ज्ञानार्जन करायचे आहे नेत्रदान, त्वचादान, अवयव दान करून समाजाचे देणे फेडायचे आहे. नैसर्गिक मृत्यूनंतर देहदान किंवा नेत्रदान त्वचादान यासाठी प्रतिज्ञापत्र भरलेले असणे गरजेचे नाही. कुटुंबातल्या लोकांनी त्याक्षणी अवयवदानाची संमती दिल्यास मृत्यूनंतर सहा तासाच्या आत ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकते. जीवन सुंदर आहे. जगून घ्या. आनंद घ्या; आनंद द्या. कायम देत रहा. तुम्ही असतांनाही.. आणि तुम्ही नसतांनाही...

भारत हा महान व अतिशय धार्मिक देश आहे. दान धर्माच्या बाबतीत भारत खूप अग्रेसर आहे एखादा पूर भूकंप किंवा नैसर्गिक कोप झाल्यास जात, धर्म, प्रांत, देश याचा कोणताही विचार न करता दानाचा ओघ भारतीयां कडून भरभरून वाहतो. भारत धार्मिक आहे तसंच अंधश्रद्धा ही त्याच्या प्रगतीस मारक ठरत आहे अशिक्षित लोक अंधश्रद्ध आहेत हा समज चुकीचा आहे. अहो सुशिक्षित लोक अधिक अंधश्रद्ध आहेत असे लक्षात येऊ लागले आहे. पूर्वीच्या काळी महिला अंधश्रद्धेत आघाडीवर होत्या परंतु आज अंधश्रद्धा दूर करण्यात महिला आघाडीवर आहेत असा निष्कर्ष समोर येऊ लागला आहे. पाप आणि पुण्य कोणी मानत असेल तर अवयव दाना सारखं श्रेष्ठ दान आणि अत्युच्च पुण्यकर्म दुसरे कोणते असू शकते? गरजवंता साठी, त्याच्या उपयोगी पडेल असे काम केल्यास अधर्म होईल असे कुठल्याही धर्मात लिहिलेले नाही. जिवंतपणी योग्य दानधर्म करून शेवटी अवयवदाना सारखे महादान आपण जरूर केले पाहिजे. दान हा सर्व धर्मांचा पाया आहे हे लक्षात घेऊन एखाद्याला जीवनदान द्यावे. आपल्या प्रियजनाचा अचानक मृत्यू झालेला असताना दुःखाच्या करून प्रसंगी सुद्धा धीर गंभीर पणे अवयव दानाचा निर्णय घेतलेल्या लोकांच्या भेटी घेतल्या असता अवयव दान दिल्याने ती व्यक्ती आपल्यातून गेली नसून

अवयव रूपाने आपल्यातच आहे ही भावना त्यांचे दुःख कमी होण्यास कारणीभूत ठरली असे सांगून समाधान व्यक्त करतात. दान देण्याचे पुण्य तसेच दानाचे समाधान अवर्णनीय आहे. या कार्यास प्रोत्साहन देऊन , काम करणाऱ्याला पाठिंबा देत मदत करणे हे देखील खूप मोठे सत्कर्म आहे. एक जागृत व परोपकारी म्हणून मी व माझीच ही जबाबदारी आहे. आपला प्रियजन गेल्याचं दुःख स्वाभाविकच आहे. पण प्रत्येक जण जाणार आहे. आता जो गेला आहे तो काहीही करून परत येणार नाही. हे सत्य स्वीकारून कमीत कमी वेळात स्थिर होऊन भावनिक बंधनात अडकून न रहाता सारासार विचार करून एक फार मोठे सत्कर्म प्रत्यक्षात पदरी घ्यावे .

समाज बदलतो आहे, कोणताही बदल होताना आणि त्या प्रक्रियेमध्ये सामील होणाऱ्यांना कधी कधी अनेक अडचणींना देखील सामोरे व्हावे लागते. मी माझे नेत्रदान त्वचादान देहदान अवयवदान करण्याचा निश्चय केलेला आहे व त्याबाबतीत माझ्या या कुटुंबियांना कल्पना दिलेली आहे. हे दान करताना त्यांनादेखील थोडाफार विरोध होईल, काही अडचणींना तोंड द्यावे लागेल याची त्यांना कल्पना दिलेली आहे. मी एक भला नागरिक, चांगली व्यक्ती आहे मग या चांगल्या बदलाचा साक्षीदार मी का होऊ नये ? मी निश्चय केला आहे माझे अवयव वाया घालवणार नाही. आणि आपण ?

हे सुदृढ शरीर, हे कुटुंब, हा समाज, ही सुखे मला लाभली आहेत तशीच माझ्यासारखी इतरांनाही मिळावी अशी भावना ठेवल्यामुळे प्राप्तसुखाचा परिपूर्ण आनंद आपल्याला घेता येतो. सुख बाहेर कुठेही शोधायला जाण्याची गरज नाही ते आपल्या देण्याच्या भावने मध्येच लपलेले आहे. अवयव दान करून आपल्या प्राप्त सुखाचा परिपूर्ण आनंद प्रत्येकाने घ्यावा. चला आपण ही परंपरा बनवू व म्हणूया की, “आमच्यात अवयवदानाचा रिवाजच आहे".

अवयव दानाचा संकल्प केलेले शिरलय वाडी आगाशी येथील एकाच कुटुंबातील 80 जणांचे लोपीस कुटुंब, माणिकपूरचे फादर पिठेकर, फादर मायकल जी, फादर अब्राहम गोम्स, फादर डॉ. रॉबर्ट डिसोझा, फादर फ्रान्सिस दिब्रिटो असे अनेक धर्मगुरू स्वतः अवयव दानाचा निर्णय घेऊन आम्हाला मार्गदर्शन व आशीर्वाद देत आहेत हे आमचे फार मोठे भाग्य आहे .

प्रत्यक्ष देहदान केलेले भुईगाव येथील दादू मास्तर, इगी मिनेझिस, फ्रान्सिस डाबरे, फ्रान्सिस डीआब्रिओ ... नेत्रदान व त्वचदान केलेल्यांपैकी बेबीबाई, ऑस्डन कोलासो, माणिकपूर येथील मार्शला लोपीस, एलायस लोपीस, विन्सम लोपीस, धावपटू स्टीफन मिनेझिस, सेबेस्टीन डिमेलो आणि इतर शेकडो जण आहेत किती जणांची नावे सांगावी. त्या साऱ्यांना वंदन व अवयवदानाचा निर्णय घेऊन तो प्रत्यक्षात आणणाऱ्या कुटुंबियांना साष्टांग दंडवत. दानाचे महत्व प्रत्येक धर्मात सांगितलेले आहे. आधुनिक सर्व धर्मिय उपदेशक अवयवदानाला आग्रहपूर्वक सहमती देत आहेतच. आम्ही मात्र सोईस्कर कारण मीमांसा करत बसतो. समाजात बदल घडतो आहे. लोक स्वतः होऊन पुढे येऊ लागले आहेत. आपण सर्वांनी देखील अवयव दानाला भावनिक होकार न देता अभ्यासपूर्वक पाऊल उचलावे ही अपेक्षा. महत्वाचे म्हणजे, यात कुटुंबीयांच्या धाडसी निर्णयाला अधिक महत्त्व आहे. अवयवदान करणारे हे अवयव स्वीकारणाऱ्या व्यक्तीसाठी पूजनीय व महनीय तर आहेतच. मात्र त्याचबरोबर समाजासाठी ते व संमती देणारे त्यांचे नातेवाईक हे देखील एक वेगळे आदर्श व दीपस्तंभ ठरतात. वसई येथील कार्डिनल ग्रेशिअस रुग्णालयामध्ये देखील आता नेत्रदान स्वीकारण्याची सोय सुरू करण्यात आली आहे.

संपर्कासाठी क्रमांक मनीष लेमॉस : 9665290260 /9096290708 किंवा तरुण मित्र मंडळाचे श्री. रवींद्र हर्डीकर विरार पश्चिम 9881212250 / 9325316518
डॉ. राजेंद्र चव्हाण पालघर : 9823133779
EYE BANK : All India Toll Free 1919

EBCRC Eye Bank Parel Opp. KEM Hospital Mumbai : 02224164342 / 4162929
Rotary Eye Bank Borivali (E), Tel: 98216 01919 / 98218 01919.
SAHIYARA EYE BANK B/305 Manas Residency, Teen Petrol pump, L.B.S. Road, Thane 022 2534 1919 93206 11919 / 93213 11919 / 93204 11919

SKIN BANK : 1) National Burns Centre, Sector-13, Airoli, Navi-Mumbai Phone No: 022-2779 6660 /61/62/63/64 or 27643333

त्वचा दानासाठी टोल फ्री

2) मसीना स्किन हॉस्पिटल भायखळा 9 am to 5 pm 022 61841325 and after 5 pm to 9 am +912261841238 /51 श्री. चारुदत्त वैद्य 9930180666. +912261841251.

BODY DONATION :जे जे हॉस्पिटलच्या शरीर विज्ञान शाखेच्या प्रमुखांना अगोदर मृत्यु-प्रमाणपत्र पाठवून त्यांची परवानगी घेतल्यानंतरच निरोगी देह मृत्युनंतरच्या सहा तासाच्या आत प्रत्यक्ष तेथे घेउन जावे लागते. नेणार्या नातेवाईकाचे व मृताचे ओळख पत्र सोबत घेऊन जावे लागते. INFORM J.J. Hospital Mumbai's RMO / CMO / Doctor on duty_022 23735555 ext. 2302. / 23769400, 23735543,
Dr Sunil Pundge +919220800655 / Dr. Amit +917718938726
Dr. Deepak Joshi HOD JJ Hospital +91 22 2373 9035 Anatomy +912223739040

2) Rajeev Gandhi Hospital Kalwa, Thane 022 25347784. Or Any nearest Govt. Medical College prior consent.
Anatomy Dept. 02223770654 , 02223735555 Ext 2355,
किंवा राजीव गांधी हॉस्पिटल कळवा ठाणे येथे परस्पर संपर्क साधावा.
Rajiv Gandhi Hosp Kalva Thane :
# 90046 71165 , 9820771973 , 9820337612, 9892736091, 9821606231, 9969405575

3) KEM Hospital Anatomy Dept: 022 2410 7447, 022 2410 7605; Dr. Yuvraj Bhosle +91 92210 01002,
+91 70210 27484, Dr. Abhijit Dhende +91 99607 80400

4) Sion Hospital Mumbai. 022 24063000. Helpline No: 2779 3333 * 022 24076381 Ext. 440 / 248

ORGAN DONATION : ZTCC at Sion Mumbai 022 24028197

हे महत्वाचे नंबर आपल्या घरातील महत्त्वाच्या ठिकाणी लावून ठेवावे किंवा हवे असतील तेव्हा उपलब्ध होतील अशा व्यक्तीस सांभाळून ठेवण्यास सांगावे.

कोणत्याही प्रकारच्या सहकार्यासाठी दहिसर ते पालघर या परिसरातील अवयवदान क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक सेवाभावी कार्यकर्त्यांची मदत मिळवू शकता. किंवा श्री. पुरुषोत्तम पवार - पाटील. वसई स्टेशन जवळ 9822049675 यांच्याशी संपर्क करू शकता.

लेखक: श्री. पुरुषोत्तम पवार - पाटील "द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन महाराष्ट्र राज्य" या संस्थेचे संस्थापक आहेत.

# देवबाप्पाकडून ख्रिसमस गिफ्ट

■ प्रा. स्टीफन आय. परेरा, खरभाट सांडोर, संपर्क - ९८५०८७८१८९

डिसेंबर महिना होता, डाकघरात खूप गर्दी होती. नेहमीच्या पत्रांसोबत ख्रिसमसच्या शुभेच्छा कार्डांमुळे पत्रपेट्या खचाखच भरलेल्या होत्या. सावंतमामा आपल्या सहकाऱ्यांसह टपालांची विगतवारी करण्यात व्यस्त होते. सावंतमामा म्हणजे पोस्टातील सेवानिवृत्त व्हायला आलेले सर्वात ज्येष्ठ कर्मचारी होते. अतिशय प्रामाणिक आणि मेहनती माणूस, सर्वांना मदत करण्यास कायम तत्पर.

पात्रांची विगतवारी करता-करता अचानक त्यांच्या हातात एक लखोटा आला. त्यावर पोस्टाचे तिकीट नसल्याने ते पत्र कोणाचे आहे हे सावंतमामाने पाहिले आणि भुवया वर करून ओरडले,"अरे हे पहा, स्वर्गातील देवबाप्पाला कोणीतरी पत्र लिहिलेले आहे." त्या लखोट्यावर लिहिले होते,"टू गॉड द फादर." आणि त्याखाली पत्ता होता, "इन हॅवॅन" पत्र पाठविणाऱ्याचे नाव कोठेही लिहिलेले नव्हते. ते पाहून एका कर्मचाऱ्याने म्हटले,"सावंत मामा आपण हे पत्र उघडून पाहूया का?" त्यावर सावंतमामा म्हणाले,"नाही, अजिबात नाही. मी हे पत्र पोस्ट मास्टरांकडे सुपूर्त करतो." इतक्यात दुसऱ्या कर्मचाऱ्याने गंमत करण्यासाठी म्हटले,"सावंतमामा, पोस्ट मास्टरांनी जर ते पत्र देवबाप्पाला पोहचते करा असे म्हटले तर कोण घेऊन जाणार?" त्यावर सावंतमामा हसत-हसत म्हणाले,"त्याची तुम्ही काळजी करू नका, मीच ती जबाबदारी स्वीकारीन. माझं आता वय पण झालंय आणि या निमित्ताने मला जिवंतपणी स्वर्गतरी पाहता येईल."

पोस्ट मास्तर कमलुद्दिन खान हे एक समाजसेवक होते. त्यांच्या समाजसेवेच्या कार्याबद्दल त्यांना कुठलातरी पुरस्कार जाहीर झाला होता, त्यामुळे त्यांची मुलाखत घेण्यासाठी मराठे नावाचे एक पत्रकार त्यांच्या केबिनमध्ये बसले होते. सावंतमामाने पोस्ट मास्टरांच्या टेबलावर ठेवलेले ठेवलेले पत्र खान ह्यांनी मुलाखत देता-देता उघडले, पण पत्र वाचून त्यांना गहिवरून आले; त्यांनी ते समोर बसलेल्या पत्रकाराला वाचायला दिले. पत्रकार मराठेंनी त्या पत्रावर नजर फिरवली; दोघेही एमेकांकडे गांभिर्याने पाहू लागले.

पत्राच्या खाली लिहिलेल्या नावावरून ते पत्र बर्था नावाच्या एका शाळकरी बलिकेने लिहिले होते असे समजले. तिच्या हस्ताक्षरावरून आणि इंग्रजी भाषेवरील ती मुलगी दुसरी किंवा तिसरीत असावी असा अनुमान काढता आला. पत्रातील इंग्रजी मजकूर खालील आशयाचा होता,"हे देवबाप्पा, ख्रिसमसचा सण अगदी जवळ आला आहे; पण माझी आई घरात रडत बसली आहे. माझे वडील मोटार अपघातात पाय गमावून बसलेले आहेत. आमच्या घरात काहीच नाही. ह्या ख्रिसमसच्या सणाला मला कपडे नको, गोडधोड पदार्थ नको. आम्ही उपाशी राहू, पण माझ्या वडिलांना उजवा पाय देशील का?

तुझी बर्था.

क्षणभर विचार करून पत्रकार म्हणाले,"आपण या कुटुंबासाठी काहीतरी करूया." "कसे काय शक्य आहे? ह्या पत्रावर काहीही बोध नाही, पत्ता नाही."खान ह्यांनी शंका उपस्थित केली. "आम्हा पत्रकार लोकांना अशा लोकांचा सोध घेणे काही कठीण काम नाही."मराठे म्हणाले.

अवघ्या दोन दिवसांत पत्रकार मराठे खान ह्यांना घेऊन सायन रुग्णालयात आले. तेथील पुरुष वॉर्डच्या कॉट न. १४ वर व्हिक्टर नावाचे एक रुग्ण होते. त्यांचा उजवा पाय अपघातात तुटलेला होता. चौकशीअंती असे समजले

की ते कुर्लाच्या एका चाळीत राहतात आणि त्यांच्या मुलीचे नाव बर्था होते. पत्रकार आणि पोस्ट मास्टर सबंधित डॉक्टरांना भेटले, त्यांच्याशी आवश्यक ती चर्चा करून ते लगेच कामाला लागले. पत्रकाराने आपल्या दैनिकाच्या मदतीने लोकांना आवाहन केले, तर खान ह्यांनी परोपकारी संघटनांना संपर्क केला आणि निधी जमा केला. डॉक्टरच्या सल्ल्याने व्हिक्टरसाठी परदेशी बनावटीचा एका कृत्रिम पाय मिळविला.
२४ डिसेंबरला संध्याकाळी बर्था चाळीतल्या मुलांसोबत गोठा बनवण्यात मग्न होती. इतक्यात समोर एक कार उभी राहिली. त्यातील दोन व्यक्तींसोबत आपले वडील बाहेर पडताना बर्थाने पाहिले. तिचा विश्वासच बसत नव्हता कारण ती तिचे वडील दोन्ही पायाने चालत होते. बर्था मोठ्याने ओरडून म्हणाली,"मम्मी बाहेर ये, डॅडी घरी येत आहेत." तिची मम्मी धावत बाहेर आली आणि व्हिक्टरला पाहून थक्क झाली.

व्हिक्टरने बर्थाला वेंगेत घेतले आणि म्हटले,"बर्था, तुझ्या विनंतीवरून देवबाप्पाने आपल्याला "ख्रिसमसचे गिफ्ट" म्हणून हा पाय दिला आणि ही बघ देवाची माणसं."
पत्रकार मराठेंनी उरलेली रक्कम बर्थाच्या आईच्या हातात स्वाधीन केली, तर खान ह्यांनी एक बॉक्स बर्थाच्या हातात दिले. त्यात एक ख्रिसमस केक आणि बर्थासाठी खेळणी होती. त्या बॉक्सच्या टॅगवर लिहिले होते..

To Bertha
With Love
From - God the Father

# सिनेमातले ख्रिश्चन

■ सॅबी परेरा (sabypereira@gmail.com)

सिनेमात आणि विशेष करून आपल्या हिंदी सिनेमात स्टिरीओटाईप किंवा ज्याला आपण साचेबद्ध म्हणू अशा पात्रांची भरमार असते. सिनेमातले शिक्षक नेहमीच तत्वनिष्ठ असतात. पोलीस, नेते, आणि सरसकट सगळे सरकारी अधिकारी भ्रष्टाचारी असतात. गरीब लोक प्रामाणिक असतात, श्रीमंत मात्र बेईमानी, अप्रामाणिक असतात. श्रीमंतांची पोरं नशा आणि बाईच्या नादाला लागलेली असतात. लहान मुलं अकाली प्रौढत्व आल्यासारखी बोलत असतात. डॉक्टर लोक गळयात स्टेथोस्कोप लावल्याशिवाय अंथरुणाबाहेर देखील पडत नाहीत. एखाद्या वेळी सिनेमात सिनेमा दाखवला तर त्यातील कलाकार कामं करायची सोडून शूटिंगच्या नावाखाली त्यांची रोजच पिकनिक सुरू असते. सिनेमातल्या सिनेमावाले यच्चयावत सगळे दारूबाज, चरित्रहीन आणि कास्टिंग काऊचवर पडीक असतात. सगळ्या मॉडेल्स आणि ॲक्टर्स 'कॉंप्रोमाईज़िंग' असतात. सगळे हिंदू साधेभोळे किंवा बिनडोक, मुस्लिम एकतर कट्टर देशप्रेमी किंवा खतरनाक अतिरेकी आणि हिंसक, सरदार दारूबाज आणि मांसाहारी, पारशी बावळट आणि वेंधळे, बिहारी अपराधी तर ख्रिश्चन लोक दारुडे, स्वैराचारी आणि चरित्रहीन असतात....

हिंदी सिनेमातील ख्रिश्चन पात्र एका विशिष्ट आणि विचित्र प्रकारे इंग्लिश मिश्रित हिंदी बोलतात, त्यांच्या बायका मुली तोकडे पाश्चात्य कपडे घालतात, त्यांना फारशी लाजलज्जा नसते, पुरुष सारखे दारू पीत असतात, ते रॉबर्ट, पीटर, मोना किंवा जेनी अशा आडनावाचा आगापीछा नसलेल्या ख्रिश्चन नावाने व्हिलनच्या आजूबाजूला राहून चमचेगिरी करीत असतात. दारू विकणारी आंटी ख्रिश्चनच असते आणि प्रत्येक ख्रिश्चन माणसाच्या घरात हटकून एखादी वायोलिन किंवा गिटार असतेच असते.

हिंदी सिनेमातले ख्रिश्चन, केवळ वारंवार ‘ओह जिझस’, ‘जिझस तुम्हारा हेल्प करेंगा’, ‘तुमको क्या मांगता हाय? व्हिस्की ऑर व्होडका?’, ‘मै तेरे वास्ते जिझस के पास प्रे करेंगा’ असे डायलॉग मारतात म्हणून त्यांना ख्रिश्चन म्हणावे काय? असा प्रश्न मला पडतो.

सिनेमातील एखाद्या पात्राला, धर्माला, व्यवसायाला एखादा स्टिरीओटाईप चिटकला आणि तो हिट झाला तर सिनेमावाले कितीही क्रिएटीव्ह असल्याचा आव आणत असले तरी असे स्टिरीओटाईप बदलण्याचा प्रयत्न अपवादानेच करतात. सिनेमातील पात्रांच्या स्टिरीओटाईप असण्याची मानसशास्त्रीय आणि धंदेवाईक कारणं जी काही असतील ती असोत. आज आपण सिनेमात आणि विशेषतः बॉलीवूडच्या प्रमुख हिंदी सिनेमातील ख्रिश्चन पात्रांचा धांडोळा घेणार आहोत.

सिनेमातल्या ख्रिश्चनांविषयी बोलताना सगळ्यात प्रथम माझ्या डोळ्यासमोर जर कोणता सिनेमा उभा राहत असेल तर तो म्हणजे, अमर अकबर अँथोनी. यातला जो अँथोनी आहे तो अल्पसा गोव्यातून आलाय, थोडासा

बँड्रातून आलाय आणि बराचसा मनमोहन देसाईच्या डोक्यातून आलाय. तो भडक रंगाचं जाळीदार बनियन घालतो, दारू पिवून डायलॉगबाजी करतो, इस्टरच्या अंड्यातून बाहेर येऊन गाणं गातो, तो नाचतो, तो फायटिंग करतो, फायटिंग करताना मार खाल्ल्यावर क्रुसासमोर प्रार्थना करतो, आपल्याच एरियातल्या जेनी नावाच्या फाकडू ख्रिश्चन पोरीला (हा देखील एक स्टिरीओटाईप) पटवतो, तिच्यावर प्रेम करतो ...

बॉलीवूडच्या धंदेवाईक हिंदी सिनेमाकडून आणि विशेषतः मनमोहन देसाईकडून ख्रिश्चन पात्राचं वास्तविक (Realistic) चित्रण अपेक्षित नसलं तरी या सिनेमात चर्चमधील फादर (हा रोल नासीर हुसेनने खरा ख्रिश्चन प्रिस्ट वाटावा इतका चांगला रंगवला आहे) मरता मरता अंथोनीला धर्मगुरू पदाची दीक्षा देऊन जातो हा प्रसंग, ख्रिश्चन धर्मगुरू होण्याची पद्धत, त्यासाठी करावा लागणारा त्याग, ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा आणि अभ्यास, त्यासाठी लागणारा दहाबारा वर्षाचा काळ हे ज्यांना माहित आहे त्यांच्या पचनी कसा पडू शकेल?

बातो बातो में या सिनेमात पर्ल पदमसीने साकारलेली रोझी परेरा ही एक आनंदी आणि प्रेमळ बाई आहे. आपल्या मुलीने एखाद्या सुस्वभावी, रुबाबदार, श्रीमंत मुलाशी लग्न करून सुखी व्हावं असं वाटणारी ही बऱ्यापैकी पटणारी आणि खरी वाटणारी व्यक्तिरेखा आहे. याउलट ह्याच सिनेमातील अमोल पालेकरने रंगवलेला टोनी ब्रीगान्झा मात्र त्याने घेतलेल्या अनावश्यक गावठी गोवन बेअरिंग मुळे आणि तथाकथित गोवन हिंदी मुळे असहनीय होतो.

१९७५ साली आलेल्या ज्युली सिनेमात, अँग्लो इंडिअन ख्रिश्चन समाजातील ज्युलीची आई ही आयुष्याचा उपभोग घेणारी एक साधी-सज्जन, हॅप्पी-गो-लकी बाई आहे. ती नाचते, गाते, कुटुंबासोबत मद्याचाही आस्वाद घेते. पण त्याचबरोबर ती कुटुंबवत्सल आहे. अविवाहित असेलेल्या तिच्या मुलीवर जेव्हा गर्भारपण लादलं जाते तेव्हा ती खंबीरपणे आपल्या मुलीच्या पाठीशी उभी राहते. जातीधर्माच्या बाहेर पडून प्रेम या भावनेकडे पाहायला हवे असं संदेश देणाऱ्या या सिनेमातील लक्ष्मीने साकारलेली ज्युली, नादिराने साकारलेली तिची आई आणि ओमप्रकाशने साकारलेले वडील या तिन्ही ख्रिश्चन व्यक्तिरेखा वास्तविक वाटाव्यात इतक्या चांगल्या लिहिल्या आणि साकार केलेल्या आहेत. पण असे सिनेमे अपवादात्मकच.

हृषीकेश मुखर्जींच्या अनाडी या सिनेमातील मिसेस डीसा हा रोल आजवरच्या हिंदी सिनेमातील उत्तम लिहिलेल्या ख्रिश्चन भूमिकेंपैकी एक आहे आणि या भूमिकेत तोवर केवळ नकारात्मक भूमिकांसाठी प्रसिद्ध असलेल्या ललिता पवारने जान ओतली आहे. आपल्याकडे भाडेकरू असेलेल्या तरुणावर, पोटच्या पोरासारखी माया करणारी ख्रिश्चन घरमालकीण त्यानंतर सावरिया या सिनेमात झोहरा सेहगलने देखील साकारली पण त्यामधे ललिता पवारच्या मिसेस डीसाचं सच्चेपण उतरलं नाही. ललिता पवारच्या मिसेस डीसाची कॉपी असलेली मिस जोसेफ, नादीराने सागर या सिनेमात साकारली आहे. पण ती कॉपीच राहिलीय तिला मिसेस डीसाच्या पुढे एक पाऊलही जाता आलेलं नाहीये.

गोलागोलाचं डिझाईन असलेला टॉप आणि मिनी स्कर्ट घातलेली डिम्पलची ख्रिश्चन बॉबी ब्रीगान्झा, रिषी कपूरला "आय ॲम बॉबी, मुझसे दोस्ती करोगे?" विचारते तेव्हा त्याचा (आणि प्रेक्षकांचाही) आ वासलेलाच राहतो. खरं म्हणजे राज कपूरच्या या प्रेमपटात सर्वच दृष्टीने दोन भिन्न टोकांवरील युगुलाची प्रेम कहानी आहे पण

या प्रेम प्रकरणामुळे ब्रीगान्झा कुटुंबाच्या आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक जीवनावर जो काही आघात झाला असेल, ते कोणत्या मानसिक स्थित्यंतरातून गेले असतील हा भाग फारच वरवरचा आलाय. प्रेक्षकांनीही त्यातून ख्रिश्चन मुलींची ग्लॅमरस, बोल्ड अशी आणि ख्रिश्चन कुटुंबाची आपल्या मुलींचं इतर धर्मियांशी लग्न करण्यास फारशी खळखळ न करणारे उदारमतवादी अशी प्रतिमा करून घेतली. पुढे सागरमधे डिम्पलने साकारलेली मोना डिसिल्वा हे तिच्या बॉबीच्याच भूमिकेचं एक्स्टेन्शन होतं. मात्र त्यातील ख्रिश्चन कोळी लोकांचं गाव मात्र बऱ्यापैकी वास्तवाच्या जवळ जाईल असं चित्रित केलं आहे.

आखियो के झरोके से या सिनेमात, ल्युकेमियाच्या आजाराने ग्रस्त असलेल्या लिली या ख्रिश्चन तरुणीच्या भूमिकेला पात्राला रंजिताने खूप चांगला न्याय दिला आहे. प्रेमी युगुलापैकी एक व्यक्ती असाध्य रोगाने आजारी असणे आणि दुसऱ्या व्यक्तीने तिच्यासाठी आपलं आयुष्य पणाला लावणे किंवा तिला शेवटपर्यंत अंतर न देणे ही कथावस्तूच भावनाप्रधान भारतीय मनाला भावणारी आहे. त्यात या सिनेमाचं सुंदर दिग्दर्शन आणि सुमधुर गाणी यामुळे हा सिनेमा हिट झाला नसता तरच नवल. हा सिनेमा इतका हिट झाला कि त्या काळात भारतभरातील तरुणांना, रुंद-खोल गळयाचा टॉप आणि गळयात क्रॉस घातलेल्या रंजितासारख्या गर्लफ्रेंडची स्वप्ने पडू लागली होती. असं जरी असलं, तरी या सिनेमात ती ल्युकेमियाच्या आजाराने ग्रस्त असेलेली युवती लिलीच्या ऐवजी गीता किंवा रुख्साना असती तरी कथावस्तुमध्ये किंवा एकंदर सिनेमाच्या परिणामामध्ये काहीच फरक पडला नसता कारण या पात्राचं नाव सोडलं तर हा सिनेमा लिलीच्या ख्रिश्चानिटीला किंवा तिच्या ख्रिश्चन असण्याला कुठेच स्पर्श करीत नाही.

कॅथोलिक ख्रिश्चन समाजाचं जगणं आणि त्यांचे प्रश्न याला खऱ्या अर्थाने भिडलेले फार कमी सिनेमे आहेत, त्यापैकी सर्वात वरचा क्रमांक आहे सईद मिर्झाच्या ‘अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यू आता है?’चा! तसेही यात मांडलेले प्रश्न काही केवळ ख्रिश्चन समाजाचे नाहीत, प्रश्न तुम्हा आम्हा सर्वांचेच आहेत पण ते एका ख्रिश्चन प्रोटोगनिस्टच्या नजरेतून मांडले आहेत. आणि महत्वाची गोष्ट म्हणजे, यात नसिरुद्दीन शाह तथाकथित फिल्मी ख्रिश्चन माणसासारखा बोलायचा प्रयत्न न केल्यामुळे अधिक विश्वासाहार्य वाटला आहे. ‘अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यू आता है?’ला ट्रीब्यूट देण्याच्या मिषाने अलीकडे आलेल्या ‘माय फ्रेंड पिंटो’ या सिनेमात प्रतिक बब्बर, अल्बर्ट पिंटोला आपला अंकल म्हणवतो या पलीकडे या सिनेमाचा आणि त्याच्या हिरोच्या ख्रिश्चन असण्याचा काहीही संबंध नाही.

एका ख्रिश्चन बाईच्या विस्थापित होण्यावर भाष्य करणाऱ्या, अपर्णा सेनच्या “३६ चौरंगी लेन” या सिनेमातली जेनिफर कपूरने साकारलेली व्हॉयलेट ही मात्र शंभर टक्के अँग्लो इंडिअन ख्रिश्चन वाटावी अशीच आहे. व्हॉयलेटचं स्वभावचित्रण, तिच्या बाह्यरूपा इतकीच ठळकपणे दिसणारी तिची ख्रिस्ती तत्वनिष्ठा हे खूप स्वाभाविक प्रमाणे या सिनेमात दिसलं आहे. एकतर त्या सिनेमातला जो महत्वाचा प्रसंग आहे तो ख्रिसमसच्या दिवशी घडतो आणि या सिनेमातील, ब्रिटीश वसाहतवादी जीवन-पद्धतीतून अजूनही बाहेर पडू न शकलेलं पात्र, हिंदू विवाह-पद्धती आणि परंपराचा वाराही न लागलेली मध्यवर्ती भूमिका आणि एकंदरीतच अँग्लो इंडिअन कुटुंबाचं जे डिटेलिंग अपर्णा सेनने केलेलं आहे ते त्या काळातील कलकत्त्याच्या ख्रिश्चन जीवनाशी पूर्णपणे इमानदारी राखून आहे.

राज कपूरच्या सिनेमातील हिरोईनला तिची काही वैयक्तिक धार्मिक, कौटुंबिक संस्कार मुल्ये असतील अशी अपेक्षा बाळगणे हा राज कपूरवर अन्याय होईल. राज कपूरच्या सिनेमातील नायिका, मग सिनेमातील तिची भूमिका कोणतीही असो, माफक अंगप्रदर्शन आणि एखाद-दुसरा मादक शॉट देणे हाच त्यांचा एकमेव धर्म असतो. मेरा नाम जोकर मधील मेरी (सिमी गरेवाल) नावाची शिक्षिका देखील ह्याला अपवाद नाही. या नावाने ख्रिश्चन असलेल्या शिक्षिकेवर राजू (ऋषी कपूर) या तिच्या विद्यार्थ्याचे प्रेम जडते. पौंगडावस्थेतील मुलाला वाटणारं स्त्री शरीराचं आकर्षण प्रेक्षकांवर ठसविण्याच्या निमित्ताने राज कपूर त्या शिक्षिकेला झुडूपापलीकडे कपडे बदलायला लावून आपल्या आपद्धर्माला जागतो. सिनेमात पुढे या विद्यार्थ्याला योग्य मार्गदर्शन करण्याचं काम ही शिक्षिका करते आणि आपला शिक्षकधर्म पाळते. मात्र या सिनेमात मेरीच्या नावाखेरीज तिचा ख्रिश्चन धर्म कुठे दिसत नाही.

जाने भी दो यारो या सिनेमातील सतीश शाहने साकारलेला डिमेलो हा देखील, भारतातील सगळेच ख्रिश्चन युरोप अमेरिकेतील वस्तूंवर, जीवन-पद्धतीवर प्रेम करतात या बॉलीवुडी स्टिरीओटाईपचा बळी आहे. त्याचप्रमाणे, कुछ कुछ होता मधली अर्चना पुरणसिंगची मिस ब्रीगान्झा किंवा जॉनी लिव्हरचा अल्मेडा या केवळ मनोरंजनासाठी लिहिलेल्या व्यक्तिरेखा असून या व्यक्तिरेखा फिल्मी स्टिरीओटाईपची उत्तम उदाहरणे आहेत. त्यामानाने, इतिहासाचे विकृत चित्रण करण्याबद्दल बदनाम झालेल्या संजय लीला भन्साळी ह्याने आपल्या खामोशी द म्युझिकल, ब्लॅक आणि गुझारीश या तिन्ही सिनेमात ख्रिश्चन पात्रांचे बऱ्यापैकी वास्तव चित्रण केले आहे. भन्साळीचे शिक्षण कॉन्व्हेंट शाळेत झालेले असल्याने आणि त्याचे बालपणही ख्रिश्चन वस्तीत गेलेले असल्याने त्याच्या सिनेमातील व्यक्तिरेखा ह्या अर्कचित्रे न होता ती तुमच्या आमच्या सारखी सामान्य माणसे वाटतात.

तसं पाहिलं तर, जुली, कॉकटेल सारख्या सिनेमातील परिस्थितीला बळी पडलेली युवती, बॉबी, सात खून माफ सारख्या सिनेमातील मधील कर्तव्यनिष्ठ मोलकरीणी, बॉम्बे वेलवेट, खामोशी, एक मै एक तू, कल हो ना हो, आखियो के झरोके से अशा सिनेमातील तत्वनिष्ठ, खमकी बाई अशा विविधांगी खिश्चन स्त्री भूमिका हिंदी सिनेमात आल्या आहेत आणि येत आहेत पण ज्याला खऱ्या अर्थाने सिनेमाचा सोलो नायक म्हणता येईल असा सिनेमा मात्र माझ्या पाहण्यात नाही. जिथे कुठे आहे तिथे एकतर संपूर्ण कुटुंब ख्रिश्चन आहे (उदाहरणार्थ बातों बातों मे, जोश, चेहरे पे चेहरा, अलबेला, अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यू आता है?, आणि अलीकडील सिनेमा पैकी फाईडिंग फॅनी आणि ब्रदर्स) किंवा ते मल्टी स्टारकास्ट असलेला सिनेमे आहेत (उदाहरणार्थ अमर अकबर अंथोनी, आखरी रास्ता, जीते है शान से, इत्यादी).

पण एखादा शाहरुख, सलमान, हितिक किंवा रणवीरचा ख्रिश्चन हिरो दीपिका, आलिया किंवा तत्सम हिंदू हिरोईनला पटवतो असा सिनेमा का दिसत नाही? (मध्यंतरी दक्षिणेतून डब होऊन आलेल्या सिनेमांपैकी अरविंद स्वामी, प्रभुदेवा अभिनित ‘सपने’ या सिनेमाच्या कथेत ख्रिश्चन धर्माच्या प्रथेचा चांगला वापर केला होता पण गंमत म्हणजे या सिनेमातही शेवटी नायिका हिंदू नायकालाच मिळते, ती ख्रिश्चन नायकाला मिळते असे दाखविण्याचे धाडस काही दिग्दर्शकाला झाले नाही.) असा सिनेमा भारतीय प्रेक्षक स्वीकारणारच नाहीत हे कुणी आणि कसं परस्पर ठरवलं? ख्रिश्चन म्हणजे गोवन असंच का सिनेमात दिसतं. या बॉलीवूडला आपल्याच इंडस्ट्रीत काम करणारे शेकडो इस्ट इंडिअन टेक्निशियन दिसत नाहीत का? दक्षिणेतून येणाऱ्या नर्स व्यतिरिक्त इतर ख्रिश्चन पात्रे दिसत नाहीत का? मुंबई पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या वसई विरार मधील एकही ख्रिश्चन पात्र आजवर एकही हिंदी

सिनेमात का दिसलं नाही? राज कपूर, अशोक कुमार, देव आनंद, विजय आनंद पासून नव्वदच्या दशकातील सर्व आघाडीच्या कलाकार, दिग्दर्शक, निर्मात्यांच्या घरी सकाळी कावडी मधे म्हशीचे दूध घेऊन येणारा वसईचा ख्रिश्चन दुधवाला, भाजीवाला या लोकांना सिनेमात एखाद्या पात्राच्या रूपाने आणावासा का वाटला नसेल? मुंबईच्या विविध शाळांमध्ये शिकविणाऱ्या हजारो ख्रिश्चन शिक्षकापैकी एखादा ख्रिश्चन शिक्षक सिनेमाचा नायक असावा (निदान एक महत्वाची व्यक्तिरेखा असावी) असे आजवर कुणालाच का वाटले नसावे? इतरांचं एकवेळ सोडून द्या पण जॉन मॅथ्यू मथाई, लॉरेन्स डिसोजा, विनील मॅथ्यू, रेमो डिसोजा अशा ख्रिश्चन दिग्दर्शकांनाही ख्रिस्ती लोकांच्या एखाद्या प्रश्नावर, विषयावर, घटनेवर सिनेमा काढावासा का वाटत नसावा? जॉन अब्राहम, असिन, लारा दत्ता, जकलीन फर्नांडीस या सारखे हिरो-हिरोईन सिनेमात सहजपणे हिंदू भूमिका निभावताना दिसतात पण अजूनतरी त्यांच्या वाट्यालाही ख्रिश्चन व्यक्तिरेखा आलेली का दिसत नाही?

आपल्या रोजच्या धार्मिक कार्याचा भाग असलेला पवित्र मिस्साबली साजरा करताना एकही प्रिस्ट दिसत नाही, आठवड्यातून एकदा रविवारी चर्चला जाणे हा ख्रिश्चन श्रद्धेचा भाग असताना हिंदी सिनेमातली एकही ख्रिश्चन व्यक्तिरेखा ही श्रद्धा पाळताना दिसत नाही. ऐन तारुण्यात एखादा सुशिक्षित पदवीधर तरुण लौकिक सुखाचा त्याग करून, ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून धर्मगुरू (Priest) व्हायला जातो त्याच्या मनोव्यापाराचा वेध घेणारं एखादं पात्र सिनेमात का दिसत नाही?, एखादी तरुणी आपलं घरदार सोडून धर्मभगिनी (Nun) होण्याचं कठोर शिक्षण घेऊन अनोळखी दुर्गम ठिकाणी सेवा करण्यास निघून जाते तीचं जीवन सिनेमावाल्यांना का खुणावत नाही? धर्मगुरू म्हणून जगताना त्यांच्या जीवनातील राजकीय, भावनिक, मानसिक ताणेबाणे एखाद्या सिनेमाचा विषय का होत नाहीत? महाराष्ट्रात राहताना बहुसंख्यांप्रमाणे एक मराठी म्हणून आणि हिंदुस्तानात राहताना बहुसंख्यांप्रमाणे एक हिंदुस्तानी म्हणून सगळ्यांशी मिळून मिसळून राहणे आणि त्याच वेळी आपली ख्रिश्चन अस्मिता, श्रद्धा, वेगळेपण जपणे ही कसरत करणारा, सामान्य मराठी माणसा इतकंच शुद्ध मराठी बोलणारा, लिहिणारा महाराष्ट्रातील ख्रिश्चन तरुण एखाद्या मराठी सिनेमाचा नायक का असू शकत नाही? आपल्याला नको असलेल्या बाळाचा गर्भपात करण्यासाठी भारतीय कायद्याप्रमाणे असलेली मुभा आणि ख्रिश्चन मुल्यांप्रमाणे असलेलं हे पाप या द्विधा मनस्थितीत सापडलेल्या ख्रिश्चन जोडप्याची कथा पडद्यावर आणण्याचं धाडस का होत नाही?

सिनेमामधे व्यक्तिरेखांचे स्टिरीओटाईप्स बनणे आणि सातत्याने एखाद्या सामाजिक, धार्मिक समूहाला अर्कचित्रात्मक सादर करणे हा काही सिनेमा वाल्यांचा मोठा गुन्हा नाही किंवा तो कुणाच्या जीवन-मरणाचा प्रश्नही नाही. मात्र हिंदी सिनेमाचा जन-मनावरील प्रभाव पाहता त्या व्यक्ती समूहाचे वास्तविक चित्रण असणारे सिनेमे देखील येत राहिले पाहिजेत. अजब प्रेम कि गजब कहानी मधली कतरिना कैफची जेनी, रॉक-ऑन मधील अर्जुन रामपाल आणि शहाना गोस्वामीची व्यक्तिरेखा या सारख्या वास्तवाशी इमान राखणाऱ्या व्यक्तिरेखा अधूनमधून का होईना पडद्यावर येत राहिल्या पाहिजेत. अन्यथा सोसायटीतले, समाजातले, ऑफिसातले लोक, माझ्यासारख्या नावा-व्यतिरिक्त कुठल्याच अँगलने ख्रिस्ती न वाटणाऱ्या माणसाकडून फिल्मी ख्रिश्चनांसारखी खाण्याची-पिण्याची, वागण्याची, बोलण्याची, पेहराव करण्याची अपेक्षा बाळगतात आणि मग माझ्यातल्या आल्बर्ट पिंटोला गुस्सा आल्यावाचून राहत नाही.

**(लोकप्रभातून साभार)**

*मेरी माग्दालेना हे बायबलमधील असे एक व्यक्तिमत्व आहे की ज्याने येशूचे जीवन काव्यमय बनविले आहे. माग्दालेना ही एक पापी स्त्री होती; पण तिची येशूवर नितांत प्रीती होती. त्यामुळे साहित्यात नि सर्वच प्रसार माध्यमात येशू नि माग्दालेना ह्यांच्या प्रेमकथा प्रसूत झाल्या आहेत. डान ब्राऊनच्या 'दा विन्सी कोड (२००३)सारख्या कादबऱ्यादेखील निर्माण झाल्या. पण वास्तविक माग्दालेना नि येशूचे संबंध एका आध्यात्मिक पातळीचे आहेत. (पहाः लूक ७.३६-५०). स्त्री-पुरूषांचे नाते केवळ शारिरीक नसते; त्याला भावनांची, तरल अशी आत्मिक झालर असते. कलावंत भाविक येशू-माग्दालेना कथेतून आत्मा-परमात्मा नाते अनुभवू शकतो. आजच्या वासनांध बनलेल्या समाजाला एक अलौकिक अनुभुती देणारे ते नाते असेल! त्या नात्याचा असाच एक भावाविष्कार-*

# मेरी माग्दालेना

**-फादर मायकल जी, वसई.**

एकदा येशू नि प्रेषित एकत्र बसले होते. रात्रीची जेवणे झाली नि येशू त्यांना म्हणाला, ''आता तुम्ही झोपा मी प्रार्थनेला जातो.'' येशू घराबाहेर पडला. पौर्णिमेचे स्वच्छ चांदणे पडले होते. तो निघाला समुद्रकिनाऱ्याच्या दिशेने. रात्रीच्या एकांतात समुद्राच्या लाटांशिवाय दुसरा आवाज नव्हता. वाऱ्याशिवाय कोणी कानाशी लागत नव्हते. येशू एका दगडावर बसला नि चांदण्या बघता बघता देवबापाच्या सहवासात गूल झाला. रात्र कशी भरली ते कळले नाही. पहाटेच्या सुमारास येशू भानावर आला. समोर पाहिले तर त्याला एक स्त्री दिसली. समुद्राच्या दिशेने ती चालत होती. उजव्या हातावर एक डेकडीचा कडा दिसत होता. त्यावर ती चढत होती. कड्यावर जाणार असेल का ती? का? रात्रीची? एकटीच?... येशूला उमगले. ती उडी घ्यायलाच जात असावी. तो तिच्या मागोमाग चालू लागला. त्याचा अंदाज जेव्हा त्याला खरा वाटू लागला तेव्हा त्याने जोराने हाक मारली, ''पोरी!''

तशी ती थबकली. तिने व्यक्ती ओळखली नाही पण त्या आवाजातील तळमळ, प्रेम तिला जाणवले!

''वेडे पोरी! काय करतेस?''

''वेगळं काय करू?'' असे म्हणत ती खाली बसली. ढसढसा रडू लागली. येशू जवळ गेला तशी ती त्याच्या पायांना बिलगली. ''मी कशाला जगू? कोणासाठी नि कशासाठी?''

येशू म्हणाला, ''काहीच उरलं नाही?''

''तारूण्य सरलं, सौंदर्य गेलं, सौंदर्याच्या जोरावर कमावलेली संपत्तीही आटली, आणि ह्या सर्व व्यापात नाती हरवली! आता एकेक दिवस जगायला भारी जातो! मला अडवू नका. मला मरू द्या.''

''मेरी!'

''कोण आहेस तू? का अडवतोस मला?''

''माग्दालेना!''

''माझं नाव माहितीय तिला? कोण आहेस तू? ... मी आता अडखळतेय! काय होतेय मला?''

''पिलाताच्या महालातही करमत नाही का तुला?''

''म्हणून तर इथे पोहोचले!''

''आणि तुला स्विकारणारा इथे आलाय!''

''तू...''

'' अग, तू वासनेत फसलीस. प्रेम तुला शिवलेच नाही!''

''तू.. येशू का? तुला भेटायची खूप इच्छा होती; पण प्रयत्न झालेच नाहीत.''

''ऐक माझं. जीवन सुंदर आहे! ऊठ.'' येशू तिला उभी करतो. आणि ती त्याला आवेगाने बिलगते. कुशीत रडते. ती आपले डोके येशूच्या खांद्यावर विसावते. समुद्रातला सूर्य हळूच डोकावून पहात होता. निर्माता निर्मितीला कवेत घेतानाचे दृश्य पाहून तो लाजेने लालीलाल झाला! तरी वरवर येत निर्लज्जपणे स्वतः पहात होता नि ते दृश्य जगाला दाखवत होता. पण त्यात लाजण्यासारखं काय होतं? ते होतं वासनेविरहित निखळ प्रेम. नाही पटत? पुढे ऐका-

''पोरी, जा माझ्यासाठी जग!'' येशूच्या शब्दांनी ती सावरली. थोडी संकोचली. पण ती शांत झाली होती. वाऱ्याने तिचा पदर फडफडत होता. त्याने ती आणखीन भानावर आली. एक नजर येशूच्या चेहऱ्यावर उगवत्या सूर्याच्या साक्षीने टाकून ती माघारी फिरली नि घराकडे चालूही लागली.

तेव्हापासून ती येशूच्या सहवासात आली. तशा त्या अनेक स्त्रिया येशूच्या प्रभावात होत्या. त्या येशूच्या शिष्यांपैकी एक झाल्या. (लूक ८.१-३) मेरीचे जीवनच बदलून गेले. सारे वाईट मार्ग तिने सोडले. मित्र बदलले. जागा सोडल्या, जीवनाचे ध्येयच बदलले. लोक म्हणू लागले, 'हिच्या अंगातील सात भूतेच जणू नाहिशी झाली नि ही सुतासारखी सरळ झाली!'.

ooo

एके दिवशी तिला बातमी लागली. येशू जवळच्याच एका जकातदाराच्या घरी मेजवावानीला येणार होता. (पहा: ल्क ७.३६-५०, म. २६.७; मर्क १४.३) वास्तविक एका प्रवचनप्रसंगी येशूकडूनच तिला ती बातमी लागली होती. येशूने तिच्या जीवनात केलेल्या परिवर्तनाचे उपकारस्मरण करण्यासाठी ती संधीच शोधत होती. आलाबास्तर सुगंधी तेलाची बाटली घेऊन ती धैर्याने त्या टॅक्सकलेक्टरच्या घरात शिरली. बरेच बडेबडे पाहुणे बसले होते. काही तिची पुर्वीची गिर्हाईके होती. त्यांच्या विखारी नजरा चुकवत नि शेरेबाजीकडे दुर्लक्ष करीत ती येशूपाशी पोहोचली. येशू भिंतीला रेटून, पाय समोर पसरून बसला होता. योहान नि पेत्र हे येशूचे शिष्य त्याच्या दोन्ही बाजुला बसले होते. दोघांना मेरीचे येणे खटकले. पण येशूने तिचे हास्यवदनाने स्वागत केल्यावर त्याच्या उपाय खुटला.

तेवढ्यात कोणीतरी खट्याळ हसलं नि पुटपुटलं, ''अरे, ही कुठे अवदसा इथे?''

'अरे? ही त्याला स्पर्श करते? ... नि हा खूश? वा रे गुरू!''

ते शब्द ऐकून मेरी येशूच्या पायाशीच बसली! तिला अश्रू आवरले नाहीत ती त्याच्या पायावर आपले अश्रू ढाळू लागली. तेव्हा येशू म्हणाला, ''पेत्रा, तुला एक प्रश्न करतो.'' प्रश्न पेत्राला पण उत्तर शास्त्र्यांना होते. ''पेत्रा, एका धन्याचे दोन चाकर होते. एकाचे पाचशे रूये देणे आहे तर दुसऱ्याचे पन्नास. दोघेही परतफेड करायला असमर्थ होते. तेव्हा धन्याने त्यांना कर्जमाफी दिली. तर त्यांच्यापैकी कोण धन्याचा अधिक रूणी राहील? ''

''ज्याला पाचशे रूपये माफ केले तो!''

''बरोब्बर! ही बाई तुम्ही पहाता ना? माग्दालेना तिचं नाव. इथे आलेले बहुतेक बडे लोक तिला ओळखतात. काहींनी तिला भोगले आहे तर काही त्या संधीचा वाट पाहून थकले आहेत. तिचे रूपांतर झाले आहे. तिला परमेश्वराची खूप क्षमा मिळाली आहे. म्हणून ती अधिक रूण व्यक्त करते. मी इथे आलो. कोणी माझे पाय धुतले? तिने आपल्या आसवांनी माझे पाय धुतले, केसांनी पुसले, नि सुगंधी तेलाने मालीश केले! हे मी होऊ द्यायला नको होते ना? अरे, सगळेच स्पर्श पापी नसतात रे! आणि लक्षात घे, आता इथे बसलेल्या पाहुण्यांपेक्षा ती अधिक योग्यतेची आहे!''

''आणि तू जुदास. तुला गरिबांची चिंता लागून राहिलीय ना?''

''नाही म्हणजे गुरू,'' जुदास लगेच उत्तरला, ''तूच म्हणालायस ना, गरीब लाजरसला मदत द्या

नाहीतर त्या श्रीमंताप्रमाणे तुम्ही नरकात जळाल?''

''खरंय! अरे, पण मीदेखील गरीबच आहे ना? म्हणूनच मी म्हणालोय, जे तुम्ही गोरगरीबांसाठी करता, ते माझ्यासाठीच होते!''

येशू पुढे म्हणाला, ''मेरी, जा, तू मुक्त झाली आहेस. शांतीने जा.!''

मेरी उठली. डोळे पुसले नि निघाली बाहेर. सारे बघत राहिले पण अवाक्षर काढायला कोणी धजले नाही.

०००

येशूच्या खूनानंतरचा तिसरा दिवस होता. मेरीला नीट झोप नव्हती. ती पहाटेच उठली. थोडे मसाले घेतले नि निघाली कबरेच्या दिशेने. हेरोदाचा कारभारी खुजा ह्याची पत्नी योहान्ना येणार होती बरोबर. पण तिचा पत्ता नव्हता. मेरी निघाली एकटीच. कबरेपाशी पोहोचल्यावर तिच्या लक्षात आले की कबरेवरची शिळा काढलेली आहे नि कबर रिकामी आहे! तिने धावत जाऊन शिष्यांना बातमी दिली. पेत्र आणि योहान आले पण कबर पाहून निघून गेले. पण मेरी कशी परत जाणार? ती बागेत रडत रडत शोध घेऊ लागली. कोणीतरी त्याचे शरीर पळविले असेल.. कुठे तरी लपवून ठेवले असेल. शोधत शोधत ती माळ्याच्या झोपडीपाशी आली. नेमकी माळ्यानेच तिला हाक मारली.

''बाई, का रडतेस? कोणाला शोधतेस?''

''माळीदादा, आमच्या येशूचे प्रेत दिसत नाही. तू काढलेस का? कोठे ठेवलेस? मला सांग. मी त्याला घेऊन जाते!'' मेरीने कळवळून विनंती केली. थोडा वेळ माळीदादा काही बोललाच नाही. मेरी तशीच त्याच्या कडे पहात राहिली...''बोलत का नाहीस?'' ती म्हणाली.

''काय बोलू? ... विसरलीस? मी तुला बोललो होतो, तिसऱ्या दिवशी बागेत ये मी तुला दिसेन...
मेरी!''

तिने डोळे पुसले नि विजेचा शॉक लागावा तशी ती सावध झाली! तिने त्याला ओळखले! ती ओरडली, ''प्रभू!''

तो मोठ्या आवेगाने ती त्याच्याकडे झेपावली. पण तो मागे हटला!

''आवर स्वत:ला, मेरी! मला चिकटून बसू नकोस. जा, माझ्या बंधूना सांग, मी जीवंत आहे!''

''ते आले होते. रिकामी कबर तपासून ते परत गेले.''

''त्यांना माझा शोध घेण्याची तत्परता नाही वाटली ना? जा, त्याना सांग, तू शोधलेस नि तुला मी सांपडलो!''

''होय प्रभू! मी मेल्यासारखे झाले होते रे गेले तीन दिवस! आज माझ्या जीवात जीव आला. जाते मी. त्यांना हा विश्वास देते.''

ती वाऱ्यासारखी धावत सुटली. जो भेटेल त्याला जाहीर करत होती. ''तो मेला नाही; जीवंत आहे. हो! मी त्याला पाहिलेय! बघा ना, माझ्यात संचारलेले नवे चैतन्य. नाही जाणवत? ते त्यानेच मला दिले. तो जीवंत आहे. मी त्याची साक्ष आहे! तो जीवंत आहे.''

००००००००००००००००००००००००००००

.

# मुस्कान....

-- सुहास बिऱ्हाडे

(करियरला महत्व देऊन चार वर्षापुर्वी समीरने आपल्या प्रेयसीला सोडलं. पण ती सल मनात कुठेतरी होती. त्यामुळे तो आपली प्रेयसी मुस्कानला शोधण्यासाठी निघाला...प्रेमाच्या अर्ध्या वाटेवर त्याने मुस्कानला सोडलं होतं... पण मुस्कानचा शोध त्याला एका वेगळ्या वळणावर घेऊन गेला)

ट्रेन एकापाठोपाठ एक स्टेशन सोडत इस्लामपूरच्या दिशेने जात होती. समीर अस्वस्थ होता, मनात भूतकाळाच्या आठवणी दाटून आल्या होत्या. कधी एकदा इस्लामपूर गाठतोय असं त्याला झालं होतं.. गेल्या ४ वर्षापासून मनात दडवून ठेवलेल्या भूतकाळाला त्याने मुक्त केलं होतं. मनात असलेली सल आता त्याला काढायची होती.. एका चुकीचं प्रायश्चित त्याला करायचं होतं. त्याला आपल्या मुस्कानला भेटायचं होतं...मुस्कान ही समीरची प्रेयसी होती. मुस्कान त्याच्यावर वेड्यासाराखी प्रेम करत होती. परंतु ४ वर्षापूर्वी समीरने स्वत:च्या करियरसाठी त्याने मुस्कानला अर्ध्या वाटेवर सोडलं आणि मुंबईला निघून आला होता. आता करियर मध्ये स्थिर झाल्यावर त्याला मुस्कानची तीव्रतेने आठवण येत होती. मुस्कानचं ते पहिलं प्रेम उचंबळून आलं होतं. मुस्कान कुठे असेल? काय करत असेल? त्याला माहिती नव्हतं. इस्लमापूर सोडताना त्याने मुस्कान आणि मुस्कानशी संबंधीत सर्व आठवणी, लोकं यांना दूर ठेवलं होतं. मुस्कानला फेसबुकवर शोधायचाही प्रयत्न केला. पण ती दिसली नाही. त्यामुळेच इस्लामपूरला जाऊन मुस्कानाला शोधायचं असं त्याने ठरवलं होतं. मुस्कानचं नक्कीच लग्न झालं असेल, असं त्याला वाटत होतं. एकदा मुस्कानला भेटावं, आपल्या चुकीची माफी मागावी बस्स..एवढीच त्याची अपेक्षा होती. तो आय़ुष्यात किती वर गेलाय हे कळल्यावर मुस्कानला झालेला आनंद त्याला पहायचा होता. ट्रेनमध्ये बसतानाच तो भूतकाळातील आठवणीत रमला होता.

समीरच्या वडिलांची बॅंकेत बदली झाल्यानंतर तो इस्लमापूरला रहायसा आला होता. कॉलेज मध्ये असताना त्याची मुस्कानची ओळख झाली. ती एका झेरॉक्सच्या दुकानात काम करत होती. समीर त्या दुकानात जायचा तेव्हा मुस्कानच्या गोड हास्याने त्याला घायाळ केलं होतं. तेव्हा समीरने मुद्दामूहन ओळख वाढवली. मनमोकळया स्वभावाच्या मुस्कानने त्याच्याशी मैत्री केली. मुस्कान त्याच्यापेक्षा ३-४ वर्षा लहान होती. पारंपारिक मुस्लिम कुटुंबातली होती. इस्मापूराच्या नूरबाग मध्ये रहात होती. शिक्षण अर्धवट सोडावं लागलं होते. घरची परिस्थिती बेताची होती. वडील नव्हते. आई आजारी असायची. इतर भावंड. मामा सांभाळ करायचा पण त्याच्या हुकूमशाहीत सर्वांना रहावा लागायचं. घर कसंबसं चालत होतं. त्यामुळे मुस्कान काम करत होती. समीर आणि मुस्कानचं तारूण्यातलं प्रेम बहरत होतं.

समीर सारखा चांगल्या घरातील मुलगा आपल्यावर प्रेम करतो यांचं तिला अप्रूप होतं. समीर तिच्या वागण्यावर भाळला होता. मूर्तीमंत सौदर्य होतंच पण तिचा मधाळ स्वभाव त्याला आवडत होता. समीर मध्ये मुस्कानला आपला उज्वल भविष्यकाळ दिसत होता. समीर प्रेमाच्या रम्य दिवसात बुडाला होता. समीरचा अभियांत्रिकीचा डिप्लोमा पुर्ण होत आला होता. आता त्याला एक वर्षाचा अभ्यासक्रम पुर्ण करायचा होता आणि लगेच नोकरी करायची होती. करियरसाठी तो प्रचंड गंभीर होता. मुस्कांनची घरची परिस्थिती, धर्म याची कल्पना होती. परंतु त्याने फार पुढचा विचार केला नव्हता. मुस्कान मात्र समीरला आपलं सर्वस्व मानत होती.

दरम्यान, मुस्कानच्या घरची परिस्थिती बदलली गेली. तिच्या मागे लग्नाचा तगादा लावला जात होता. तिला ते नकरमय जीवन नकोच होतं, त्यापेक्षा समीरशिवाय ती राहू शकत नव्हती. तिने समीरला अनेक दिवसांपासून कल्पना दिली होती. जेव्हा परिस्थिती हाताबाहेर जाऊ लागली तेव्हा तिने समीरला लग्नासाठी गळ घातली होती. पण समीरला ते शक्य नव्हते.

"लग्न? इतक्या लवकर? कसं शक्य आहे?" समीर म्हणाला "मी नाही थांबू शकत समीर. ते माझं लग्न लावून टाकतील कुणाबरोबरही. प्लीज काहीतरी कर" मुस्कान काकुळतीला येऊन सांगत होती. प्रेमाच्या या अध्यायात आता निर्णायक वळण येऊ लागलं होतं. समीरने मग कठोर निर्णय घेतला. "मला करियर मध्ये सेट व्हायचंय. मी लग्न करू शकत नाही इतक्यात" त्याने मुस्कानला निक्षून सांगितलं. मुस्कानने खूप विनवण्या केल्या. समीर ठाम होता. आपल्या करियर पुढे त्याला प्रेम त्याला दुय्यम वाटत होतं. त्याला मुंबईला जायचं होतं. वडिलांची बदलीही मुंबईला झालीच होती. तो मुंबईला जाणार हे ऐकून मुस्कान कोसळलीच. त्याच्या हातापाया पडत होती. अनेक कॉमन असलेल्या मित्रांना मध्यस्ती करायला सांगितलं. समीर कुणालाच दाद देत नव्हता. जाफर हा समीर आणि मुस्कानचा मित्र होता. त्याने समीरला विनंती केली. पण समीरने ऐकलं नाही. समीर मुंबईला कायमसाठी गेला. मुस्कान फोन करायची म्हणून आपला मोबाईल नंबर पाहिला. मुस्कानची काही आठवण नको म्हणून इस्मापुराच्या कुणाशीही संबंध ठेवला नाही. सर्वांपासून अलिप्त झाला. मुस्कानवर प्रेम नव्हतं म्हणून नाही तर स्वत:चं करियर घडवायचं होतं.

ट्रेन मध्ये बसलेल्या समीरच्या डोळ्यांपुढे आठवणींचा हा सारा पट उलगडत होता. त्या दिवसानंतर मुस्कानचं काय झालं, याची त्याने माहितीही ठेवली नाही. त्याला खरं तर त्यावेळी मुस्कानची पिडा सोडवायची होती. त्यामुळे तो कठोर बनला होता. मुंबईत आल्यावर त्याच्या प्रगतीचा आलेख झरझर वाढला. शिक्षण झाल्यानंतर लगेच मोठ्या खाजगी कंपनीत चांगल्या पगाराची नोकरही मिळाली. वडील निवृत्त झाले आणि वडिलांनी केलेल्या आर्थिक मदतीतून त्याने उपनगरात स्वत:चं घरही घेतलं. पण मनात दडवून ठेवलेल्या मुस्कानच्या आठवणीने त्याला आता अस्वस्थ केलं होतं. समीरला चांगली स्थळं येत होती. त्यामुळे लग्नापुर्वी एकदा तरी मुस्कानला भेटावं असं त्याला मनोमन वाटत होतं.

त्याने मागील चार वर्षात मुस्कानची कुठलीच खबरबात ठेवली नव्हती. फेसबुकलाही ती सापडली नाही. त्याचा इस्लामपूरामधील सामायिक मित्र जाफरचा त्याने कसाबसा नंबर मिळवला आणि इस्मलापूरला निघाला होता. फोनवर त्याने जाफरला खरं कारण न सांगता सहज भेटायला येतो असं सांगितलं होतं... जाफरकडून त्याला कदाचित मुस्कानची माहिती मिळू शकणार होती. इस्लामपूर जवळ येताच समीरच्या हृदयाची धडधडही वाढत होती. मुस्कानने लग्न केलं असलं तर ती इथेच असेल का? की अन्य कुठे गेली असेल?, कशी दिसत असेल? ती मला माफ करेल ना ?असे एक ना एक अनेक प्रश्न त्याच्या डोक्यात थैमान घालत होते. ट्रेन इस्लामपूर स्थानकात आली. जाफर समीरला घ्यायलाच आला होता. जाफर रिक्षा चालवायचा. समीरल दिसताच त्याने कडकडून मिठी मारली.

"किती बदललास तू?" जाफर म्हणाला. "तू सुध्दा" समीर हसत म्हणाला. जाफर समीरला आपल्या घरी घेऊन गेला. पाहुणचार झाला. इतक्या वर्षांच्या साठलेल्या गप्पा झाल्या. जाफरच्या बायकोने खास दम बिर्याणीचा बेत केला होता. यथेच्छ ताव मारून दोघे पाय मोकळे करायला बाहेर पडले.
तू मुक्काम माझ्याकडेच कर, जाफर म्हणाला "कशाला तुम्हाला त्रास. मी हॉटेल बुक केलंय" समीरने सांगितलं.
"आता इस्लापूर काही गाव नाही. सगळी मोठी हॉटेलं झाली आहेत" समीर म्हणाला. गप्पा रंगल्या होत्या. मग

समीरने विषय काढला. "मुस्कान कुठे आहे सध्या?" जाफरच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले. "तुझी शेवटपर्यंत तिने खूप आठवण काढली" जाफर म्हणाला

"म्हणजे?" "तू अचानक गेलास आणि आमच्या सगळ्यांशी संपर्क तोडलास. ती बिच्चारी एकटी पडली. खूप रडत होती". जाफर सांगत होता "तिने एकदा हाताची नस कापून घेतली होती. कारण तिला जबरदस्तीने लावून दिले जात असलेले लग्न करायचे नव्हते" "मग पुढे..." समीर उत्सुकतेने आणि अधीरतेने विचारलं "काही नाही..ती वाचली. पण तिच्या कुटुंबियांनी तिला खूप मारहाण केली होती" "पुढे काय झालं मला माहित नाही, त्यांच्या चाळी रिडेव्हलपमेंटला गेल्या. त्यानंतर मुस्कान कुटुंबियांसमवेत कुठे गेली माहित नाही", जाफर म्हणाला. "पण असं कसं. तुला तर माहिती असेल ना?" "खरंच रे, मला गावात राहून माहिती नाही. कारण मी पण मग स्वताला लांबच ठेवलं होतं" "मग आता तिचे कुटुंबिय कुठे असतील?" "त्या चाळीतले कोण कुठे तर कोण कुठे गेले होते. कदाचित रेहमत चाचा सांगू शकतील. समोर त्यांचे दुकान होते आणि मुस्कान कुटुबियांशी त्यांचे संबंध होते." "'चल ना जाफर, त्या रेहमत चाचाकडे जाऊया"

"ठिक आहे". जाफरने रिक्षा काढली आणि काही वेळातच ते नूर बागेसमोरच्या रेहमत चाचाच्या दुकानात पोहचेले. मुस्कान रहात असलेल्या नूर बागेच आता उंच इमारती रहात होत्या. जिथे मुस्कान वाढली, जिथे मुस्कानचा सहवास होता ती वास्तू, परिसरच नामशेष झाला होता. सत्तरीकडे झुकलेले रेहमत चाचाला जाफरनेच गावातील ओळख दाखून बोलतं केलं. " मेनन कुटुंबियाचं खूप वाईट झालं बेटा, रेहमत चाचा सांगत होते ती मुस्कान कुणा मुलाच्या प्रेमात वेडी झाली होती. त्याला शोधायला ती मुंबईला पळून गेली होती. ते ऐकताच समीरच्या पायाखालची वाळू सरकली."काय कधी? आता कुठे आहे?" त्याच्या प्रश्नांच्या सरबत्तीतून अधीरता लपत नव्हती. "झाले असतील चार वर्ष.. ती काही नंतर परत आली नाही. आणि आता या रिडेव्हलेमेमट मध्ये ते विस्थापितच झाले. मुलीच्या विरहाने आई देखील गेली." रेहमत चाचा सांगत होते. "मुंबईला गेली पण कुणाला कसं माहित नाही. कोण होतं त्यांचं कुणीच नव्हतं" समीरने विचारलं "ते मला काय कुणालाच माहित नाही. पण..." चाचा बोलायचे थांबले "काय झालं चाचा..? समीरने विचारलं "तिच्या कुटुंबियांनी शोध घेतला तक्रार दिली. नंतर असं समजल की ती मुंबईला पळून गेली आणि कुणाच्या तरी तावडीत सापडली. ती कुठल्यातरी वेश्यालयात असल्याचे गावातील एकाने नंतर सांगितलं." सांगताना रेहमत चाचाचा कंठ दाटून आला होता.

समीरच्या डोळ्यापुढे अंधारी आली होती. पायाखालची जमीन सरकली होती. काय ऐकतोय यावर विश्वास बसत नव्हता. "हो बेटा, मुस्कान वाईट लोकांच्या तावडीत सापडली. त्या कुणा मुलावर प्रेम केलं. तो तिला टाकून गेला. ही वेडी त्याला शोधायला मुंबईला गेली. काही माहिती नाही, काही नाही. आणि स्वतच आयुष्यच गमावून बसली....ते असं ठिकाण आहे तिथे जाण्याचा मार्ग असतो येण्याचा नाही." समीरच्या डोळ्यापुढे मुंबईतलं कामाठीपुरा, पिलाहाऊस तराळलं. त्या कोंदड खोलीत ग्राहकांना शोधणाऱ्या असंख्य लाचार दिनवाण्या मुली. त्यात मुस्कान असेल. कुणी तिला फसवून नेल? तिने हा वेडेपणा का केला? त्याला स्वतावर संताप येत होता. मुस्कान तू हे काय केलंस...तो मनातल्या मनात म्हणाला. समीरची अवस्था पाहून काही न बोलता जाफरने चाचाचा निरोप घेत समीरच्या खांद्यावर हात टाकून नेलं... त्याला आता इस्मलापूरात थांबण्यात अर्थ नव्हता. मुस्कानचा शोध घेणंही व्यर्थ होतं. त्याच्या प्रेमाचा भेसूर अंत झाला होता. इस्लामपूरा सोडताना ट्रेन मध्ये बसलेल्या समीरच्या डोळयात पाणी तराळलं होतं. मला आता कुणीच माफ करू शकणार नाही... माझी मुस्कान मला पुन्हा कधीच दिसणार नाही. पाणावलेल्या डोळ्यांनी आणि जड अंत:करणाने त्याने इस्मालपुराचा निरोप घेतला.

# करीअरविषयी बोलू काही...
# (वसईतील ख्रिस्ती तरुणांचे भवितव्य)

■ **प्रकाश आल्मेडा, संचालक - करीअर डेव्हलपमेंट सेंटर, वसई**

आजचा काळ अतिशय गोंधळाचा आणि तणावाचा आहे. प्रत्येकजण ताणतणावाच्या रगाड्यात, भविष्याच्या भीतीखाली दडपून जगत आहेत. आपण जे करतो ते योग्य आहे का? आपल्याला जे साध्य करायचे आहे ते साध्य होईल का? पुढची परिस्थिती नक्की कशी असेल? चहूकडे वाढणाऱ्या जीवघेण्या स्पर्धेला आपण तोंड देऊ शकू का? एक ना अनेक प्रश्न सतावत आहेत. पालकांना मुलांच्या भविष्याची चिंता असणे साहजिक आहे. सध्या आर्थिक मंदीची स्थिती आहे. हुशार, उच्चशिक्षित तरुणही बेरोजगार आणि तणावात पाहून आपल्या पाल्यांनी दहावी, बारावीनंतर वा पदवीनंतर नक्की कोणत्या दिशेने जावे, भविष्याचे नियोजन कसे करावे हे प्रश्न पालकांना पडतात. जेवढी माहिती जास्त तेवढा गोंधळही जास्त.

मुलांच्या करीअरबद्दलचा निर्णय मुलांच्याच नव्हे तर संपूर्ण कुटुंबाच्या भवितव्यावर दीर्घकालीन परिणाम करणारा असतो. प्रचंड अभ्यास, ताणतणाव सहन करून केलेला आटापिटा नक्की कशासाठी आहे ह्याचे भान असायला हवे. आपल्याला आयुष्यात नक्की काय करायचे आहे ह्याची स्पष्टता असली की जे साध्य करायचे आहे ते सोपे होऊन जाते. गाडीत बसण्यासाठी, कोठे जायचंय? तेथेच का जायचय? इतर मार्ग कोणते आहेत? अशा प्रश्नांची उत्तरे असली की साहजिकच कोठे, कसे आणि का जायचे ह्याचा एक नकाशा हाती येतो आणि मग योग्य नियोजन करून जायचे तेथे जाता येते; एकूण करिअरचा प्रवास सुखकर होतो. ह्याचे मुख्य कारण म्हणजे करीअरच्या प्रवासचं नियोजन करता येतं. "नियोजन" हा शब्द येथे कळीचा आहे.

नियोजन केल्याने वेळ आणि पैसा अशा नेहमीच मर्यादित असणाऱ्या साधनसंपत्तीचा आपण अधिक उत्तम वापर करून यश मिळवू शकतो. देशाला जसे भविष्याचे नियोजन करावे लागते, तसेच कुटुंबाला प्रत्येक सदस्याच्या भविष्याचा विचार करायला हवा. करीअर हा एक प्रवास आहे. नियोजनाने त्यातील धोके नीट समजून अधिक कमी करता येतात. त्याचे भान ठेवल्याने अपेक्षा विवेकी होतात आणि आयुष्य अधिक सफल होते. "इफ यू फेल टू प्लॅन, यू प्लॅन टू फेल" असे म्हणतात ते खरे आहे.

करीअर म्हणजे नोकरी नव्हे. करीअर हे आयुष्याचे असते. करीअर हा केवळ जगण्यासाठी करायचा प्रकार नसून, आपल्यातील गुणवत्तेचा आत्मशोध घेऊन, बदलणाऱ्या स्थितीचे भान ठेवून आपले ध्येय साध्य करणे होय. अर्थात आयुष्यातील महत्त्वाच्या गोष्टीची निवड आपल्याला झटक्यात करता येत नाही, कारण सभोवतालची स्थिती ही सातत्याने बदलत असते. अमेरिकेत म्हणतात की तुम्ही डॉक्टर असाल तर रिटायर्ड होताना तुम्ही आर्किटेक्ट असू शकता. बदल हाच कायमचा भाग असल्याने आपल्याला बदलत रहावे लागेल. सचिन तेंडुलकर ह्यांना चार्टर्ड अकांऊटंट होण्यास सांगितले असते तर ते शक्य झाले असते का?

दोन गोष्टी कायम लक्षात ठेवाव्यात. पहिली, स्वतःचा आत्मशोध घ्यावा. तुम्ही वेगळे आहात आणि इतर वेगळे आहेत ह्याचे भान ठेवावे. पालकांनी मुलांची तुलना करणे बंद करावी आणि आपली मुलं आहेत तशी स्वीकारावी. दुसरी गोष्ट, स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचं विश्लेषण करावं. एखाद्याला लोकांत मिसळणे आवडत नसेल; त्याचा स्वभाव तसा असेल तर त्याने हॉस्पिटॅलिटी क्षेत्रात जावे. मुलांचं करीअर हे पालकांचे "जॉईंट वेंचर" आहे हे खरे आहे. दहावी-बारावीची वर्षे साठ वर्षांच्या आयुष्याला दिशा देतात. आपण मुंबईपासून हाकेच्या अंतरावर राहतो, अशा वेळी पालकांनी मुलांना तेथील कॉलेजेस, इन्स्टिट्यूट्स ह्याची माहिती द्यावी. दहापैकी नऊ इंजिनिअर्सना नोकरी नाही, चारपैकी तीन MBA नां आवश्यक कौशल्य अवगत नाही.

देशातील ८०% इंजिनीअर्सना नोकरी मिळण्याची शक्यता धूसर आहे. ऑटोमेशनमुळे देशातील ६०% नोकऱ्या जाण्याच्या स्थितीत आहेत. पुढील ७ वर्षात आयटी क्षेत्रातील ५०% रोजगार जाण्याची शक्यता आहे. ह्याचा अर्थ आपल्या शिक्षणपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. त्यामुळे करीअर कांउन्सिलींगची गरज ही फक्त दहावी-बारावी झालेल्या मुलांनाच नाही तर अनुभवी लोकांसाठीसुद्धा आहे. आज नोकरीची स्थिरता नसली तरी नवीन कौशल्य शिकण्याची संधी सहज उपलब्ध आहे. स्थिरता, आर्थिक सुरक्षितता, समाधान आणि प्रगतीच्या संधी ही आपली चार ध्येय असतात.

वसईतील युवा वर्ग अजूनही आर्थिक आणि सामाजिक बाबींविषयी फारसा जागरूक दिसत नाही. वसईतील तरुणांची शैक्षणिक बाजू जमेची आहे. मुंबई उत्पादनाचं शहर राहिलेलं नसून ते आता सेवा क्षेत्र बनले आहे. त्यामुळे आपल्या तरुणांनी सेवा क्षेत्रातील कौशल्य शिकून घेतले पाहिजे. काही तरुणांना स्वतःच्या व्यक्तिमत्वाविषयी आवश्यक आत्मविश्वास दिसून येत नाही. इंग्रजी माध्यमात शिकूनही अस्खलित इंग्रजी संभाषण त्यांना करता येत नाही. ८५% यश हे सॉफ्ट स्किल्स आणि व्यक्तिमत्त्वावर अवलंबून असते, तर १५% यश हे तुमच्या क्षेत्रातील ज्ञानावर अवलंबून असते. आजकाल मुलांचे वाचन फार असमाधानकारक आहे. आपले तरुण आज प्रशासकीय सेवेत नाहीत. पदवीला ९०% काढणारे तरुण बँकेची स्पर्धापरीक्षा उत्तीर्ण होताना झगडताना दिसतात.

तरुणांनी उद्योगाची कास धरायला हवी. स्टार्टअपसाठी बँकेने वसईतील तरुणांना प्रोत्साहन द्यावे. आजकाल सर्वत्र स्टार्टअपचा बोलबाल आहे. आपल्या तरुणांना ई-कॉमर्स क्षेत्रात वाट का नाही सापडत?

वसईत करीअर डेव्हलपमेंट सेंटर, आयब्लॉसम पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट सेंटर, बसीन बिझनेस कॅथोलिक असोसिएशन सारख्या संस्था कार्यरत आहेत.

काल जे केले तेच आज केल्याने वेगळा निकाल हाती लागणार नाही. आपल्याला गरज आहे ती एका नव्या दिशेची.

आज शाळकरी मुलांना मोठी स्वप्नं दाखवून आणि ती सत्यात उतरवण्यासाठी मेहनत करण्यासाठी प्रोत्साहित करावे लागेल.

"फ्युचर इट्स दी आर्ट ऑफ द पॉसिबल" हे खरे आहे.

# जीवंत मानवी देवांचे तीर्थक्षेत्र...
## (आनंदवन ,हेमलकसा आणि सोमनाथ)

■ फ्रान्सिस आल्मेडा सर

बंधन टूरच्या आनंद वारी सोबत आम्ही या तीर्थक्षेत्राची सहल करुन आलो.

आनंदवन म्हणजे भूतकाळावर मात, लोकबिरादरी प्रकल्प म्हणजे वर्तमानकाळाला साथ

आणि सोमनाथ प्रकल्प म्हणजे भविष्य काळाला हात!

**आनंदवन,वरोरा**

महारोगाने विद्रूप झालेल्या मानवी देहातील चैतन्य कामाला लावून फुलवलेले नंदनवन! या नंदनवनाचा आद्यमाळी महामानव मानवी देहातील देव बाबा आमटे! समाजाने तिरस्काराने टाकून दिलेले बेवारस मानवी जीव सन्मानाने उभे करण्याचे काम बाबांनी केले. शेती,बागा,हस्तकलाकेंद्र,हातमाग,यंत्रमाग,तांत्रिक कार्यशाळा, शाळा व कॉलेजे एक स्वयंपूर्ण वसाहत जी बाहेरच्या जगाला विविध उत्पादने पुरविते. हाताला बोटे नसलेले लोक निरोगी लोकांना तोंडात बोट घालायला लावणारी काम करीत आहेत!

ज्यांची बोटे रोगाने हिरावून घेतली आहेत असे हाताच्या बोटावर मोजता येतील एवढे रोगमुक्त महारोगी घेऊन वरोऱ्याच्या उजाड माळरानावर बाबांनी पहिली झोपडी उभारली. आज तेथे रोगमुक्त महारोग्याची स्वयंपूर्ण वसाहत आत्मविश्वासाने उभी आहे. बाबांनी ही माणसे केवळ रोगमुक्तच केली नाहीत, तर त्यांना भीती, अंधविश्वास व रुढीपरंपरांच्या जोखडातून मुक्त केले. तेथील एकेक माणसाशी बोलल्यावर कळते त्यांची विवेकी विचारसरणी, बाबांच्या विचारांनी ठासून भरलेली ही माणसे बाबांचे रूप घेऊन वावरतात! आम्हाला माहिती देणारे परांजपे काका बाबांच्या कर्तृत्वाविषयी भरभरून बोलत होते. काकाच्या मुखाने जणू बाबाच बोलत होते. त्यांनी आम्हाला बाबांना दफन केलेली जागा दाखवली. त्यांच्या दफन भूमीवर फक्त एक झाड उभे आहे. ते डवरलेले झाड सांगते ऐका महामानवाची कथा! ठिकठिकाणी जगातील विचारवंतांचे विचार ठळक अक्षरात लिहिलेल्या पाट्या आहेत. आनंदवन ही कुष्ठरोग्यांची वसाहत वाटत नाही, ती तर वाटते मुक्त महामानवांची अपूर्व नगरी!

**लोकबिरादरी प्रकल्प हेमलकसा,**

घनदाट जंगलात रानटी श्वापदांच्याआणि विषारी सापांच्या सहवासात उभे आहे एक स्वप्न संकुल.अतिदुर्गम भाग.अन्न वस्त्र निवारा या मूलभूत गोष्टीचेच नव्हे तर पाण्याचेही दुर्भिक्ष! रस्ते वीज वाहने या शहरी सुविधांची तर कल्पनाही करता येणार नाही अशा जागी बाबांनी आपल्या सुपुत्राला पाठवले.खरेच एक देवपुत्र या घनदाट जंगलात उतरला.प्रकाश बाबा आमटे!अज्ञान,अनारोग्य,अंधश्रद्धा अशा घनदाट अंधारात प्रकाश देणारा सूर्य उगवला! झोपडीत थाटलेल्या दवाखान्यात औषधोपचार सुरू झाले.भुताखेतावर विश्वास ठेवणारे आदिवासी आधुनिक औषधापासून लांब पळायचे! त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना रोगमुक्त करता करता घनदाट जंगलात एक हॉस्पिटल उभे राहिले. शिक्षणाअभावी आदिवासींची होणारी पिळवणूक आणि अज्ञानामुळे सहन करावे लागणारे अत्याचार न पाहवून त्यांना सज्ञान करण्यासाठी शाळा उभारण्यासाठी संकल्प झाला. सामाजिक बांधिलकी मानणारे

निष्ठावान सहकारी मिळाले आणि विद्यालय आकाराला आले. येथील आदिवासींची मायबोली मराठी पेक्षा पूर्णपणे वेगळी त्यांना मराठीतून शिकवण्यापूर्वी शिक्षकांनी त्यांचीच भाषा शिकायला सुरुवात केली. सर्व अडचणीवर मात करून या आदिवासी मधून आज शिक्षक,डॉक्टर व इंजिनिअर झाले आहेत! आता तर प्रकाश आमटेचे सुपुत्र अनिकेत आमटे यांनी इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू केली आहे. आदिवासी मुलांना केवळ शिक्षणाचीच नव्हे तर राहण्याची खाण्यापिण्याची देखील सोय येथे केली जाते आणि तीही विनामूल्य!

प्रकाश आमटे माणसावरच केवळ प्रेम करून थांबलेले नाहीत त्यांनी अनाथ प्राण्यांनादेखील आपल्या आश्रयाला घेतले आहे. त्यांच्या आमटज आर्कमध्ये मगर,सुसर,ससे,हरीण,माकड आणि बिबळे एकत्र नांदतात. साप देखील अंगाखांद्यावर खेळतात!

**सोमनाथ प्रकल्प आणि श्रमसंस्कार छावणी.महारोडा.**

ताडोबाच्या अभयारण्याला लागून असलेल्या साडेबाराशे एकर क्षेत्रावर बाबांनी हा महाप्रकल्प उभारलाय!येथून तिनही प्रकल्पासाठी अन्न,धान्य, भाजीपाला व फळे पिकवली जातात व उरलेले खुल्या बाजारात विकले जाते! अशाप्रकारे सर्वांच्या,आताच्या व भविष्यातील उपजिविकेचा प्रश्न सोडवून ठेवलेला आहे!

याच प्रकल्पावर भारतभरातील युवकांची श्रमसंस्कार छावणी उन्हाळयाच्या सुट्टीत घेतली जाते. या संस्कारासाठी प्रतिवर्षी देशभरातून हजारो विद्यार्थी हजेरी लावतात. जाताना हाताने कष्ट करण्याचा संस्कार आणि बाबांची त्याग व समाजसेवेची शिकवण सोबत घेऊन जातात. या श्रमसंस्कार छावणी साठी टाटा उद्योगसमूहाने रंगमंच व विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करून दिली आहे. या प्रकल्पावर बरे झालेल्या कुष्ठरोग्यांची राहण्यासाठी सुसज्ज घरे आहेत. सर्व आधुनिक सोयींनी सुसज्ज घरात राहणारे हे सुसंस्कृत रहिवासी कोणत्याही पांढरपेशा शहरी नागरिकांपेक्षा उजवे आहेत त्यामुळेच शेजारच्या परिसरातून तेथे शेतीच्या कामासाठी येणाऱ्या तरुणी त्यांच्या प्रेमात पडून त्यांच्याशी विवाहबद्धही झालेल्या आहेत! बाबांच्या कामाचे हे सर्वात मोठे यश आहे!

तिन्ही प्रकल्पावर जेवणासाठी स्वतंत्र भोजन गृहे आहेत.कोणीही स्वतःचे भोजन स्वतः तयार करीत नाही. प्रत्येक भोजन गृहावर काम करणारा गट एक महिना काम करतो. त्यामुळे या प्रकल्पावरील प्रत्येक माणूस वर्षातील अकरा महीने भोजन स्वतः तयार न करता जेवू शकतो! सर्वात महत्त्वाची गोष्ट ही की आमटे कुटुंबीयांपासून सर्वजण ह्या भोजनगृहात तयार झालेले शाकाहारी जेवण जेवतात! ज्यांची स्वतःची घरे व कुटुंबे आहेत असे लोकही भोजन गृहांतून डबे घेऊन जातात. आनंदवन आणि सोमनाथ प्रकल्प हे दोन्हीही बाबांचे मोठे सुपुत्र विकास आमटे यांच्या मार्गदर्शनाखाली चालतात. या प्रकल्पावर आम्हाला माहिती देणारे हरिभाऊ पाटील हे तर एखाद्या मराठीच्या प्राध्यापकाला शोभेल अशा भाषेत बाबा आमटे आणि त्यांचे सुपुत्र यांच्या कर्तृत्वाचा आलेख उभा करीत होते!

या तिन्ही प्रकल्पावर कोठेही देवदेवतांच्या किंवा थोर पुरुषांच्या मूर्ती किंवा मंदिरे नाहीत!(बाबांची देखील मुर्ती नाही)

मात्र अनेक ठिकाणी जगभरांतील विचारवंतांचे विचार असलेल्या पाट्या लावलेल्या आहेत! असे हे तिर्थशेत्र जेथे मानवाच्या रूपात देवदूत वावरतात आणि अंधश्रद्धेच्या जगात विवेकाचा प्रकाश पसरवतात!

(माणसाने माणसाशी माणसा सारखे कसे वागावे हे शिकावे या तिन्ही प्रकल्पावर वावरणाऱ्या माणसांकडून!)

# विचार तर कराल ! – अतुल आल्मेडा, निर्मळ

स्वीडनचे उद्योजक आल्फेड नोबेल व त्यांचा भाऊ लुडविन हे जन्मापासून श्रीमंत होते. त्यांच्या कुटुंबाच्या मालकीच्या तेलविहिरी होत्या. तेल उत्पादनामुळे त्यांनी गडगंज संपत्ती कमावली. त्यानंतर त्यांनी आणखी संपत्तीत भर पडावी म्हणून शस्त्र निर्मितीचे कारखाने सुरू केले. दोघेही भाऊ रसायनतज्ज्ञ होते. त्यानंतरच्या काळात केवळ पैसे कमवण्याच्या उद्देशाने बोफोर्स तोफा निर्माण करणारा कारखाना विकसित केला. शस्त्रनिर्मितीच्या उद्योगात त्यांनी मोजता न येणारी श्रीमंती अनुभवली. एके दिवशी १८८८ साली या बंधूंपैकी लुडविल यांचे निधन झाले. वर्तमानपत्रात “मृत्यूच्या व्यापा-याचे निधन” या मथळयाखाली त्याच्या मृत्युची बातमी प्रसिद्ध झाली. या मथळयामुळे आल्फेड चिंताग्रस्त झाला. आपल्या मृत्युनंतर असे लिहिले जाऊ नये म्हणून त्यांनी खूप विचार केला. शेवटी विचार करून विवेकी मृत्यूपत्र लिहिले. आपली संपत्ती माणुसकीची जोपासना करण्याकरिता बहाल केली व आपण कमावलेल्या अमाप संपत्तीतून नोबेल पारितोषिकाची स्थापना केली. १० डिसेंबर १८९६ ला आल्फेड नोबेलचे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या मृत्युपत्रात नोंदविल्याप्रमाणे १९०१ पासून नोबेल पारितोषिकाची सुरूवात झाली. अमाप संपत्ती त्याला वैभवी जीवन देऊ शकली पण समाधानी, शांतीचे जीवन देऊ शकली नाही. कारण संपत्ती मनुष्याला शांती देऊ शकत नाही. शांती व समाधानी जीवनासाठी परोपकार व त्यागाची वृत्ती अर्थपूर्ण ठरते.

ख्रिस्ताने दोन हजार वर्षांपूर्वी म्हटले आहे, “उंटाने सुईच्या नेढयातून जाणे हे श्रीमंताने देवराज्यात (शांतीत) जाण्यापेक्षा अधिक सोपे आहे.” असे लूक, मत्तय व मार्क या तिन्ही शुभवर्तमानकारांनी नोंदवून ठेवले आहे. मात्र माणसे व ख्रिस्ती माणसे ख्रिस्ताची पूजा करतील, उदोउदो करतील, पण हे जीवनाचे मूल्य कधीच अंगिकारत नाहीत कारण ते कर्मकांडी ख्रिस्ती आहेत व तो-यात सांगणार, आम्ही ख्रिस्ती श्रद्धावंत आहोत. “श्रद्धा म्हणजे आचरणात उत्कटपणे व्यक्त होणारी विवेक शक्ती” असे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी नोंदविले आहे.

केवळ नफ्यासाठी उत्पादन म्हणजे भांडवलशाही, फक्त गरजा भागविण्यासाठी केलेले उत्पादन म्हणजे समाजवाद आणि शेजा-यासाठी कृतज्ञतेच्या भावनेने केलेले उत्पादन म्हणजे मानवतावाद असे तत्त्वज्ञान सांगते. शेजारी कोण ? पृथ्वीच्या पाठीवर जेथे दु:ख आहे तेथे तुमचा शेजारी आहे. हे ख्रिस्तानेच उत्तम समारितानीच्या दृष्टांतातून स्पष्ट केलेले आहे. आपले उत्पादन (कार्य) कशासाठी आहे, मानवजातीच्या इतिहासात एका आयुष्यात सगळयात जास्त पैसा कमावलेला माणूस म्हणजे बिल गेट्स. परंतु तो पैसा त्याला शांतीच्या, समाधानाच्या जीवनापासून वंचित ठेवत होता. म्हणूनच त्याने आपल्या संपत्तीतली मोठी रक्कम (सुमारे पन्नास अब्ज डॉलर्स) सामाजिक कार्यासाठी दान करून टाकली. एवढेच नव्हे तर पूर्ण वेळ सामाजिक कार्यासाठी वाहून घेतले आहे. त्याच्यानंतर जगातील दोन नंबरचा श्रीमंत वॉरन बफे. तो म्हणाला, मला पैसे कमावता येतात पण मला ते समाजसेवेसाठी वापरता येत नाहीत. त्याने आपली संपत्ती बील गेट्सकडे सामाजिक कार्यासाठी दिली.

हे का घडतं ? माणसाला केवळ पैसा निर्भेळ सुख देऊ शकत नाही. मग जास्तीत जास्त पैसा कमविण्याच्या नादी लागायचे का ?

आज आपल्या भारत देशातही नारायण मूर्ती आणि अझीम प्रेमजी सारखी माणसे पुढे येत आहेत. अझीम प्रेमजीने तर आपल्या देशातील शिक्षणव्यवस्था सुधारण्यासाठी आठ अब्ज डॉलर्स दान द्यायचे जाहीर केलंय. या दानशूर व्यक्ती आपल्याला काय सांगतात ? आम्ही अमाप पैसा कमावला पण शेवटी या पैशात समाधान नाही.

ख्रिस्ताने व म. गांधीनी जाती, धर्म व राष्ट्र या बंधनापलिकडे जाऊन मानवतावादी दृष्टिकोनांतून माणसावर प्रेम केले. आपली संपत्ती व आपले आयुष्य लोकांकरिता वाहिले. परिणामी त्यांना जीवनात सुख, समाधान मिळाले. त्याचमुळे ख्रिस्ताने आपल्या मारेक-यांना क्षमा केली, तर गांधीच्या छातीवर गोळ्या\ घातल्या गेल्या तेव्हा त्यांच्या तोंडातून 'हे राम' हे शब्द बाहेर पडले. पैशाच्या मागे न गेल्याने ते मानवतेचे तारणकर्ते झाले, लोकांच्या गळ्यातले ताईत बनले. तेच स्वामी विवेकानंद व बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी केले. आपण या महामानवांना वंदन करतो, पण त्यांची शिकवणूक अंगिकारतो का ? म. गांधी यांनी 'हिन्द स्वराज्य' हा छोटेखानी ग्रंथ प्रथम गुजरातीत लिहिला. त्याची प्रेरणा "The Kingdom of God is within you" या लियो टॉलस्टॉय यांच्या ग्रंथातून मिळाली. स्वर्गाचे/शांतीचे राज्य हे तुमच्यात आहे, हे ख्रिस्ताने सांगितलेले तत्त्वच, लियो टॉलस्टॉय व म. गांधी यांनी अखिल मानवाला आपल्या कृतीतून पुन्हा सांगितले. स्वर्गाचे राज्य हा भौगोलिक प्रदेश नसून ती मनाची वृत्ती आहे हे समजून घ्या. त्यासाठी विचार करायला शिका, विवेकी व्हा.

स्पिनोझा म्हणतो, संपत्ती कमावण्यासाठी अधाशीपणाने जगणे किंवा त्याकरिता जबर महत्त्वाकांक्षा बाळगणे ही मानसिक स्वास्थ्य बिघडल्याची लक्षणे आहेत. आपले मानसिक स्वास्थ्य तपासून पाहा. बाजारमूल्ये जेव्हा मानवी मूल्यावर मात करतात तेव्हा ती रानटी युगाची सुरूवात असते, असे कार्ल मार्क्सने नोंदविले आहे.

आज माझ्या, तुझ्या, तुमच्या जगण्याचा उद्देश भ्रष्ट झालेला आहे. हे जीवन प्रेमाने, माणुसकीने जगण्यासाठी की स्पर्धा करून पैसे कमवून, वैभवी राहणीमानासाठी या संभ्रमावस्थेत आपण सापडलो आहोत. स्पर्धा, मित्राला देखील शत्रू म्हणून बघते. अशा स्पर्धामय जगात आपण वावरत आहोत. मलाच सगळ्यात जास्त मिळायला हवे, मग तो पैसा असो, मानसन्मान असो, पद असो, जीवनाचे कुठलेही अंग असो, मी उठून दिसायला हवा, या स्पर्धेमुळे आपण जीवनाचे खरे उद्दिष्ट विसरलो आहोत किंवा बाजूला सारले आहे. प्रत्येक जण स्पर्धेच्या मागे लागलेला आहे व त्याचा परिणाम म्हणून माणूस माणसाचे गळे कापत आहे, माणुसकीची कत्तल करत आहे. या पृथ्वीतलावर प्रत्येकाची गरज भागवली जाईल एवढे अन्न आहे पण लोभापुरतं नाही. म्हणून म्हणतात, "Needs can be satisfied, greed cannot" बायबलमधील एक वाक्य असेच आहे, "तुम्ही सारे जग कमावले पण मनाची शांतीच गमावली तर काय फायदा ?" स्वामी विवेकानंदानी सुद्धा मनुष्य हा आर्थिक प्राणी आहे ही भूमिका नाकारलेली आहे. निखळ अर्थकारणाला नैतिकतेचा लगाम असल्याशिवाय मानवी जीवनाला अर्थ ठरणार नाही, अशी तात्त्विक मांडणी केली आहे.

जग कसे बदलायचे ? व्हिक्टर फ्रँन्केल नावाच्या मानसोपचारतज्ज्ञाचं माणूस आत्महत्या का करतो किंवा कधी करतो या विषयीचं एक सुंदर पुस्तक आहे - 'मॅन्स सर्च फॉर मीनिंग' या पुस्तकात Friedrich Nietzsche या तत्त्वज्ञाचे वाक्य कोट केले आहे आणि त्याचा अर्थ स्पष्ट केला आहे. "Those who know the why of the living have no problems about the how of living"

मी का जगतो याचे उत्तर ज्यांना सापडले, त्यांना कसे जगावे हा प्रश्न सतावत नाही. डॉ. प्रकाश व विकास आमटे, डॉ. अभय बंग, श्री. कैलास सत्यार्थी, पाकिस्तानची ती तरूणी-मलाला, एक ना अनेक आदर्श आपल्या समोर आहेत. मी काय करणार ? जग बदलण्याची सुरूवात मजपासून व्हावी. माणसाला काहीही अशक्य नाही, हवा फक्त विवेकी विचार.

जगायचे कसे हे आयोजन ठरविता येते पण हे आयोजन करण्यामागच्या जीवनाचे प्रयोजन काय, माझ्या जीवनाचा उद्देश काय, हेतू काय ? एकदा उद्देश, हेतू, ध्येय निश्चित झाले की आयोजन मार्गी लागते. हे आयुष्य आपल्याला एकदाच मिळाले आहे. इथे वन्स मोर नाही. हे अमूल्य आयुष्य आपण कशासाठी वापरणार ? हजारो बालके कुपोषणामुळे मृत्युमुखी पडतात, हजारो शेतकरी आत्महत्या करतात. आपला आणि त्यांचा काहीच संबंध नाही का ? जीवन हे देवाने दिलेले दान आहे, त्याचे जेवढे दान कराल तेवढे मोल वाढेल असे गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांनी सांगितले आहे.

जग बदलण्याची आकांक्षा ठेवण्या-यांनी जग बदलण्याची सुरूवात स्वत:पासुन करावी, असे महात्मा गांधी सतत म्हणत आणि त्यांनी ते स्वत: केले. मी काय करणार ?

# 'दीड दमडी ना' अर्थात 'नापास' झालेल्या मुलाचे 'प्रगती'पुस्तक

**- नेहा किशोर सावंत**

वर्जेश ईश्वरलाल सोलंकी च्या कविता या आपल्या पहिल्या काव्यसंग्रहानेच नव्वदोत्तर काव्य जगतात आपला वेगळा ठसा उमटविणाऱ्या , वर्जेश सोलंकी या कवीच्या 'ततपप' या दुसऱ्या काव्यसंग्रहानंतर 'दीडदमडीना' अशा आगळ्या वेगळ्या शीर्षकाने आत्मपर लेखांचा संग्रह नुकताच 'लोक वाङ्मयगृहातर्फे प्रकाशित झाला आहे. या लेखसंग्रहाचे स्वरूप तसे छोटेखानीच आहे. एकूण १९ लेखांमधून वर्जेशने गतायुष्यातील आठवणींचा व संघर्षाचा परामर्श आगळ्या वेगळ्या अशा तरुणाईच्या भाषाशैलीतून घेतला आहे. उगीचच आयुष्याचा फाटपसारा मांडलेला नाही कि वाचकांची सहानुभूती मिळवण्यासाठी आयुष्यातील पराकोटीच्या दुःखाच, धडपडीच उरबडवेपणाने प्रदर्शन केलेले नाही, तर बालपण ते उमेदीच्या, धडपडीच्या तारुण्यातले मनावर कोरून राहिलेले प्रसंग, नोकरीच्या ठिकाणचे राजकारण, आंतरिक-मानसिक तसेच परिस्थितीशी सुरु असलेला अविरत संघर्ष तसेच आयुष्यात पाहिलेले मृत्यू, मनात घर करून राहिलेल्या व्यक्तिरेखा या घटकांमधून जीवनाचा ठराविक पट अतिशय संवेदनशीलतेने उभा केला आहे.

आत्मपर लेखनात सर्वसाधारणपणे प्रथम पुरुषी निवेदनशैलीची योजना केलेली असते. परंतु 'दीडदमडीना' मध्ये मात्र तृतीय पुरुषी निवेदनशैली योजलेली आहे. यातील निवेदक (वर्जेश) हा वर्जेश सोलंकीकडे म्हणजेच दीडदमडीनाकडे त्रयस्थाच्या भूमिकेतून पाहतो. वर्जेश सोलंकी हा निवेदकाच्या भूमिकेतून 'मी'कडे म्हणजेच 'दीडदमडीना'कडे पाहतोय (एक झाड दोन पक्षी, बलुतंमधील निवेदनशैली अशाच प्रकारची आहे.) त्यामुळे अपरिहार्यपणे निवेदनात तटस्थपणा आलेला दिसतो. उगीचच आत्मस्तुती किंवा आत्मप्रौढी यात केलेली नाही, उलट 'दीडदमडीना' या शीर्षकातूनच स्वतःविषयीचे न्यूनत्व, कचखाऊवृत्ती, परिस्थितीशरणता, स्वतःचे दुबळेपण व्यक्त होते. (जी वर्जेशच्या अनेक कवितांतूनही व्यक्त होताना दिसते.) दीडदमडीना या लेख संग्रहातील लेख कालानुक्रमे आलेले नाहीत तर काहीशा flashback तंत्राने आले आहेत असं म्हणायला हरकत नाही.

वर्जेशच्या पहिल्या काव्यसंग्रहाला पुरस्कार मिळाल्याच्या हकीकतीपासून लेखांना सुरुवात होते. या हकीकतीनंतर भूतकाळातील घडलेल्या एकेक घटना, आठवणी, काही व्यक्तिरेखा, नोकरीचे अनुभव स्वतंत्र लेखांमधून उलगडत जातात आणि नापास झालेल्या एका मुलाचे प्रगतीपुस्तकच आपल्या समोर खुले होत जाते. 'पराभव आणि संघर्ष या आपल्या आयुष्याच्या दोन बाजू आहेत' असे 'दीडदमडीना' म्हणतो, त्याचे हे विधान म्हणजेच या लेखसंग्रहाचे मुख्य सूत्र आहे. व्यक्तिगत जीवनाविषयीची (जन्म तारीख,नाव, आडनाव बदलण्याची) हकीकत सांगतानाच त्याच्या व्यक्तिमत्वाला चिकटून बसलेली हतबलता, दुर्बलता, परिस्थितीशरणता अधोरेखित होत जाते. कौटुंबिक ओढग्रस्ती, दारिद्र्य या समस्यांबरोबरच त्याला पडणारी भीतीदायक अन अस्वस्थ करणारी स्वप्न, बांडगुळासारखं व्यक्तीमत्वाला चिकटून राहिलेलं भेदरलेपण, वयपरत्वे होणारे

शारिरीक बदल व त्यातून निर्माण होणाऱ्या शारीर जाणिवा, पौगंडावस्थेतील नवतारुण्याच्या नवथर जाणिवा, या वयातील काही गोष्टींची अनभिज्ञता तर काही गोष्टींविषयीची अनावर ओढ याचे दिलखुलास आणि प्रांजळ कथन केले आहे. स्वप्न व वास्तव यामधील विपरीत ताणही अनेक ठिकाणी व्यक्त झालेला दिसतो. परिस्थितीशी व स्वतःशी चाललेला आंतरिक संघर्ष नेमक्या शब्दात व्यक्त केला आहे.

कौटुंबिक ताणताणाव तसेच आर्थिक ओढग्रस्तीशी सामना करताना आईची होणारी दमछाक पाहून हळहळणारा दीडदमडीना, शिक्षकांना घाबरणारा, परीक्षेला घाबरणारा, टीसीला घाबरणारा दीडदमडीना कोणताच साहस करू धजावत नाही. करतो ते एकाच बंड ते म्हणजे वडिलांचा पिढीजात शिवणकामाचा, दर्जीपणाचा धंदा न करण्याच बंड. त्याऐवजी घरात कधीही कुणीही न उचललेली लेखणी मनापासून व्यक्त होण्यासाठी उचलतो. मनातला साचलेला कोलाहल व्यक्त करण्यासाठी त्याला एक सृजनशील साधन सापडतं. हे सारं सहजासहजी घडत नाही, त्यासाठी त्याने केलेला संघर्ष वाचकांच्या मनाला भिडल्याशिवाय राहत नाही. वर्जेशच्या कवितेची निर्मितीप्रक्रिया, त्याच्यावर असलेला मान्यवर कवींचा प्रभाव, काव्यलेखनाच्या उमेदीच्या काळात थोरामोठ्यांकडून मिळालेला नकार याविषयी कडवट भावना न ठेवता सत्यकथन केलेले आहे.

'मृत्यू' हा घटक ठळकपणे या लेखांमधून आलेला दिसतो. मग तो अंगणात लावलेल्या बाटली आंब्याच्या झाडाचा असो कि वडील, आजी, मामा या कौटुंबिक व्यक्तींचा असो किंवा पप्पू, अय्यर, बाफना या मित्रांचा असो किंवा ट्रेनमधील सहप्रवाशाचा असो, या मृत्यूंच्या वर्णनातून दीडदमडीनाचा हळवा अन संवेदनशील स्वभाव दिसून येतो. 'काळ' हातातून निसटत चालल्याची कातर जाणीव त्याच्या लेखनातून व्यक्त होते. हे मृत्यूचे दर्शन दीडदमडीनाला (वर्जेशला) जसे अंतर्मुख करते तसेच ते वाचकालाही अस्वस्थ करते. या संग्रहातील काही प्रसंग उदा. - उंदराने बूट कुरतडणे, मित्राने दिलेले जुने बूट नव्या आनंदाने घालून जाताना ट्रेन मधून पडणे, बहिणीच्या लग्नासाठी पै पै जमवणे हे सारेच प्रसंग त्याच्या 'दुष्काळात तेराव्या महिन्याची' अनुभूती देतात. तसेच यातील आई, वडील, मावशी, आजी, पप्पू यासारख्या व्यक्तिरेखा मनात घर करून बसतात.

या लेखांमधून वसई, विरार- आगाशी परिसराचे प्रादेशिक, सांस्कृतिक पर्यावरण जसे यात टिपले आहे तसेच ख्रिस्ती जीवनाचा प्रभावही अनेक ठिकाणी व्यक्त झालेला दिसतो. तसेच महानगरीय गतिशील जीवनाचे संदर्भही स्वाभाविकपणे अधोरेखित झाले आहेत. प्रवास व रेल्वेतील धावते विश्व व प्रवास यांचेही उत्कट चित्रण केले आहे. महानगरीय जीवन व आगाशी सारख्या निमशहरी भागात जगताना, दोहोंची सांगड घालतानाची त्रेधा नेमकेपणाने व्यक्त केली आहे.

या लेखसंग्रहाची भाषाशैली वैशिष्ट्यपूर्ण आहे. हिंदी, गुजराथी,व मराठी भाषेची योजना यात केली आहे. वर्जेश मुळचा गुजराथी भाषिक असल्यामुळे काही ठिकाणी ती अपरिहार्यपणे योजली आहे. शाळकरी विश्व, कॉलेज विश्व, रेल्वेतील वैविध्यपूर्ण विश्व साकारताना बम्बैय्या टपोरी भाषेचा केलेला संयुक्तिक वापर (काहीशी द्वयर्थी व लैंगिक स्वरुपाची) व काही ठिकाणी 'घाबरीगांड, तितरबितर, गौतम गंभीर' अशा शब्दातून स्वतःविषयीचे दुबळेपण व्यक्त केले आहे. 'काळजी-कलेजी' ‘गौतम-गोविंदा, गौतम-गंभीर या सारख्या शब्दांची वेगळयाच अर्थाने केलेली योजना निवेदनाला नक्कीच ताजेपणा देते. तरुणपिढीच्या मानसिकतेचा

प्रत्यय देणारी हि भाषाशैली या लेखसंग्रहाचे वैशिष्ट्य आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. या संग्रहातील निवेदनशैलीवर, भाषाशैलीवर वर्जेशच्या कवितेचा ठसा काही अंशी जाणवतो. उदा.- 'किशनघवालाजोशीजगतापअय्यंगार' अशा रचनेतून त्याला जाणवलेले वैयर्थ प्रभावीपणे व जोरकसपणे नोंदवले आहे त्यामुळे हे लेख म्हणजे वर्जेशची कविताच वाचत असल्याचा भास होतो.

माझी कविता हेच माझे आत्मचरित्र असे म्हणणाऱ्या वर्जेशचा दीडदमडीना हा लेखसंग्रह वाचतानाही आपण वर्जेशच्या कविताच वाचत असल्याचा प्रत्यय येतो, इतकी तरल व संवेदनशील भाषाशैली हे या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सुरुवातीच्या काळातील वर्जेशच्या दुबळया व्यक्तिमत्वाशी संवादी असणारे शीर्षक, नंतरच्या काळातील कवी म्हणून प्रसिद्ध झालेल्या, घराच्या व स्वतःच्या उत्कर्षासाठी झटणाऱ्या वर्जेशच्या व्यक्तिमत्वाशी विसंगत वाटू लागते. स्वतःकडे कायमच न्यूनत्व घेऊन मनाचा मोठेपणा व संवेदनशिलतेमुळे तो लाखात एक असल्याचा प्रत्यय येतो. या विपरीत ताणामुळेच दीडदमडीना हे शीर्षक अधिक परिणामकारक व अर्थपूर्ण वाटू लागते. या लेखसंग्रहाचे मुखपृष्ठही उल्लेखनीय असे आहे.

या मुखपृष्ठात एका पत्र्याच्या दाराच्या दोन झडपा दाखवल्या आहेत एक झडप गंजलेली, हलाखीच्या अवस्थेतील तर दुसरी झडप डागडुजी केलेली, त्यातल्या त्यात रंगरंगोटी करून नव्याने जगू पाहणारी, सुधारित आवृत्ती असल्यासारखी दिसते. या मुखपृष्ठातून दीडदमडीनाच्या आयुष्यातील पडझडीची व प्रगतीची, सकारात्मक बदलाची स्थिती व्यक्त करणारे, लेखाच्या आशयाशी व शीर्षकाशी संवादी असणारे नितीन दादरावाला यांचे मुखपृष्ठ उल्लेखनीय आहे. एका बैठकीत हे पुस्तक वाचून होते, आणखी काही हवे होते ही अतृप्तीची जाणीव शेवटी उरून राहते, कदाचित 'दीडदमडीना' -२ विषयीचे सुतोवाच तर लेखकाला सुचवायचं नसेल ना!

परीक्षण - नेहा किशोर सावंत

६०३, गोदावरी,रिव्हर पार्क, रावळपाडा, दहिसर पूर्व , मुंबई ६८ nehasawant003@yahoo.co.in

'दीडदमडीना- लेखक वर्जेश सोलंकी पृष्ठ संख्या - १०३, किंमत-१३० रुपये प्रकाशक -लोक वाङ्मयगृह

# कावड

■ जॉन गोन्सालवीस, उमराळे

कावड म्हणजे हातावर कमावून पानावर खाणाऱ्या कष्टकरी जनतेचा क्रुसच. कावड म्हणजे श्रमिकांचे वाहन. कावड म्हणजे शेशेतकऱ्यांच्या श्रमाचे प्रतीक. कावड म्हणजे मातीशी इमान राखणा-या, मातीशी नाते सांगणाऱ्या श्रमजीवी व्यक्तींचे निशाण.

पाच-सहा फूट लांबीची बांबूची जाडशी चिब (बांबूची कांब) घेऊन त्याला दोन्ही बाजूस दोऱ्या किंवा मोठे शिंके बांधले की झाली कावड तयार. कावडीचा मंत्र होता - सतत चालतच रहा... सदैव कष्ट करीत रहा... सतत ओझे वाहत राहा. शिंकामधील ओझीच्या वजनाने कावडीची कांब (आड) स्प्रिंगसारखी वरखाली होत असते. त्यामुळे कांबीचा येणाऱ्या करऽऽ करऽऽ आवाजातून श्रमाचे एक गीत गाईले जाते. एकेक पाऊल पुढे चालत राहा... त्या तालातच श्रमाचे संगीत होते. त्या श्रमाच्या तालातच एक नाद होता गतीचा... त्यातून निढळाचा घाम गाळला जात होता...

शास्त्रीय परिभाषेत कावड म्हणजे एक तरफच ! दोन्ही बाजूस वजन, मध्ये टेकू किंवा शक्ती. कावडीच्या साधनात शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ ठरत होती. कोणताही इसम आपल्या वजनाच्या दुप्पट-तिप्पट वजन कावडीच्या साहाय्याने लीलया वाहून नेत असे. सपाट मैदानी रस्ता असो वा डोंगरदरी, कडेकपारी असो व पठार, माळरान असो वा वाकडीतिकडी पाऊलवाट असो, त्यामधून कावडधारक आपली ओझी आपल्या इप्सीत स्थळी सुखरूप नेत असे.

आमच्या गावातील पासवाले, भाजीवाले या कावडीच्या जीवावर आपला गाव सोडून भाजीपाला, दूध, केळी विकण्यासाठी मुंबईसारख्या शहरात जायचे. गल्लीबोळातून, नाक्यानाक्यावर, दारादारावर मुंबईसारख्या शहरात फिरायचे. 'दूध घ्या दूधऽऽ', 'भाजीवालाऽऽ' अशा जोरजोराने आरोळया ठोकायचे. त्यामधून त्यांना मिळणाऱ्या कमाईवर आपल्या कच्चाबच्च्यांना खाऊ आणायचे. आपली चूल पेटती ठेवायचे... निढळाच्या घामाची भाकर मिळवायचे... त्या भाकरीला श्रमाचा गंध होता. स्वत:च्या कमाईने खाल्लेल्या अन्नाची चव काय न्यारीच ! या कावडधारी मनुष्यालाच मुंबईला 'वसईवाला' हे नामाभिधान मिळाले होते. 'ए वसईवाल्या, कसली आहे रे ?...', 'अरे वसईवाल्या, वेलचीची केळी कशी दिली रे?', 'अरे गाववाल्या, खूप पैसे सांगतोस तू.' असे गि-हाईकांचे बोल त्यांच्या कानी पडायचे.

तू 'वसईवाला' कावडीतून गि-हाईकांची तहान भागविण्यासाठी तासलेली कोवळी शहाळी न्यायचा. एखादा वसईवाला गि-हाईकाकडे पाहून मोडक्या तोडक्या भाषेत गमतीने जोराने म्हणायचा, "मिस्टर अँड सिस्टर, गुड मॉर्निंग. आंडु गुंडु थंडा पानी ! बिमार आदमी को नारियल का पानी !" भाषा किती शुद्ध-अशुद्ध याचा तो कधी विचार करायचा नाही. आपल्या गि-हाईकास ताजा, चोख माल द्यायचा हीच त्याची प्रामाणिक भावना होती. गि-हाईक म्हणजे त्यामुळे वसईवाला म्हणजे विश्वासु, इमानी, साधाभोळा, भला माणूस अशी त्याची

प्रतिमा निर्माण झाली होती. लोकांत देखील ‘हा आपल्याला कधी फसवणार नाही, पैसे रोख घेणार, मला चोख देणार, अशी भावना निर्माण झाली होती.

याच कावडीत तो कधी ताजे ताजे लांबसडक शिराळे-गलके, गोल गोल दुधी-भोपळे, हिरवागार भाजीपाला, कोवळी कोवळी शहाळी, केळफूल, गवार, भेंडी, शेवज्याच्या शेंगा, काळी कुळकुळीत वांगी, वालपापडी, मेथी-चवळी, कोथींबिरीच्या जुडया हारीने लावायचा, तर कधी टोपली अळूची पानं, केळीची पानं, हळदीची पानं यांनी सजवायचा.

अंगात केळीचे डाग लागलेले धोतर. त्यावर तोकडया बाहमाचाखमीस, त्यावर कब्जी चढवलेली, कब्जीला वर-खाली-आत पैसे, रूमाल ठेवण्यासाठी केलेले मोठ्ठाले खिसे, डोक्यावर काळी किंवा लाल टोपी, कानात भिखबाळी, ब-याचदा अनवाणीच, जर कदाचित पायात वहाणा असल्या तरी त्याचा अंगठा, वादी तुटलेली… असा असायचा वेष कावडवाल्याचा.

भाजीवाल्यापेक्षा दुधवाल्याचा दिमाख भारी असायचा. त्याचे कपडे भाजीवाल्यापेक्षा स्वच्छ असायचे. चार बुकं शिकलेला. थोडफार लिहिता वाचता येणारा. कब्जीच्या एका खिशात साखळीचे घडयाळ अडकवलेले, दुस-या खिशात घाम पुसण्यासाठी रूमाल असायचा. कावडीच्या दोन्ही बाजूला दुधाने भरलेले पितळीचे चकचकीत हंडे. ती तर त्याची खरी संपत्ती. आपल्या दुधाच्या शुद्धतेबद्दल त्याला भारी अभिमान. म्हणून एखादा दुधवाला मोठया फुशारकीने म्हणायचा, ‘माआ भयसा दूध नूसता गंधाआ टिळा…’ (माझ्या म्हैशीचे दूध म्हणजे गंधाचा टिळा). पुढे महागाई वाढली. गाई गुरांचा पेंढा, चारा, पेंड, खुराक खूप महाग झाला. गुरांच्या किमतीसुद्धा भयंकर वाढल्या. पूर्वीच्याच भावात निर्भेळ दूध गि-हाईकाला देणे दुधवाल्यास परवडेनासे झाले. मग त्याने आपल्या मदतीला घरामागील विहिरीचे पाणी घेतले. पातळ दूध बघून गि-हाईक तक्रार करू लागल्यावर दूधवाला गि-हाईकाला समजावण्याचा सुरात म्हणायचा, ‘दूध पातळ होणार नाही तर काय? म्हैस पाण्यात बसते ना”

या कावडीचे नाते खूप खूप जुने वाटते. लहानपणी शाळेत गुरूजींनी रामायणातील सांगितलेल्या श्रावण बाळाची गोष्ट मनात घर करून राहिलेली आहे. कावडीच्या एका पारडयात वृद्ध पित्याला घेऊन श्रावणबाळ आईवडिलांची कावड खांद्यावर घेऊन काशीच्या तीर्थयात्रेला निघाला होता. श्रावणबाळाच्या कथेने कावडीला अजरामर करून टाकले आहे. युवदर्शन एकांकिका स्पर्धेत एका युवक संघटनेने एक वगनाट्य सादर केले होते. त्यात गोलाकार नाचणा-या बाल्यांचे बोल आठवत आहेत -

श्रावणबाळ जातो कशाला… जातो कशाला…

मातापित्याचा कावड खांद्याला… कावड खांद्याला…

या कावडीचे नाते ‘जनी जर्नादन’ हेच जीवनसूत्र मानणा-या संत एकनाथांशीही जुळते. संत एकनाथांविषयी अशी कथा सांगतात की, काशीहून पवित्र गंगाजळाने वाहून आणलेली कावड रामेश्वराला पोहचवण्यापूर्वीच

वाटेत वाळवंटात तहानेने तडफडणा-या गाढवाच्या मुखात त्यांनी गंगेची कावड रिकामी केली. परोपकराचा इतिहास या कावडीच्या पाठीमागे आहे.

हायस्कूलची शाळा सकाळची होती. दुपारी एक वाजता घरी यायचो. घरी आल्यावर जेवण झाल्यावर आमचा चमू खेळण्यासाठी, पोहण्यासाठी जात असे. त्यावेळी अन्नधान्याची खूप टंचाई होती. 'मिलो' खाऊन लोक जगत होते. 'आज रेशनला धान्य आलेले आहे,' ही बातमी मिळण्याचा अवकाश. दोन-तीन घास घशात ढकलत, शाळेच्या गणवेशात रेशन आणायला धूम ठोकावी लागे. सोबत रेशनिंग कार्ड आणि आईने बटव्यामधून काढून दिलेली नोट. काळी कुळकुळीत झालेली, अनेक ठिकाणी घडया घातलेली. दप्तरामधील वहया-पुस्तके गोणपाटावर भिरकावून दप्तराचीच कापडी पिशवी रेशन आणण्यासाठी वापरली जायची, प्लस्टिकच्या पिशव्यांचा तो जमाना नव्हता. दुकान साडेतीन वाजता उघडायचं. रांग मात्र दीड-दोन वाजल्यापासूनच लगायची. उन्हाचा तडाखा खात, कपाळावर ओघळणारा घाम शर्टाच्या बाह्याने पुसत, मुंगीच्या गतीने पुढे सरकत जाणा-या रांगेने पुढे पुढे सरकत जायचं. याचवेळी आजूबाजूच्या परिसराचे चिमणडोळ्याने निरीक्षण करत जायचं जोपर्यंत आपला नंबर येत नाही तोपर्यंत. यावेळी सर्वांचे लक्ष वेधून घेत असे एक कावडवाला.

रेशन दुकानाच्या बाजूला एक तलाव होता. त्या तलावाच्या बाजुला बोर्डाची विहीर होती. त्या विहीरीवर पाणी भरण्यासाठी आजूबाजूच्या परिसरामधील बाय कळशा, घागरी, हंडे घेऊन येत. या सर्वांत उठून दिसे तो एक बाप्या माणूस. गुडघ्यापर्यंत दादा कोंडके स्टाईल तुमान घातलेला. हवा आत-बाहेर जाण्यासाठी हलाखीच्या परिस्थितीमुळे भोके पडलेली बनियान. खांद्यावर एक फडका व त्यावर पाण्याने भरलेली बोजड कावड. घराघरात हाच मनुष्य पाणी भरण्याचे काम करीत होता. त्याच्या कामाचा मोबदला म्हणून त्याला काही पैसे मिळत असतील. त्या पैशाशी आम्हाला काही घेणेदेणे नव्हते. पाण्याने भरलेली डब्याची कावड तो इतक्या सहजतेने वाहून नेत असे की, त्याच्याकडे सतत बघतच राहावेसे वाटे. हेलकावे खाणारे डबे...त्यामधील डुचमळत उडणारे पाणी...घामाने नखशिखांत भिजलेला डबेवाला उर्फ कावडवाला... रस्त्यावर धबऽऽधबऽऽ आपटणारे त्याचे ओले पाय तो जसाजसा पुढे जात असे तसतसे डब्यामधून पाणी रस्त्यावर धारेने पडत असे. क्षणाच्या अवधीनंतर सूर्याच्या प्रखर तेजाने ती नक्षी नाहीसी होत असे. तो पाणी वाहून नेणारा कावडवाला पाहिल्यावर मला नाथाघरी पाणी भरणारा श्रीखंड्या आठवत असे.

रेशनच्या रांगेत तासन् तास ताटकळत उभे असलेल्या एखाद्या शाळकरी मुलाला उन्हाची तिरीप लागून जर चक्कर आली तर तो कावडवाला आपली कावड तेथेच उतरवून मागचा पुढचा विचार न करता ओंजळीने पाणी प्यायला देत असे. पाण्याला धर्म नसतो. असलाच तर तो म्हणजे तहानलेल्याची तहान भागविणे याची प्रचीती मला त्या कावडवाल्याच्या वागण्यातून दिसून यायची.

या कावडीबद्दल मला खूप अभिमान वाटतो. ज्या ज्या व्यक्तींचा पिंड या कावडीवरील कमाईवर पोसला गेलेला आहे, त्यापैकी मी एक आहे म्हणून कावड म्हटली की बाबा डोळयांसमोर ऊभे राहतात आणि बाबा म्हटले की कावडीचं चित्र डोळयांसमोर उभे ठाकले जाते. कावड म्हणजे बाबांची संपत्ती होती. बाबांना वारसहक्काने

मिळालेली स्थावर-जंगम मालमत्ता होती. कावड म्हणजे आमच्या घरामधील एक न बोलणारी परंतु खूप काही काम करणारी अशी एक अविभाज्य व्यक्तीच बनून राहिली होती. बाबांनी आयुष्यभर कावड वाहिली म्हणून मला कावड वाहण्याचे परिश्रम करावे लागले नाहीत. बाबांनी कावड वाहिली... आम्हां भावंडांना शिकवले म्हणून आमच्या खांद्यावरची कावड गेली... बाबांनी कावड वाहिली... आम्हां भावंडांना शिकवले म्हणून आमच्या खांद्यावरची कावड गेली... बाबांनी जर माझं नाव शाळेत दाखल केलंच नसतं तर माझ्या खांद्यावर वारसा हक्काने कावड आली असती...

माल विकल्यावर बाबा जेव्हा रिकाम्या कावडीवर आम्हा भावंडांच्या उडया पाडायच्या... खरं म्हणजे आमच्यासाठी ती अलीबाबाची गुहाच ठरायची. टोपलीच्या आत 'बार्दाने' असायची. त्यात एक कापडी पिशवी असायची. बार्दानाच्या गाठी सोडल्यावर कापडी पिशवीमधील खाऊ खाण्यात आम्ही भावंडे दंग व्हायचो. कधी कधी त्यावरून भांडणदेखील व्हायचे. 'आधी मला... आधी मला...', 'मला कमी का?', 'मला जास्त दे,' असा गलका व्हायचा. त्यात कधी ताजी, कुरकुरीत भावनगरी, कधी गरमागरम भजी, तर कधी हंगामाप्रमाणे बाबांच्या खिशाला परवडतील अशी केळी, आंबे, पेरू, बोरंही फळेदेखील असायची.

दिवाळीच्या सुटीत तर आमची चंगळच असायची. त्या कळाात आताच्या एवढी महागाई नव्हती. त्यामुळेही असेल परंतु बाबांची गि-हाईक खूप दिलदार मनाची होती. प्रत्येक दिवाळीच्या सणासुदीला त्यांच्या घरी बनवलेला खाऊचा पुडा न चुकता द्यायचे. त्यात रवा-बेसनचे लाडू, गोलगोल चकल्या, कातरलेल्या करंज्या, शंकरपाळया, खोबरे-शेंगदाणे घालून तयार केलेला पोहयाचा चिवडा, मिठाई असे जिन्नस म्हणजे आमच्यासाठी सुकामेवाच होता. पंचपक्वान्नांचा सण यायला हवा होता. असे आमच्या बालसुलभ मनाला त्यावेळी वाटायचे.

बाबांच्या गि-हाईकांना मी कधीच पाहिले नव्हते परंतु त्यांनी आम्हासाठी पाठविलेल्या खाऊचा आस्वाद घेताना त्यांचे न पाहिलेले दिलदार चेहरे माझ्या नजरेसमोरून अजूनही जात नाहीत. आई मात्र त्याचवेळी त्या न पाहिलेल्या गि-हाईकांसाठी 'मावले-सायबेनी, माझ्या पोरांसाठी खाऊ पाठवणा-या सायबांना व त्यांच्या पोराबाळाना तू सूखी ठेव,' अशी हात जोडून प्रार्थना करायची.

कावड म्हणजे कष्टक-यांचा आधारवड... श्रमजीवी वर्गाच्या संस्कृतीचे प्रतीक... कावडीशी नातं म्हणजे माणसाचं मातीशी असलेलं नातं... माणसाचा श्रमाशी असलेला जिव्हाळा... तहानलेल्यांना पाणी पाजण्याचं नातं... परोपकाराशी नातं... संत एकनाथांच्या जातकुळी नातं...!

# ख्रिसमसच्या आधी पोस्ट करा !

■ पास्कल रॉक लोपीस , माणिकपूर –वसई. इतिहासकार आणि नाणेसंशोधक


सण-समारंभावेळी आपले मित्र-नातेवाईक यांना भेटून शुभेच्छा देणं हे प्राचीन काळापासून आपल्याकडे चालत आलय. वेगवेगळ्या देशांमध्ये शुभेच्छा देण्याची पद्धत स्वतंत्र आणि वेगवेगळी आहे. परंतु संपूर्ण जगात नवीन वर्षाचे स्वागत हे भेटून आणि एखादा उत्सव असल्यासारखा साजरा करण्यात येतो आणि त्याचबरोबर त्याच्याआधी येणारा ख्रिसमस हा सणही मोठ्या उत्साहात अख्ख्या जगात साजरा केला जातो. एकाच आठवड्यात हे दोन्ही सण येत असल्याने आठवडाभर मेसेजेस आणि शुभेच्छांना पूर आलेला असतो.

आजकाल अनेक नातेवाइक किंवा मित्रमंडळी आपल्या आजूबाजूलाच असतात. परंतु जेव्हा ते लांब असायचे तेव्हा अनेक वर्षांपूर्वी शुभेच्छांसाठी पोस्टल मेल पाठवणे हाच एक पर्याय होता आणि आता जरी तंत्रज्ञान बदलत असले, फेसबुक, ईमेल, व्हाटसअॅप आले असले तरी ख्रिसमसच्या शुभेच्छा या गोड खाऊ आणि भेटवस्तूंबरोबर पोस्टानेच पाठवल्या जातात.  या सणाच्या वेळी पोस्ट ऑफीस भरपूर पार्सलनी तुडुंब भरलेलं असतं. त्यामुळे ख्रिसमसच्या आधीच पोस्ट करुन ते वेळेत मिळण शहाणपणाचं ठरत. या गेल्या काही काळापासून पोस्ट ऑफीसने स्पीड पोस्ट नावाने एक विशेष सेवा सुरु केली आहे. याचे वेगळे २५ रुपये जास्त आणि वजनाप्रमाणे पैसे भरावे लागतात. पोस्टऑफिस या काळात ख्रिसमसचे चित्र असलेले २५ रुपये किंमत असलेले स्टँप चलनात आणतं. यामुळे पोस्टऑफिसला देखील ख्रिसमसचे पार्सल स्पीडपोस्ट करण्यासाठी त्यावर लावून वेळेत पोचवण सोयीच पडतं.

भारतीय डाक व्यवस्थेने २०१६ च्या डिसेंबरमध्ये ख्रिसमस स्टँप चलनात आणले आणि याचा वापर ख्रिसमस मेल मध्ये सांताक्लॉजच्या एका अनोख्या चित्राबरोबर करण्यात आला. वय माहिती नसलेला, पांढरी मोठी दाढी वाढवलेला, लाल रंगाचे कपडे घातलेला, सगळ्यांना भेटवस्तू वाटत फिरणारा सांता या सणापासून वेगळा करुच शकत नाही. प्रख्यात कवी क्लेमेंट मूर यांनी त्यांच्या 'संत निकोलस' कवितेतील सांताचे हुबेहुब चित्र १८२२ मध्ये साकारले. त्यानंतर ते घराघरांत प्रसिद्ध झाले. रेनडिअरची जोडी बर्फात लहान मुलांसाठी भेटवस्तू घेऊन जाताना, सांताक्लॉज, रंगीबेरंगी दिव्यांनी नटलेली घरं, ख्रिसमस बेल, गिफ्टसनी सजवलेले ख्रिसमसचे झाड इत्यादी गोष्टी स्टँपवर आपल्याला दिसून येतात. 'मेरी ख्रिसमस' लिहिलेला दुसरा स्टँप भारतीय डाक व्यवस्थेने २००८ च्या डिसेंबर मध्ये चलनात आणला. त्याच्यावर तारका, मेंढ्या, मेरी आणि लहान जिझस यांचे चित्र होते. या संपूर्ण गोष्टीमागे एकच उद्देश होता ते म्हणजे ख्रिसमसच्या भेटवस्तूंचे योग्य पद्धतीने वर्गीकरण आणि त्या वेळेत ख्रिसमसच्या आधी पोचणे.




अगदी आजही ख्रिसमस मेल वेळेवर पोचण्यासाठी अनेक देशांमध्ये स्काउटमधल्या मुला मुलींना फक्त याच काळात सेवा करण्याची परवानगी मिळते. ख्रिसमस मेल योग्य त्या भागात वेळेत पोचण्यासाठी स्काउट काही स्थानिक गट तयार करतं. यामुळे स्काउटला आर्थिक मदत मिळण शक्य होतं. त्याचबरोबर या काळात कामामध्ये व्यवस्थितपणा व सुसूत्रता यावी यासाठी स्काउटला स्वत: चे स्टँप वापरण्याची परवानगी असते.




आधीच्या काळात जेव्हा विशेषकरून स्पीडपोस्ट सेवा नव्हती तेव्हा स्टँपवर एक कार्बन मार्क लावण्यात येत असे , ज्याने हे ख्रिसमससाठी आहे हे समजण्यात येई आणि प्राधान्यक्रम देऊन ते आधी पाठवण्यात येई. ब्रिटिश रॉयल पोस्टने 'Post Early For Christmas' असं लिहून स्टँप वर कॅन्सलेशन मार्क देण्यास सुरुवात केली. याचा उद्देश लोकांमध्ये जागरुकता आणि वेळेवर येणार पोस्टल विभागावर ओझे टाळणे हा होता.




ब्रिटिश आणि पोर्तुगीजांच्या काळापासून किंवा आत्ताही काही गावांमध्ये पाहत आलेलो मनोरंजक गोष्ट म्हणजे धावता पोस्टमन. जेव्हा वाहनांचा शोध लागलेला नव्हता, तंत्रज्ञान विकसित झालेलं नव्हतं त्यावेळी या धावत्या पोस्टमनची संकल्पना अस्तित्वात आली. किती अंतर कापले आणि पत्रांचे वजन यावर शुल्क ठरवण्यात येत असे. नंतर पोस्टल अधिकाऱ्यांनी रस्ते आणि रेल्वे झाल्यानंतर पोस्टमननी पळणे कसे निरर्थक आहे हे सांगण्यास सुरुवात केली. त्यामुळे आता ते देशातील अतिदुर्गम प्रदेशातच अस्तित्वात आहेत. त्यावेळी त्यांना वाटेत येणारे धोके, त्रास, अडथळे दूर करत जंगलातून, भूप्रदेशातून, वाळवंटातून पत्रे इकडची तिकडे न्यावी




लागत. या सगळ्यात कधी त्यांना जंगली प्राण्यांचा सामना करावा लागेल तर कधी बंदी होऊन आपला जीव धोक्यात घालवावा लागे. संध्याकाळ झाल्यावर त्यांना दिसण्यासाठी, प्राण्यांना घाबरवण्यासाठी आणी पत्र वेळेवर पोचवण्यासाठी कंदील लावावा लागे. अनेकदा या पोस्टमनना वाघाने खाल्ल्याच्या, नदीच्या पात्रात बुडाल्याच्या, विषारी सापांनी चावल्याच्या, हिमस्खलनमध्ये पुरल्याच्या, चोरांनी मारल्याच्या अनेक घटना आहेत. जेव्हा इंटरनेट नव्हतं, रस्ते नव्हते तेव्हा एका हातात भाला चालवत, एका हातात कंदील धरुन, पाठीमागे पोस्टल मेलची बॅग अडकवून ह्या शुभेच्छा, पत्र पोचवण्यासाठी लांब लांब दूरदूरपर्यंत हे पळत जात असत.

आपल्या शुभेच्छा , भेटवस्तू , पत्र वेळेत पाठवण्यासाठी ख्रिसमसच्या आधीच पोस्ट करा.

# लिहितो आहे...... --- फेलिक्स डिसोझा

*भुईगाव , वसई  येथील कवी फेलिक्स डिसोजा यांना साहित्य अकादमी, दिल्लीतर्फे आसाम, डिब्रुगड येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय कविता महोत्सवात निमंत्रीत कवी म्हणून सहभागी होण्याचा मान मिळाला. देशातल्या २२ भाषांतील तरूण कवी या महोत्सवात सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून कवी फेलिक्स डिसोजा यांनी या महोत्सवात मराठी भाषेचे प्रतिनिधीत्व केले. या महोत्सवात त्यांनी माझी साहित्यिक प्रेरणा या विषयावर मांडलेले विचार...*

साहित्यासंदर्भात मी कवितेच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठीतले कवी अरुण काळे यांच्या कवितेतील ही ओळ मला विलक्षण आवडते ती ओळ अशी आहे, 'कोणी अक्षर सुधारण्यासाठी कविता लिहीत नाही'... जेव्हा जेव्हा मी माझ्या कवी असण्यासंदर्भात विचार करतो तेव्हा तेव्हा मला या ओळीची आठवण होते, का लिहितो मी कविता या प्रश्नाचं साधं सरळ उत्तर माझ्याकडे नाहीए किंवा त्याचं उत्तरच नाहीए असंही म्हणता येऊ शकतं... पण आपण प्रश्नाच्या मागे लागलो आणि त्याचा तळ धुंडाळत राहिलो तर काहीएक विचारमंथन होतंच असते... आणि ही विचारप्रक्रिया म्हणजे कवी असण्याचा घेतलेला शोध आहे असे मला वाटते... हा शोध नेमका नसतोच मात्र या प्रक्रियेत काही ना काही गवसतेच. माझ्या साहित्यिक प्रेरणा शोधताना माझा भुतकाळ आणि वर्तमानकाळ माझ्या डोळ्यासमोर उभा ठाकला आहे, माझं बालपण म्हणजे साधारणतः मी शालेय शिक्षण घेत होतो तेव्हा मी गावात राहत होतो आणि जेव्हा मी कविता वगैरे लिहू लागलो तेव्हा तेव्हा मी त्या ठिकाणीच राहत होतो पण ते गाव पुर्वीचं गाव नव्हतं, बरच बदललं होतं. बरंच म्हणजे सगळंच... खूप काही डोळ्यादेखत निघून जात होतं. संपत होतं... ढासळत होतं... अडगळीचं वाटणारं खूप साहित्य, सामान माणसासह घराबाहेर पडत होतं, नवं, चकचकीत,  मोहवणारं, हवं हवंसं वाटणारं, टपकन पुढ्यात पडत होतं.. काळाच्या सीमेवर मी उभा होतो जेथून एका ठिकाणाहून गावातल्या बायांनी एकटेपणात गायलेल्या ओवी ऐकू शकत होतो आणि दुस-या ठिकाणाहून वाढत जाणारा गोंगाट आणि भाषेचा कलकलाट ऐकून वाढत जाणारा एकटेपणा ठळक होत होता... काळाचा वेग प्रचंड मोठा होता.. एक एक गोष्ट निसटत जाण्याचा वेग संथ असला तरी नवी गोष्टीचा हस्तक्षेप जीवनात धुमाकूळ घालत होता आणि खूप सारं बदलत गेलं. सण ,उत्सव साजरे करण्याच्या पद्धती बदलल्या, शेती नकोशी नि बिनफायद्याची म्हणून कष्टाची वाटू लागली, माणसाला राहण्यासाठी वडिलोपर्जित घरे अपूरी पडू लागली, घरासाठी झाडे कापली नि कुंडीत कॅक्टस वाढविण्याची फॅशन आली, केबलक्रांतीने मनोरंजनाचा धुमधडाका सुरू झाला, दोन भाऊ वेगवेगळया घरात राहू लागले, संवादाची सम विस्कटली, नात्यातला दुरावा वाढत गेला, शिक्षण वाढले आणि तरूणांना नवे नवे क्षेत्र खुणावू लागली, प्रचंड स्पर्धा वाढली, वेग वाढला, शहराच्या असोशीने गावातली माणसं शहराकडे धावू लागली, शहर गावात हात पाय पसरू लागलं... ज्याला समाज मान्यता नव्हती त्या गोष्टीना प्रतिष्ठा मिळू लागली, मूल्याची घुसळण झाली, चांगले वाईट याच्यातला फरक पुसला गेला, जे अधिक फायदेशीर ते अधिक चांगले अशी मूल्ये रूजविण्यात जाहिराती यशस्वी झाल्या, मानवी व्यवहार फायद्या तोट्याच्या तराजूत मोजले जाऊ लागले, त्यात नातेसंबंधही फायद्याच्या वजनावर तोलले जाऊ लागले. सगळयांसाठी विक्रेता आणि ग्राहक ह्या दोनच भूमिका शिल्लक राहिल्या... हे सगळं घडत होतं , हे सगळं  माझ्या काळात घडत होतं.. अनुभवत होतो. का कुणास ठाऊक कदाचित आईच्या

अधिक जवळ असल्यामुळे असेल ,मला मी बोलत असलेल्या भाषेचा, त्यातील गाण्याचं खूप आकर्षण आहे... गावात लग्न प्रसंगी जेव्हा बाया एकत्र येऊन गायच्या तेव्हा मी तेथेच बाजूला बसून ऐकत राहायचो.. मला त्या गाण्याची लय भारी वाटायची.. ती ऐकताना खूप हळवं झाल्यासारखं वाटायचं... खूप भरून यायचं. बायांची ही गाणी म्हणजे करूणामयी प्रार्थना वाटायच्या, विहिरीवर, तलावाकाठी, भाटात कुठे चार पाच बायका एकत्र दिसल्या की ते दृश्य मी पाहत राहायचो.. आईच्या वयाच्या या बाया, अशिक्षित, काही तिसरी चौथीपर्यंत शिकलेल्या.. एकमेकांना एकमेकींच्या खूप सांगायच्या... एकमेकांच ऐकून कधी एकमेकांना आधार देताना दिसायच्या, पदराने डोळ्याच्या कडा पुसताना दिसायच्या... हळूहळू बायांचं असं जमणं बंद झालं.. बाया आपल्या घरात एकट्या दिसू लागल्या, काळजी करीत… बाहेर गेलेले कधी घरी परततील याची वाट पाहत.

सार्वजनिक विहिरीची पडझड झाली, जातं गेलं, गिरणी आली आणि बायांच्या ओव्या थांबल्या... सणासुदीला ओव्याऐवजी नकोसा गोंगाट ऐकू येऊ लागला... बाहेरचा गोंगाटाला बिथरत बाया शांत झाल्या.. ही शांतता एकांतपणाची नव्हती तर जीवघेण्या एकटेपणाची होती... आपली बोली आईच्या मुकेपणाने शुष्क होत असलेली पाहिली... त्यातून वाहत येणारी करूणा आटली, प्रेम करण्याचं या भाषेचं कसब कमीकमी होत गेलं... हे पाहताना मन अस्वस्थ होत होतं, काहीतरी कायमचं तुटलंय याची जाणीव होत होती... हे तुटलंपण शोधत मी कवितेपर्यंत पोहोचलो... या भाषेतून वाहिलेल्या संस्कृतीच्या आत डोकावण्याचा माझा हा प्रयत्न आहे.. काहीतरी गवसतंय असं वाटतं म्हणून कवितेपाशीच रहावसं वाटतंय. या भाषेच्या आकुंचित होण्याने सांस्कृतिक मूल्यव्यवस्थेशी असलेला आपला संबंध तुटला. मागे पडत चाललेली लोकगाणी, लोककथा आणि आपल्या बोलीभाषेत संवाद साधण्यातला जिव्हाळा या भाषिक उलथापालथीत संपुष्टात आला. "हाऊ ओसा तळा" या वसईतल्या सामवेदी बोलीतील दंतकथेचे नाट्यरूपांतर करून आपल्या पुर्वजांच्या जीवनात डोकावण्याचा एक प्रयत्न मी केला होता. त्यातील माणसाचे नाते, सुखदुःख, कष्टाबद्दलची अपार श्रद्धा याचा आजच्या काळाशी अन्वयार्थ लावण्याचा तो प्रयत्न होता... त्यासाठी काही संशोधनात्मक काम करत असताना आपण सुबत्ता आणि समृद्धीच्या प्रदेशात आलो खरे पण आपलं म्हणून म्हणवलं जाईल ते खूप सारं गमावलं असल्याची जाणीव अस्वस्थ करणारी होती...

'देरे देवा माला आंगभर काम।

गोठ्याभर शेण देईवे माज्या।

या ओळीतून बाईचे कष्टाला दिलेली प्रतिष्ठा ,आपल्या कुंटुंबाप्रती असलेली निष्ठा पाहून या बायांच्या किबंहुना त्यांच्या संस्कृतीच्या आत डोकावून आपली पाळेमुळे ज्या मातीत रूजली आहेत त्याचा तळ धुंडाळण्याच्या गरजेने मला लिहिते केले, १० -२० वर्षातल्या बदलाचा भाषेवर, जीवनावर आणि मूल्यव्यवस्थेवर झालेल्या परिणामाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न मी केला आणि त्यातील निरीक्षणे माझ्या कवितेचा विषय झाली. आपण जे जे मागे टाकले आणि सुसह्यतेसाठी ज्या ज्या गोष्टी स्विकारल्या त्यातून आपला सांस्कृतिक पोत बदलला. याचा परिणाम जीवनाच्या सर्व क्षेत्रात अनाकलनीय बदल होण्यात झाला. मूल्ययवस्थेवरचा एक समाज म्हणून आपला ताबा सुटला आणि आपण आपल्याला सुचना देणा-या आणि त्याप्रमाणे वागवणा-या यंत्रणेच्या स्वाधीन झालो. त्याचा वेग इतका प्रचंड होता की आपण जिथे आहोत म्हणजे नेमके कुठे आहोत, जे चालले आहे आहे ते चांगले की वाईट हे समजण्याची क्षमता आपण हरवून बसलो.

त्यातून निर्माण झालेल्या जीवनपद्धतीतून नवे जग, जगाची नवी रित प्रस्थापित झाली. कमालीचा दिखाऊ झगमगाट, उन्मादी सेलिब्रेशनचा गोंगाट, 'मी' पणाचा भव्य मंडप, अधिकाधिक आणि लवकर श्रीमंतीसाठीचा दलाल आणि बिडरांचा सुळसुळाट, समाजकार्याला देणग्या देऊन गुन्हेगारीचं शुद्धीकरण, समाजसेवेचं नाटक करीत

राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याचा नवा फंडा, कलेचं बाजारीकरण, विचार आणि चिंतन यापासून पळालेला सामान्य माणूस, उथळपणाचा गवगवा, पोट धरून हसवणारं मनोरंजन या सर्वांतून वैचारीकदृष्ट्या आपण खुजे होत गेलो. घर, रोजगार, शिक्षण, गर्दी, रस्ते, हवा, पाणी, निसर्ग आदि सर्वंच प्रकारच्या समस्याच्या गर्तेत अडकलेले आपण गुंतले गेलो किंवा असे गुंतवून ठेवण्यात ही व्यापारी व्यवस्था कमालीची यशस्वी झाली. प्रत्येकाचं आयुष्य अधिकाधिक खाजगी, तुटलेलं, एकटेपणाने भरलेलं, जगण्यासाठीच्या जीवघेण्या संघर्षाने भरलं गेलं. त्यातून आलेली व्यस्तता आणि नैराश्यातून कमालीची नकारात्मक भावना समाजमनात दिसू लागली. त्यातून बेफिकीरपणा वाढून निष्क्रियता वाढीस लागली. कोणाचेही आले सरकार तरी आपल्या आयुष्यात पडणार नाही फरक असे म्हणत किंवा मला काय त्याचे म्हणत झगमटाने न्हाऊन निघण्यासाठी अधीर असलेला सामान्य माणूस समाजापासून, समाजबंधापासून तुटला गेला.. याचा परिणाम राजकारणाचे गुन्हेगारीकरण होण्यात झाला. त्यातून निर्माण झालेली सत्तास्थाने बेलगाम झाली. त्यातून निसर्गाचा हवा तसा वापर झाला, भ्रष्टाचाराला रान मोकळे झाले. सामान्य माणूस अधिकाधिक गर्तेत अडकला, त्याला कोणी वाली उरला नाही, त्यालाही कशाची पर्वा राहिली नाही. मनोरंजनात मश्गूल जनता झगमगाटाच्या स्वप्नवत दृश्याची आशेने वाट पाहत निष्क्रिय राहते. कोणीतरी तारणहार आपला उद्धार करण्यासाठी येईल या आशेत डोळ्यात प्राण आणून उद्धाराची वाट पाहते. या वातावरणात किफायतीशीर, फसव्या, स्वप्नवत जगाच्या जाहिराती करून सत्ता काबिज करता येऊ शकते. विरोधी लिहिणा-या, बोलणा-या विचारवंताचा गोळ्या घालून खून करता येतो, आरोपी कायमचे सुरक्षितपणे लपवता येतात, सनसनाटी निर्माण करून उन्मादी विजयोत्सवात जनतेला ढोल वाजवण्यात गुंतवता येते, वेदनेच्या, दुःखाच्या आवाजाला देशद्रोह म्हणता येते, चिकित्सा करणा-या महिला पत्रकारांना झुंडीने बलात्काराच्या धमक्या देऊन धमकावते येते, लेखकांना सुरक्षितेचं ढोंग रचून नजरकैदेत ठेवता येते, वेदनेनेने उमटणारा किंकाळीचा आवाज उन्मादी जल्लोषात पुसून टाकता येऊ शकतो.. असा हा विचारहीन, दिशाहीन मात्र भीतीचे आणि तणावाचे वातावरण शिल्लक राहिल म्हणून जाणीवपूर्वक घडवून आणलेल्या घटनाचा उन्मादी काळ आहे.

या सर्व वातावरणात कविता लिहीणे मला खूप अवघड काम वाटते. आव्हानच वाटतं. काय लिहावं आणि कोणासाठी हा प्रश्न निराशा निर्माण करतो. कविता ऐकण्या वाचण्याची शक्यता धूसर होत चाललीय. आपण आपल्या वैभवशाली मूल्यव्यवस्थेतून अतिशय आक्रमक आणि हिंसक अशा प्रदेशात आलो आहोत. या काळाचं निरीक्षण करीत आपली कवितांचा आशय विषय शोधणे जिकरीचे झाले आहे आणि तशातच लिहीण्याचा आवाज या कोलाहलात क्षीण झाला आहे. ह्या दिवशी लेखकाची लिहण्याची गरज शिल्लक राहणे फार आवश्यक आहे. आमचा गुजराती मित्र कवि पियुष ठक्कर यांच्या कवितासंग्रहाचे नाव आहे "लिखु छु" म्हणजेच लिहितो आहे.. लिहितो आहे या कृतीत मला एक आशा दिसते... या संभ्रमित आणि निराशा निर्माण करणा-या काळात तुर्तास ही आशा तरी टिकायला हवी... ही आशा लिहित्या माणसात टिकून राहायला हवी... आणि अरूण काळे यांनी म्हटलेच आहे, कोणी अक्षर सुधारण्यासाठी कविता लिहीत नाही.

# शहंशाह – सॅविन तुस्कानो, नंदाखाल

मी १० वर्षाचा होतो, माझेपण काका तेव्हा सगळया काका, भाऊ किंवा बाबा सारखे दुबईला होते, तेथून अकाई कंपनीचा वीडियो कॅसेट प्लेयर (VCP) घेऊन आले होते, त्यावेळी एक खूप मोठा पिक्चर रिलीज़ झाला होता त्याची कॅसेट आली होती, तो पिक्चर बजटनेपण मोठा होता आणि लांबीनेसुद्धा, त्यावेळी त्या पिक्चरच्या 2 कॅसेट आल्या होत्या कारण तो पिक्चर एक कॅसेटमध्ये मावत नव्हता, मी तो पिक्चर बघितला आणि मला अंगात आल्यासारखे झाले !

आमच्या थॉमसनचे मी जॅकेट घेऊन आलो, ते मला टाइट येत होते तरी मी घातले, केस शॉर्ट होते तरी ते थोडे डोळ्यापुढे आणले, परसदारी बेड्र्यामध्ये जाऊन दोर आणला आणि हाताला गुंडाळला आणि पप्पाना सांगितले, पप्पा माझा फोटो काढा. पप्पानी नाखुशीने फोटो काढला. मी आवाजामध्ये जोर आणत डायलॉग म्हणालो, "रिश्ते में तो हम तुम्हारे बाप होते हैं ... (लांब श्वास घेऊन) नाम हैं शहंशाह !!!" (परत लांब श्वास), अमिताभ बच्चन काय चीज आहे ते त्या दिवशी कळले.

अब्राहम मामा आणि बबन गुरूजी ह्यांच्या नाटकांची प्रॅक्टिस जवळून पहायला लागलो, पूर्ण नाटक पाठ होते मला.. मग नाटकात एक छोटासा रोल मिळाला. त्या नाटकाचे नाव होते, "बारा आने बाठली जाम काम". "दादे माला भूक लागले" हा डायलॉग त्यामधील "सांजवली झाली रात" या गाण्याचा पहिला अंतरा संपला की बोलायचे होते, तो मी अचूक बोलायचो. कौतुकाची थाप पाठीवर पडली आणि अंगात स्फुरण चढले. आपल्याला ह्या क्षेत्रातच काहीतरी करायचे आहे हे मनाने ठाणले. हे सर्व काही 'जाम भारी' आहे असे वाटले. त्यानंतर स्कूल, चर्च, युवदर्शन आणि गावातही एक सुद्धा एक्टिंग, डिरेक्टिंग संधी सोडली नाही, सगळया ठिकाणी काम करू लागलो.

एकदा टीव्हीवर 'सदमा' पिक्चर लागला होता, तो रात्री १२ वाजता संपला, मी त्यावेळी जोरात रडायला लागलो, मला तेव्हा कळले की पिक्चर असे पण संपू शकते, त्यानंतर डायरेक्टर काय ते कळले, नंतर आर्ट स्कूलमध्ये एडवरटायजिंग शिकलो, ॲड फील्म मेकिंगसाठी झेवियर्समध्ये फिल्म मेकिंग शिकलो, मुंबईतील चांगले मित्र मिळाले आणि आयुष्यभराचेआयुष्याचे स्ट्रगल सुरु झाले.

डॉक्टरच्या कामाला जसे प्रॅक्टिस म्हणतात, तसे फिल्म इंडस्ट्री मध्ये काम करतात त्याला स्ट्रगल म्हणतात आणि खरच १९९९ साली पहिली फिल्म डेंजर नावाची, असिस्टंट डायरेक्टर म्हणून मिळाली त्यावेळी कळलं की त्याला स्ट्रगल का म्हणतात. विरारने पहाटे ३.५३ ची ट्रेन पकडून वांद्र्याला उतरायचे, तिथल्या बस डेपोतून बस पकडून चेंबूरला RK स्टूडियोमध्ये ६ वाजता बरोबर पोहोचायचो, स्पॉट बॉय बरोबर चहा प्यायचा, मग त्या दिवशी काय शूट करायचे, ते शॉट्स प्लॅन करून त्याप्रमाणे प्रॉपर्टी अरेंज करून ठेवायची, सेट स्वच्छ करायचा, स्क्रिप्ट प्रिंट घेऊन एक्टरच्या वॅनमध्ये ठेवायची. रात्री ११ वाजता शूट संपली की मी बस घेऊन वांद्र्याला पोहोचायचो आणि शेवटची ट्रेन पकडून २ वाजता घरी पोहोचायचो. आंघोळ वगैरे आटोपून तासभर झोप घेऊन परत पहाटे ३.५३ ची ट्रेन पकडून तेच रुटीन चालू... प्रवासात मेल्यासारख्या झोपायचो, बाजूला बसलेल्या लोकांना मला उठवायला सांगायचो. त्या शूटचे मला १०० रुपये प्रती दिन conveyance मिळत असे. हातात पैसे आले, तो आनंद अवर्णनीय होता.

त्या फिल्म सेटवर 4th असिस्टंटवरून मी क्लॅप बॉय, मग script continuity writer, म्हणजेच 2nd असिस्टंट पर्यंत पोहोचलो, माझा इंटरेस्ट ॲड फिल्म्स डायरेक्शनमध्ये होता, कारण कॉलेजमध्ये मी एडवरटायजिंग शिकलो होतो. एक दिवस आमच्या फिल्म सेटवर ॲड फिल्म कॅमेरामन सुहास गुजराती आणि फोटोग्राफर गौतम राज्याध्यक्ष आले होते, मी त्यांच्याकडे जाऊन त्यांचा गायडन्स घेतला, त्याने मला फेमस स्टूडियो, महालक्ष्मीला जाऊन स्ट्रगल कर, फिल्म ऑफिसेसना भेट दे असा सल्ला दिला. मला थोडक्यात त्यांनी कटविले, मला वाटले, त्यांच्या बरोबर काम करण्यास सांगतील. मी त्यावेळी फिल्म स्कूलच्या exam resultsची वाट बघत होतो, माझ्या फिल्मला पहिला क्रमांक मिळाला आणि रवी देशपांडे, एक ॲड फिल्म डायरेक्टर जे तिकडे परिक्षक होते त्यांनी मला जॉब ऑफर केला, मी घरी पप्पा-मम्मीला मला एडवरटायजिंगमध्ये जॉब लागल्याचे सांगितले !

त्या दिवसानंतर त्या माणसाने माझ्याकडून एवढे काम करून घेतले की मी त्यानंतर एकही दिवस सुट्टी घेतली नाही, २ वर्षे माझी एकही दिवस सुट्टी नव्हती. ऑफिसमध्ये, स्टूडियोमध्ये, सोफ्यात झोपायचो. घरी कधीतरीच जायला मिळायचे. पण माझे खुप कॉन्टेक्ट्स झाले, खूप काही शिकायला मिळाले, स्वतः डायरेक्ट करायला लागलो. मी एकदा ऑफिसचा कॅमेरा घेऊन एक पब्लिक सर्विस फिल्म शूट केली, मित्राकडून एडिट आणि डबिंग करून घेतली आणि सर्वांना दाखवली. त्या फील्मला त्या वेळचा भारतातील सगळ्यात मोठा अवॉर्ड म्हणजेच ॲड क्लब (ABBY) आणि इंडियन डायरेक्टर्स एंड फिल्म प्रोड्युसर्स एसोसिएशन (IDPA) अवॉर्डचे नॉमिनेशन मिळाले. त्या वेळेला यशराज फिल्म्स मध्ये नविन ॲड फिल्म डिपार्टमेंट सुरु झाल्याचे मला कळले, मी ती फिल्म यशराज फिल्म्सच्या एडवरटायजिंग सेल (AD CELL) डिपार्टमेंट मध्ये पाठवली, त्या फिल्ममुळे मला एसोसिएट डायरेक्टरचा जॉब मिळाला. पहिली ॲड फिल्म होती डाबर च्यवनप्राशचे रीलॉंच, ती ॲड फिल्म प्रसून जोशीने लिहीली होती. रावणमंत्रवर आधारित होती, आणि त्या ॲड फिल्ममध्ये ॲक्टर होते, अमिताभ बच्चन !!! मला जेव्हा कळले, तेव्हा पटलेच नाही, मला अमिताभ बच्चनबरोबर काम करायला मिळणार ? ती एक २० सेकंदांची फिल्म होती त्यामध्ये मला त्यांना डायलॉगचे cue द्यायचे होते, माझी त्यादिवसापासून झोप गेली, १५ दिवसानंतर शूटिंग होती, मी एक दिवसही व्यवस्थित झोपू शकलो नाही, रोज अमिताभ बच्चन यांच्या बरोबर मी डायलॉग कसा बोलेन याची मला स्वप्ने पडत होती. डायरेक्टर अर्जुन सबलोकच्या बरोबर रिहर्सल केली, अमिताभ यांच्या प्रतिक्षा बंगल्यावर जाऊन त्यांची सेक्रेटरी रोझीला स्क्रिप्ट पोहोचवली, तिने माझा फ़ोन नंबर घेतला, मला कॉल करेल असे सांगितले, दुसऱ्या दिवशी शूटिंग होती, मी पूर्ण रात्र जागा होतो.

दुसऱ्या दिवशी सगळ्यात आधी मी सेटवर पोहोचलो, खूप मोठा सेट लागला होता. अमिताभ बच्चनना भेटायला यश चोप्रा ले होते, यशजींनी आम्हाला विश केले आणि निघून गेले, शॉट सेटअप सुरू झाला आणि मला रोझीचा कॉल आला, “Savin, Sorry, Sir is running late today, he will be coming 5 mins late on the set” मी तिला “OK, i will inform the crew” सांगून फोन ठेवला, मी विचार केला ‘च्या मारी, एवढे सगळे एक्टर्स, १-२ तास लेट होऊनसुद्धा इन्फॉर्म करत नाही आणि अमिताभ बच्चन ५ मिनिटे लेट झाले तर कॉल करून सांगतात, हे सर्व काय चाललेय ?’

मी इन्फॉर्म केले, सगळे मस्त आरामात सेटअप करत होते, इतक्यात सेटवर सगळे अचानक गप्प झाले, अमिताभ बच्चन, यश चोप्राबरोबर, सेटवर आले होते. सगळे त्यांच्याभोवती जमा झाले, खरच काय पर्सनॅलिटी आहे त्या माणसाची... ते आले आणि यश चोप्रा बोलले, ‘इन्होने मेरी मोहब्बतें फिल्म का सेट चुराया हैं’ सर्व हसायला लागले,सेटचा गंभीर मूड थोडा हलका झाला. अर्जुन सबलोक आमच्या टीमला घेऊन त्यांच्याकडे गेला

आणि आम्हा सर्वांची ओळख करून दिली. मी त्यांना डायलॉग कॉपी दिली तेव्हा ते बोलले, मैं अपनी कॉपी लाया हूँ, दीपक..., हाक दिली, मेकअपमन दीपक सावंत, स्क्रिप्ट घेऊन आला .

“चले शुरू करें?, Hey Arjun, where am i sitting?”

अर्जुनने मला खूण केली, मी गेलो आणि त्यांना म्हणालो, ‘सर, आप यहाँ होंगे और मैं वहां से आपको डायलॉग cues दूंगा.

अर्जुन, we are ready, मी डायरेक्टरला सांगितले...

“Alright, rehearsal, just roll on tape pls don't shoot…. And action...

अमिताभ स्पून घेतात व मी त्यांना थांबवतो असे स्क्रिप्टमध्ये होते, पण मी डायरेक्टरला सांगितले, मी त्यांना खाताना थांबवतो, स्पून घेताना नको, म्हणजे आपले प्रॉडक्ट दिसेल.

अमिताभनी स्पून उचलली, मी डायलॉग बोललो नाही, मी त्यांना स्पूनमधील खाताना थांबवायची वाट बघत होतो.

‘आपको यहाँ रोकना हैं !’ अमिताभ पटकन रागाने बोलले. मी म्हणालो, ‘सर, हमने सोचा की जब आप खाएंगे तब रोकना ठीक रहेगा.’

प्रसून जोशी राइटर आले, “any problem?” मी म्हणालो, “No sir, all ok.”

Ready one more rehearsal sir. And action:

मी: अरे बच्चन साहब ...

एबी : है !

मी: आप तो डाबर च्यवनप्राश खाते थे यह क्या ?

एबी: यह ! यही तो असली चीज़ हैं भाईसाहब..

मला तिथे:ओह !! (असे बोलायचे होते) पण मी ते एवढे मस्त डायलॉग बोलत आहेत, कशाला अडवू असा विचार केला. एवढ्यात अमिताभ पटकन चेयरवरून उठले आणि बोलले...

एबी: अमा यार ! आप हमारी एक्टिंग ख़राब कर रहे हो. (सगळे सुन्न झाले)

मी त्यांना सॉरी म्हणालो, “सर interruption लग रहा था वह ‘ओह’ डायलॉग, इसिलिए नही किया.”

एबी: प्रसूनने लिखा हैं तोह ठीक ही लिखा होगा, हम लेंगे यह डायलॉग.

प्रसून जोशी माझ्याजवळ आले आणि म्हणाले, “मैं दू क्या डायलॉग cues.”

मला खूप वाईट वाटले, मी त्याला जरा रागानेच म्हणालो, “ No Sir, I will do it, it's my job!”

मी एवढी रात्रंदिवस प्रॅक्टिस केलीय अन आज माला काय झालेय…

मी ठरविले, बस, शेवटी ते एक्टर आहेत, मी मला जसे येतेय तसेच बोलेन... अमिताभ बच्चनना म्हणालो, “सर डायरेक्ट टेक करते हैं.”

एबी : ठीक हैं, क्या नाम हैं आपका ? साविओ ?

मी : नहीं सर, सेविन !

एबी : तो, भैया सेविन, वहां पीछे नेपथ्यमें जाईये और वहांसे cue दीजिये, सगळा सेट माझ्याकडे मी गुन्हेगार असल्यासारखा बघत होता.

माझ्या लक्षात आले की मी रिहर्सलसाठी कॅमेरामनच्या बाजूला आलो होतो. मला कॅमेराच्या मागे जाऊन cue द्यायची होती, मी मागे गेलो, एकदम सीरियस झालो, रेडी सर, प्लीज ऑर्डर.

Allright, going for take! डायरेक्टर बोलला, Roll sound, roll camera please, and Action !!!

अमिताभनी स्पून उचलली, मी म्हणालो, अरे, बच्चन साहब ! आप तो डाबर च्यवनप्राश खाते थे यह क्या ?

हाहाहाहाहा !!!! अमिताभ मोठयाने हसायला लागले !!!. 'बस, सेविन डरना नहीं ! सबकी जाद का बैदा मारेंगे हम दोनों !, मज़ाक कर रहे थे यार हम !

मी त्यांच्या जवळ गेलो, हळूच बोललो, "ठीक हैं मारेंगे मारेंगे," त्यांनी माझ्या हातावर टाळी दिली, आणि 'आपकी शकल, हाहाहाहा' परत हसले... "सर, आपने डरा दिया !!! चलिए टेक करेंगे अभी !"

मी बरा सापडलो यांना !, माझा जीव टांगणीला लावला होता या माणसाने… काय बोलू, मी एवढा खुश अन embarrass या आधी कधी झालो नव्हतो.

मग आम्ही २ टेकमध्येच ती अॅड फिल्म शूट केली, त्यानंतर मी अमिताभ बच्चन यांच्यासह डाबर च्यवनप्राश, डाबर हाजमोला, अनारदाना अशा ८ वेगवेगळया फिल्म्स केल्या !. ती किती ग्रेट प्रोफेशनल माणूस आहे ते कळले. पुढे आम्ही कूर्गला शूट करत होते. त्यावेळी त्यांनी मला त्यांच्या घरून मेडिसिन्स आणावयास सांगितली होती. मी आपल्या सामवेदी समाजाच्या लग्नात नविन जावई 'आयेज' घेऊन जाताना पिशवी कशी सांभाळून धरतो तशी ती धरून मुंबई ते कूर्गला गेलो होतो, त्यांनी मला त्यांच्या वॅनमध्ये बोलवून thanks दिले होते, शूटिंग सुरू असताना एडिलेड टेस्ट क्रिकेट मॅच सुरू होती, त्यावेळी आम्हाला कूर्गमध्ये नेटवर्क मिळत नव्हते, तेव्हा त्यांच्याकडे सॅटॅलाइट फ़ोन होता त्यावर सुनील शेट्टी त्यांना फ़ोन करून स्कोर सांगायचे आणि ते मला स्कोर सांगायचे, मी खूप खुश व्हायचो. सगळ्या सेटवरच्या लोकांना माझी अमिताभ बरोबर केवढी ओळख आहे बघा, असे दाखवायचो आणि ते मला त्यांनी तुझा तुझ्या पहिल्या शूटच्या वेळी कसा जीव टांगणीला लावला होता ते सांगून चिडवायचे !

अमिताभ बच्चन यांना लहान असताना विडियो कॅसेटवर बघितले होते तेव्हा एक दिवस त्यांच्याबरोबर काम करावयास मिळेल असे मनातही आले नव्हते.

नंतर एकदा डाबरच्या लास्ट शूटवर लंच ब्रेकमध्ये मी त्यांचा ऑटोग्राफ माझ्या कॅपवर घेतला तेव्हा त्यांना बोललो की मी तुमचा शहंशाह पिक्चर बघितला आणि खूप इन्फ्लुएंस झालो. तेव्हा ते म्हणाले की मी दिलीप कुमारसाहेबांना बघून झालो !

We always need someone to look upto! See you soon.

# लफडं - डॅनिअल मस्करणीस, मर्देस – वाघोली, मोबाईल: ९१५८९८६०२२

ऑफिसवरून आल्या आल्या खांद्यावरील बॅग तशीच खुर्चीत टाकून रिचर्ड अस्वस्थपणे खोलीत येरझाऱ्या घालीत होता. "आपण काय विचार करत होतो आणि काय हा प्रसंग उद्भवलाय? कुणाचं भलं करायला जावं आणि आपणच अडकावं." रिचर्ड बराच विचारमग्न होता. डोक्यात प्रश्नांचे मोहोळ उठले होते आणि काहीसा संताप, राग, भीती ह्यांच्याही संमिश्र छटा त्यात होत्या. व्हाट्सअँपवरील मेसेजेसच्या बीपचा आवाज ऐकून तो चटकन टेबलावरील त्याचा मोबाईल घेण्यास धावला. '१० मिनटात घरी येतोय' म्हणून तो रॉजरचा मेसेज होता. 'रॉजरसारखी भरवशाची माणसं आहेत म्हणून बरे!' त्याने काहीसा सुस्कारा टाकला.

"हे काय? खोलीत काळोख करून काय फ़िरतोयेस " त्याच्या आईने, 'दादी'ने खोलीतील लाईट पाडत त्याला विचारलं. संध्याकाळचा कधीच अंधार पडलाय हे रिचर्डच्या लक्षातच आलं नव्हतं.

"रॉजरची वाट पाहतोय गं" दादी खोलीतून बाहेर पडते आहेच तोच तो बोलला. त्याचे हे बोलणे ऐकून ती खोलीबाहेर जात आहे तोच "... प्रवीण संबंधी बोलण्यास" असे रिचर्डचे पुढचे बोलणे तिने ऐकले व ती जागीच थबकली, काहीशी अस्वस्थ झाली आणि स्वयंपाकघरात घुसली.

काही मिनटातच रॉजर आला.

'अरे ये रॉजर, तुझीच वाट पाहत होतो ', रिचर्डने रॉजरला आत घेतले आणि खोलीचे दार लावले

'हो. आता 'ताबडतोब ये' असं तू म्हटलंस म्हणजे यावंच लागणार ' रॉजरने खुर्चीत बसत म्हटले, 'काय सगळं ठीक आहे ना?'

'हो हो सगळं ठीक आहे ' चेहऱ्यावर उसनं हास्य आणत रिचर्ड बोलला.

'तुझं सामाजिक कार्य बाकी छान चालू आहे. बरंच काही कानी येतंय. वैद्यकीय क्षेत्रात गरजुंना मदत करणे खूप गरजेचे आहे रे.'

'हो हो आपली एक आवड ' रिचर्ड काहीसा ओशाळला आणि मध्येच रॉजरला तोडत म्हणाला, 'ते जाऊ दे, मला सांग आमचा प्रवीण काय करतोय रे सध्या? '

'आहे. प्लम्बिंगचं बरं चाललंय त्याचं. इथल्या इथे बरी कमाई आहे त्याची.'

'हम्म', मूळ मुद्द्याला हात घालत रिचर्डने म्हटले, 'त्याचं काय लफडं आहे तुमच्या गावात?'

'लफडं? काय लफडं?' काहीश्या अवघडल्यासारखे रॉजरने विचारले

'प्रवीण माझ्या मावशीचा मुलगा, आणि तुझा शेजारी. मी त्याच्याविषयी जे कानी येतेय ते लोकांना विचारू शकत नाही. तूच एक भरवश्याचा आहे ज्याच्याकडून मला खात्रीलायक माहिती मिळू शकते'

'पण अचानक त्याचा विषय?'

'अरे काय सांगू तुला' रिचर्ड खुर्चीतून उठून खिडकीपाशी गेला, 'मी कधी कोणाच्या सोयरिकमध्ये पडत नाही. पण अनायसे ती संधी आली. माझा मित्र पीटर ह्याने त्या दिवशी त्याच्या मुलीसाठी प्रवीणविषयी विचारणा केली. प्रवीण कधी कुणाशी जास्त बोलत नाही. पण मी विचार केला कोणाचं चांगलं होत असेल तर ते का न करावं. परत प्रवीण आपल्या मावशीचा मुलगा, म्हणून मीही पीटरला 'प्रवीण चांगला आहे' असा निर्वाळा दिला. मागच्या आठवड्यात पीटरची मुलगी प्रमिला आणि प्रवीण दोघे एकमेकांना भेटून एकमेकाला होकारही दिला. त्यांची सोयरीक जमल्यात जमा आहे... आणि..'

तो खाली रॉजरच्या बाजूला बसला, आवंढा गिळून म्हणाला,

'आणि, काल मी घरात सगळ्यांना हे मोठ्या आनंदाने सांगत असताना, सेल्वीनने 'प्रवीणचं त्याच्या गावातील त्या वॉल्टरच्या बायकोबरोबर लफडे आहे, ही सोयरीक व्हायच्या अगोदरच मोडली पाहिजे. प्रवीण तसाच अठवरा राहूदे. त्याला चांगली अद्दल घडली पाहिजे'. असे रागाने बोलून मला मोठा धक्काच दिला. मावशी गेल्यापासून माझं मावशीच्या घरी काही एवढं जाणं होत नाही आता. कोणाला काय विचारावं तेच मला कळत नाहीये. लोक काहीही म्हणतात. गरज नसताना कोणाचंही कोणाबरोबर नाव जोडतात. नशीब तू त्याच्याच बाजूला राहतोस म्हणून विचार केला तुलाच विचारावं', रिचर्डने आपल्या मनातील खदखद त्याच्या मित्रांसमोर मांडली.

'खरं सांगू, माझ्याही हे सगळं कानी आलं होतं.' रॉजर रिचर्डला साद देत म्हणाला.

'खोटं आहे ना हे सगळं?' रिचर्ड आशेने म्हणाला.

'मीही तुझ्यासारखा सकाळी ५ वाजता घर सोडून जातो तो रात्री ९ पर्यंत बाहेरच असतो. पण गावातील बायका म्हणतात तो तिच्या नेहमी घरी जातो. दोघे गाडीवरून फिरतात. तिने म्हणे बॉबकटही केलाय. सकाळी जातात ते कधी कधी संध्याकाळी परत येतात. खरं सांगू, गाडीवरून जाताना एक दोनदा मीही त्यांना पाहिलंय. मागील एक वर्षांपासून हे चाललंय असं गावातील लोकं म्हणतात.. काही गडबड तर नक्कीच आहे रिचर्ड.'

'मी मग आता काय करू? माझा मित्र पीटर ह्याला मी काय सांगू? त्याचा मोठा विश्वासघात करतोय रे मी. माझंच मला कळत नाहीये ' रिचर्ड हातावर डोकं पेलीत रॉजरकडे पाहत म्हणाला, 'मोठा पेच आहे हा.'

खोलीत एक गंभीर शांतता पसरली. रॉजर रिचर्डचा बालमित्र. कठीण प्रसंगात डोके शांत ठेवून मार्ग काढणारा. रिचर्डला संकटात त्याची खूप साथ असायची. रॉजर त्याच्याच घराचा एक सदस्य झाला होता. मात्र ह्या प्रसंगात रॉजरलाही काय करावे हे सुचत नव्हते.

रिचर्ड विचार करू लागला, दादी किती खुश होती. प्रवीणला पीटरच्या मुलीचा निरोप आला तेव्हा. मावशी गेल्याला ३ वर्षे झाली होती. मावशीचा एकुलता एक मुलगा आता तरी मार्गी लागेल या कल्पनेनेच सगळे खुश झाले होते. नशीब आपण हे सांगायची वेळ आणि सेल्वीनने घरी यायची वेळ एक झाली म्हणून

आपल्याला हे कळले. नाही तर आपण होतो मख्ख ‘सगळं चांगलं चांगलं आहे’ असे समजत. पीटरला आत्ताच फोन करून सांगावे का? की ही सोयरीक मोड म्हणून. तो म्हणेल तुझ्या स्वतःच्या मावशीच्या मुलाविषयी तुला माहिती नव्हतं? मग कोणत्या तोंडाने "मुलगा चांगला आहे' असा तू निर्वाळा दिलास? आणि एवढ्या उशिराने तू हे सांगतोयेस ते माझ्या एकुलत्या एक मुलीवर ठरलेलं लग्न तुटल्याचा शिक्का बसावा म्हणून? त्याची मुलगी प्रमिला किती गोड, समंजस. तिने तिच्या भावी आयुष्याची प्रवीणला डोळ्यासमोर ठेवून स्वप्ने पाहण्यास सुरुवातही केली असेल. त्याच्याशी एव्हाना मोबाइलवर बोलणंही चालू झालं असेल. आणि ह्या सगळ्यात आपण आता असा घोळ घालायचा? पण ते गरजेचेही आहे. मी आपला साधा सरळ विचार करणारा. माणसाच्या आयुष्यात असे गोपनीयतेचे पीळ असतात हेच पचवण्यास जड जाणारा व व्यक्तीला त्याच्या चेहऱ्यावरूनच पारखणारा, का आपण ह्या फंदात पडलो? काय करावे हेच रिचर्डला सुचत नव्हते.

रॉजरही हताशपणे रिचर्डच्या प्रश्न भरलेल्या चेहऱ्याकडे पाहत होता.

"आपण खात्री करून घेण्यासाठी अजून एकाला विचारलं तर?", रिचर्ड डोक्यात काहीतरी चमकल्यासारखे रॉजरकडे आशेने पाहत म्हणाला.

'कोणाला?'

'त्यालाच. प्रवीणलाच'

'त्याला? बाप रे? त्यालाच कसं विचारणार? आणि महत्वाचं म्हणजे, त्याला कोण विचारणार?' रॉजरचे हे भीतीदायक उदगार रिचर्डसाठी नवीनच होते. रॉजर जो भर रात्री विजेच्या खांबावर चढून आपल्या विजेचे काम फिक्स करणारा, परिणामाची पर्वा न करता चार लोकांत आपली बाजू घेणारा, गावात कुठे काही झाले तर चटकन बेभान गर्दीचे नेतृत्व करणारा असा रॉजर इतक्या छोट्या गोष्टीला का घाबरतोय, रिचर्डला आश्चर्य वाटलं,

'मीच विचारीन. जर 'धूर आहे म्हणजे आग असणारंच' असं आपण म्हणत असू तर जो प्रत्यक्ष ह्या सगळ्यात इन्व्हॉल्व्हड आहे त्यालाच विचारलं तर प्रश्न मिटेल. खऱ्याचं खरं आणि खोट्याचं खोटं होईल', रिचर्ड हळू पण ठाम सुरात म्हणाला.

'हम्म, ठीक आहे.' रॉजरने दीर्घ श्वास घेऊन रिचर्डकडे पाहीले. आणखी काही मिनिटे तिथे थांबून मग रॉजर रिचर्डचा निरोप घेऊन त्याच्या घरी जाण्यास निघाला.

रिचर्डच्या दादीला रॉजर का आलाय हे माहीत होतंच. तो निघत असताना त्याला मध्येच थांबवून ती म्हणाली, 'मा बायसॉ प्रवीण अहा कय करदॅ यावर माऑ विश्वासूस बॅहॅ नाय. हा, पयल्यापासून जाम तारकाट. बायला नेहमी या टेन्शन अह्यासा. रॉज मॅ त्या करतान मावलीदरी प्रार्थना करतॅ. बाय अहलोस्ती तॅ कदाचित अहा कय जाला पन नस्ता.' असे म्हणत ती हुंदका देत पदर तोंडाला लावत आतमध्ये गेली.

त्याच रात्री झोपता झोपता रिचर्डने 'प्रवीण तू उद्या फ्री असशील तर मला काही वेळेसाठी चर्चच्या ग्राऊंडवर भेटशील का?' असा व्हाट्सअप मेसेज प्रवीणला टाकला. काहीच मिनिटात 'ओके. आलो' असा त्याचा रिप्लायही आला.

'तिचा नवरा शिपवर असतो, सलग बारा महिने बाहेरच आहे तो. तिच्याही शारीरिक गरजा आहेत' रॉजरचे हे वाक्य रिचर्डच्या डोक्यातून काही केल्या जात नव्हते. तिचा बिचारा नवरा, वॉल्टर. तो तेथे शिपवर मेहनत करतोय आणि ही इथे तरुण मुलाला नादाला लावून बसलीय. त्या वॉल्टरला माहिती पडले तर काय वाटेल त्याला? तिच्या लहान मुलांवर काय संस्कार होत असतील? काही तरी पर्वा हिने करावी की नको? हा प्रवीण आपल्या अंगाखांदयावर वाढलेला. आत्ता आत्ताच दहावीनंतर नापास झाल्यावर माझ्याकडे 'दादा काय करू?' म्हणून विचारण्यास आला होता जणू. एक ना नाना प्रश्न त्याच्या मनात थैमान घालत होते. पूर्ण रात्र तो जागाच होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी रिचर्ड चर्चच्या गेटपाशी गाडी लावून ग्राऊंडच्या दिशेने चालू लागला. काही लहान मुले सायकल चालवीताना दिसत होती. वर्दळ कमी होती. रिचर्ड झपझप पुढे चालू लागला तोच त्याने पुढून येणाऱ्या व्यक्तीला पहिले अन त्याच्या पोटात धस्स झाले. त्याचा मित्र पीटर चर्चच्या ऑफिसमधून पायऱ्यांवरून खाली येताना दिसत होता.

'अरे रिचर्ड, माझ्या मित्रा. काय म्हणतोस?' पीटर रिचर्डला पाहून खूपच आनंदी झाला.

'हो पीटर क-काय म्हणतोयस ... इथे कुठे?' रिचर्ड काहीसा सावध होता.

'अरे म्हणजे काय? सोयरीक पुढच्या रविवारी आहे. फादरांना सांगावयास आलो होतो'

'पीटर मला तुला काही तरी सांगायचे आहे' रिचर्डला आता हे सगळे अनावर झाले होते. पीटरला कोणत्याही परिस्थितीत सत्य हे सांगितलं गेलंच पाहिजे असं त्याला वाटत होते.

'अरे तू जे काही म्हणशील ते. तुझे खूप उपकार आहेत माझ्यावर. माझ्या पमीच्या चेहऱ्यावर तुझ्यामुळेच आज हसू आहे'

'तू आज संध्याकाळी फ्री आहेस का?'

'बघतोयेस ना?' रिचर्डच्या खांद्यावर ठेवून पीटरने स्मितहास्य करत म्हटले, 'आता थोडा धावपळीत आहे. हवं असेल तर संध्याकाळी भेटू.'

रिचर्डचा आता गळा दाटून आला होता, 'ठीक आहे ' आपल्यावर संयम ठेवत तो बोलला ....आणि लाडक्या मुलीच्या सोयरिकच्या तयारीत मग्न असलेला पीटर बाईकवरून भुर्र निघूनही गेला. प्रवीणशी बोलावं का? काही अर्थ आहे का आता बोलण्यात? रिचर्ड गोंधळात पडला. पण 'आलोच आहो तर' असे स्वतःला बजावत तू पुढे चालू लागला. ग्राऊंडच्या पलीकडच्या बाजूला असलेल्या बाकावर बसला आणि प्रवीणची वाट पाहू लागला.

काही मिनिटे गेली आणि समोरून पायी चालत येणाऱ्या प्रवीणला त्याने पाहिले. मान तिरपी ठेवून चालणारा, हडकुळा, चेहऱ्यावर तेच ते भाबडे भाव. कोण विश्वास ठेवील ह्याचे असे काय असेल म्हणून? आपण लोक ओळखण्याच्या बाबतीत किती मूर्ख, रिचर्डला स्वतःला दूषणे द्यावीशी वाटत होती.

प्रवीणने रिचर्डच्या हातात हात देत म्हटले, 'दादा कसा आहेस?'

'मी मजेत आणि तू?'

'बरा आहे. या रविवारी सोयरीक आहे तुला माहिती आहेच... त्याच्या तयारीत थोडा बिझी आहे' तो काहीसा लाजत म्हणाला.

'तुला कदाचित माहित नसेल. पण तुझी प्रमिलासोबत सोयरीक पुढे सरकण्यात माझाही वाटा आहे. प्रमिलाचे वडील, पीटर माझे खास मित्र. तु माझ्या मावशीचा मुलगा म्हणून मीही त्याला चटकन प्रतिसाद दिला.'

"हो हो, प्रमिलाचे पप्पा सांगत होते. थँक यु दादा"

'प्रवीण, मला तुला काही विचारायचं, आणि त्याचं उत्तर मला खरं खरं हवंय' रिचर्डने वेळ न दवडता मूळ मुद्द्याला हात घातला,

'?' रिचर्ड दादाच्या बोलण्यातील गंभीरतेचा रोख पाहून प्रवीणच्या चेहऱ्यावर काहीसे वेगळे भाव उमटले.

'तुचं आणि तुमच्या गावातील त्या रिटाचं काय प्रकरण आहे?' रिचर्डने त्याच्या डोळ्यात नजर रोखीत त्याला विचारले.

'माझं? तिच्याबरोबर? छे! तसं काहीच नाही दादा.' प्रवीण काहीसा बावरला. रिचर्डचा सडेतोड प्रश्न त्याला अपेक्षित नव्हता.

'मग हे माझ्या कानी सगळे काय व का येतेय?'

'वॉल्टर दादाच्या घरी काही मी आज जात नाहीये. लहानपणापासून जातोय. तेव्हा कोणी मला काही बोलले नाही. मी हे तुझ्याकडून प्रथमच ऐकतोय.', प्रवीणला त्याच्या पाठीमागे एवढी चर्चा होतेय ह्याची कल्पनाच नसावी, रिचर्डला काही ते पटले नाही.

'तेव्हा बोलले नाहीत कारण तेव्हा तू लहान होतास. वॉल्टर येथे नाहीये आणि तू आता पुरुष आहेस. तुला कळतंय ना?'

'दादाच्या मुलांना मी खेळवलंय. दादा इथे नसतात त्यामुळे वहिनीनी जे जे काही काम सांगितलं ते मी ऐकायचो. मुलांना खेळवणे, त्यांना दुकानातून पेन्सिल, खाऊ घेऊन येणे. त्यांच्या शाळेच्या प्रोजेक्टमध्ये मदत करणे, सगळी कामे केलीयेत मी'

'ते ठीक आहे. बॉबकट करून गॉगल घालून तोंड स्कार्फने गुंडाळून तुझ्या मागे ती बसते. दिवसाढवळ्या तिला भर गावातून बाईकवर मागे बसवून दिवसभर बाहेर राहणे हे कोणतं काम?' रिचर्ड प्रवीणच्या भावुक चेहऱ्यात वाहवून न जाता त्याच्या जवळ जाऊन म्हणाला, 'प्रवीण सत्य काय आहे?'

'दादा सत्य मला सांगता येणार नाही.', प्रवीण तोंड फिरवीत म्हणाला.

'का?'

'कारण वहिनीला मी तसे वचन दिले आहे.'

'वचन? आणि त्या दोघांच्या लग्नाच्या वचनाचे काय, मुर्खा.' रिचर्ड आता हातच उगारणार होता, पण त्याने स्वतःला सावरले.

'खरंच तू कोणाला सांगणार नाहीस?'

'!!..' रिचर्डचे डोळे अजूनही प्रवीणकडे रागाने रोखलेले होते

'वहिनीला बरं नव्हतं. कोणाला सांगू नकोस पण वर्षभरापूर्वी तिच्या मानेवर एक गाठ आली होती. डॉक्टरांनी ती गाठ कॅन्सरची आहे असे सांगितले होते. त्यामुळे मीच तिच्याबरोबर डॉक्टरांकडे जायचो. लोकांनी जे आम्हाला बाईक वर जाताना आणि पूर्ण दिवस बाहेर राहताना जे पाहिलंय ते ह्या वेगवेगळया डॉक्टरांकडे जाताना.'

'एवढा मोठा आजार तिला झाला होता मग ती अनुभवी लोकांना सांगू शकत होती. तुलाच का?'

'वॉल्टरदादा तिकडे शिपवर आणि येथे ही एकटी. तिचे भाऊ बहिणी त्यांच्या आयुष्यात मग्न. आणि हा आजार काही जगजाहीर करण्यासारखा नाही' काहीसे थांबून रिचर्डकडे वळून पाहत तो पुढे म्हणाला, ‘आणि तू बॉबकट विषयी जे म्हणालास, ऑपरेशन करण्याअगोदर डॉक्टरांनीच वहिनीला केस कापण्यास सांगितले होते. तिच्या फक्त मोठ्या बहिणीला माहीत होते. ऑपरेशनसाठी ४ दिवस हॉस्पिटलमध्ये असताना मुलांना मोठ्या बहिणीच्या घरीच ठेवण्यात आलं होतं.'

रिचर्डच्या प्रवीणकडे रोखलेल्या कोरड्या नजरेत आता काहीसा ओलावा झिरपू लागला होता.

सत्य! सत्य असे समोर येईल याची त्याने कल्पनाच केली नव्हती.

'तू हे खरं बोलतोयस?' काहीश्या नरमाईने तो म्हणाला

'होय ' असे म्हणत त्याने त्याच्या खिशातील मोबाईल काढला व एकेका डॉक्टरांचे सेव्ह केलेले नंबर दाखवून म्हणू लागला, 'हे बघ डॉ. अडवाणी, केमो स्पेशालिस्ट ह्यांचा नंबर, हा, हा, त्यांच्या असिस्टंटचा नंबर... आणि हा त्या डॉ. यादव ह्यांचा… आणि हा त्या नर्स सविता ह्यांचा.. '

मग त्याने डॉक्टरांना मोबाइलवरून पाठवलेले काही रिपोर्ट्सचे फोटोही दाखवले. 'रिटा वॉल्टर मेंडीस' हे त्यावरील नाव रिचर्डच्या नजरेतून सुटले नाही.

'आणि वॉल्टरला हे सगळं, म्हणजे आजाराचं माहिती आहे?'

'वॉल्टर दादा गेली १२ महिने शिपवरच आहे. शिपवर दारूचं, जुगाराचं व्यसन लागलंय त्याला. शिपवरील कॅसिनोत सगळा पगार उडवतो. तो घरी पैसेही पाठवत नाहीये. ह्या आजारपणासाठी वहिनीला लग्नाचे सगळे दागिने विकावे लागले. सुदैवाने, आजार पहिल्या स्टेजमध्ये असल्याने लवकर निभावलं.'

कॅन्सरच्या विळख्यामुळे सैरभैर झालेली, लहान मुलं पदरात असलेली एक तरुण एकटी महिला आणि तिला मदत करणारा एक तरुण ह्या दोघांतील संभाव्य लैंगिक संबंध ह्या कोनाचा रिचर्डला विचारही करवत नव्हता.

'हे बघ प्रवीण. तू खरं बोलतोयस ह्यावर माझा विश्वास आहे.' रिचर्ड प्रवीणच्या खांद्यावर हात ठेवीत बोलला, ' पण आता तू प्रमिलाबरोबर काहीच दिवसात सोयरीक करणार आहेस. एक नवीन नातं तू सुरु करणार आहेस आणि त्याची सुरुवात तू जे मला हे सांगितलं आहेस ते सर्व तिला सांगूनही करावी अशी माझी इच्छा आहे, तेही दुसऱ्या तिऱ्हाईताने कोणी हे तिला वा तिच्या कुटुंबियांना सांगण्याअगोदर.'

'ठीक आहे, मी आजच सांगेन प्रमिलाला', रिचर्डने प्रवीणकडून हे वचन घेऊन त्याला निरोप दिला व एक मोठा सुस्कारा टाकला.

सत्य! हा अडीच अक्षरांचा शब्द! म्हटलं तर आभाळाएवढं विस्तीर्ण, ढळढळीत, मोकळं आणि म्हटलं तर भल्या भल्यांच्या नजरेच्या टप्प्यात न येणारं.

'प्रवीणचे सत्य माझ्यापुरते बाहेर आले असले तरी लोकांपुढे त्याला संशयाच्या नजरेतच वावरावं लागणार. लोकांपुढे ही मदत कधीच समोर येणार नाही. मेडिकल क्षेत्रात कित्येक गरजूना मदत करून समाजाच्या समोर मोठ्या झोकात वावरणारा मी आणि लोक संशयाच्या नजरेतून पाहत असुनही स्वतःची अब्रू दावणीला लावून एका गरजूला सर्वोतपरी मदत करणारा माझा मावसभाऊ प्रवीण!' रिचर्ड अजूनही प्रवीणच्या छोट्या होत जाणाऱ्या पाठमोऱ्या हडकुळया मूर्तीकडे भरल्या अंतःकरणाने पाहत होता…

संध्याकाळी सहा वाजता पीटरचाच समोरून रिचर्डला फोन आला

'हॅलो रिचर्ड. कुठे भेटायचं मग?'

'अरे पीटर मी सहजच बोललो होतो. सोयरिकचा कार्यक्रम तर होऊ दे मग भेटू.'

'ते ठीक आहे. पण तुला काहीतरी सांगायचं होतं ना?'

'हो-हो, हेच की, आपण मित्र आहोतच पण आता आपण 'ताता फोडोन नाता' कऱ्या लाविले', रिचर्ड वर आकाशात उडत असलेल्या पक्ष्यांच्या थव्याकडे पाहत पीटरशी बोलत होता. त्याला आता खूप हलके हलके वाटत होते, '…प्रमिला आणि प्रवीणचा हा प्रवास सुंदर आणि स्वप्नवत होवो, हेच तुला सांगायचं होतं. बाकी काही नाही रे…..'असे बोलून त्याने गहिवरलेल्या अवस्थेत फोन ठेवला.

# मूल्यांची पायमल्ली होते तेव्हा... --- नोएल निर्मळकर.

माणूस विविध अंगांनी समाजाला जोडलेला आहे. त्यामध्ये समाजकारण, धर्मकारण आणि राजकारण ही महत्त्वाची अंगे हा त्या अंगांचा गाभा आहे. यामध्ये जितका स्वार्थ कमी तितकी जास्तीत जास्त निकोप सेवा घडते. ह्या प्रत्येक क्षेत्रामध्ये कुणीतरी नेतृत्व करीत असतो. धर्मामध्ये नेतृत्व करणारा कुणीतरी बुवा, बाबा किंवा धर्मगुरू असतो तर राजकारणामध्ये कुणीतरी पुढारी असतो. यांच्या व्यतिरिक्त समाजाची सेवा करणारा समाजसेवक असतो. ह्या सर्वांनाच आपण समाजसेवक मानतो पण अत्यंत निस्वार्थी भावनेने जो सेवा देतो तोच खरा समाजाचा असतो. गांधीजी, बाबासहेब आंबेडकर, मदर तेरेजा, बाबा आमटे, सिंधूताई सकपाळ, मतीन भोसले अशी अनेक नावे घेता येतील.

खरा समाजसेवक समाजातील एखादी वेदना, दु:ख मिटविण्यासाठी आयुष्यभर झटतात. त्या वेदनेला व दु:खाला स्वत:शी जोडून घेतात. ज्या समाजाचे दु:ख वेदना असते त्या समाजाशी स्वत:ला कलम करून घेतात, त्या मातीत स्वत:ला गाढून घेतात. असे हे समाजाचे सच्चे सेवक आपल्याला सर्व क्षेत्रामध्ये आढळतात. हे सेवक पत, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, बडेजाव किंवा हव्यास यापासून कोसो दूर असतात. व्याधीग्रस्त समाजासाठी ते फकीर बनलेले असतात. पण अशी माणसं फार थोडी असतात.

समाजसेवेच्या नावाखाली स्वत:ला समाजसेवक म्हणणारे गुरू, धर्मगुरू, बुवा, बाबा किंवा पुढारी स्वत:ची तुंबडी भरून घेणारे भंपक समाजसेवक आपल्याला भरपूर आढळतील. कितीतरी बाबा-बुवांच्या बुडाखाली करोडोंची माया आहे. त्यांच्या अंगरख्याच्या आड असहाय्य महिलांचे लैंगिक शोषण लपलेले आहे.

समस्याग्रस्त भोळयाभाबडया लोकांची भरमसाट लूट करण्यात हे ढोंगी समाजसेवक पटाईत असतात. त्यासाठी ते धर्माचा चपखल उपयोग करतात. जेव्हा यांच्या दुष्कत्यांचे भांडाफोड होते तेव्हा नजरेआड असलेली सर्व कृत्ये समोर येतात. अशावेळी शोषीत फक्त हताशपणे त्यांच्याकडे बघत राहतो.

सज्जनांची कोणतीच संघटना नसते. ते कधीच एकत्र येत नाहीत त्यामुळे दुर्जन जागोजागी आपलं दुकान मांडून बसलेले असतात. डॉ. नरेंद्र दाभोळकर नेहमी धर्माची चिकित्सा करण्याचा आग्रह धरत. ती झाली तरच 'दूध का दूध आणि पानी का पानी' होईल. पण अशावेळी दुर्जन संघटित होतात दाभोळकर सारख्यांना संपविण्याचा कट करतात. दिवा फोडून प्रकाश नष्ट करता येत नाही तर असंख्य ज्योती पुन्हा नव्याने प्रज्वलीत होतात.

राजकरणामध्येही वेगळं काही आढळंत नाही. राजकारण हा देखील एक धंदा बनला आहे. एखाद्या धंदयात गुंतवणूक करावी तशी करोडोंची माया उधळवून उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरतात. सर्व प्रकारच्या भल्या बुऱ्या मार्गांचा अवलंब करून निवडून येतात. ग्रामपंचायतीपासून लोकसभेच्या निवडणुकीमध्ये आपल्याला हेच चित्र दिसते. महाराष्ट्राच्या विधानसभेच्या सत्ता स्थापनेचे नाट्य महिना दीड

महिना चालले. खुर्ची मिळंवण्यासाठी राजकीय पक्षांनी जे डांव मांडले ते सर्व निंदनीय तर आहेतच पण मतदारांच्या विश्वसाचा तो खेळ होता.  त्यांच्या भावना पायदळी तुडविल्या गेल्या.

धर्म आणि राजकारणात वाढलेली ही बजबजपुरी कशाचे द्योतक आहे ? नितीमूल्यांच्या पायमल्लीचे निदर्शक आहे. डोक्यावर शिरस्त्राण, हातात फुले आणि पायात पादत्राणे शोभून दिसतात. शिरस्त्राणामध्ये टोपी, फेटा, पगडी किंवा राजमुकुट असू शकतो, पादत्राणामध्ये खडावा, चपला, शूज असू शकतात. डोक्यावरील शिरस्त्राणपेक्षा पायातील शूज कितीतरी पटीने किंमती असू शकतात. फुलांच्याबाबतीतही तसे म्हणता येईल. प्रत्येकांची किंमत कमी अधिक असू शकते. पण प्रत्येकाचे मोल आपापल्याजागी अतुलनीय आहे. पादत्राणे फार किंमती आहेत म्हणून डोक्यावर ठेवली, कमी किंमतीचे शिरस्त्राण हातात धरले आणि किंमत नसलेली फुले पायदळी तुडवळी तर एक विद्रुप चित्रच तयार होईल.

प्रत्येक क्षेत्राची मूल्ये ठरलेली असतात. ती जोपासली गेली तर समाज उन्नत होईल. समाजसेवकाच्या नसानसात आणि रक्तात ही मूल्ये भिनली पाहिजेत. गाईचे दूध बाजारात विकत मिळते, त्याला किंमत आहे पण आईचे दूध बाजारात विकत मिळत नाही, म्हणूनच त्याला मूल्य आहे. ज्यांनी मूल्यांची पायमल्ली केली त्यांनी समाजाचे शोषण करून पीडा निर्माण केल्या. त्यासाठी त्यांनी अमानवी कृत्येही करण्यास मागेपुढे पाहिले नाही. पण ज्यांनी मूल्ये जोपासली त्यांनी अंधारात तेजोमय वाटा निर्माण केल्या. अज्ञान आणि दारिद्रयाने विटलेला, बरबटलेला समाज त्यांनी आपल्या कवेत घेतला.

त्यांनी देवळातला देव पुजला नाही पण माणसातला देव शोधला. त्यासाठी आपल्या जीवनाचे होम हवन करून समाज मंदिर उभे केले. आणि सूर्यासारखे तळपत राहिले. जागोजागी तळपत राहणारे हे सूर्यच समाज जीवनाची खरी आशा व उमेद आहे......

# घायल्या कामाला ऊबी - बॅप्टिस्ट वाझ, दारशेंग

शिमा कॉपात आन फरशा कॉपात जीवाभावाशॅ मित्र. हांनशापारा दोगी मरीबायशा घरा एकत्र भॅट्यार्शॅ. अडश्यो तडश्यो गप्पा गोष्टी करीत आख्खी बाठली खाली करॅशे. तॅआ दोगाई ऑडी दोस्ती गा दोगी दारू प्यादो एकूस शाऊन वापऱ्याशे. शोले मिनश्या विरु-जयशा घती त्याई दोस्ती ऑथी. सुखादुखात, आनंदात, लग्नात, बालटीमात जडेजडे दारुऑ प्रोग्राम तडेतडे ये दोगी ॲका शावनात पेताना दिख्यार्शॅ.

आगायनॅ लागला तॅ भुईगावपोत ॲ राम-श्याम या नावानॅ माइत ऑथे. एकदी ये दोगी ठरलॅल्या वॅळॅत मरीबायश्या घरा आलॅ. ते येताखोटी मरीबायनॅ दारुई बाठली, शाऊन आन बाजूला वाटीमिनॅ मिठा हाडॉन ठोविला. फरशानॅ शावनात दारु ऑतीली आन तॉंड वाकडा करीत एक कडवाट घोट मारलॉ. वाटीतनॅ थॉडा मिठा तॉंडाला लाविला आन शाऊन शिमापा दिला. पन शिमासा आज प्यासा मन नॉता. त्याआ तॉंड ऊतारलॉता. तॅनॅ शाऊन तॉंडा लाविला पन त्यात तॅला कय मजा वाटली नाय. फरशाआ ता लक्षात आला. पन तॉ कय बोयलॉ नाय दोनॅक शावनॅ गेल्योर शिमा रंगात येदे आहा तॅला वाटला. दोन शावनॅ खपले, तिहरा भरला तरी पन शिमा कॉपातसा तॉंड उतारलॅलास. आतॅ फरशाला रॅवाला नाय. शिमाई कयतरी भोठी भानगड अहली पाय आहा तॅला वाटला. भगून तॅनॅ शिमाला विसारला " कॉपात, मॅ तिगाळापासून बगीतॅ आज तुमसा तॉंड पडलॅला दिखातॅ. रॉजीकुमारी बरबर मारामारी जाले गा का? " शिमा कय बोयलॉ नाय. मुकाळॅ बंडीशा खिशातनॅ बिडीआ बंडाल काडला. तॅतनॅ एक बिडी काडली. मरीबायला सुलीतनॅ आग हाड्या हांगिली. तॅनॅ बिडी पेटविली. ता बगॉन फरशा आन मरीबायला नवाल वाटला. कारन शिमा दारु पेताना कते बिडी पेत नॉतॉ. ता बगॉन मरीबाय बोयली "कॉपात, आज तब्येत बरी नाय गा का?" त्याऑरती शिमानॅ बिडीऑ एक झुरकॉ घॅटलॉ आन बोयलॉ 'कॉपात तहा कय नाय रॅ! पन गॅल्या मयन्यात विंजारतनॅ बैल हाडलॉतॉ तॅनॅ मा सॉक्काट करे अहा दिखातॅ' 'अरे कॉपात! पन जाला का ता तरी हांगेदा गनाय?'

"फरशा कॉपात, तुमाला का हांगॉ? विंजारतनॅ गॅल्या मयन्यात बैल हाडलॉ ता तुमाला मायतीस हाय. तॉ खुटा काड्या लाविलॉ तॅ दोन फेऱ्यो मारल्यो गा ऊबी रॅतॅ, राटाला झुपीलॉ तरीसुद्दा दोन फेऱ्यो मारल्यो गा ऊबी रॅतॅ. नांगराला झुपीलॉ दोन ऑरॅ काडलॅ गा ऊबी रॅतॅ. गाड्याला झुपिलॉ फरलांगभर सललॉ गा ऊबी रॅतॅ. आतॅ माला हांगा या बैलाआ मॅ का करॉ? शिमा वैतागॉन बोयलॉ आन शावनातनॅ एक भोटॉ घोट मारॉन रिकामी शाऊन फरशापा दिला. फरशानॅ बाठलीशी दारु हळूहळू शावनात ऑतीली सावकाश घोट घॅटलॉ शाऊन खाला ठोविला आन शिमाला ॲका दमात हरेक शब्दोर जोर देत भोट्या आवाजात बोयलॉ 'बैल विक्यासॉ? त्योर शिमा बोयलॉ, 'तुमसा माथा फिरले गा का? गा तुमाला सडले? दोन दोन फेऱ्योर ऊबी रॅनारॉ बैल कुन विकात घॅनार?' 'त्याई तू कय काळजी करॉ नाका. तुऑ बैल विक्याशी जबाबदारी मा दरी लागली.' अहा बॉलॉन फरशानॅ शावनातसॉ शेवटसॉ घोट मारॉन शाऊन खाला ठोइला आन उठॉन ऊबी रॅलॉ. घारा जाता जाता फरशा कय बॉलात नॉतॉ पन बैल विक्याशी योजना तॉ मनामिनॅ ठरवितॉतॉ.

दुहऱ्या दिहा फरशा लवकर ऊठलॉ. तॉंड धोयला. शा पिलॉ. कपडे केले. बायकू जानूबायला मॅ येतॅ अहा बॉलॉन खानिवड्याशा दॉसता दरी गॅलॉ. अडश्यो तडश्यो गप्पा मारता मारता तॅनॅ शिमा कॉपातसॉ बैल विक्यासॉ हाय आहा दॉसताला हांगिला. दॉसतानॅ बैला करता गिराक हाय मनून कॉपातला हांगिला आन एक दोन दिआथ बैल बग्या येते हांगॉन फरशाई बोलवन केली.फरशानॅ ई बातमी शिमाला हांगीली पन तॉ कय खुश

जालॉ नाय. बैल कय कामाऑ नाय, तॉ कुन विकात घॅनार? ई काळजी शिमाआ मनात घर करॉन बेहलती. ती कय जादो तयार नोती. फरशा कॉपातनॅ काळजी कऱ्यासा काम नाय हांगॉन तॅला धीर दिलॉ.

चार दिहानॅ खानिवड्यासॉ दोसत ॲकाला घॅऑन फरशाआ घरा आलॉ. फरशा त्यांना घॅऑन शिमाआ घरा गॅलॉ. तडे त्याई बैल बगीलॉ बैल दिख्यादो मजबूत आन उमदो ऑथॉ. बगता खोटी त्याना तॉ पंसाद पडलॉ. घासाघिस हॉऑन किंमत ठरली. पन दोसत बोयलॉ "कामाचं काय? कामाला बैल कसा आहे? ई आयकता खोटी शिमाआ पॉटात फाळ पडलॉ. आतॅ आपलॉ व्यवार फिसकटनार अहा तॅला वाटला. पन तॉ कय बॉलॅ ऑडॅत फरशा बोयलॉ, "त्या बाबतीत काही बोलू नका. बैल घातल्या कामाला ऊभा असतो. नांगराला, गाडीला, मळनीला वा रहाटाला जोडला तरी बसत नाही. नॅहमी घातल्या कामाला ऊभा. दोसत बोयलॉ, "मग तर ठरलं. हे ठरल्याप्रमाणे पैशे घ्या मी बैल आजच घेऊन जातो." मग का? शाऊनाला शाऊन लागले. आन दोसत बैल घॅऑन मार्गा लागलॉ.

शिमाई बायकू जानूबाय आज खूश ओथी. खोट न घॅता बैल विकिल्याऑ आनंद तिया पॉटात मावात नॉतॉ. पन अडे शिमाआ पॉटात फाळ पडातॉते. आपून दोसताला फसविला ई रुकरुक तॅआ मनातनॅ जात नोती. तॉ मन हलका कऱ्यादो फरशाआ घरा गॅलॉ. तॅनॅ आपल्या मनाशी खदखद तडे ओतीली. फरशानॅ "कॉपात ई बगा तुमी ज्या दरनॅ बैल हाडलॉतॉ तॅनॅ तुमाला खॉटा हांगिला, तुमी दोसताला खॉटा हांगिला, दोसत पन बैल विकताना खॉटा बॉलनार. धंद्यामिनॅ अहा सलातॅ. तुमी कय काळजी करॉ नाका. घारा जाऑन मस्तपैकी निजा." अहा हांगॉन त्याई समजूत काडली.

दोन-शारदी गॅलॅ. पासव्या दिहा दोसत त्या माहनाला घॅऑन सरळ फरशाआ घारा गॅलॉ आन भोट्याये आवाज करीत बोयलॉ, 'कॉपात तुम्ही मला फसवलं. कामाच्याबाबतीत खोटं सांगून बैल माझ्या गळ्यात मारला. 'त्योर फरशा बोयलॉ, 'मी काय खोटं बोललो. 'तुम्ही मला सांगितले ना की, बैल घातल्या कामाला ऊभा म्हणून" तॉस शब्द पकडॉन फरशा बोयलॉ "मग बरॉबर आहे ना? रहाटाला जोडला अन् दोन फेऱ्या मारल्या की तो ऊभा राहतो की नाय? नांगरनी करताना दोन ओढे घेतले की तो ऊभा राहतो की नाय? मी तर तेच सांगितले की आमचा बैल घातल्या कामाला ऊभा असतो म्हणून. आपल्याला शब्दात फसविला याई तेला जानीव जाली आन तॉ बॉल्यासॉ बंदूस जालॉ. थॉड्या वॅळानॅ फरशा तॅला बोयलॉ "तुम्ही हा बैल विकून टाका. कोनी विचारले तर त्यांना सांगा... बैल घातल्या कामाला ऊभा... दोसत आन त्याआ बरबरसॉ माहनु ॲका सुरात बोयले...

थॉड्या दिहानॅ दॉसताऑ माहनू फरशा कॉपातला मशाआ बाजारा भॅटलॉ. तॉ बोयलॉ "कॉपात, मी बैल विकला... घातल्या कामाला ऊभा सांगून!

ई कथा वासनाऱ्या कॉपात मंडळी, तुमाला मॅ हांगातॅ तुमी बैल विकत घॅताना कुनी तुमाला हांगिला की आमसॉ बैल 'घातल्या कामाला उभा' गा तडे तुमी उबी रॅऑ नाका. नायतॅ तुमी पन फशेद्या आन तुमाला कुन फरशा कॉपात हांगडॉ मित्र भेटनार नाय..!

# नाळ वसई गोव्याची -- डॉ नॅन्सी विन्सेन्ट डिमेलो (PHD, LLB) गास, वसई.

"उंच उंच नारळाची झाडे, सुंदर समुद्रकिनारे, सुंदर भव्य चर्चेस, पुरातन मंदिरे सारं कसे सगळं वसई सारखेच आहे ना ? वसईपासून दूर गोव्याला आलो आहोत असे वाटतच नाही ना ?" असे उदगार गोव्याच्या भटकंतीत वसईकरांच्या मुखातून सहज निघताना आढळतात. वसई व गोव्यातील सारखेपणा वा साधर्म्यभाव ह्या भावनेस कारणीभूत असून, शेकडो वर्षापूर्वीच्या गोवा वसईच्या ऐतिहासिक नातेसंबंधात ह्याचे गूढ दडलेले आहे.

साडेचारशे वर्षांपूर्वी आपल्या वसईकरांनी पोर्तुगीजांच्या पूर्वेकडील साम्राज्याची राजधानी असलेल्या गोव्याच्या निर्मितीत फार मोलाची कामगिरी केली आहे. १५२८ साली वसई जिंकणाऱ्या नुनो द कुन्ह्या यांची नेमणूक गोव्याचा गव्हर्नर म्हणून झाली. नुनो द कुन्ह्या याने अनेक वेळा दीववर आरमारी हल्ले केले, पण प्रत्येक वेळी ते अपयशी ठरले. अपयशानंतर प्रत्येक वेळी गोव्याला माघारी जाताना पोर्तुगीजांनी नियमितपणे चिखली, तारापूर, अर्नाळा, वसई, ठाणे या बंदराची व गावांची लुटालूट केली, जाळपोळ केली. इतका विध्वंस करुन ते थांबले नाहीत तर गोव्याला परत जात असताना त्यांनी मोठ्या प्रमाणात माणसे पकडून युध्दकैदी म्हणून गोव्याला नेली व त्यांना कामाला जुंपले.

तदनंतर सन १५३३ मध्ये पोर्तुगीज नाविक दलातील एक अधिकारी डायगो सिल्व्हेरा याने वसईवर हल्ला करून लुटालूट व जाळपोळ केली. वसईतून त्यांनी चार हजार लोकांना युद्धकैदी म्हणून ताब्यात घेतले, तदनंतर त्यांची रवानगी गोव्याला करण्यात आली. वसईतील या युद्धकैदी लोकांचा वापर पोर्तुगीजांनी गोव्यातील चर्चेस व मठ उभारण्यासाठी केला. त्याकाळात वसईत रंगाने ग्रेनाइटसारखा लालसर, ऊनपावसाला तोंड देणारा, सलग दहाबारा फुट असणारा एक ठराविक प्रकारचा खडक (दगड) मिळत होता. ह्या खडकाचा महाकाय पर्वत वसईतील बेणेपट्टी मर्सिसपासून उत्तन डोंगरीपर्यंत पसरलेला होता, ह्या खडकाला 'पोशीपीर' असेही म्हणतात. हा प्रचंड पर्वत फोडून त्याचे भलेमोठे दगड जहाजांच्या साह्याने व निग्रो गुलामांच्या साह्याने वसईच्या किनाऱ्याला किल्ल्याची उभारणी करण्यासाठी आणले गेले. तसेच गोव्याला मोठ्या जहाजांमधून हे दगड नेण्यात आले. ह्या दगडांचा वापर पोर्तुगीजांनी वसई किल्ल्यातील चर्चेस, मठ व इतर इमारतीच्या बांधकामासाठी केलाच पण त्यांनी गोव्यातील मोठमोठी चर्चेस व मठ बांधण्यासाठी सुध्दा ह्या दगडाचा वापर केला.

वसईतून युद्धकैदी म्हणून नेण्यात आलेल्या लोकांचा वापर मोठ्या प्रमाणात चर्चेस उभारण्यासाठी करण्यात आला. वसईतील गवंडी, पथारवट, सुतार व इतर कारागिरांनी ही गोव्यातील ख्रिस्तमंदिरे उभारली. अशाप्रकारे वसईकर लोकांनी वसईच्या दगडांनी गोव्यातील चर्चेस बांधली. वसई गोवा ह्या दोन्ही ठिकाणची महामंदिरे वसईतील कारागीरांनी उभारली आहेत त्यामुळे दोन्ही ठिकाणच्या चर्चेस मध्ये बाह्य स्वरूपात तरी बऱ्याच प्रमाणात साम्य दिसून येते. वसईतील पोर्तुगीज उमरावांच्या बायका अतिशय दानशूर होत्या त्यांनी

गोव्यातील सेंट मॉनिका कॉन्व्हेटच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात मदत केल्याचीही नोंद इतिहासात सापडते.

पोर्तुगीज काळात वसईची धार्मिक जबाबदारी मिशनरी संघटना व गोवा धर्मप्रांत या दोन स्वतंत्र घटनाकडे होती. १७३९ साली चिमाजी आप्पांच्या विजयानंतर ह्या मिशनरी संघटना बंद झाल्या त्यामुळे वसई हे गोवा धर्मप्रांताला जोडण्यात आले. त्याकाळी वसईतील लोक जरी धर्माने ख्रिस्ती झालेले असले तरी त्याचे राहणीमान भारतीय संस्क्रुतीप्रमाणे होते. या काळात वसईतील धार्मिक बाबीवर नियंत्रण ठेवणारी 'पाद्रोआदू' नावाची एक पोर्तुगीज संघटना होती. ह्या संघटनेद्वारे वसई भागात पोर्तुगीज संस्कृती व संस्था जिवंत ठेवण्याचा प्रयत्न पोर्तुगीजाद्वारे चालू होता. स्थानिक ख्रिस्ती लोकांनी ह्याला विरोध करण्यास सुरवात केली. वसईतील स्थानिक ख्रिस्ती लोक गोवा या धर्मप्रांतामध्ये राहण्यास तयार नव्हते. त्यामुळे वसईच्या ख्रिस्ती लोकांनी मुंबईचा गव्हर्नर मेजर जनरल विल्यम मेडोस याकडे अर्जही केला होता. वसई येथील ख्रिस्ती लोकांना गोव्यातील बिशपांचे नियंत्रण नको होते आणि त्याबद्दल मराठा सरकारही नाखूष होते. १९३६ पूर्वी वसईतील तरुणांना धर्मगुरुपदासाठी तयार करण्यासाठी मुंबईत गुरुविद्यालय (सेमेनरी) नव्हते, त्यासाठी त्यांना गोव्याला पाठवावे लागे. अशा प्रकारे वसईतील स्थानिक ख्रिस्ती लोकांच्या एक दशकाच्या प्रखर धार्मिक संघर्षानंतर वसई भाग १९२८ साली मुंबई ह्या धर्मप्रांतात करण्यात आला.

गोवा व वसई दोन्ही ठिकाणी धर्मांतरीत ख्रिस्ती असून त्यांच्या चालीरीती, संस्कृती व भाषा यांत भारतीय संस्कृतीची झलक दिसून येते अर्थात दोन्ही ठिकाणी पोर्तुगीज वा भारतीय संस्कृती संमिश्ररित्या दिसून येते. दोन्ही ठिकाणच्या बोलीभाषेवर पोर्तुगीज भाषेचा बराच परिणाम अद्यापही दिसून येतो. माय, पाय, पाद्री, पदरीन, मदरीन, फिल्यात, कॉमसार, भैरमाव, पिरसाव, तिजाल, सुशेगात इ. पोर्तुगीज शब्द सहजपणे अद्यापही दैनंदिन व्यवहारात वापरले जातात.

वसई पोर्तुगीजांच्या जगातील सर्व वसाहतीमध्ये अधिक वैभवसंपन्न होती. पोर्तुगीज काळात वसईहून तांदूळ आणि भाजीपाला भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या सर्व पोर्तुगीज वसाहतींना नियमितपणे पुरवला जात होता. गोव्यालाही वसई अन्नधान्य, भाजीपाला यासारख्या जीवनोपयोगी वस्तू देखील पुरवीत होती थोडक्यात गोव्यातील लोकांची वसईत अन्नदात्री होती. सुरवातीच्या काळात शेतीव्यवसाय करण्यासाठी नव्हे तर गोवेकरांना शेतीव्यवसाय शिकविण्यासाठी पोर्तुगीजांनी वसई परिसरातून मोठ्या प्रमाणात माणसे गोव्याला नेली. त्यापैकी सर्व जण त्या ठिकाणी स्थायिक झाले व 'तुला-मला' संस्कृतीचे रूपांतरण 'तुका-माका' संस्कृतीत झाले. त्यामुळे खरे वसईकर गोवेकर झाले.

# रेणुका - अझम्प्शन लोपीस

खूप दिवसांपासून मनात येत होतं पण हिंमत होत नव्हती. एकदा हिंमत करून विचारलंच : तुमचं नाव काय? ती म्हणाली, "रेणुका. छान आहे ना?" मनातली भिती काढून हसत मी म्हटलं "हो". खूपच छान आहे." तिला जेव्हा कधी मी पाहिलं ती श्रृंगाराने परिपुर्ण वाटायची. तिच्या केसांचा मोठा अंबाडा त्यावर सजावट केलेली त्याभोवती नेहेमीच गजरा नाहीतर एखादी फुलांची वेणी तरी गुंडाळलेली. लांब पण आकर्षक कानातील जोड. गळयामध्ये मंगळसूत्र आणि इतर दागिने कधी मोत्यांच्या माळा. साडी व्यवस्थित नेसलेली पण पोट मात्र बरंच उघडं. ती फार उंच असल्यामुळे कदाचित तिला साडी पुरत नसावी. हातात बांगडया गच्च भरलेल्या. कपाळावर नेहेमी साडीला साजेशी टिकली. तोंडाला व्यवस्थित लाली पावडर केलेली. पायात कोल्हापूरी चपला. तिच्या बहूतेक साडया हया कॉटनच्याच असायच्या. सावळा रंग आणि धिप्पाड देह. नेहेमीच सुंदर स्मितहास्य हे तिचं वैशिष्टय. ती एक तृतीय पंथ होती.

तिला शांत आणि गप्प मी कधीच पाहीलं नाही. ती सतत बोलायची कादाचित तिचं दूःख हलकं करायची. ती प्रतिक्रियेची अपेक्षा करायची नाही. ती कोणाला ओळखत असो वा नसो पण आपुलकीने आणि मनापासून विचारपूस करायची. सगळया बायांच्या आणि मुलींच्या डोक्यावर हात ठेवायची. कुणी तिला पैसे देवो अगर न देवो तिचा प्रवास चालूच असायचा. एका बाईने तिच्या हातावर एकदा **10** रूपये ठेवले. ते बघताच ती लगेच म्हणाली किती देवू परत? त्या बाईने हसून काहीच नको देवू म्हणून खुणावलं. रेणुकाही समाधानाने हसली. तिला कधीच पैशांची हाव नाही.

आयुष्यात भयंकर दुःख असताना ती कधीही हसायला आणि इतरांना हसवायला विसरली नाही. कुणी तरूण मुलगी मोबाईलवर बोलताना पाहीली की म्हणायची, "काय गं बॉयफ्रेंडबरोबर मारतेस का गप्पा?" आईवडीलांना माहीत आहे का? त्यातून ती सगळया गोष्टी आईवडीलांना सांगत जा असं अप्रत्यक्षपणे सांगायची. कुणी छोटं बाळ आईबरोबर पाहीलं की म्हणायची "त्राश नाही दयायचा हं आईला बाळा." नकळत लहान मुलांवर संस्कार करायला नाही विसरायची. मध्येच कोणाला तरी विचारायची "काय गं कशी दिसते आज मी?" इतरांकडून स्वतःची स्तुती करून घ्यायलाही तिला आवडायचे. रेणुका कधीतरी नऊवारी साडी नेसायची आणि त्यात तर ती अजूनच उठून दिसायची. एकदा तिने नऊवारी साडी सहावारी पद्रधतीने नेसल्याचे मला आढळले म्हणून मी तिला तसे विचारलेही तर ती बिनधास्तपणे म्हणाली "नऊवारी साडी नेसायला फार छान पण शौचाला फार त्रास." तिच्या या बोलण्यावर मी खळखळून हसले होते.

ती मला फक्त रेल्वे प्रवासात कामावरून घरी येताना भेटायची आणि तीही एका स्टेशनसाठी. गाडीतून उतरले की मी सुदधा गर्दिच्या ओघात निघून जायचे. पण इतक्या कमी वेळात तिच्यावरची नजर कधी हटली नाही. ती मला फार आवडायची. तिचं बोलणं तर फारचं स्तुत्य होतं. तिच्या वैयक्तिक आयुष्याबददल मी कधीच विचारले नाही आणि नाही मला त्याची कधी गरज वाटली. तिला बघून नेहेमी एक प्रश्न पडायचा. हिच्या आयुष्यात असंख्य वेदना असताना ही कशी काय समाधानी आणि हसरी असते ? रेणुकाचा आणखी एक गुण म्हणजे ती खूप न्यायप्रिय होती. एकदा एक अंध भिकारी **7** ते **8** वर्षाच्या

मुलाला घेऊन रेणुकाबरोबर गाडीत चढला तो भिक मागत गर्दिच्या ठिकाणी पोहोचला. तेव्हा एका बाईने त्याला फटकारून म्हटले "अरे ए कुठे चाललास. एक तर इकडे उभे राहायला जागा नाही आणि कुठे घुसतोस मध्ये ?" हे शब्द ऐकताच रेणूकाचा पारा चढला आणि ती लगेच त्या बाईला म्हणाली "तुम्हाला दिसत नाही का त्यांची लाचारी ते इतरांवर अवलंबून आहेत म्हणून तुम्ही त्यांचा अपमान करता का जरा माणुसकी जपा. देवाने तुम्हाला चांगलं आयुष्य दिले आहे म्हणून हिणवता का तुम्ही त्याला?" रेणुकाच्या या शब्दातून मला तिची व्यथा जाणवली. तिला हयापुर्वी इतकं चिडलेलं कधीच पाहीलं नव्हतं. पण तिचंही म्हणणं बरोबर होतं. एखादया माणसाचे दुःख आणि वेदना समजण्यासाठी त्यांच्या जागेवर जाऊन पाहावं लागतं. दुरून बोलणं सगळयांनाच सोपं असतं.

आपल्याला देवाने चांगले आयुष्य दिले आहे त्याचा सदुपयोग करण्याऐवजी आपण तक्रार करत असतो का नेहेमी... तर मग रेणुका आणि तिच्या स्थितीत असलेल्या लोकांनी काय करावे हा प्रश्न खरा तर आपणा प्रत्येकाला पडायला हवा. आपलं छोटंसं दुःख आपण डोंगराएवढं करतो तर मग हया माणसांनी आपल्या आयुष्यात किती तक्रारी कराव्यात ? रेणुका ही एक प्रतिनिधी आहे दुःखावर मात करत जगर्णाया व्यक्तींची. तृतीयपंथ असलेल्या व्यक्तीला आपल्या समाजात काय स्थान आहे त्यांचं अस्तित्व स्वीकारून आपण त्यांना सन्मानाने जगू देतो का ? तेही आपल्यासारखी माणसे आहेत मग त्यांना आपण शिक्षण नोकरी हया नेहेमीच्या जीवनपद्रधतीपासून का वंचित ठेवले आहे? ते धडधाकट असताना सूद्रधा त्यांना कुणी का नोकरी देत नाही ? त्यांच्याबद्रदल मनात बरेच प्रश्न निर्माण होतात. पण आपला समाज ही उत्तरे देवू शकतो का ? माझ्या बी.एस.डब्ल्यूच्या शेवटच्या वर्षात एक सेमिनार पेपर मला तयार करायचा होता. आणि आमचा विषयही समलैंगिक व्यक्तींच्या प्रश्नांशी संबंधित होता. हयासंबंधी जास्त माहीती मिळवण्यासाठी आम्ही सांताक्रूझ येथे असलेल्या हमसफर ट्रस्ट हया संस्थेमध्ये गेलो होतो. ही संस्था अगदी अभिमानाने हया तृतीयपंथीयांद्रवारे चालविली जाते. ते आंतरराष्ट्रीय पातळीवर लावणीच्या स्पर्धेत भाग घेतात. एखादी लावण्यवतीही सजणार नाही इतक्या सुंदरतेने त्या सजतात आणि नृत्यही करतात. ते सर्वजण स्वावलंबी आणि स्वाभिमानी आहेत त्याना पाहून मनात एक स्फुर्ती निर्माण होते.

हया विषयावर लिहावं तितकं थोडं आहे. मला वाटते की आपण त्यांचं अस्तित्व नाकारून चालणार नाही. त्यांना जे काही मिळालं ते नैसर्गिक आहे. आपण त्यांना न हिणवता आदराने आणि सन्मानाने आपल्या समाजातील एक घटक म्हणून स्वीकारणे गरजेचे आहे. त्यांच्या दुःख आणि वेदना आपल्याला कधीच समजू शकणार नाहीत पण त्यांना तुच्छतेने वागवून त्या वाढवण्यासाठी आपण जबाबदार ठरू नये. आपण त्यांना मदत करू शकत नसू तर कमीत कमी दूःखवू तरी नये असे माझे प्रांजळ मत आहे. मला आठवतं, लहाणपणी हया व्यक्ती दारावर आल्या की घरातली मोठी माणसे दार लावायला सांगून त्यांच्याबद्रदल मनात भिती निर्माण करायचे. पण का कुणास ठाऊक मला त्यांची भिती नाही वाटायची मी दाराआडून त्यांना पाहायचे. आज त्यांना पाहील्यावर असं वाटते की त्यांना आपण दया किंवा सहानुभूती दाखवू नये तर आपल्यासारखेच तेही सामान्य व्यक्ती आहेत असे स्वीकारून त्यांना तुच्छ नजरेने पाहू नये. रेणुका ही मला नेहेमीच स्फुर्ती देणारी आहे. तीच स्फुर्ती आपणापर्यंत पोहचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न मी करतेय. अशाच अनेक रेणुका आपल्याला भेटल्यास आपण त्यांच्याकडून स्फुर्ती घेऊन त्यांना दुखावणार नाही हीच अपेक्षा.

# श्रद्धा आणि विवेक – **नोबेल मेन**

पोप फ्रान्सिस ह्यांनी १९९८ मध्ये 'श्रद्धा व विवेक' हे एक परिपत्रक लिहिले आहे. श्रद्धा आणि विवेक ह्यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. हे पोप महाशयांना जगाला पटवून दयायचे आहे. हे परिपत्रक समजण्यास कठीण किंवा क्लिष्ट आहे. पोप सांगतात की आपली श्रद्धा किंवा विश्वास किती भक्कम किंवा मजबूत आहे हे आपण देवाने दिलेल्या ज्ञानाचा, सदसदविवेक बुद्धी कशा प्रकारे चांगला वापर करतो ह्यावर अवलंबून आहे.

श्रद्धेला जर चांगूलपणाची, विवेकाची, नितीमत्वा जोड नसेल तर ती श्रद्धा पोकळ असू शकते व त्यामुळे अंधविश्वास वाढू शकतो. तसेच केवळ आपण विवेकबुद्धीवर अवलंबून असू व देवावर श्रद्धा, विश्वास नसेल तर आपण सापेक्षवादाकडे वळू शकतो. म्हणजे कुठलेली अंतिम साथ नाही किंवा देव, स्वर्गराज्य, तारण, मुक्ती हे अंतिम साथ नाही यावर आपला विश्वास बसु शकत नाही. हया केवळ आपल्याला कल्पना वाटू लागतील.

पोप म्हणतात की मनुष्याने सतत प्रश्न विचारले पाहिजेत. माझ्या जीवनाचा अर्थ काय? मी कोण आहे? मला कुठे जायचे आहे हे मूलभूत प्रश्न आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. जेव्हा आपण असे प्रश्न विचारतो तेव्हा आपण अंतिम साथ जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. येशूने सांगितलं आहे की 'साथ जाणुन घ्या' साथच तुम्हाला मुक्त करेल| हे साथ जाणून घेण्याच्या प्रवासात 'श्रद्धा व विवेक' हया मध्ये कधीच स्पर्धा असू शकत नाही, देव हया दोन्ही गोष्टी आपणाला सारख्याच प्रदान करतो. विश्वास असूनदेखील एखादया गोष्टीचे फळ आपल्याला मिळत नाही कारण आपण विवेकबुद्धीचा वापर केलेला नसतो. धर्मातील पवित्र पुस्तकांचा अर्थ समजून घेण्यासाठी तसेच त्यामधील काव्य, इतिहास, परंपरा, भाषा, साहित्य, बोधवचने, चमत्कारीक घटना, संस्कृती ह्यांचा योग्य वापर सद्यस्थिती करण्यासाठी आपल्याला विवेकाची गरज लागते. विश्वास व श्रद्धा हे देवाने दिलेली देणगी आहे. अगदी सुरूवातीपासून किंवा आपल्या जन्मापासून आपल्यापासुन विश्वासाची बीज रोपली गेलेली आहे.

भक्तीद्वारे, प्रार्थनेद्वारे हा विश्वास घटत होत जातो. तसेच सदसद विवेक बुद्धीचा देखील विकास वयोमानानुसार होत असतो. प्रथम विश्वास ठेवावा लागतो. त्यानंतर ज्ञान मिळवावे लागते. ज्ञानामुळे माणूस शहाणा होते. विवेकबुद्धीचा वापर करून योग्य निर्णय घेण्याची क्षमता प्राप्त होते. श्रद्धा व विवेक जरी आपल्या देणगीच्या रूपाने मिळालेले असले तरी त्याची जडणघडण करावी लागते| विवेकाच्या नाश न होणार *याची काLजी घ्यावी लागते| रोमकरास पाठवलेल्या पत्रात, अध्याय १: २१-३२मध्ये संत पौल सांगतो काहींनी विवेक सोडून दिला व त्यामुळे ते देवाचे अस्तित्व नाकार लागले| त्यांची श्रद्धा पोकळ झाली व ते मुर्ख बनले व त्यांनी जीवंत देव बदलला व चुकीच्या देवाच्या मागे लागले| म्हणजे नाश होण्यास विवेकबुद्धीचा वापर न करणे हे कारण ठरले. विवेकाला 'देवाने दिलेले शहणपण' म्हणजे हा शब्द उचीत आहे| ही विवेकबुद्धी केवळ एखाद्या समाजाला, जातीला वर्गाला दिलेली आहे. येशूला भेटायला आलेल्या 'मागी' राजांना ही बुद्धी होती त्याच प्रमाणे मेंढपाळ व शेतकरी ह्यांना होती.

# मुलांच्या तारूण्यांतील पालकाच्या विवंचना – **डॉ. ट्रिजा परेरा, आगाशी**

आज तंत्रज्ञानाच्या जगात मानवाने मोठया प्रमाणात प्रगती केली अन् तंत्रज्ञानाच्या साहाय्याने आपले जीवन सोपे केले आहे. आपल्या गरजानुसार मानवाने तंत्रज्ञानामध्ये नॅनो तंत्रज्ञान, सॅटेलाईट तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञानाइत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा शोधू लावून दैनंदिन जीवनात जीवन मान उंचाविणा-या वाटचाली स्विकारल्या आज हे तंत्रज्ञान तितके विकासाच्या मार्गाने घेऊन चालले तितकेच अधोगतीच्या मार्गाकडे झुकलेले दिसुन येत आहे. तंत्रज्ञानाने कौटुंबिक संवाद, शांती आणि सौहार्दाचे वातावरण नष्ट होत चालले आहे.

तंबाखूमुक्त, नशामुक्त, पोलिओमुक्त अशा शासनाने अभियानाबरोबर मोबाईल मुक्तीचे अभियान राबविण्याची निकड भासू लागली आहे. मोबाईलचे व्यसन लागलेल्या तरूणाईला थांबविणे कठीण जात आहे. मोबाईल, कम्प्युटर, लॅपटॉप, आयपॅडच्या अधिन गेलेल्या तरूणाईला खान-पान, कौटुंबिक व सामाजिक बांधिलकीचे भान ठरले नाही. वैतागलेली, कंटालेली, ग्रासलेली, अबोल झालेली तरूणाईमुळे पालकांच्या विवेचना वाढल्या आहेत. पालक हतबल झाले आाहेत. मुलांचे व्यक्तीमत्व फुलविणे घडविणे ह्यासाठी मुख्य पाया म्हणजे कुटुंब संस्था असून एक संस्कारक्षम व्यक्तीमत्त्व बाहेरच्या जगाला सामोरे जाण्यासाठी पंखात बल देण्याचे संपूर्ण कर्तव्य पालकाचे असल्याने सतत चिडचिडा काहीच एकूण न घेण्याच्या मनस्थितीतील आपल्या तरूण मुलांना बघुन पालक तणावाखाली जात आहे.

प्रत्येक पालक आपल्या स्वत:च्या जीवनातील विकास, प्रगती किंवा उत्कर्षाकडे झेपावत असताना आपल्या पाल्यांच्या मनात आणि वृत्तीत प्रगतीकडे जाण्यासाठी अथवा उत्कर्षाकडे झेपावण्याची जिद्द निर्माण करण्यात समाधान किंवा धन्यता मानत असतो. परंतु पालकांना त्या बाबतीत खूप कमी वाव ठरला आहे. पालक बालक ही भावनिक आपुलकी लोप पावत आहे.

घरातून निघालेली तरूण मुले नेमकी त्यांच्या शिक्षणसंस्थेत पोहचतीलच ह्याची खात्री उरली नाही. परवाच वसई स्टेशनला काही कामानिमित्ताने गेली असता, ट्यूशन क्लास चुकवुन टी बारमध्ये सिगारेट ओढत बसलेल्या मुलांना रंगेहात पकडलेल्या एका आईचा त्रागा पाहून मन सुन्न झाले. आई पाणावलेल्या डोळयांनी आपल्या मुलाला जाब विचारत होती. तुझ्यासाठी कष्ट, परिश्रम करण्यासाठी दिवसभर आम्ही दोघे बाहेर असतो. तुझे भवितव्य घडावे, तू उच्च शिक्षित व्हावा म्हणून दिनरात मेहनत करतो आणि तू आपले क्लास चुकवुन असले फाजील धंदे करतोस. आईचा त्रागा शिगेला पोहचला होता. उलटपक्षी मुलगा ओरडून आई चूप बस, आवाज वाढवू नकोस, आई आवर घाल तुझ्या बोलण्याला नाहीतरऽऽ नाहीतर असे दटावून बोलत होता. आईला नाईलाजाने आपले तोंड बंद ठेवणे भाग पाडले. म्हणजे मुलांनी कोणतेही कसेही वर्तन केले तरी आज मुलांच्या वर्तनावर आवर घालण्याची हिंमत राहिली नाही. मुलांना जाब विचारायचा म्हणजे मोठे धाडस करावे लागते. रात्री उशिरापर्यंत मोबाईलवर असलेल्या मुलांला त्याच्या वडिलांनी थोडे कडक शब्दात खडसावल्याबद्दल मुलांनी पुढचे शिक्षण अर्धवट सोडण्याचा निर्णय वडिलांना सुनावला, वडिल बिचारे भाबडया शब्दाने मला हे सांगताना अक्षरश: हुंदके देत होता, माझ्या मुलावर मी हक्काने मर्यादा घालू शकत नाही. तो

खूप लाडावला आहे. मी जास्त काही बोललो तर तो जीवाचे बरे वाईट करील असे माझी पत्नी मला सुनावित असते.

खूप कष्ट अन् परिश्रमाने शिकविलेल्या एकुलत्या एक मुलाचा अमेरिकेला जाऊन रहाण्याचा निर्णय ऐकताच धक्का बसलेला एक बाप म्हणाला तू आमचा विचार न करता, कोणत्याही कर्तव्याची जाण अथवा माता-पिता सेवेची बांधिलकी न मानता परस्पर निर्णय घेतला आहेस, तर आमच्या मृत्यूची बातमी आल्यास येण्याची घाई करू नकोस. समाजात एक ना अनेक उदाहरणे अशी आढळतात. इंग्रजी शिक्षणासह पाश्चिमात्य संस्कृतीही तितकीच कौटुंबिक कलह वाढविण्यास जबाबदार ठरत आहे. जेवणापासून कपडयापर्यंतच्या गोष्टी ऑनलाईन मागविणा-या दोन मुलीचा बाप आपल्या भावना व्यक्त करीत असताना सहज बोलून गेला, मुलगे असते तर कानपाठून धारेवर घेतले असते. मुलीला काय व कसे बोलावे ते कळत नाही पण ऑनलाईन खरेदी चालूच असते, मी फक्त पैसे देण्याचा मालक बाकी कोणतीही चर्चा अथवा होकार न घेता फक्त आणि फक्त पैसे पुरविण्याचा ‘बाप’ म्हणून ठरलो आहे.

तरूणाईतील स्वैराचाराला आवर घालण्यास पालक असमर्थ ठरत आहेत. मुलाच्या गैरहजेरीविषयी अधिक चर्चा करण्यासाठी आपले पालक महाविद्यालयात पोहचल्याची चाहूल लागताच मुलाने आत्महत्या केल्याचीही उदाहरणे समाजात आहेत. फसवणूक करणे, खोटे बोलणे, थापा मारणे ही गोष्ट आता सहज आढळते. पालकांच्या डोळयात धूळफेक करून पालकांना फसविले जाते. पालक आणि मुलांतील वैचारिक दरी वाढत असल्याने कुटुंबात संघर्षाचे वातावरण तयार झाले आहे.

कुटुंबातील निर्माण झालेले विसंवादाचे वातावरण सुधारविणे आवश्यक आहे. तरूणाईला अधात्माकडे वळविणे ही काळाची गरज आहे. कौटुंबिक आरोग्यदायी चर्चा होणे महत्त्वाचे आहे. मुलांची ऐकण्याची कुवत वाढविणे आवश्यक आहे. परंतु पालकांनी फक्त ‘वक्ता’ न बनता, मुलांच्या मनाला वाव द्यावा. मुलांना व्यक्त होऊ दया. व्यावहारीक चर्चेत मुलांना सहभाग दया. त्याची मते पटो अगर न पटो पण त्यांना प्रतिक्रिया व्यक्त करण्यात संधी द्या. पालकांनी आग्रही भूमिका न घेता, सहजतेने निर्णय घ्यावेत, आईवडिल आणि तरूण मुले ह्याच्यातील पीळ कमी करण्यासाठी आपले अधिकार हस्तांतरित करावेत. मानसशास्त्र म्हणते की मुले मोठी झाली की त्यांना विशेष भूमिका घेण्यासाठी अधिकार प्राप्त होणे आवश्यक आहे| अर्थात् कुटुंबातील ‘सुसंवाद’ पोषक वातावरण निर्माण करू शकते.

# हिंदोळा आठवणींचा - ॲलेक्स मच्याडो, 7208161213

मला आठवतंय. खूप पूर्वी म्हणजे आम्ही लहान असताना मुंबईहून किंवा इतर कुठून लांबची पाहुणेमंडळी घरी आली की आम्हाला त्याचं खूप अप्रूप वाटायचं. आणि त्या मंडळीला अप्रूप वाटायचं आमच्या ओटीवर टांगलेल्या हिंदोळयाचं. हिंदोळा दिसला की त्यांच्याबरोबर असलेली बच्चेकंपनी खूष व्हायची आणि धावत जाऊन हिंदोळयाचा ताबा घ्यायची.

अगदी लहानपणापासूनच ह्या हिंदोळयाने आमच्या जीवनाचा एक कोपरा कायम काबीज करून टाकला आहे .जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर ह्या हिंदोळयाची सोबत आम्हाला लाभली आहे. रोज शाळेत जायच्या अगोदर ह्या हिंदोळयावर बसूनच आमच्या अभ्यासाची सुरुवात व्हायची. सकाळची कोवळी ऊन्हं अंगावर घेत समोरच्या बालभारतीतून गिरवलेले धडे अजूनही मनात जीवंत आहेत.

म्हणूनच हिंदोळयाच्या झोक्यावर मन कधीकधी झुलू लागतं आणि सुरू होतो एक न संपणाऱ्या आठवणींचा प्रवास....

अतिशय कुशलतेने लाकडी फळया एकमेकांना जोडून तयार झालेला एक मोठा आयाताकृती लाकडी तुकडा, त्या तुकड्याच्या चार किनाऱ्यावर घट्ट बसवलेल्या आणि थोड्याशा ऊंच लाकडी पट्ट्या , चारही कोपऱ्यामध्ये बसवलेल्या वाट्या, ( हया कधी लोखंडी तर कधी पितळेच्या असत) , ह्या वाट्यांमधून बाहेर आलेले गोलाकार हुक्स आणि वर छप्पराच्या लाकडी खांबाला ( बाल ) बसवलेल्या लोखंडी पट्टीमध्ये अडकवलेलं एक टोक आणि दुसरं टोक वाटीमधून बाहेर आलेल्या हुकमध्ये अडकवून तो लाकडाचा तुकडा जमिनीपासून दिड दोन फुटांवर अधांतरी टांगवून ठेवणारा इंग्रजी S आकाराचा लांबलचक लोखंडी तुकडा. ह्याला कडी म्हणत. ह्या लोखंडी कडीच्या आधारावर अधांतरी झुलणारा लाकडी तुकडा म्हणजे हिंदोळा. ह्या हिंदोळयाच्या समोरच्या बाजूला छपराच्या लाकडाला बांधलेला ,ठराविक अंतरावर गाठी मारलेला आणि शेवटी हमखास कापडाच्या चिंधीचं एक्स्टेंशन जोडलेला सुंभाचा तुकडा सोडलेला असायचा. ह्याला आमच्या कादोडी बोलीभाषेत 'हॅपाॅ' म्हणत. हिंदोळयात बसून मागेपुढे झोके घेण्यासाठी ह्या सुंभाचा ऊपयोग होई.

काही हिंदोळे एकदम गुळगूळीत तर काही जरासे खडबडीत. पण दोन्हीवर बसून झोके घेण्याची मजा मात्र सारखीच.

हिंदोळयाच्या कडेवर हात ठेवून मागे पुढे हिंदोळयाला वेग द्यायचा आणि हिंदोळयाने वेग घेतला की आपलं पोटापर्यंतचं शरीर वेगाने पुढे येणाऱ्या हिंदोळयावर झोकून द्यायचं आणि त्याच अधांतरी

अवस्थेत  हिंदोळ्याबरोबर मस्त मागेपुढे झुलत राहायचं हा आमच्या बालपणीचा एक थ्रिलींग खेळ. खूप मजा वाटायची.

हिंदोळ्यामध्ये अंथरलेल्या मांडुल्याच्या अंथरूणामध्ये पहुडलेलं तान्हं बाळ आणि त्याच्या बाजूला बसलेली माहेरवाशिण हे दृष्य किती लोभस दिसायचं. त्या सौंदर्यात भर पडायची ती रंगीबेरंगी कापडाच्या, हातांनी विणलेल्या मांडुल्याची. ह्या मांडुल्यांच्या चारही बाजूला रंगीबेरंगी कापडाच्या त्रिकोणी तुकड्यांची झालर खूपच सुंदर दिसत असे. ह्या मांडुल्यामध्ये जणू ते विणणारीने  आपली मायाच अ◌ोतून दिली असावी. कधी कधी आम्ही बच्चेकंपनी हिंदोळ्यामध्ये कोंडाळं करून त्या तान्ह्या बाळाशी खेळत बसत असू.
वडीलधाऱ्या  मंडळीसाठी हिंदोळा म्हणजे एक खास  स्थान. वाडीतून किंवा कामावरून थकून भागून आलेली ही मंडळी न चुकता हिंदोळ्यामध्ये बसणार आणि दोनचार झोके घेणार. जणू ह्या दोन चार झोक्यांनी त्यांचा सगळा थकवा, शिण दूर होत असे. कधी कधी घरी आलेल्या पाहुणे मंडळीच्या पाहुणचाराचा सोपस्कार ह्या हिंदोळ्यातच पार पाडला जाई.
संध्याकाळी शाळेतून घरी  आल्यानंतर आम्ही सगळे परत हिंदोळ्याकडेच. गप्पाटप्पा, शाळेतल्या कविता असा सगळा कलकलाट चाललेला असायचा आमचा. मग कामावरून आलेली एखादी जेष्ठ व्यक्ती हिंदोळ्याचा ताबा घ्यायची आणि हिरमुसल्या चेहऱ्याने आम्ही दुसऱ्या  जागेच्या शोधात निघायचो. थोडे मोठे झाल्यावर ह्याच हिंदोळ्यात दुपारभर पत्ते कुटत पाच तीन दोन आणि मेंडी कोट खेळण्यातली मजा अजून आठवते. पावसाळ्यात ह्या झोपाळ्यावर पाण्याचे थेंब जमा व्हायचे.
आम्ही बोटाने पाण्याच्या थेंबामधून आपली नावं लिहीण्याचा मजेशीर प्रयोग करत असू. ऊन्हाळ्याच्या दिवसात आम्ही बाहेरच झोपायचो. रात्रभर आम्ही सगळे दोस्त ह्या हिंदोळ्यामध्ये गप्पा मारत बसायचो. ह्यामूळे बऱ्याच आम्ही  वेळेला मोठ्यांचा आ◌ेरडा सुध्दा आम्ही खाल्लेला आहे.

भाद्रपद महीन्यात हिंदोळ्याची शोभा अजून वाढायची. भादव्यासाठी पाहुण्या आलेल्या माहेरवाशिणींनी हे हिंदोळे भरून जायचे. त्यांच्या खळखळून हसण्याने आणि ऊत्साही कलकलाटाने हिंदोळा देखिल जणू मोहरून जात असे. त्या माहेरवाशिणी सुध्दा खूप जुना मित्र बर्याच दिवसांनी भेटल्यासारख्या त्या हिंदोळ्यावर बसत. रात्री मात्र सगळ्यांची जेवणं वगैरे झाल्यानंतर एखादी माहेरवाशिण आपल्या आईच्या सोबत ह्याच हिंदोळ्यात बसून आपल्या सासरचं दुःख तिच्या कानात सांगत असे. त्यावेळी तिचा गहीवरलेला स्वर आणि तोंडातून फुटणारा अस्पष्ट हुंदका ऐकून हिंदोळाही जणू अस्वस्थ होई आणि मुलीच्या दुखाने कासाविस झालेल्या आईला तिची समजूत काढताना तो ऐकत राही.
हिंदोळ्याचं आणि संगीताचं जणू एक अतुट असं नातं असावं. हिंदोळ्याच्या प्रत्येक झोक्याबरोबर एक लयबध्द संगीत जाणवायचं. लग्नाच्या दिवसात ह्याच हिंदोळ्यावर जणू संगीताची मैफल भरायची. रात्री जेवणं आटोपली की शेजार पाजारच्या बायका एकत्र जमून हिंदोळ्यावर बसायच्या आणि एकाहून एक सुरेल, बोलीभाषेतील गाणी त्यांच्या मुखातून बाहेर पडू लागायची. बायकांचा संथ पण लयबध्द सुर,

गाण्याची सुरेल चाल आणि त्यामध्ये मिसळणारा हिंदोळयाच्या झोक्यांचा लयबध्द नाद. सगळं वातावरण जणू भारून जाई.

' डोंगराशा आडून एक बाय सांद ऊंगवलाॅ'

' डोंगराशा कडसनी, एक बाय मोरूलॉ डॅवलॉ ' किंवा

' कानाला बुगडी घिती आयल्यात गा सखे सासरे गा सखे मामसासरे गा ' अशी एकाहून एक सरस आमच्या बोलीभाषेतील  गाणी गायली जात.

पण मी भारावून जायचो जेव्हा करूणरसामध्ये एखादी आई ' रमेदाये आये आईक माजा गराणा ' असं रमेद मावलीला साकडं घालायची तेव्हा . कधी कधी एखादी चार बुकं शिकलेली आई आपल्या बाळाला वेंगेत घेऊन हिंदोळयात बसून ' निंबोणीच्या झाडामागे चंद्र लपला ग बाई ' असं अंगाईगीत मधुर आवाजात गाऊ लागली की आमचे सुध्दा डोळे आपसूक पेंगायला लागायचे.

मन हेलावलं जायचं ते आणखी एका अंगाईगीताने. आपल्या तान्हुल्याला वेंगेत धरून समोर गोठ्याकडे नजर लावून आई जेव्हा

' एला तू गाये दे ला तू दूssssद_,

बायला माज्या भूक लागेयली,

लागेल्या भूक्यासॉ जालाॅ का गा वेळ,

नाय पुरॅ खेळ बायसॉ माज्या '

असं त्या मुक्या प्राण्याला आळवू लागे तेव्हा खरोखर मन हेलावून जात असे. त्या करूण आळवणीचा सूर एवढा प्रामाणिक आणि आर्त असायचा की तो ऐकून गोठ्यातल्या त्या मुक्या प्राण्याला देखिल पान्हा फुटावा.अंगावर शहारे यायचे हे गीत ऐकताना.

आज हे सगळं आठवलं की नवल वाटतं. कोणी रचली असतील ही अर्थपूर्ण गाणी? कोण असेल ती आपल्यामधील बहीणाबाई? कशा सुचल्या असतील कुणाला ह्या लयबध्द आणि सुरेल चाली?

आता गोठ्याची जागा पोर्चने घेतलीय, गायीच्या जागेवर आज गाडी ऊभी आहे आणि दुध तर वाहून गेलंय केव्हाच महानंदा आणि अमूलच्या पुरामध्ये. बहीणाबाई सगळया अडकल्या आहेत लोकलच्या गर्दीत आणि आय टी च्या जंजाळामध्ये.

म्हणूनच जेव्हा एखादा हिंदोळा दिसतो अडगळीत पडलेला , वृध्दाश्रमात सोडलेल्या म्हातार्या आई बाबांसारखा, तेव्हा मन बेचैन होतं, झुलू लागतं बालपणीच्या हिंदोळयावर आणि  गाऊ लागतं

' ये ला तू गाये , दे ला तू दूssssद

बायला माज्या भूक लागेयली '

# प्रेमाची किंमत ६०१ रुपये मात्र – तेरेजा डिसोजा, गास

मालती आणि मंदार दोघेही एका शहरात राहणारे. लहानपणापासून शाळा, कॉलेज मध्ये एकच वाट. मालती एका शेतकऱ्याची मुलगी. मालतीची आणखीन तीन बहिणी, सुमन, करुणा, प्रीतम. दोन भाऊ राजेश आणि रंजन असे अष्टकोनी कुटुंब. मालती मधली. मोठ्या बहिणीला शिक्षणाचा कंटाळा म्हणून घरच्या गाई-म्हशीचा गोठा साफ करणे, धुनी भांडी करणे ह्याची आवड फार. शेतकरी असून त्यासोबत इतर जोडधंदा म्हणून गाई म्हशी, कोंबड्या पाळणे इ. छोटे मोठे धंदे असायचे. मालती शाळेत हुशार होती व तिची ही लहान भावंडे तिच्या सोबत शाळेत एकत्र जायची. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे मालतीला घरकामात शेतात काम करण्यास मदत करावी लागत असे. शेतातील भाजी विकण्यास बाजारात जाऊन लाकडे, खाऊ, तांदूळ असे येणाऱ्या पैशातून विकत आणायचे.

दोघी बहिणी मालती आणि सुमन एकाच वर्गात एकाच बाकावर, एकच पुस्तक वापरून अभ्यास करण्यासाठी तिच्या आईने प्राचार्याकडून परवानगी घेतली होती. पाचवीपासून एकाच बाकावर प्रत्येक विषयाचे एकच पुस्तक वापरून दोघींही अभ्यास करीत असत. ह्या दोघी दहावीला कधी पोहचल्या हे आईबाबांना कळलेच नाही. सुमन व मालतीची परीक्षा जवळ आली तशी शाळेतून अधिक अभ्यास करण्यास शिक्षक थांबवून सर्व अभ्यास करवून घ्यायची. दहावीचा फॉर्म भरला. आता फेब्रुवारी महिन्यात शाळेतून सेंड ऑफ होणार ह्या आनंदात होती. सेंड ऑफ साठी इतर मैत्रिणी खूप खुश होत्या त्यांना काय पिक्चर पाहायला जायचे होते. सुमन मालती कडे ती सोय नव्हती. सेंड ऑफ साठी आईने गावातील एका मुलीचे कपडे एका दिवसासाठी मागून घेतले. ते कपडे मंदारच्या बहिणीचे होते.

शाळेतून घरी अभ्यास करण्यास वेळ मिळाला. गावातील एका वर्गमैत्रिण कल्पनाकडे सुमन व मालती अभ्यासासाठी जात असत. ते मंदारचे घर होते. आई, मोठे भाऊ सुहास आणि दोन बहिणी आशा आणि माया असे चौकोनी कुटुंब होते. मंदार हुशार होता परंतु वडील हयात नव्हते त्यामुळे मोठ्या भावाला नोकरी करावी लागली होती. मोठ्या बहिणीचे लग्न करायचे होते परंतु जुळत नव्हते तसे सुहासने सोयरिक करून घेतली. आईला खूप वाईट वाटले. मुलगी लग्नाची असता सुहासने सोयरिक केली हे तिला पसंत नव्हते. लग्नाची तारीख ठरली .... लग्न झाले आणि हे भाऊ आणि वहिनी मंदा फिरायला बाहेर गेले. तेथून भावांनी बायकोसाठी आणि बहिणीसाठी एकाच ताग्यातील कापड आणले. बहिणीला थोडे कमी कापड दिले. त्यामुळे धुसपूस सुरु झाली. मंदारला काही नाही. मंदार रद्दी विकून जे पैसे यायचे त्यातून त्याने कॉलेजची फी

भरणे, बसचे तिकीट ह्यासाठी वापरत होता. मंदार च्या घरी अभ्यासाला मालती रोज जात होती तेथूनच मालती आणि मंदार ह्यांचे हास्यप्रकरण सुरु झाले.

मालती आणि मंदारचे प्रेम प्रकरण आहे ही बातमी वाऱ्यासारखी गावभर पसरली. मालतीची परीक्षा सुरु झाली. रोज कोणते कपडे घालायचे म्हणून आशाचे कपडे उसने घ्यायचे. परीक्षा झाल्यावर मालती व मंदार एकमेकांच्या भेटी गाठी व्हायला लागल्या. रोज काहीना काही लिखाण चिठ्ठी एकमेकांना देवाणघेवाण व्हायची. मालती तिच्या आईची परवानगी घेऊन मंदारला भेटायला जायची. मालतीला शेतीची कामे करयाची भरपूर हौस. उन्हाळा सुरु झाल्यावर मालती भावंडाना घेऊन वाडीत जायची, खदानीतून शेणखत काढून शेतात पेरायचे. सर्व कामात निपुण अशी मालती होती. मालतीने बारावीची परीक्षा दिली. मंदारने मालतीला सांगितले की तू काही घरातील कामे करू नकोस, तू काम केलेले मला आवडत नाही. मी नोकरी करतो मला खूप पगार आहे. हे फक्त मालतीला खुश करण्यासाठी होते. मालतीने ह्या प्रकरणावर डोळेझाक केली. मंदारचे कॉलेजचे शेवटचे वर्ष होते. त्यामुळे भेटीगाठी सोडल्या कारण प्रेमप्रकरण आहे हे मालतीला कळले नाही हे प्रेम निस्वार्थी होते. नंतर मंदार कामावर जायला लागला. मालती बारावीत एका विषयात नापास झाली. म्हणून मालतीने टायपिंग चा क्लास जाऊ लागली. नोकरी मिळाली तर मालतीच्या लहान भावंडाची परवड थांबेल अशी धारणा. क्लासला जाताना एसटीची एकच वेळ असल्याने मंदार मालतीला भेटायचा. हळूहळू ह्यांचे प्रेम प्रकरण घरच्या मंडळीला कळले. हे प्रेम खरे होते की खोटे हे दैव जाणे. मंदारला घरून खूप विरोध होता. मालतीने कधीही मंदारला आपल्या शरीरावर अतिक्रमण करू दिले नाही. कारण मालती देवाला घाबरणारी होती तेवढी जिद्दही, कष्टाळू होती. काही झाले तर आपली अब्रू चव्हाट्यावर येईल आणि त्याचा परिणाम इतर भावडावर व आपल्या आई वडिलांवर होईल.

मंदारला त्याचे मित्र सांगत होते की मालतीबरोबर खेळ कर काही होत नाही. एका मित्राने त्याला सेक्सी संबोधले आणि मालतीला विचारले की मंदार सेक्सी आहे का? मालतीला सेक्सीचा अर्थच त्यावेळी कळला नव्हता. ह्यामुळे इतर तरुण मालतीला सतावायाचे. परंतु मालती हुशार होती तिने कोणाही तरुणाला दाद दिली नाही. मालती खंबीर होती

मंदारने आपला प्रेमसंबध यापुढे राहणार नाहीत असा निरोप मालतीला पाठवला. मालतीचे खरे प्रेम होते परंतु मंदारला मालतीचा उपभोग घेऊन सोडायचे होते. मंदारने निरोप पाठवलं की तो एक धर्मगुरू होणार आहे त्यासाठी आपले हे संबंध तोडत आहे आणि वरून मालतीला सल्ला दिला की तुही धर्मभगिनी होण्यास जा.

मंदारच्या घरच्याना हे सोयरिक होणार नाही ह्याला धर्मगुरू व्हायचे आहे असे सांगून आपण न्याय करू घेऊ. त्यासाठी एका चर्चवर न्याय करण्याचे ठरवले. चर्चे प्रमुख धर्मगुरु, मंदारचे भावजी, मोठे भाऊ दोन नातलग आणि मालतीचे वडील, भाऊ असे न्यायदाना समोर न्याय केला. इतके दिवस मंदार आणि मालतीचे प्रेमसंबंध जुळले होते परंतु मंदारला धर्मगुरू व्हायचे असल्याकारणाने मालतीने हे प्रेमप्रकरण तोडावे अशी गळ घातली. मालती बरोबर भाऊ आणि वडील होते. परंतु मालती काही हे मानण्यास तयार नव्हती. तिने धर्मगुरू आणि इतरांना सांगितले की दोघामधील प्रेम म्हणजे देखावा नाही हे निस्वार्थी प्रेम आहे. मंदारला धर्मगुरू व्हायचे आहे तर त्यास तशी मालतीने परवानगी देत आहे. परंतु मालती काही धर्मभगिनी होण्यास जाणार नाही. तरी देखील मंदारला लग्न करायचे आहे, परंतु मालतीने जी सांगितलेली अट मान्य असेल तर? धर्मगुरूने अट विचारली मालतीने ती अट अशी आहे की “जोपर्यत मालतीचे सोयरिक आणि लग्न होत नाही तोपर्यत मंदारला लग्न काय सोयरिकही करता येणार नाही. सगळ्यांनी होकार दिला... आता मालतीच्या नावाची नाचक्की मालतीच्या कुटुंबाची बेअब्रू झाली त्याचे काय ? त्यासाठी मंदार ला प्रेमाची शिक्षा म्हणून मंदार कडून मालतीला ६०१ (सहाशे एक रुपये मात्र) मंदार च्या भाऊ सुहास ह्यांच्या कडून देण्याचे ठरले ते मालतीला मिळाले नाहीत . मालतीचे वडील आई, भावंड खूप नाराज झाली परंतु मालतीने हिम्मत हरली नाही आणि मागे वळून पाहिलेही नाही. तिने तिचा कोर्स सुरु ठेऊन एका खाजगी ऑफिसात नोकरी मिळवली. मालती कमावती झालेली होती आणि पैसे काय कोणीही कमावतो परंतु प्रेम हे पैशाने विकत घेता येत नाही हे मालतीने सिद्ध करून दाखवले.

ताप्तर्य काय : प्रेमात सगळे माफ असते परंतु पैशाने प्रेम विकत घेता येते हे पैशेवाल्याचे कर्म

# नंदू - आयवन क्रास्टो, 9987787056

एक पैसा मिळणार नाही ! चालता हो ! नाहीतर उभा चिरूनच काढेन. नंदूला हे शब्द पुरे होते असं नव्हे ;पण तो गुपचूप निघून गेला. एरव्ही हे असे ऐकल्यानंतर काही अंतर गेल्यावर त्याने शिव्यांची लाखोलीच वाहिली असती. नंदू गावातला एक लग्न नं झालेला आणि कधीही होण्याची शक्यता नसलेला पन्नाशीच्या आसपास असलेला आमचा गावकरी. गावातल्या अनेक नमुन्यांपैकी एक नमुना. चालताना धडपडणं ,लंगडत चालणं आणि हो ! मोबाईल सदृश एखादं डबडं कानाला लावून , आपण किती गंभीर चर्चा पलीकडश्याशी करतोय याचा खोटा आव आणून ,खऱ्या अर्थाने एकला चलो रे ! या थाटात पंचक्रोशीत फिरत राहणं ही नंदूची ओळख. त्याच बरोबर कुणाकडेही पैसे मागणे ,तंबाखू चोळत बसणे आणि नशेत राहून , त्याच्या अश्या वागण्यासाठी सकल जग कसे कारणीभूत आहे ; याची वाच्यता वाचाळ तोंडाने करत रहाणे ही त्याची अधिक ओळख.

वर नमूद केलेला संवाद , हा तो माझ्याकडे पैशाची मागणी करायला आल्यावर घडला. पैसे किती ? तर फक्त वीस रुपये !एरव्ही , मी हे पैसे विनासायास आळोखे पिळोखे न घेता सहज दिले असते, पण माझा मूड ठीक नव्हता आणि कोणावर तरी ओरडायचे होतेच!

तसं बघितलं तर नंदूची एवढी ओळख पुरे नव्हे तो त्याच्यावर अन्याय होईल. त्या अन्यायाचं त्याला काही पडलं नाही म्हणा !कारण , या सगळ्या जाणिवांतून तो कधीच बाहेर पडलाय आणि स्वतःचं मस्त मौला जीवन जगतोय . जगराहाटीप्रमाणे ते जगणं वाया गेलेल्या माणसांचं असलं तरी त्याला त्याचं काही पडलं नाही.

मी , शाळेत नववी किंवा दहावीत असताना नंदूला पोलिसांनी पकडून नेलंय ही बातमी आली ;आणि मग त्याला पोलिसांनी कसं मारलं,कोठडीत त्याचे कसे हाल झाले याचे किस्से कानावर पडायला सुरुवात झाली. दोन दिवसात तो बाहेर आला. कोण्या नातेवाईकाने त्याच्या आई वडिलांना अधिकचे ऐकवून नंदूला जामिनावर सोडवले होते. नक्की झालं काय ? कोणत्या कारणासाठी हा आत गेला? चार चौघासारखा असलेला गावातला एक तरुण, अचानक पोलीस कोठडीची वारी करून येतो म्हणजे नक्कीच काही तरी गंभीर झालं असणार. माझ्या त्या बालवयात कोणाकडून काहीबाही ऐकूनही आकलन झालं नाही.

त्या सुटकेनंतर नंदूने आयुष्यात काहीही केलं नाही ; आणि आत्ताही करत नाही. म्हणजे , त्याची शाळा तर मधेच सुटली होती ; पण दोन पैसे कमावण्याच्या दृष्टीने कोणताही प्रयत्न त्याच्याकडून झाला नाही . दिवसभर तो इकडे तिकडे उंडारत असे.

आम्हा मित्राबरोबरही तो खूप वेळा असे. तसे लहानपणीचे आमचे वेळापत्रक नंदूपेक्षा वेगळे नव्हतेच. फक्त शाळेत जाणे आणि आईच्या धाकात रहाणे या गोष्टी सोडल्या तर जणू अगदी खूप नंदू गावात वावरत

होते . उन्ह्याळयाच्या अन दिवाळीच्या सुट्टीत आम्ही पोरं शिवारात घुसून वालपाडीच्या शेंगा चोरून पोपटी करायचो. त्यात नंदू आमच्या संगतीला असायचा ; पण सगळयात महत्वाचं म्हणजे शिवाराला लागून जी बागायती शेती होती त्या शेतांच्या कडेला माडावर असलेल्या शहाळया.

पोपटीवर यथेच्छ ताव मारल्यावर लागलेली तहान ही शहाळी पिऊन शमवली जायची. अर्थात ! उष्टे हातही शहाळयाच्या पाण्याने धुतले जात . नंदू इथे अगदी कामाचा माणूस होता. आम्हा कोणालाही शहाळया काढण्यासाठी माडांवर चढण्याची हिम्मत व्हायची नाही. उंचीची भीती मनात होती आणि त्यात एकल माडाच्या झाडावर चढणेही एक कौशल्यच आहे . नंदू आमच्या पेक्षा थोराड तर होताच ; पण तो या माडावर माकडासारखा भरभर चढायचा आणि शहाळयांची पेंडच्या पेंड खाली टाकायचा . मनोसक्त शहाळी पिण्याचं भाग्य त्या वेळी आमच्या कपाळी नंदूमुळे आलं.

एकदा, असाच नंदू शहाळी काढण्यासाठी माडावर चढला होता; आम्ही पोरं माडाच्या बुंध्यापाशी जमा होतो. दुपारची वेळ असूनही शेताचा मालक बांधाच्या कडेने येताना दिसला, आम्हा सर्वांची पाचावर धारणच बसली. आम्ही धूम पळालो. मालक आला आणि माडाच्या बुंध्यापाशी काही शहाळया बघितल्यावर त्याला संशय आला. वर बघूतोय तर नंदू माडाच्या शेंडयाच्या खोबणीत लपण्याच्या प्रयत्न करतोय. त्यानंतरचं रामायण गावात घडलं ;आणि नंदूला चोर म्हणून पदवी मिळाली. अशा अनेक कारवायांनी नंदूचं जीवन उजळत होतं म्हणा ! अगर काजळत होतं.

नंदू दिसन्यात तसा उजवाच होता. चारचौघात तो अगदी उठून दिसे. साधारण सहा फुटापेक्षा थोडी कमी उंची . मजबूत बांधा, कुरळे केस आणि चालण्याची राजेशाही ढब. तो एकेक खांदा पाडून चालायचा. गावाच्या वेशीवरून तो चालत येत असेल तर बघत बसावं. आम्ही त्याला काबुली नंदू म्हणायचो. काबूलचा पठाण !

नंदूचं पोहणं, एक किस्साच होता. गावातल्या कित्येक जणांना नंदूने पोहायला शिकवलंय. गावकुसाच्या बाहेर असलेल्या या 20 ते 25 फूट व्यासाच्या बावडीत पंचक्रोशीतली बरीच चिल्ली पिल्ली , तरुण पोहायला येत. नंदूचे पोहण्याचे अनेक पराक्रम या मंडळीसमक्ष बघायला मिळत. बावडी शेजारी असलेल्या पंपाच्या केबिन वरून उडी मारणे, धावत येऊन बावडीच्या कठड्याला हात नं लावता अलगद सूर मारणं,असले प्रकार तो लीलया करत असे.

या नंदूचं एक प्रेम प्रकरणही गावात चर्चेचा विषय होता. कारण जे काही करायचं त्याचा गाजा वाजा झालाच पाहिजे हे नंदूच्या नशिबालाच चिकटलेलं होतं. गावात बरीच अशी प्रेमप्रकरणं होत होती आणि ती कोणास कळण्या अगोदर मिटतही होती. नंदूचं प्रेमप्रकरण मात्र गावाची वेशी ओलांडून अफवेच्या वाऱ्यावर उडत होतं. प्रेम म्हणजे तसं एकतर्फीच म्हणा ! नंदूकडून शंभर टक्के ,आणि दुसऱ्या पार्टीकडून श्यूण्याहून

कमी. कारण ज्या व्यक्तीवर नंदूचं होतं , त्या वक्तीला हा खेळ माहीतही नव्हता आणि जरी माहित असता तरी खेळखंडोबाच झाला असता किंवा तिच्या घरच्यांनी केला असता. कुठे गंगू तेली आणि कुठे बाणभट्ट!

नंदू मात्र इंद्राच्या थाटात , तिला आपण मिळवणारच! ती माझ्याशिवाय कोणाची होऊ शकणार नाही ! याचं अवडंबर माजवत होता. पुढे त्या प्रकरणाचा होणार होता तोच अंत झाला. दुसरी पार्टी लग्न होऊन सासरघरी सुखी झाली आणि नंदू घरी राहून देशो धडीला लागला.

गावातल्या चौकात , एकदा आम्ही सारे दिवे लागणीच्या सुमारास चकाट्या पिटत बसलो होतो. इतक्यात कामी काकूंच्या कमळीचा त्यांच्या घरातून जोरजोरात आवाज ऐकू येऊ लागला. भयंकर भेदरलेली कमळी आंघोळ करताना न्हाणीघराच्या झरोक्यातून कुणी तरी बघत होतं म्हणून जोरजोराने ओरडत होती. आम्ही सारे कोण असेल म्हणून त्या बाजूला पळालो, तर आजूबाजूस कोणीच दृष्टीस पडलं नाही. मात्र त्या बाजूच्या पायवाटीवर नंदू नेहमीच्या नशेच्या अवतारात कानाला डबडं लावून चाललेला दिसला. आम्ही निराश होऊन परत आलो; पण अंदाज करू शकलो नाही कि कोण असेल तो विकृत भुरटा जो असे व्यवहार करायला धजवतोय.

या सगळ्या कोड्यात , एक दिवशी आईने विषय निघाला असताना नंदूच्या तुरुंग वारीची कहाणी सांगितली. गावाबाहेरच्या बावखालात जिथे दुपारी भागूकाकांची बानू धुणं धुवायला गेली असतानां ; नंदूने तिला घाबरवलं होतं. ते घाबरवणं नक्की काय होतं ? किंवा नंदूने असं काय केलं ? की ज्यामुळे बानूच्या घरच्यांनी पोलिसात धाव घेतली . आईने विषय तिकडेच थांबवला आणि पुढे काही विचारण्याची माझीही हिम्मत झाली नाही. पण कुठेतरी सांजवेळी घडलेल्या घटनेची आणि नंदूच्या त्या पराक्रमाची कडी जुळत गेली.

आताही नंदू उंडारत असतो. लोकांच्या दारी परस दारी फिरत असतो. गावचौकात आमच्या समोर त्याच्या पराक्रमाचे इमले बढाईच्या रूपात बांधत असतो. आम्हासाठी ती करमणूकच म्हणा !कारण त्याच्यासाठी काही करायची आमची हिम्मत होणारच नाही. गावच्या पाण्यात राहून गावाच्या झोकात न राहता प्रवाहाविरुद्ध पोहण्याचं बळ अजून आमच्यात आलं नाही.

गावातला एक युवक वाममार्गावर गेला असतानां फक्त बघणं, ऐकणं, हसणं, सुनावणं आणि हे सगळं थोड्या अवधीत विसरून आप -आपल्या व्यवहाराला लागणं या व्यतिरिक्त काही करणं आम्हाला माहीतच नाही...

# एक छोटीशी कंटाळवाणी गोष्ट -- **सुनिल बी डिमेलो, नंदाखाल**

एक छोटीशी कंटाळवाणी गोष्ट आज सांगणार आहे. ही गोष्ट इतकी कंटाळवाणी आहे की, गोष्टीतील पात्रांची नावं वाचताबरोबर तुम्ही गोष्ट वाचायचं सोडून देणार ह्याची मला खात्री आहे कारण खऱ्याखुऱ्या आयुष्यातदेखील आपणा कुणालाही ह्यातील काही पात्रांचं काहीही...हो काहीही पडलेलं नाहीये...गोष्ट पूर्ण वाचलीत तर मात्र तुमचे अभिनंदन आणि आभार.

पोटूशी असलेल्या पृथ्वीला रडतपडत मागे ठेऊन आकाशगंगा दूरदेशी निघून गेल्यावर काही काळ पृथ्वीचे चित्त थाऱ्यावर नव्हते. तिने रडून आकांडतांडव केले, काही दिवस उपाशी राहून आपल्या होणाऱ्या मुलाच्या वडिलांची खूप वाट पाहिली. तसा तो यायचा अधूनमधून पण त्याची भेट खूपच धावती असायची आणि त्याच्या भेटीने पृथ्वीला बरे वाटण्याऐवजी त्याच्या उथळ वागण्याने तो जाताना तीच्या मनावर खोल ओरखडे उठवून जायचा.

हळूहळू त्याच्या भेटी कमी होऊ लागल्या आणि पृथ्वीलादेखील आता त्याच्या नसण्याची सवय होऊन गेली. तो नाही आला तरच बरं असं आताशी पृथ्वीला वाटू लागलं होतं. प्रदिर्घ काळ एकट्याने काढल्यावर पृथ्वीला आता आपल्या गर्भातील मुलाची चाहूल लागू लागली होती. आतून ढुशी देणाऱ्या बाळाचं तिला कोण कौतुक वाटायचं. यथावकाश पृथ्वी प्रसवली. सर्व आडाखे खोटे ठरवत तिला दोन जुळी बाळं झाली होती. अंगापिंडाने थोराड असलेल्या मुलीचे नाव तिने पर्यावरण ठेवले तर जन्मापासून नाजूक प्रकृती असलेल्या मुलाचे नाव तिने विकास ठेवले.

एकाच आईच्या उदरात जन्माला येऊनदेखील दोन्ही मुलं दिसा-वागायला पूर्णतः वेगळी होती. इतकं कशाला एकाच आईच्या संस्कारात वाढूनदेखील दोन्ही मुलांची विचारसरणी, आचारविचार अगदीच भिन्न होते. पर्यावरण स्वभावाने अगदी सोज्वळ, प्रेमळ आणि आजूबाजूच्या सर्वांचा विचार करणारी. कुणी मागे राहत असेल तर त्यांच्यासाठी थांबून त्यांना सोबत घेऊन चालणारी. एकूण काय तर सर्वांच्या कलाने वागणारी, सर्वांना सोबत घेऊनच पुढे मार्गक्रमण करणारी अशी गुणी मुलगी होती. पृथ्वीआईला तिचे कोण कौतुक.

विकास त्यामानाने फटकळ. त्याला इतरांचा विचार करायला वेळच नव्हता. आलात तर तुमच्यासोबत आणि नाही आलात तर तुमच्याशिवाय असा त्याचा शिरस्ता होता आणि हे तत्व पाळत असताना आपल्यासोबत जे येणार नाहीत त्यांना नेस्तनाबूत करायलादेखील तो मागेपुढे पहात नसे. त्याच्या ह्या दादागिरीच्या स्वभावामुळे त्याचे आणि पर्यावरणताईचे अधूनमधून खटकेदेखील उडत. मग पृथ्वीआईला मध्यस्थी करून भांडण निस्तरावे लागे. विकासला आई आणि ताई लाडाने विकासदादा अशी हाक मारत. हे आपलं बाळ लहानपणापासून नाजूक प्रकृतीचे असल्याकारणाने आई बहुतेक वेळा त्याला झुकते माप देत असे आणि आईची ही कमजोरी विकासदादा जाणून होता. मोक्याच्या क्षणी रडून, भावनिक मुद्यांना हात घालून तो बऱ्याचदा आपल्या कामांसाठी आईकडून संमती मिळवून घ्यायचा. समोरासमोर चुकीचा पायंडा पडत असताना पर्यावरणताईला शांत राहणे शक्यच नव्हते. ती पृथीआईला पूर्ण ताकदीने आपले म्हणणे पटवून द्यायचा प्रयत्न करी. विकासदादाच्या ह्या मनमानी वागण्याचा पुढे आपल्या सर्वांना कसा त्रास होणार आहे हे
ती सोदाहरण आईला सांगायचा प्रयत्न करी पण तिचा नाईलाज होता. पुत्रप्रेमामुळे आई आंधळी झाली होती, तिला पुढे येणारे धोके दिसत असूनदेखील ती त्यावर डोळेझाक करत असे.

विकासदादाचा तोरा हल्ली खूपच वाढला होता. तो स्वतःला खराखुरा दादा समजू लागला होता. त्याला आपण पर्यावरणताईपेक्षा खूप मोठे झालो आहोत असा भास होऊ लागला होता किंबहुना तो आता त्याच्या वागण्याबोलण्यातून दिसू लागला होता. तो आईला आणि पर्यावरणताईलाला फारसा जुमानेसा झाला होता. सकाळी घरातून बाहेर पडताना स्वयंपाकघरातील आईला, 'आलो गं' म्हणायचा, मात्र माजघरात बसलेल्या पर्यावरणताईवर तो चक्क दुर्लक्ष करू लागला होता. ताईला त्याच्या ह्या वागण्याचा खूप राग यायचा आणि आईकडे तक्रार करून काही उपयोग नाही हेदेखील ती जाणून होती. ती आपला राग मनातच दाबून टाकायची मात्र हा राग कधीतरी उफाळून येत असे आणि मग भडकणाऱ्या क्रोधाग्निपुढे कोणाचेच काही चालत नसे. विकासची तर दैना उडत असे. तो मग आईकडे आपले गाऱ्हाणे घेऊन गेला तरी आई ऐकून न ऐकल्यासारखे करत असे कारण तिला पर्यावरणताईचा राग ठाऊक होता, ठराविक काळ गेल्याशिवाय तो शांत होत नसे आणि ती रागात असताना प्रत्यक्ष आईचेदेखील तिच्यापुढे काही चालत नसे.

हळूहळू विकासदादाला पर्यावरणताईच्या अश्या वागण्याची आणि तिच्या उद्रेकाची सवयच झाली. तो स्वतः देखिल निबर होत गेला. हल्ली तो आईला आणि बहिणीला न जुमानता स्वतःच्या मर्जीप्रमाणे वागत होता. आपल्या नातेवाईकांवर देखील त्याने गारुड केलं होतं. त्या सर्वांना उज्वल भविष्याच्या स्वप्नरंजनात त्याने गुरफटून टाकलं होतं. ते सर्व देखील त्याच्या हा मध्ये हा मिळवत मंतरलेल्या अवस्थतेत गेल्याप्रमाणे वागत होते. त्यामधील ज्या लोकांना पुढे येणारा अनर्थ दिसत होता त्यातील काही मूग गिळून गप्प बसले, काहींनी चक्क दुर्लक्ष केलं, काही भीतीने गपगार झाले आणि ज्या थोडक्या लोकांनी विकासदादाला तो जे करतोय ते चूक आहे हे सांगायचा प्रयत्न केला त्यांना विकासदादाने आपल्या बलाढ्य ताकदीने चिरडून टाकलं.

आता तर तो एक अनभिषिक्त सम्राट झाला होता आणि त्याला विरोध करणे हे गावंढळपणाचे लक्षण ठरत होते. त्याचे नातेवाईकच नव्हे तर सर्व समाज त्याच्या बाजूने होता. आता त्याला कुणाला आपल्या बाजूने वळवण्यासाठी गोडीगुलाबी, लांगुलचालन किंवा जबरदस्ती करावी लागत नव्हती. सर्व कसं अगदी सुरळीत त्याच्या मर्जीप्रमाणे चाललं होतं. लोक आता पर्यावरण नावाच्या त्याच्या बहिणीला विसरून गेले होते. नवीन पिढीला तर विकासदादाला बहीण आहे हेदेखील ठाऊक नव्हते. तशी त्यांची त्यात काही चूक नव्हती म्हणा कारण त्यांचं पालनपोषणच मुळी विकासधार्जिण झालं होतं. नाही म्हणायला त्यांची एक चूक झाली म्हणा आणि ती चूक महाभयंकरच होती. ती म्हणजे आपल्या पूर्वजांनी केलेल्या चुकांपासून काहीही बोध न घेता उलट त्याच चुका ते गिरवत बसले किंबहुना त्यात ते नवनवीन आणि अक्राळविक्राळ चुकांची भर घालत गेले. विकासदादाने दाखवलेल्या स्वप्नांपलीकडे त्यांना दुसरं काही दिसतंच नव्हतं. विकासदादाचा करिष्माचं जबरदस्त होता.

हो, पण एक मात्र होतं, ह्या नवीन पिढीकडून पर्यावरणताई त्यांच्या आणि त्यांच्या पूर्वजांनी केलेल्या सर्व चुकांची आणि मनमानीची दामदुप्पट भरपाई वसूल करणार होती आणि आत्ताशा कुठे ह्या भरपाईला सुरुवात झालीये...

भरपाई द्यायला सुरुवात केलेला मँगो मनुष्य,
१९ सप्टेंबर २०१९,
वसई.

# जखमांची फुले - **सचिन मेंडिस, जापके**

अंगणातून चर्चकडे निघालेल्या त्या मुलीला आजीने हळूच हाक मारली अन जवळ बोलावलं.  तसं मागच्या काही दिवसात सायंकाळी मिस्साला निघालेल्या कुणीतरी लहानग्याला आजीची न चुकता हाक जायची.

केळीच्या पानात बांधलेली गोंडाळयाची फुले अलगदपणे आजीने त्या लेकीच्या हातात ठेवली अन ती म्हणाली,

 "मावलीपुढे ही फुलं वाहा, मला जमलं असत तर मीच गेली असते परंतु ह्या वयात मला चर्चमध्ये जावत नाही.” आजीने फुलं त्या लेकीच्या हातात देताना न मागताही हे स्पष्टीकरण दिलं.

"आजी काल पण  तू हेच कारण सांगितलं होतं". त्या मुलीने आजीला लागलीच उत्तर दिलं.

"तू रीटाची नात का?' जेम्सची मुलगी. काल तुझ्याकडेच दिलेले का मी फुले?' ह्या म्हातारपणात डोळ्यांना ओळख लागत नाही.”

आजीची बडबड संपण्याअगोदर त्या लहानगीने देवळाची वाट पकडली होती.

मरिया माऊलीचे वार सुरु झाले की आजी माऊलीच्या पायाशी फुले अर्पण करण्यासाठी फुलांची तजवीज करून ठेवायची. अंगणात कुठेतरी कोपऱ्यात गोंडाळे, सदाफुली, जास्वंद अशा फुलांची पावसागोदर लागवड करून ठेवायची. मागच्या वेळेला झाडाला पाणी घालताना आजी तोल जाऊन पडली होती, तेव्हा तिला घरच्यांकडून ओरडा खावा लागला होता. परंतु माऊलीचे वार सुरु झाले की आजी अस्वस्थ व्हायची. मी जरी माऊलीकडे पोहचू शकत नसली तरी माझ्या अंगणातली फुले माऊलीच्या पायाशी पोहचावी ही तिची तळमळ कधी संपत नसे. आजीला असं सुगंधितपणे माऊलीशी जोडण्याचं पवित्र कार्य अंगणातल्या रूपवंत फुलांनी गावातल्या निष्पाप मुलांच्या हातातून गेली अनेक वर्ष घडवून आणलं होतं.

अंगणातले गोंडस फुले, ती फुले जपणारी फुलाहून सुंदर लाल जास्वंदासारखी आजी, ती फुलं वाहून नेणारी रूपवंत मुलं अन ह्या सर्व घटनांची प्रेरणा मरीया माता ह्यांची एक अनोखी साखळी ह्या निमित्ताने जुळून आली होती. अन ह्या साखळीतला प्रत्येक दुवा तितकाच महत्वाचा म्हणूनचं निर्मळ, पवित्र अन अनुपम असा होता.

मुलांच्या हातात फुले दिली की आजीची नजर पायाकडे जायची. मागच्या वेळी जेव्हा ती अंगणात पडली होती तेव्हा मांडीला जखम झाली होती. फुलं देऊन ओटीवर माघारी फिरताना आजी सुकलेल्या जखमेवरुन हलकेच हात फिरवायची. जखमांची फुले होण्याचं तिने ऐकलेलं होतं. ते अनुभवण्याचं सुखं आजीने घेतलं होतं. त्या सुगंधी जखमा अलगद तिच्या डोळ्यात जपून ठेवताना तिला मिळणारं समाधान अतुल्य होतं. अगदी तिच्या श्रद्धेसारखंच.

# रिटायरमेंट होम -- **सायमन रॉड्रीग्ज, आगाशी**

शिलू आन दुमी ला दोन पॉर आन एक पोरी. शिलू बँकेत भोट्या हुद्द्योरने रिटायर आन दुमी झेड पी टीजर मनून गेल्या वहरा रिटायर. बोरिवली ला दोन फ्लॅट आन आपल्या वसय ला दुमजली बंगलो. पोरे पण जाम हुशार . भोटो सुनील कम्प्युटर इंजिनियर होवोन अमेरिकेला MS कऱ्या गेलो आन तडेस सेटल जालो आन लानो प्रशांत फायनान्स मीने MBA केला आन UK गेलो. आन पोरी पिंकी ने कम्प्युटर इंजिनियरिंग करोन ऑस्ट्रेलिया ला MS कऱ्या गेली आन तडेस आपल्या एका इंडियन पोरा प्रेमात पडोन तडेस सेटल जाली. सुनील पण गेल्या वहरा वरडॉन नवरी ला अमेरिकेला घेवोन गेलो आन प्रशांत पण [पोरी बगीते जी त्या बरोबर UK ला सेटल होयदे. मग शिलू आन दुमीने बोरिवली ला दोन प्लॅट आन आपल्या अडे असनो भोटो बंगलो बांदीले तो कडे न्यासो?

वरसा उदाहरण थोड्या फार फरकाने आपल्या अडे गावोगावी दिख्या लागले. आत्यासा जा जनरेशन हाय त्या विचारसरणी आधुनिक जगाहरी जोडली गेले. त्यांना स्वातंत्र्य पाय. कुना बंधने पा नात. लगीन केले तरी आपल्याला पोरे जाले पात , किंवा त्या आपल्याला संगोपन केला पाय वैगेरे बंधने नाकारणारो वर्ग आते आपल्या अडे दिख्या लागले. एखादा पोर / पोरी जाली तरी त्यायी जबाबदारी जास्ती करोन आजी आजोबा दरी हाय आहा चित्र आते सर्वसाधारण दिखाते.

आन त्यात सर्वाधिक नुकसान बोला किंवा मनस्ताप बोला आते जे चाळीशी ते साठी शे पालक हात त्यायी होते. कारण या पिढी आ दुर्देव आहा कि आक्खा आयुष्य बय बाबाला घाबरोन (किंवा रिस्पेक्ट) देण्यात गेलो. मिनसो काळ बायकुला (नवऱ्याला) घाबरण्यात गेलो आन पुडसो काळ पोरांना घाबरण्यात जायदे किंवा जाताना दिख्या लागले. आपुन जा कय कमाविले , बंगलो बांदिले त्या उपभोग घ्या करता पोरेस तयार नात ते मग आपुन यि सगळा कुना करता कर्यासा?
आन आपल्या डोकरेपनी आपल्याला बग्यादो आपले पोरे आले नाय ते का कर्यासा? अहि भीती हल्ली या मध्यमवयीन पिढीला वाटूया लागले.

मग यावर उपाय का? जा कय सल्ले ता ते आपुन बदलू शकाव नाय. मंग आपल्यालास आपलो विसार बदल्या पाय. सगळयात पयलो विसार .. "आपले पोरे स्वतंत्र हात, त्यांना त्या आयुष्य कडे आन काहा जग्यासा ता मयती हाय. त्यांना योग्य शिक्षान देना आन मार्गदर्शन करना यि आपला कर्तव्य हाय. बाकी जहा आपुन आपल्या पायोर उबी रेले तहास त्यांना पन त्या पायोर उबी रेऊनदे ना .. त्यांशा पोरा जबाबदारी पण त्यांना घेऊनदे ना .. "

दुहरॉ विसार - " पोरांदरने , नातेवाइकांदरने किंवा कुना दरने हि अपेक्षा ठोवो नाका .. अपेक्षा ठोयली गा अपेक्षाभंगा दुख होते. पोरे कमावते जाले गा त्या त्याव संवसार त्यांना बगुन्दे "

मंग पुडे माँ का?

कयीस नाय जो पोत पोरांना गरज हाय ताव पोत त्यांना पाहेदे ते सपोर्ट कर्यासो बाकी वेळ आपलो मजेत घालव्यासो. ज्या पोरे बायार हात त्यायी वहरा दोन वहरोर तडे एक चक्कर माऱ्याशी. आन अडे कय दुखला खुपला ते आजकाल फुलटाईम मेल फिमेल नर्स मिळात्यात त्या दरने सेवा घ्याशी. एकटो दुकटो हायदॅ ते एक रिटायरमेंट होम जॉईन कर्यासा..

यि रिटायरमेंट होम का हाय? वृध्दाश्रम गा?
या पुडे आपल्या अडे रिटायर्डमेंट होम शी कंसेप्ट येनार .. आपल्या वस्तीपासून थोडा लांब .. निसर्गा सानिध्यात .. बरे ४० ते ५० रिटायर्ड महाने रेऊ शकेद्यात आन त्या काळजी घ्यादो चांगले केयर टेकर अहेद्यात आहा घर. गरज लागली ते आपल्या पोरांना भेटले नाते तडे मस्तपैकी हात. त्यांकरता सगळा कय एंटरटेनमेंट तडे अहनार.. बागकाम , खेळ , जीवांन बनवना , नाटकाला जाना , वाचन करना ..ज्याला जी आवड हाय त्या मनमुराद आनंद अडे लुटता येनार आहा ता घर ..
पुडशा येणाऱ्या १५/२० वहरा मीने या शिवाय बी कय पर्याय पण दिखे नाय.. त्यामुळे आतेपासुनुस त्या तजवीज केलेली बरी ...

---

## साहित्य म्हणजे.......

साहित्य हे साहित्यच असतं
त्यात श्लील - अश्लील असं काहीच नसतं.
लेखकाच्या लेखणीतून साकारलेलं भावनांच ते
प्रतिबिंब असतं.
साहित्य हे साहित्यच असतं भाव भावनांच
विणलेलं एक जाळं असतं
ज्याच्या प्रत्येक धाग्यात एक सुंदर
आविष्कार असतो.
साहित्य हे साहित्यच असतं
जे वेड्याला शहाणं करतं
अशिक्षिताला शिक्षित करतं
आणि आयुष्याला एक वेगळी दिशा देत.
साहित्य हे साहित्यच असतं जे
शब्दांच्या ही पलीकडल असतं,
समजण्या इतपत ते सोप्प नसतं
आणि न समजण्या इतपत ते
अवघड ही नसतं
साहित्य हे साहित्यच असतं
ज्यात जात पात ,रंग, वय
असं बंधन नसतं
विचारांची देवाघेवाण
करण्याचं ते एक साधन असतं............

## क्षितिजाच्या पलिकडे.......

दूर क्षितिजाच्या पलिकडे राहिले घर माझे
भासे अनोळखी मजहे जग सारे......
ने मजसी पैलतिरी त्या क्षितिजा पलीकडे
पाहीन मी माझेच प्रतिबिंब, त्या विस्तीर्ण
पसरलेल्या अथांग सागरामध्ये....
मी ही एकरूप होईन
त्या लाटांबरोबर,
करीन हितगुज अवकाशाशी
भिडेन क्षितिजाला जाऊन
पाहीन मी क्षितिजाच्या ही पलीकडले......

**रेश्मा सुनील परेरा, दोन तलाव, वटार**

# बकेट लिस्ट - **एमेल आल्मेडा.**

'हौसेला मोल नाही आणि शिकायला वय नाही' ह्याची प्रचिती मला काही दिवसांपूर्वी झाली. माझ्या छोट्या मुलाला गायनाच्या क्लाससाठी घेऊन गेल्यावर मला एक तास तिथेच थांबावं लागत असे. हा रिकामा वेळ इकडे तिकडे टाईमपास करत वाया घालवणं पटत नव्हतं. वेळ सत्कारणी लागावा म्हणुन मी देखील त्यावेळात काहीतरी शिकावं असा बेत करत होतो तसं तबला, पेटी, किबोर्ड ही वाद्य मी स्वत:च्या हा ैसेपुरती जुजबी वाजवतो. आता एखादं नविन वाद्य शिकावं की ह्यापैकी एखाद्या वाद्यातच निपुणता प्राप्त करावी ह्या विचारात महिना सरला तरी मन काही निर्णयाचा राग आळवत नव्हतं. मन आणि बुध्दी यांचे सूर जुळत नव्हते.मनात शिकायची हौस होती आणि डोक्यात विविध शंका.

त्यादिवशीदेखील मी नेहमीप्रमाणे मुलाला घेऊन क्लासला गेलो होतो. त्याचा क्लास सुरु झाला आणि मी बाहेर मोकळया जागेत फिरत होतो. इतक्यात एक व्यक्ती जिन्यावरुन चाचपडत येताना मला दिसली. हातात अंधांची काठी होती. ह्या व्यक्तीला मी ओळखत होतो. नेहमी क्लास सुटल्यावर ते दिसायचे, त्यांच्या बरोबर एक सोबती असायचा पण क्लासला येताना मी त्यांना आज पहिल्यांदा पाहत होतो आणि तेही एकटे. मी पुढे जाऊन त्यांना हात दिला आणि त्यांना क्लासमध्ये पोहोचवलं. क्लास सुरू होऊन वेळ झाला होता व आतमध्ये डिस्टर्ब नको म्हणून त्यांनी बाहेर बसणं पसंत केलं. रिकामा वेळ आणि मनातलं औत्सुक्य म्हणून मी त्यांच्याशी संवाद सुरु केला.

"सर, तुम्ही कोणतं वाद्य शिकवता?"
माझा प्रश्न ऐकून ते हसायला लागले. हसतच पुढे म्हणाले, "अहो, मी इकडे शिकवायला नाही तर पेटी शिकायला येतो."

त्यांचं उत्तर ऐकून मी अवाक झालो. आमचा संवाद पुढे सरकला आणि त्याच्याविषयीची माहिती जाणून मला खुप आश्चर्य वाटलं. एक अंध व्यक्ती, ५७ वर्षे वय, मुंबईला नोकरी करुन, लोकलच्या जीवघेण्या प्रवासानंतर परतीच्या प्रवासात संध्याकाळी पेटी शिकायला येते. मी विचार केला, कुठून येतो हा उत्साह आणि ही उर्जा!

त्यांनी मला सांगितलं त्याप्रमाणे त्यांनी त्यांची 'बकेट लिस्ट' तयार केली होती आणि त्यामध्ये पेटीवादन शिकणं हे वरच्या क्रमांकावर होतं. त्यामुळे त्यांनी वय, वेळ, थकवा इत्यादी मुद्यांना फाटा देत रिटायर्टमेंट नंतर आपल्या आयुष्यात संगीताच्या सप्तसुरांच्या मैफिली सजाव्यात म्हणून ह्या वयात ते विद्यार्थी झाले होते. त्यांची दूरदृष्टी, सकारात्मक पाहता त्यांनी भविष्याच्या दृष्टिने वेळेची खूप चांगली गुंतवणूक चालवली होती. त्यांचा आदर्श नक्कीच अंगिकारण्याजोगा होता.

मी मनोमन खुश झालो होतो. संगीत शिकण्याच्या माझ्या विचारांना त्यांच्यामुळे बळकटी मिळाली होती. त्याचबरोबर आपली 'बकेटलिस्ट' तयार करण्यासाठी प्रेरणा मिळाली होती.
मी मनोमन देवाचे आभार मानले. ह्या नाताळनिमित्ताने ते सद्गृहस्थ 'सांताबाबा' बनून माझ्यासाठी 'ख्रिसमस भेट' घेऊन आले होते.
मी लगेच जाऊन माझा प्रवेश निश्चीत केला. आता मीदेखील त्यांच्यासोबत पेटी शिकणार होतो.

# आठवणीतील वाट -- **बर्नड लोपीस**

एकाच गावातील आम्ही सर्व इयत्तेतील धरून किमान सतरा-अठराजण एकत्र सोबत शाळेत जायचो. तेव्हा मम्मी-पपा हा प्रकार नव्हता. आईवडील मुलांना शाळेत सोडायला येणं तर दूरच पण फी थकली म्हणून बोलावणं आलं तरी ते येत नसत. ऑटोरिक्षा, स्कुलबस वगैरे चोचले असायचं कामच नव्हतं. सकाळी उठल्यावर चहा-चपाती खाल्ली की घरातील वरकामात मदत करायला लागायची. मुख्य काम असे कागड्याची फुले बांधण्यासाठी केळीची पानं (खॉलँ)आणणे. जो पहाटे लवकर वाडीत पोहचेल तो जास्त नशिबवान. केळीची पानं आपल्याच वावरातील हवीत असा काही दंडक नव्हता त्यामुळे इतरांच्या मळयात घुसखोरीही चालत असे. शाळेत जातानाच अशी मोक्याची ठिकाणं आम्ही हेरून ठेवत असू....

तर पाठीला वह्यापुस्तके असलेली खाकी रंगाची पिशवी अडकवून अशी आमची वरात निघायची.

वरातीचा पहिला थांबा खळयात असायचा. हे खळं तसं आमच्या कुटुंबाच्या मालकीचं पण वाटणीत ते काकांच्या हिश्शाला जरी आलेलं असलं तरी शेतीकामाच्या झोडणी, मळणीसाठी सगळा गाव ते वापरत असे. झाडून स्वच्छ व धोपटून कठीण केलेल्या जमिनीवर शेणाचं सारवणं होई. एकाचं काम आटोपलं की दुसरं सुरू करण्यापूर्वी परत सारवलं जाई. असं मस्त कोटींग असलेलं खळं हे आमच्या फतकलीचं ठिकाण ठरणं स्वाभाविकच होतं. सगळे तिथे जमले की टोळकं निघे. शाळेत जाण्यासाठी जो मुख्य रस्ता होता तो थोडा लांबचा होता. त्यामुळे आमच्या जाण्यायेण्याचे दोन स्वतंत्र रस्ते होते...

सकाळच्या शाळेची वाट आमच्या गावातून गावच्या केळीफोपळीच्या बागेतून निघाली की फक्त एकच घर असलेलं 'सरगोडी' नावाचं गाव लागे. तिथून दोनशे मीटर वर 'मनखळे' गाव. अधेमधे वाड्या...पुन्हा पुढे 'चरीवाडी' गाव...खरं तर ही चुरीवाडी. इथे असलेल्या बावखलात बहुतेक बिनविषारी साप ऊन खायला तरंगत्या कचऱ्यावर बसत. मातीची ढेकळं घेऊन नेमबाजी करणारे बरेचसे एकलव्य विना द्रोणाचार्यांचे तिथेच पारंगत होत असत. ही ढेकळाची नेमबाजी शिकत असताना कुठूनतरी वडीलधाऱ्या माणसांचा ओरडा येई नि फौज परत शाळेचा रस्ता धरी.

चरीवाडीतून मनखळयाजवळ उतरायला एक वाडीतली वाट होती. आतल्या भागात दवणा-मरवा अशा सुगंधी वनस्पतींची लागवड केली जात असे. कधीकधी दुपारी तिथे ही हल्ला केला जात असे. मच्छीमार्केटजवळ मुख्य रस्ता लागे मात्र त्याआधी आमरण गाव लागे. आमरणातही मोजकी तीनचार घरं. मग पुढे बाजाराचं ठिकाण. सोमवार हा खाऊसाठी दहा पैसे मिळण्याचा काळ होता.बाजारातून जाताना एक वेगळीच मज्जा येई.पण ती मौज चणेफुटाण्यापलीकडे जाऊ शकत नसे.. बाकी सारं बघायला .

एक उंच टोकदार नाकाचा माणूस एका चाकाच्या काठीवर उंदीर,झुरळ, पाली ऊवा यांची हाताने काढलेली चित्राचा फलक घेऊन बाजारात फिरत असे.

"उंदीर माराच्या उवाच्या औषिद" हे त्याच्या तोंडातील जाहिरातीचं वाक्य...तेथे काढलेलं ऊवेचं चित्र इतकं मोठं होतं की चार-पाच ऊवा डोक्यावर असल्या तर डोक्यावर केस दिसणं मुश्किल.

तिथून पुढे जून्या बेलीकाका मार्केटमधली भारत बेकरी.इथे कायम गोडसर वास दरवळत असे.,बटर टोस्ट, गोड बिस्किटे, खारी यांची सरमिसळ असलेला चुरा... बटराचा भुक्का म्हणून विकला जाई. स्वस्त नि मस्त असा हा खाद्यप्रकार बहूतेकांना आवडत असे कारण तोच परवडत असे.

त्याहीपुढे 'भारती संतोष भुवन' नाव असलेलं कामतांचं हॉटेल. तेथे शीरा छान मिळे. हा मेनू रविवारी सकाळी चर्चमधून येताना खाऊ म्हणून आई आणत असे. कामतांची आई तो स्वत: बनवीत असे. सिनेमातून नाव ऐकण्याआधी मदनपुरीचा परीचय कामतांनीच करून दिला होता.पुढे कामताच्या हॉटेलशी दोस्ती जमली.आगाशीत तेव्हा दुकानदार गिर्हाईकांना नावाने ओळखत.. राघोभाई खाटकांनी.. या या लोपीस किती कापू? असा मार्केटिंगचा आवाजही आठवतो. सर्व गावातील सर्व माणसं एकमेकांच्या परिचयाची असायचा काळ होता.

पुढे पोरवालाची एकदोन भांड्यांची स्टोअर्स.गल्ल्यावर राजस्थानी घुंगटवाल्या भाभ्या.. रोशनलाल बोरीकाकाचं दुकान.. तिथे गणपतिच्या दिवसांत मातीचे पहिलवान हारीनं उभे केलेले असत. ते रंगीत व कुळकुळीत केस व मिशाधारी.. ऊघडेबंब पहेलवान कोण विकत घेत असेल हा प्रश्न बालमनाला पडत असे.

समोर बुधूकाका टेलरचं दोन खणी दुकान. फॅमिली डा ॅक्टर असावा तसा आमचा फॅमिली टेलर. घरच्या दुधाचा रतीब बुधुकाकाकडे जात असे. त्यातून नात्याची वीण घट्ट झाली. गोरापान आणि रूंद चेहऱ्याचा बुधुकाका एकदम विश्वजीत पेक्षा भारी दिसायचा.. काचेच्या कपाटात रंगीबेरंगी कापडाच्या गुंडाळ्या पाहताना मला अलिबाबाच्या गुहेत आल्यासारखे वाटत असे.

आणखी  राऊतकाकांचं वेल्डिंग वर्क्स, लोखंड वेल्डिंग करणारा मेणासारखा मऊ मनाचा बबनकाका... वेल्डिंगचा काळा चष्मा लावून जेम्स बाँड दिसत.. तो कोपरा ओलांडून पूढे सालूकाकाचं मोठं ओटीवर गॅलरी असलेलं गोव्याच्या पद्धतीचं घर...अन् मग पुढे शाळा दिसायला लागे...

शाळेत शिरण्याआधी संत तेरेजा हा ॅस्पिटलचा गेट दिसे. समोरचा रस्ता हरीजनवाड्यातून मंगाळा गावाजवळून स्मशानाकडे जाई... शाळेच्या मागच्याच बाजूला असलेल्या या स्मशानात शाळा चुकवून दंगा मस्ती करणारी भुतं कायम उतरत. भिंतीवर कोळशाने चित्र काढली जात. बहुतेकवेळा मन हलकं करणारं लिखाण अशा ठिकाणी होत असे पण ज्यांच्या आईबहिणीचा ऊद्धार करावासा वाटावा इतके वाईट शिक्षक नव्हतेच.... कायम सोवळयात असल्यासारख्या कडक शिस्तीच्या मुख्याध्यापिका गिरिधरबाई संक्रांतीला तीळगुळ घेऊन येत... वर्गातील तेहतीस मुलंच माझे तेहतीस कोटी देव आहेत म्हणून प्रेमाने वाटत. मुलांचे कपाळावर येणारे केस स्वतः वर्गात कापत. अजागळ येणाऱ्या मुलांना विहिरीवर नेऊन अंघोळ घालत. अशा या शिक्षिका सापडणं कठीणच नाही तर अशक्यच.

रमतगमत पंधरा-वीस मिनिटांत संपणारी वाट दुपारच्या जेवणाच्या रजेत आम्ही पाच मिनिटांत पार करत असू... पुढच्या पाच मिनिटात जेवून सगळे गडी खळयात जमत. मग सगळं टोळकं वाडीतल्या रस्त्याने निघे. सिझननुसार आंबे, चिंचा, फणस यावर धाड पडत असे. आणखी एक कार्यक्रम हमखास होई... वाडीतील बावखलात बांधलेल्या विहिरीत... किमान वीस पंचवीस फूट उंच रहाटावरून ऊड्या मारायचा कार्यक्रम. कधीकधी पाण्यातील पकडापकडीचा खेळ इतका रंगे की जेवणाची सुट्टी संपल्याची घंटा वाजून गेलेली असे. मग एकेक जण जमेल तसा वर्गात शिरत असे. कधीकधी त्या विषयाचे शिक्षक आमच्या आधीच पोहोचलेले असत... भिजलेल्या केसांवरून त्यांना अंदाज आला की थातुरमातुर कारण सांगण्यात अर्थ नसे... मुकाट्याने दोन दोन छड्या खायच्या नि जागेवर जाऊन बसायचं. वर्गातील मुलींचं लक्ष मात्र आमच्या खिशावर असे. कैऱ्या,चिंचा ही मालमत्ता एका बाकावरुन दुसऱ्या बाकावर पास केली जात असे. मुली मोठ्या चवीने मिटक्या मारत त्या खात मात्र त्यासाठी मार कायम आम्ही खात असू. हे वाल्याकोळयासारखं गणित असे... पण मजा येई.

अशी ही शाळेची वाट अजूनही आहे खरी पण आता ती सासूरवास झालेल्या विवाहितेसारखी पार वाळून गेली आहे. हुंदडत जाणारा घोळका तिला आताशा दिसत नाही. आता अंग चोरुन चालावं लागतं तिथं. कधी काळी येणं झालंच तर मी माझ्या शाळेची वाट न्याहाळत येतो. मातीत राहिलेले पावलांचे ठसे शोधत शोधत....

# पुस्तक परीचय : पुस्तकाचे नाव: रॉ लेखक: रवि आमले

■ **बेन्सन कोरिया, नंदाखाल**

शत्रूच्या भूमीत जाऊन वा राहून एखादी गुप्त माहिती मिळविणे किंवा अफवा पसरविणे हे पारंपरिक दृष्ट्या हेराचे काम. इतिहासामध्ये गुप्तहेराचे दाखले पदोपदी आढळतात. स्वराज्यात बहिर्जी नाईक या हेरामुळे गुप्तहेर खाते हे एका वेगळ्याच उंचीवर गेलं आहे. या युगात प्रत्येक देशाचा एक गुप्तहेर विभाग असतो आणि त्यात एक वा त्याहून अधिक गुप्तवार्ता संकलन करणाऱ्या संस्था असतात. काही संस्था ह्या देशांतर्गत माहिती मिळविण्यासाठी तर कधी शत्रूराष्ट्रातील किंवा मित्रराष्ट्रातील गुप्त बातमी मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतात

भारताचीही अशी एक संस्था आहे जी विदेशी भूमीतील गुप्त माहिती मिळविण्यासाठी सतत मेहनत घेत असते आणि ती संस्था म्हणजे *रॉ* (Research And Analysis Wing). ह्या पुस्तकातसुद्धा लेखकांनी रॉ च्या विविध मोहिमा, त्यांची तत्कालीन परिस्थितीत केलेली कामं अशा विविध कामांचा आढावा घेतला आहे. लेखक हे जेष्ठ पत्रकार आहेत. लोकसत्ताचे माजी वरिष्ठ सहसंपादक होते. सध्या सकाळ (मुंबई) चे निवासी संपादक आहेत.

तसं पाहता गुप्तहेर संघटनांबद्दल फक्त थोडीच माहिती उपलब्ध असते. ह्याच प्रमुख कारण म्हणजे एखादी माहिती सार्वजनिक झाली की ती गुप्त राहत नाही किंवा गुप्त माहिती ही सार्वजनिक करता येत नाही. एखादी महत्वाची माहिती बरोबर व्यक्तीकडून कशी काढून घ्यावी आणि चुकीची माहिती किंवा अफवा कशी पसरवावी हे या संस्थाचं प्रमुख काम असतं. लेखकांनी रॉ ने भाग घेतलेल्या, घडवून आणलेल्या मोहिमा अगदी मस्तपैकी व विस्तृत लिहिल्या आहेत. अगदी रॉ च्या जन्मापासून ते सध्याच्या वर्तमानापर्यंत. रॉ वाचताना अगदी अचंबित व्हायला होतं. काही गोष्टी अशा आहेत की असं कसं घडू शकते किंवा असं का घडविले जातं हा प्रश्न पडतो. कधी एखादी अप्रिय घटना घडली की राज्यकर्ते त्यावर टिप्पणी करतांना "परकीय शक्तीचा हात" वैगरे बोलून जातात. ही परकीय शक्ती म्हणजे शत्रू राष्ट्रातील गुप्तहेर संघटना. अशा गोष्टी करण्यात रॉ देखील मागे नाही हे मान्य करावे लागेल. जशी आपली रॉ तशी इतर देशाच्या सुध्दा गुप्तहेर संघटना आहेत. पाकिस्तानची ISI, अमेरिकेची CIA, इस्राएलची मोसाद वगैरे.

गुप्तहेराचं जीवन हे अतिशय सावधगिरीचं व धोकादायक असतं. कायम हेरगिरी करताना दुर्दैवाने पकडला गेलात तर स्वदेश आपले हात वरती करू शकतो किंबहुना करतोच. हेराचा स्वतःचा देश कधीही आपण ह्या पकडलेल्या हेराला तुमच्या देशात हेरगिरी करण्यात पाठविले आहे असे उघडपणे कधीही म्हणणार नाही. गुप्तहेर संस्थाच्या मोहीमा ह्या सर्वार्थाने देशाच्या हिताच्याच आणि आपले सार्वभौमत्व अबाधित राखण्यासाठी केलेल्या असतात. त्यासाठी जे काही बर वाईट करावं लागतं ते नैतिकता-अनैतिकतेच्या तराजूत मोजले जात नाही किंवा मोजले जाऊ शकत नाही. फक्त आणि फक्त राष्ट्रहितासाठी केलं जाते हे ह्या पुस्तकात अधोरेखित केले आहे. रॉच्या प्रत्येक मोहिमेला एक आंतरराष्ट्रीय राजकारणाची पार्श्वभूमी आहे. काही गोष्टी ह्या ठरवून केल्या गेल्या तर काही गोष्टीचा मागोवा अगदी वेगळयाच कोनातून घेतला गेलेला दिसतो.

बांगलादेश मुक्ती संग्रामापासून तर आताच्या श्रीलंकेत झालेल्या निवडणुकापर्यंत अनेक मोहिमेत रॉ सक्रिय राहिली आहे. बांगलादेश मुक्ती संग्रामात पडद्यामागच्या हालचालीत रॉचा हात कुणीही धरू शकत नाही. बांगलादेशला पाकिस्तानविरुद्ध लागणारी सगळी रसद रॉने पुरविली होती मग ती मदत आंदोलन करण्यासाठी पैशाची असेल किंवा बांगला सैनिकांना असलेल्या प्रशिक्षणाची असू द्या. अशा गोष्टी वाचताना नवल वाटते. तसाच काहीसा प्रकार हा सिक्कीम भारताबरोबर विलीनीकरांत आहे

ह्या मध्ये सुध्दा रॉ आघाडीवर राहिली आहे. एखादया देशात जर भौगोलिक किंवा राजकीय अशांतता निर्माण झाली तर त्या भडकलेल्या ज्वाला अजून भडकविण्याचे काम हे शत्रू देशातील गुप्तहेर संघटना करतात. जशा आपल्या देशात शेजारील राष्ट्र दहशतवादी कारवाया करीत असतो तशाच कारवाया रॉ पाकिस्तानमध्ये बलुचिस्तानामार्फत करतो.बलुचिस्तान प्रांत हा पाकिस्तानमधील पाकिस्तानवर  एक नाराज असलेला प्रांत आहे आणि ही नाराजी वाढविण्यासाठी आपल्या गुप्तहेर संघटना मदत करीत असतात. एखाद्या देशातील सरकार बनविण्यात किंवा सरकार पाडण्यात देखील गुप्तहेर संघटना मदत करीत असतात! अमेरिकेत तर मागच्या निवडणूकात डोनाल्ड ट्रम्प ह्याना जिंकविण्यासाठी रशियाची गुप्तचर संस्था KGB  ह्यांनी मदत केल्याचा आरोप खुद हिलरी क्लिंटन ह्यांनी केला आहे. आता तर रशियाचे अध्यक्ष ब्लादमीर पुतीन हे ह्या KGB चे एक माजी अधिकारी आहेत. तेंव्हा या आरोपाची खोली आपणास समजू शकते. ह्या पुस्तकात अशा अनेक गोष्टी नमूद केल्या आहेत.

गुप्तहेरांचं काम कधीही न संपणारे असते. युद्धकाळापेक्षा शांततेच्या काळात हे काम खुप जोमात असते. तलावात शांतपणे विहार करणाऱ्या हंसासारखे, वरून दिसतो तो शांत परंतु पाण्याखाली होत असलेली त्याची पायांची अखंड हालचाल आपणास दिसत नाही अगदी तसंच.

युद्धभूमीवर जाण्याअगोदर जर युद्ध जिंकायचे असेल तर आपल्याला शत्रूच्या बलस्थानांचा आणि कमकुवत जागेचा अभ्यास आवश्यक असतो. तो अभ्यास आपणास दिल्या गेलेल्या गुप्त माहितीवर प्रामुख्याने अवलंबून असतो. गुप्तहेर संस्था जेवढ्या मजबूत तेवढी देशाची अखंडता सार्वभौमत्व मजबूत असे मानले जाऊ शकते. शत्रू,आपला  संभाव्य शत्रू आणि मित्र ह्यांची गुप्त माहीतीही असावीच लागते तसेच आपली गुप्त माहिती कोणाच्या हाती लागू नये यासाठी पराकोटीची काळजी घ्यावी लागतेच.यालाच इंटेलिजन्स आणि काउंटर इंटेलिजन्स म्हणतात.

रॉ ह्या आपल्या गुप्तहेर संस्थेबद्दल एकंदरीत कमी माहिती उपलब्ध आहे व त्याहून कमी माहिती ही सर्वसामान्य लोकांना आहे. ह्या मधेच रॉच यशस्वीपण आलं. आपल्या गुप्तहेर संस्थेच्या अशा विविध रोमांचक मोहीमांसाठी रवि आमले साहेबांचं रॉ पुस्तक वाचलंच पाहिजे.

जय हिंद

# एका मेलेल्या पोष्टाची जिवंत गोष्ट -- **सिरील मिनेझीस.**

पोष्टsssमन !

एकेकाळी हा आवाज कानावर पडला की ऐकणाऱ्याचे कान टवकारायचे. लगबगीनं घरातून ऐकणारा बाहेर यायचा. आपल एखादे कार्ड, एखादे आंतरदेशीय पत्र अथवा पाकीट तर आलं नाही ना याची खातर जमा करायचा. त्या काळी सगळयात लोकप्रिय व्यक्ती बहुदा पोष्टमनच असेल यात तीळ मात्र शंका नाही .

"माँ मुझे नोकरी लग गई ,पुरे तीनसो रूपयेकी ."

अशी गोड बातमी आपल्या शिलाई मशिनवर कपडे रफू करणाऱ्या माँ ला सांगणारा हिरो अगणीत असायचे,पोष्टमनने आणलेल्या लखोट्यातूनच हिंदी सिनेमाची कथा ऊलगडत जायची असं म्हटलं तरी ते वावगं ठरणार नाही. मराठी नाटकात पोष्टमनची ऐंट्री हमखास असायची. स्वत:च्या खिशात दमडी नसलेला हा अवलीया मात्र हजारोच्या मनिऑर्डरी वाटत सुटायचा.आपल्या दुचाकीला लयब्द पैडल मारत गावागावात, नगरा नगरात भटकंती करणारा पोष्टमन पाहिला नाही असा माणूस शोधूनही सापडणार नाही.नुसतं टपाल पोहचवणे,मनी ऑर्डर पोहचवणे,तार देणे, इतकीच कामे त्याची नव्हती तर याही पलीकडे जाऊन, कुणाला पत्र वाचून दाखव कुणाला पत्र लिहून दे . अशीही कामे तो आनंदाने करायचा .पत्रावर शिक्के मारण्याचा त्याचा स्पिड बुलेट ट्रेन पेक्षा वेगवान असायचा.

आजचं इन्टरनेट युग अस्तित्वात येण्या अगोदर या पोष्टमनला एक वेगळा दर्जा एक वेगळाच मान होता. खाकी ड्रेस, डोक्यावर खाकीच टोपी, काखेत खाकीच भली मोठी झोळी, असा पेहराव असलेल्या निरागस पोष्टमनला इतकं सारं खाकी असताना, फुकटात खायची बिलकुल सवय नव्हती.आपल्या बगलेत भलामोठ्ठा पत्राचा गठ्ठा घेऊन लोकांच्या पायऱ्या झिजवणारा पोष्टमन सगळयांना हवा हवासाच वाटायचा.

पोष्टऑफिस म्हटलंकी आपल्या नजरे समोर येते ती एखाद्या जुनाट इमारतेतील अडगळीची खोली. सदैव कोंदड वातावरणाने बरबटलेली. अंधुक प्रकाशाचं राज्य असलेली. कपाटा -फडताळा व्यतीरीक्त इतरस्त्र पसरलेले फायलीचे व कागदपत्रांचे ढीग. हाताच्या बोटांनी अक्षरे गिरवता येतील इतकी धुळ साचलेली टेबले.जुनाट अपंग झालेल्या दोलायमान खुर्च्या .

"काय हवय ?"असं कावलेल्या स्वरात विचारणारा व चष्म्याच्या फटीतून नजर किंचीत वर करुन बोलणारा पोष्टमास्तर तुम्ही पाहिलाच असेल. ह्या महाशयाच्या चेहऱ्यावर हसु ऊमटत असेल का ? हा प्रश्न नेहमी मला पडायचा.

पोष्ट ऑफिसात जो तो आपापल्या कामात व्यस्त दिसायचा .कुठे ठप्याचा दणदणाट तर कुठे तारेची टिकटिक. बाबा आजमच्या काळातील डोक्यावर चित्र विचित्र आवाज करीत गरगरणारा पंखा, हवेपेक्षा मनस्ताप अधीक द्यायचा. ऑफिसच्या बाहेर तिकीट किंवा लिफाफे चिटकवण्यासाठी ठेवलेला गोंद पाण्यापेक्षा जास्त पातळ असायचा.

कुठे तरी असंख्य सुखसोईनी सुसज्य असलेले आपल्या स्वप्नातील पोष्ट ऑफिस असेल का ? असं राहुन राहुन वाटायचं. जिथं गेल्यावर सलाम ठोकणारा दारवान असावा. "यावे यावे. पोष्टात आपले स्वागत आहे."अस म्हणून चटकन बसायला खुर्ची देणारा मास्तर असावा. नीट लाऊन सजवलेली कपाटे असावी. कुठेही पसारा नसावा . पहिल्याच प्रयत्नात तिकीटे डकवणारी गोंदाची बाटली दिसावी.

"क्रुपया सुट्टे पैशे द्या." असा सवाल मास्तरांनी करावा अनं माझ्या खिशातील बंद्या रूपयाची आपोआप मोड व्हावी.

शाळेत असताना विध्यार्थ्यानां पोष्टासम्बधी इत्यंभूत माहीती ठेवावी लागत असे. कार्ड कितीला मिळतं ?, आंतरदेशीय पत्राचे मुल्य काय ?, पाकीटाची किंमत किती ? शिवाय मनी आँर्डरचे दर ही लक्षात ठेवावे लागत असत. पंधरा नये पैशाचे पोष्टकार्ड, पस्तिस पैशाचे आंतरदेशीय पत्र आणि साठ पैशाचे पोष्ट पाकीट आठवल की आता  भारतीय पोष्ट खात्याच अस्तित्व किती धोक्यात आहे ते लक्षात येत. पोष्ट ओफिसात सदैव टिकटीक करणारी "तार" सुध्दा अलीकडे इतिहास जमा झाली .

आता पोष्टा संम्बधी विध्यार्थानां शिकवलं जात का ?  पोष्टाचा इतिहास त्यांना शिकवला जातो का ? सारं सारं काही न समजण्या पलीकडचे.

साहवी - सातवीत असेन मी तेव्हा मला पोष्ट खात्या तर्फे पहिलं पत्र मिळालं होतं. संपूर्ण रात्र ते पत्र छातीशी कवटाळून मी झोपलो होतो. (खर सांगायच म्हणजे मी जागाच होतो पहाटे पर्यंत) त्याकाळी चाळीसगाव, जळगाव येथून  "जिवन प्रकाश" या नावाचे ख्रिस्ती प्रश्नावलीचा एक लखोटा येत असे. बायबल मधील उताऱ्यावर काही प्रश्न सोडवल्यावर बक्षीस रुपात पुस्तकं मिळत असे. आज आपण फेसबुकवर जशी फ्रेंड रिकवेस्ट करतो अगदी तशीच रिकवेस्ट तेव्हा सुध्दा असायची आणि मग नकळत आपण टपाल प्रेमी होत असत.

तेव्हा पोष्टमनच्या खांद्याला गच्च भरलेली बँग ,कुशीत भल्ल मोट्ठं टपालाचं गाठोडं दिसायचं. या पोष्टमनदादाची वाट न पाहणारा विरळाच .  चालत नाही तर सायकलच्या पैडंलला हाकणारा पोष्टमन     पाहिला की सारेच एकदम खुश होऊन जात . सुख - दुखाच्या बातम्या आणणारा, नोकरी लागल्याची गोड बातमी देणारा, गावाकडची आजी गेल्याची बातमी तेराव्याला का होईना अचूक देणारा हा पोष्टमनच होता.

काळ बदलला, तारेची खडखड कायमची थांबली . कार्ड, आंतरदेशीय पत्र ,पाकीट  काळाच्या ओघात नष्ट झाली. करोडोनी संपणारी कार्ड शेकड्याच्या घरात परत आली.  नव्या पिढीला पोष्टमन फक्त गोष्टी पुरता मर्यादित झाला.  हळूहळू हे टपाल सेवा बंद होण्याच्या मार्गाकडे वाटचाल करते आहे .

" चिठ्ठी आई है ..." असं गाणारा  पुढे कुठलं गाणं गाणार आहे ?

" ये मेरा प्रेमपत्र पढकर ...."  आपल्या प्रेयसीला प्रियकर कसा बरे आळवणार आहे ?

" मामाच पत्र हरवलं ,ते मला सापडलं ."  असं म्हणंत मुलं कधी फेर वरुन खेळतील का ?

" आपका खत मिला ,आपका शुक्रिया ." असं म्हणून प्रेयसी प्रियकराला पून्हा कधी धन्यवाद देईल का ?

अजुन धुगधुगी आहे पण मरणसुन्न अवस्थेत असलेल्या या मेलेल्या पोष्टाची जिवंत कथा तुम्हाला व मला निश्चित व्यथीत करणारी अशीच आहे.

# नवा नाताळ – **बेर्नादेत रूमाव**

जॉन अंकलने त्या कोपऱ्यावर नजर फिरवली, तर नेहमीच्या त्या जागेवर रोझा नव्हती. थरथरत्या हाताने आणि अधू नजरेने त्यांनी किचनमध्ये डोकावून पाहिले. तर किचनच्या ओटयाजवळ ऊभी राहून रोझा दूध गरम करत होती. ते पाहून जॉन अंकलला बरं वाटलं. 'येतेस का?' हा रोजचा प्रश्न मग त्यांनी विचारला नाही.

रोझाची ती ठरलेली. तिची आवडती जागा होती. नाहीतरी घराचा एखादा कोपरा आपला विशेष आवडीचा असतोच ना! रोझाने हॉलजवळच्या या खिडकीची निवड केली होती. दिवसाच्या कोणत्याही प्रहरी ती तिथे बसलेली असायची. तिची तेथे बसण्याचीही एक पध्दत होती. खिडकीच्या त्या कोपऱ्यात तिचा हक्काचा एक स्टूल होता. त्यावर खिडकीशी लघुकोन करून ती बसायची, त्यामुळे दोन गोष्टी साध्य होत असत. अधूनमधून घरभर तिची नजर फिरत राहायची व त्याचबरोबर खिडकीबाहेरील छोट्या जगातील सारं काही तिला दिसायचं.

आताही खिडकी शेजारच्या त्या छोट्या स्टुलवर रोझाचा भला थोरला देह विसावला होता. ती जागा म्हणजे तिच्या विरंगुळ्याचे साधन होते. अख्खा दिवस ती तिथे बसून राहायची व रस्त्यावरून जाणारी येणारी वाहनांची गर्दी, माणसांची वर्दळ निरखत राहायची. शाळा कॉलेजात जाणाऱ्या मुलांमुलींची दंगामस्ती, किंचाळणे-ओरडणे, आकाशातून ऊडणारी पाखरं, केबलवायरच्या झुल्यात बसून झोके घेणारे रावे, बुलबुल, शेजारच्या गुलमोहरावरून बदामीवर सतत ऊड्या मारत पाठशिवणीचा खेळ खेळत तुरूतुरू पळणाऱ्या खारूताई हे सारे तिच्या जगण्याचे भाग होते. तिच्या दिवसभराच्या विरंगुळ्याची ती साधने होती.

'येतेस का? जरा बाहेर पडू. बिल्डिंगभोवती दोन चकरा मारू. तेवढेच पाय जरा मोकळे होतील.' असं सारखं बोलून जॉन आता कंटाळला होता. सुरूवाती सुरूवातीला जॉन नेहमी रोझाला जाता बाहेर जाताना म्हणायचा. 'येतेस का?' पण आता त्यालाही ठाऊक झाले होते, की रोझा काही तिची मूळ हक्काची जागा सोडणार नाही. बाहेर पडणार नाही. तीस-बत्तीस वर्षाच्या सहजीवनानंतर आता तर जॉनची खात्री पटली होती. तिचे वाढते वजन हे त्यांच्या चिंतेचे एक कारण बनले होते.

...रोझा वर्षातून केवळ दोनदाच घराबाहेर पडायची. एकदा ईस्टरच्या व एकदा ख्रिस्मसच्या मिस्सासाठी... तेही रिक्षातून.रोझाच्या या कमी हालचालीमुळे तिचा देह असा अस्ताव्यस्त पसरला होता की स्थूल देहामुळे ती बाहेर पडत नव्हती हा जर तरचा प्रश्न आता ऊरला नव्हता.

आखाती देशात उमेदीची वर्षे घालवून जॉन मायदेशी आला. तोही रोझाच्या आग्रहाखातर. येथे परत आल्यावर त्याने एका गॅरेजमध्ये नोकरी धरली. ऊतार वयात त्यांच्यावर देवाची कृपा झाली. दोन मुलं झाली. हाडाची काडं करून त्यांनी मुलामुलीला निगूतीने वाढवले. पण अर्धवट शिक्षण, यथातथा नोकरीमुळे दोघांची लग्ने ऊरकता ऊरकता जॉन रोझाच्या नाकी नऊ आले. मुलांची लग्नं चाळीशीत झाली.

जॉन अंकल आता वयानुरूप थकले व हळूहळू ओणवे होऊ लागले. आता तर काय जॉनच्या शरीरावर पार्किंसनचा विळखा पडला होता. एक एक अवयवाचा ताबा पार्किंसन घेत होता. हालचाली मंदावल्या होत्या. तरी होता होईस्तोवर जॉन अंकल शरीर हलतं ठेवण्याचा प्रयत्न करत होते. घरातल्या घरात वॉकरच्या आधाराने ते फिरत होते. संध्याकाळी झाली की इमारतीभोवती एक दोन फेऱ्या सावकाश मारत होते. कितीही वेळ लागला तरी जॉन अंकल काठीचा, जिन्याचा आधार घेत खाली ऊतरत होते. जाणाऱ्या येणाऱ्या हात हलवत होते. विचारपूस करत होते. त्यांची देवाकडे, कुणाकडे काहीएक तक्रार नव्हती, पण प्रत्येकाकडे त्यांची एकच मागणी असे. 'Please Pray for me.' देवाकडे त्याचे फक्त एकच मागणं होते,' देवा, सगळं काही तुझ्या ईच्छेनुसार होऊ दे. पण मला शेवटपर्यंत चालत बोलत ठेव. बाकी काही नको.'

जॉन अंकलने दोन्ही मुलांमुलींची लग्नं आपल्या ऐपतीप्रमाणे लावून दिली. सुरूवातीची काही वर्षे म्हातारी म्हाताऱ्याची आशेने वाट पाहण्यात गेली आणि मग जशी वर्षे सरू लागली तशा दोघांच्या आशा मावळून गेल्या. ना मुलीच्या पदरात काही पडलं ना मुलाच्या. दोन्हीकडे पाळणा हलला नाही. क्वचित घराबाहेर पडणारी रोझा मग अधिकच घुमी झाली. अवती भवतीच्या स्त्रियांची सुखे पाहून खंतावू लागली. खिडकीत जास्त वेळ बसून दिवस घालवू लागली. रोझा-जॉनची म्हातारपणी नातवंडाना मांडीवर खेळवण्याची हौस राहून गेली. तरीही जॉन अंकलने आशा सोडली नाही. त्याने कधी देवावर राग धरला नाही. मरियेवरचा विश्वास ढळू दिला नाही.

दरवर्षी बाळ येशूचा गोठा तयार करण्याचे आपले व्रत सोडले नाही. ख्रिस्मस काळात लोकांना, पै-पाहुण्याना घरी बोलावून प्रार्थना, कँरल, आराधना करण्याची रीत सोडली नाही.

'काय दिलंय देवाने आपल्याला ? ना धड नोकरी दिली... ना वेळेत मुलं दिली... कसलं सुख दिलं देवाने ? म्हातारपणात मुलं दिली... तीही कुचकामी निघाली... मुलांनी तरी काय दिलं आपल्याला... आणि म्हणे देव...' सतत गप्प गप्प राहणाऱ्या रोझाच्या तोंडाचा पट्टा एकदा का सुटला की ती देवाला दुषणे देत राहायची.नशिबाला बोल लावायची.

' रोझा, असं बोलू नये. देवाने जे जे दिलंय त्याबद्दल आनंद मान. देवाच्या योजना माणसाच्या योजनाहून भिन्न असतात. यावर तू का विश्वास ठेवत नाहीस. 'अधनं मधनं दोघा म्हाताऱ्यात देवावरून असे खटके ऊडत पण प्रेमळ जॉन रोझाची समजूत काढी. मग तीही शांत होऊन खिडकी बाहेर डोकावत राही. पण पुर्वी नवऱ्याला ऊत्साहाने गोठा बनवायला मदत करणाऱ्या रोझाने मागील काही वर्षापासून मदत करणं सोडून दिले होते. अंकल थरथरत्या हातांनी जमेल तसा गोठा बनवत होते. आताही दिवसभराच्या खटपटी लटपटीनंतर गोठा बनवून ते इमारतीभोवती चकरा मारायला गेले होते.

ईमारती भोवती फेरफटका मारून जॉन अंकल वर आले होते. ते ऊत्साहाने फसफसत होते. रोझाने एकवार आपल्या बालसदृश नवऱ्याकडे पाहिले. साऱ्या कॉलनीभर ख्रिस्मसचा माहौल होता. सकाळी घराबाहेर पडलेला त्याचा मुलगा जेसन व सून मरिया अजूनही आले नव्हते. जॉनचे कान त्यांच्या येण्याचे

वेध घेत होते. निर्विकार मनाने रोझा रस्त्यावरील रहदारी निरखित होती. मध्येच नवऱ्याच्या मर्यादीत हालचाली पाहत होती. जॉनमधील बालसुलभ ऊत्साहाचे तिला भारी कौतुक वाटत होते.

एवढ्यात ईमारतीच्या गेटवर रिक्षा थांबली. त्यातून आधी जेसन खाली ऊतरला. त्याच्या हातात बरचं सामान होते. त्याच्या पाठोपाठ मरिया खाली ऊतरली. तिच्या हातात छोटं बांधलेले मुटकुळं होते. ते पाहून रोझाला नवल वाटलं. धडपडत ती स्टुलवरून ऊठली व जॉनला म्हणाली. 'जॉन...जॉन ईकडे ये. लवकर ये. ते...ते बघ. खाली...जेसन मरिया आले आहेत आणि मरियेच्या हातात बघ ना, काय आहे?... त्याच्या हातात बाळ आहे नं... कुणाचं आहे रे... ते बाळ ? तुला काही माहित आहे का? ते दोघे काही बोलले नाहीत आपल्याला... की ते असं बाळ आणणार आहेत म्हणून... 'आंनद व दुःखाच्या संमिश्र भावनांनी रोझा फार गोंधळून गेली. पण जॉन अंकल नेहमी प्रमाणे शांत, स्थिर होते.

' त्या दोंघाना तुला सरप्राईज द्यायचे होते.माझ्याशी या विषयावर जेसन बोलला होता.'

' मग तुम्ही का नाही सांगितले मला?'

' वा.. मग ते सरप्राईज कसे राहिले असते. ते बाळ मरियेच्या एका मैत्रिणीचे आहे.... अचानक राहिलेले... गडबड झालेलं... तिसरे बाळ... तिला नको असलेले.... आणि आपल्या मरिया- जेसनला हवं असलेलं.....'

' आणि आपल्या दोघांना सुध्दा हवं असलेले...

'खरं ना जॉन....' रोझा ऊत्साहाने म्हणाली.

'हो..अगदी खरं...'

' मग त्यांच्यात काही बोलणं झालं. मैत्रिणीनी बाळ आपल्या मरिया-जेसनला देण्याचं मान्य केलं आणि...आज नाताळच्या शुभमुहूर्तावर बाळ आपल्या घरी येत आहे. ' जॉन अंकलचे बोलणं संपेपर्यत दारावरची बेल वाजली. आणि लगबगीने रोझा दारापर्यंत धावत गेली. आपल्या आत नवा ऊत्साह संचारल्याची रोझाला नव्याने जाणीव झाली. सुहास्य वदनाने तिने जेसन मरियाचे स्वागत केले व बाळाला आपल्या कवेत ओढून घेतले.

' परमेश्वराच्या योजना खंरच भिन्न असतात. जॉन, तू बरोबर म्हणाला होतास.

यंदाचा नाताळ खरचं सुदंर व वेगळा आहे. ' बाळाचा गालगुच्चा घेत रोझा म्हणाली. जॉन अंकल आपल्या थरथरत्या हातांनी गोठा तयार करण्यात गढून गेले.

# काजव्याचे चांदणे - **पेट्रेशिया गोन्सालवीस, बोरीवली (पश्चिम)**

हॅलो,राणी कशी आहेस ? आहेस कुठे?

'बोल, मी बरी आहे, पण रजा वाढवते गं..

का गं...?

अगं तुला मी बोलले होते ना.. ब्रेस्टला गाठ लागते.. ती आधी मला फायब्रॉईडची आहे असं सांगितलं गं..

पण.. ती वेगळीच होती.... हुंदक्याच्या आवाजाने मी अंदाज बांधला.

ए, वेडाबाई रडतेस काय??, फोन ठेव मी येते संध्याकाळी घरी....

ओके,ये....

मी तिला उसना धीर दिला होता. पण मला पुढ्यातल्या फाईलमधले काहीच दिसेनासे झाले.

कशीबशी 5.30 ला निघाली. बसची वाट बघण्यात वेळ न दवडता मी सरळ रिक्षा घेतली. अर्ध्या तासात तिच्या सोसायटीत पोहचले. दारावरची बेल वाजवली.खात्री होती तीच येईल दार उघडायला. तिने हसत हसत दार उघडले अन नजरेनेच आत घेतले. एव्हाना चेहऱ्यावरचे हसू तोंडात "बुढ्ढी के बाल" विरघळावे तसे विरघळले होते. ती मला मिठी मारून रडत होती. माझा अंदाज खरा ठरला होता. डोक्याला बांधलेल्या स्कार्फ ने  सगळी उत्तरं मिळाली होती.

कुठून व कसे ते सांगता येईना पण मी तिला धीर दिला.

अगं आधी बस तरी... आणि काय अशी रडतेस??

काहीही असलं तरी सायन्स किती पुढे गेले आहे.

हल्ली कॅन्सरवर कितीतरी उपचार निघाले आहेत. तो आता असाध्य रोग नाही राहिला, मोघम काही उदाहरणे देत तिला शांत केले. केमोचे डोस दिल्यावर होणाऱ्या वेदना कित्येकांच्या जवळून अनुभवलेली मी, तिला धीर देत होती.माझीच मला दया आली.

खूप वेळ शांततेत गेला.माझ्या नकळत डोळयातून अश्रू आले. पण स्वतःला सावरत... विषयांतर करून इकडच्या तिकडच्या गप्पा करीत राहिले. whatsapp वरील जोक्स, काही विनोदी व्हिडिओ दाखवत होते.

ती खूप खळखळून हसत होती. तीही तिचा आजार.विसरून गेली होती.

आमच्या खिदळण्याच्या आवाजाने आत असलेली सासु हॉलमध्ये आली. मी अदबीने नमस्कार करावयास उठले तर सत्तरीची तिची सासु माझ्याकडे रागाने बघत तिला बोलली, खिदळता का? तुम्हांला काही काळवेळेचं भान आहे की नाही. घरात केवढं मोठं संकट. आमचं ना खाण्यात लक्ष, ना कुठल्या कामात... आणि तुम्ही हसताय मोठमोठ्याने. रागाने तणतणत आत निघून गेल्या.

अगं,राणी वाईट वाटून घेऊ नकोस, पण माझ्या काळजीने त्या अशा पॅनिक झाल्या आहेत.

असू दे गं, मला राग नाही आला. साहजिकच त्यांचं वागणं स्वाभाविक आहे.त्या मायेपोटी अशा बोलल्या. त्याचं जाऊ दे पण मला बघायला येणारे कितीतरी जणं खुशाली विचारायला येतात आणि मला जास्तच वेदना देतात.अगं एक तर म्हणाली अगं, मेडिक्लेम आहे का तुझा? खूप खर्च होतो गं. "त्या केमोचा किती गं त्रास तो? नको रे बाबा, गेल्या जन्मीचं पाप असेल गं."

दुसरी तर म्हणाली "आमच्या नात्यातली बाई या आजाराच्या नावाने सहा महिन्यांतच गेली गं."

असे कितीतरी सल्ले, नकारात्मक विचार माझ्या मनात कोंबवून जातात. त्या केमोचा त्रास होत नाही ना, एव्हढा त्रास या बघायला येणाऱ्या लोकांमुळे होतो. तू आलीस आणि आज किती दिवसांनी मी अशी खळखळून हसले गं.

बघ ना गं, आजाराचं काय सांगता येत नाही गं.

नश्वर शरीराला किती व्याधींना तोंड द्यावे लागते. पण बघ ना काही लोकं आजारी माणसाला पाहायला जातात आणि त्यांचा आजार वाढवतात.

मला तर या अशा शेऱ्यांचा त्रास होतो.तरी बरं आहे माझं कुटुंब माझ्या सेवेत कसलीच कसर ठेवत नाही. माझे उपचार,आहार, विराम सगळ्या गोष्टी आनंदाने करतात.

तुझ्यासारख्या मैत्रीणी येऊन असे आनंदाचे क्षण देतात म्हणून जगण्याची इच्छा आहे. नाहीतर कधीच..... मी तिच्या तोंडावर हात ठेवला. "असं काय बोलतेस वेडी...मस्त आनंदी राहायचं... औषधे घेत जा.आणि आता तर धोका टळला आहे. फक्त तू सकारात्मक राहा. जगण्याची प्रबळ इच्छा सर्व आजारांवर मात करते... चल, मला उशीर होतो... येऊ मी... " तिला बाय करून मी दरवाजाकडे वळले. जिना उतरता उतरता मनात आले.माझं हसणं खिदळणं तिच्या सासुबाईना आवडलं नसेल, पण ती किती खुश, फ्रेश दिसली.

नुकताच पाऊस पडून गेला अन् ऊन आल्यावर इंद्रधनुष्याने रंगाची ऊधळण करावी, अगदी तशी.... दुसऱ्यांच्या दुःखात,आजारात, आपल्याला खूप मदत करता आली नाही तरी हरकत नाही. पण बायबल मधले "विधवेचे दान" व.रामायणातील "खारीचा वाटा"उचलता आला तरी खूप आहे.काहीबाही बोलून दुसऱ्याचं दुःख वाढवण्यापेक्षा रुग्णांना भेटायला न जाणे बरे.आपल्या प्रार्थनेत त्यांच्यासाठी आरोग्याची याचना केली तर ते उत्तम ठरेल. पोकळ सहानुभूतीचे हॅलोजन लावून दुःखी करण्यापेक्षा, काजवे होऊन मिणमिणत्या प्रकाशाने दुखितांचे दुःख जाणले. त्यांना आधार दिला तर ते काजव्याच्या चांदण्यात न्हाऊन निघतील व जीवनाचा आनंद घेतील.

तर विचार कसला करताय..। होऊ या ना दुःखी जणांच्या आयुष्यातील काजव्याचे चांदणे.

अन उजळवु या त्यांचेही जीवन...

# 'रिकामं घरटं' – संगीता वाझ, वसई

लेबररूममध्ये ती वेदनेने तळमळत होती. ज्या वेदनेपुढे जगातील सर्व वेदना बोथट अशा त्या.... प्रसुतिवेदना. वेदनेचा खरा अर्थ आज तिला कळला होता. पण या जीवघेण्या वेदनेनंतर त्या साऱ्यांवर फुंकर घालणारा सृजनकर्त्याचा तो चमत्कार पाहून ती सर्व विसरली. आपल्या बाळाला जवळ घेऊन तिने 'आई' या नव्या भूमिकेचा शुभारंभ केला......

बाळाच्या संगोपनात ती पूर्णपणे रमून गेली. रात्र-रात्र जागून त्याचे शी-सू करण्यात तिला धन्यता वाटू लागली. आपली तहान, भूक, झोप सारं सारं विसरून ती आईपण उपभोगण्यात रममाण झाली नि दिवसरात्रीचे मिळून चोवीस तासही तिला अपुरे पडू लागले. त्याचे संगोपन व जराजरासे दुखलेखुपले करताकरता ती स्वतःलाच विसरून गेली. मुलाला वाढविण्याच्या या प्रोसेसमध्ये ती जणू एक जिवंत मशीनच बनली. मुलाच्या ओढीने संध्याकाळी ऑफिसमधून तिची ती घरी परतायची लगबग, ठरलेली लोकल पकडण्यासाठी केलेली धावपळ.... कशाकशाचेही तिला भान नव्हते. माझं बाळ अन् मी त्याची आई याव्यतिरिक्त तिला काही सुचत नव्हतं. तिचं जगच जणू तिच्या मुलापुरतं मर्यादित झालं होतं.

तिचं बाळ कलेकलेने वाढत होतं. त्याचे उपडे होणे, मान सावरणे, बसण्यासाठी धडपडणे, रांगणे, पडत-ऊठत दुडूदुडू चालणे.....सारे ती मनापासून एन्जॉय करत होती. आपलं 'आईपण' मिरवत होती. हळूहळू वर्षे सरत होती. मुलगा मोठा होत होता. मुळातच हुशार, गुणी, समंजस असा तो आपल्या आईवडिलांना उज्ज्वल भविष्याची स्वप्ने दाखवत एकेक इयत्ता पुढेपुढे जात होता.

तो बारावी पास झाला नि तिला नको असलेला तो क्षण आला. त्याने पुढील शिक्षणासाठी परदेशी जाण्याचा निर्णय घेतला. खरं पाहता तसा निर्णय अगोदरच ठरवून झाला होता, म्हणूनच गेले चार-पाच महिने तिचे चित्त थाऱ्यावर नव्हतेच.... कसा राहील हा तिथे माझ्याशिवाय? आजारपणात कोण ह्याची काळजी घेईल? रात्री नीट झोप लागेल का? खाण्यापिण्याचे हाल होतील का? प्रश्नचं प्रश्न. उत्तर मात्र एकाचेही मिळत नव्हते....

नि आज तो दिवस उगवला. तिचा छकुला तिला सोडून दूर परदेशी जायला निघाला होता. त्याला विमानतळावर सोडायला जाताना प्रयत्न करूनही तिचे अश्रू काही थांबत नव्हते. तोही हिरमुसला होऊन तिला बिलगून बसला होता. नवरा तिला समजावत होता नि तिचं मन मात्र दूर दूर भूतकाळात रेंगाळत होतं....

दुडूदुडू धावताना पडणारे तिचं बाळ.... कधी तापाने फणफणणारं तिला बिलगून बसणारं तिचं बाळ.... रागवल्यानंतर तिचे केस ओढणारं तिचं बाळ.... भरवताना तिचं बोट चावून खट्याळपणे हसणारं तिचं बाळ.... शाळेतून पहिल्या नंबराची बक्षीसं घेऊन हसत हसत येणारं तिचं बाळ...... जरा मोठं झाल्यावर तिने गालगुच्चा घेताच रागावणारं तिचं बाळ.... तिला सतत कामात व्यस्त पाहून मदत करण्यासाठी धडपडणारं तिचं बाळ.... किती किती रूपे त्याची.......

आता तिला तो जवळजवळ सहा वर्षे तरी दिसणार नव्हता. नंतरही तो इथे परतेल याची शाश्वती नव्हतीच.

गेली वीस वर्षे काडी-काडी जमवून जे घरटं त्या दोघा नवराबायकोनी बांधलं ते घरकुल आज त्यांच्या पिल्लाविना रिकामं रिकामं वाटत होतं. तिचं विश्व असलेला तिचा मुलगा आज पंखात बळ येताच भुर्रकन उडाला होता. आता उरलेले आयुष्य फक्त त्याच्या परत येण्याची वाट पाहण्यात घालवायचं होतं..... आकाशात झेपावणारे ते विमान दिसेनासं होईपर्यंत ती अश्रूभरल्या नजरेने पाहत राहिली.......

आजही ती मोठ्या आशेने वर आभाळातील विमानाकडे बघत असते. अजूनही तिला आशा आहे की तिचं बाळ परतेल नि ते रिकामं घरटं पुन्हा एकदा आनंदाने भरून जाईल पण आतला आवाज सांगतोय्.... पिल्लू घरटं सोडून गेलंय् ते न परतण्यासाठीच.

रेडिओवर वाजणारं 'या चिमण्यांनो, परत फिरा रे, घराकडे अपुल्या जाहल्या तिन्ही सांजा जाहल्या'.... हे गीत आजही तिच्या हृदयाला पिळ पाडतं.... समाजाच्या नजरेतून एका यशस्वी व कर्तबगार मुलाचं मातृत्व मिरवताना मन मात्र आर्त टाहो फोडून साद घालतंय्.... बाळा ! एकदा माघारी वळून बघ रे !!!

---

## जगायचंय मला!!

नको आई उमलण्याआधी तोडू मला
उमलू दे मला जीवन जगू दे मला।।ध्रु।।
आईच्या कुशीत जगायचंय मला
तुझ्या हाताच्या उबेत वाढायचंय मला
जीवनाचा आनंद मला ही घ्यायचाय
माझ्या जन्मदात्यांना मला ही भेटायचंय।।१।।
माझे गोडंस रुप पाहून तुही जाशील हरखून
पदराखाली घालून मात्रुत्वाचा आनंद ही
अनुभवशील
माझ्या काळयाभोर जावळातुन तू हात फिरवशील
तेव्हा तुझे दुःख, वेदना सारे काही विसरशील।।२।।
अगं,आई मी तुझा तनय असो की तनया
तुमच्या सहवासात मिळू दे आम्हांला माया
प्रपंच नको, दोघे ही समान जगण्यासाठी
म्हातारपणाची काठी होऊ आम्ही
तुमच्यासाठी।।३।।
नाही होणार मी तुम्हांसाठी ओझे
तुझ्या आधाराने भविष्य घडविन मी माझे
मग तुम्हांलाही वाटेल माझा अभिमान
घराण्याची राखीन मी शान।।४।।
आई खरे सांग,का नको मी तुला?
नाहीस ना तू वारांगना, व्यभिचारी, बलात्कारी
ललना
अर्थप्राप्त होऊ दे तुझ्या ही जगण्याला
मग तु का नाकारतेस माझ्या येण्याला।।५।।
नको आई उमलण्याआधी तोडू मला
उमलू दे मला, जीवन जगू दे मला.....

**सौ. पद्मजा भरत पाटील. वासळई**
**मो.9922464256**

# अंत्या ..... -- अमर म्हात्रे, वसई

दुपारची उन्हं वर चढायला लागली.. तसा जीव कासाविस व्हायला लागला होता... तितक्यात शेजारून खूप आरडाओरड ऐकायला आली... जावून पाहिले तर शेजारचा विनू अंत्या काकाला जोरदार ठोश्या बुक्याने मारत होता... अगदी लाथा घालतच त्याने त्याचे रक्त येई पर्यंत मारलं... मी सोडवण्याचा प्रयत्न केला पण विनू त्याला सोडायला तयार नव्हता.. त्याने शिव्या घालत त्याला घरातून घालवले... विनूची आई लक्ष्मी हे सर्व पाहून विनुला थोपवण्याचा प्रयत्न करत होती.. त्याला नको मारूस.. त्याला कशाला मारतोस अश्या आरोळ्या ठोकत तिचा अश्रूंचा बांध फुटला होता... तिलाही फरफटत त्याने अंगणात काढले ..विनू आज कुणाचेच ऐकायला तयार नव्हता.

"तुला माहिती हाय लोकं काय बोलतात... या वयात म्हातारा म्हातारी बिन लग्नानी राहतात... कसं सहन करायचं..?" "तुला जायचे तर जा त्याच्या सोबत मला या पुढे या घरात तो म्हातारा दिसला नाय पाहिजे" असे म्हणत विनू आपल्या सायकली वरून चालू पडला.. म्हाताऱ्या लक्ष्मीला हात देत मी घरात सोडले. अंत्या तडक रस्ता फुटेल तिथे निघून गेला.. तो आता पुन्हा येईल अशी शक्यता नव्हती. मी तो प्रकार पाहून गोंधळलो.. मुंबईत रहात असल्याने गावचे काही समजत नव्हते. दुसऱ्या दिवशी सकाळी मी विचारपूस करण्यासाठी लक्ष्मी काकू कडे गेलो, अंत्या रातभर गायब होता. ती त्याची वाट बघत होती. पण तो काही परतला नव्हता. "विनू असा का गं वागतो?? आपल्या आई वडिलांना काय असे कुत्र्या वाणी वागणूक द्यायची असते का..?" त्यावर ती म्हणाली "अंत्या विनूचा बाप नाही पन सख्या बापने केले नसेल इतकं त्याने करून ठेवल आमच्या करता... " आता तो म्हातारा झाला म्हणून त्याला असा बाहेर काढायचा का?? ..ऐकून मला गरगरायला झाले.

तिने सारी हकीकातच सुरु केली. अंत्या माझ्या माहेर गावचा.. माझ्यावर मनापासून प्रेम करायचा.. त्यांच्या घरी सर्व काही होत, जमीन जुमला, पैसाअडका कश्याची कमी न्हवती.. आमच्या प्रेमाला विरोध होता.. घरच्यांच्या विरोधात जावून मला लग्न करणे शक्य नव्हते.... म्हणून घरच्यांनी जिथे ठरवले तिथे लग्न केले... अंत्या मात्र तसाच राहिला... त्याने लग्न केले नाही... त्याच्या घरच्यांनी त्याला समज दिली पन नाय सुधारला... लग्नाच्या काही वर्षात माझा मालक माझ्या पदरात एक मुल टाकून देवाघरी गेला.... मंग काय लोकांना तेवढाच चानस... सगळे एक जात लांडगे... एकटी बाई असली ना.. की हे जगू देत नाही....

तिच्या तोंडाचा पट्टा सुरु झाला होता... लचके तोडणारी घीदाडंच ती.... त्यांच्या पुढे माझा काय निभाव लागणार?? अंत्या भेटला. त्याला कुणी तरी माझी परिस्थिती सांगितली... तसा तो भेटायला आला... घरातून कधीच हाकलून काढला होता... त्यानं मला इथेच राहायचंय.. मी पाहीन सर्व.. असे सांगून तो इथेच राहायला आला. त्याने मोल मजुरी केली.. विनुला शाळेत घातला.. त्याच्या सर्व पालनपोषणाचा खर्च त्याने राब राब राबून केला.... तसं आमच्यात काही नव्हतं... माझ्यावरच्या प्रेमाखातर त्याने स्वत:चे आयुष्य बरबाद करून हे सर्व केलं होतं.... तो नसता तर आज मी नसती.. मला जीव द्यावा लागला असता... लोकं वाईट... पण आज असे वाटते पोटची पोर तरी कुठे चांगली असत्यात ?? तेव्हाच जीवाचं काही बर वाईट

केल असत तर बर झाल असत.. असे म्हणत तिला हुंदका लागला.. ती रडू लागली.. मी घरी परतलो... मन सुन्न झाल.... आज काल अशी लोकं पण आहेत... हे ऐकून अस्वस्थ झालो ...

मला काही दिवसांतच मुंबईला रवाना व्हायचं होत. सकाळी सर्व तयारी करून मी रेल्वे स्थानकावर पोहोचलो... तर एक म्हातारा रेल्वे कॅंटीन पाशी ओशाळल्यागत उभा होता.. चेहरा ओळखीचा वाटला म्हणून जवळ गेलो, तो अंत्या होता.. मी भेटल्याने त्याला आनंद झाला... त्याने लक्ष्मीची चौकशी केली.. मी भेटलो असे सांगू नका असे घाबरतच सांगत त्याने माझ्या कडून वचन घेतले. त्याच्याकडे पैसे नव्हते.. म्हणून त्याला काही पैसे दिले.. चहा आणि नाश्ता करून तो हात जोडून निघाला.. माझ्याही गाडीची वेळ झाली होती... त्याच्या पाठमोऱ्या आकृती कडे पाहतच मी स्टेशन सोडले, पुढे २ वेळा जाणे झाले तेव्हा अंत्या फलाटावर भिक मागत असताना दिसायचा.. मला भेटला की त्याला काही पैसे मी देत असे.... लक्ष्मी काकू तो गेल्या नंतर आजारी पडली... ती पुन्हा कधी उठून उभी राहिलीच नाही...

एके दिवशी तिने कायमचा निरोप घेतला... फलाटावर अंत्या नेहमी प्रमाणे भेटला आणि नेहमीप्रमाणे त्याने तिची चौकशी केली.... "ती गेली रे कालच... तुझी आठवण काढायची ".. त्याच्या डोळ्यांत टचकन अश्रू बाहेर पडले... तो उठून निघाला... मी ही रवाना झालो.. त्यानंतर तो कधी भेटलाच नाही आज ही मी त्याला शोधत असतो... एखादा भिकारी भेटला तर तो तोच तर नाही ना याची खातरजमा करावीशी वाटे.. मग तो कुणीही असो मला त्याच्यात अंत्याच दिसायचा.. त्याला काही पैसे दिले की समाधान वाटे.. त्याने स्वत:च्या जिंदगीचा विचार न करताच दुसऱ्याचे पोर वाढवले आणि अपेक्षाही ठेवल्या असतील तो मोठा झाल्या वर आधार बनेल.. इथे रक्ताचे नाते कधी आपले होत नाही तिथे दुसऱ्याचे काय होणार ??

---

## धर्म धमन्यांतून - **आयवन क्रास्टो**

वेदीवर सजावटीच्या आडून,
प्रवचनाचा डाव मांडल्यावर,
अतिशुद्ध भाषा, पारदर्शक,
अन, सोनेरी कडेच्या चष्म्यातून ,
छानशा परदेशी गोष्टीतून,
समोर बसवलेल्या,
खुर्चीत जखडलेल्याना,
मारून मुटकून ऐकवल्यावर;

भक्ती गीतांच्या मेळयामध्ये,
अध्यात्म्याच्या ढोलकीतून,
तमाशाची धून प्रकट करून,
इंग्रजीतून देवाचा गौरव,
देशी हाथ जोडून केल्यावर,

वधस्तंभी टांगलेल्या तारणाऱ्याला,
पुन्हा पुन्हा मारल्यावर,
त्याच्या निस्तेज झालेल्या,
कुशीतला भाला अलगद काढून,
त्याला पुन्हा पुन्हा गव्हाणीत,
जन्माला आणल्यावर,
बुद्धीपटलावर द्राक्ष रस ओतल्यावर,
सुटलेल्या जिभेच्या अग्रावर,
देवशब्द नाचवल्यावर;

धर्म धमन्यांतून वाहू लागेल का ?

# एक नाताळ आगळा वेगळा
# ख्रिस्तानुभव तृतीयपंथीयांसोबत

■ **फा. आसिस रॉड्रिग्ज SJ**

पिंकी उर्फ दिशा शेख. असामान्य प्रतिभेच्या ट्रान्सजेंडर. अत्यंत बुद्धिमान आणि उत्तम वक्तृत्व लाभलेल्या दिशाने मराठी साहित्यात आपले आगळे वेगळे स्थान निर्माण केले आहे. दिशाच्या कविता असामान्य ताकदीच्या असून तृतीयपंथी व्यक्तीचं जगणं भळभळत्या जखमेप्रमाणं त्यांनी आपल्या कवितेतून मांडलं आहे. त्या कविता वाचकाला अस्वस्थ करून सोडतात.

रेल्वे पोलिस, मवाली, गुंडांकडून त्यांचं मोठ्या प्रमाणात लैंगिक शोषण होतं. आपल्याच समुदायाच्या कारभा-यांकडून होणारी त्यांची पिळवणूक आणि सतवणुक सुन्न करून सोडते.

दिशाशी प्रत्यक्ष परिचय झाला तो नाशिक बाळ येशू मंदिर येथे युवा संमेलनात. त्या दिवसभर युवकांसोबत होत्या. ह्या कार्यक्रमात युवकांना प्रबोधन करण्यासाठी त्यांना निमंत्रित करण्यात आले होते. जेणेकरून युवकांना तृतीयपंथीयांच्या कथा आणि व्यथेची जाण व्हावी, व त्यांच्या प्रती आदराची भावना वाढीस लागावी.

प्रभावी वक्तृत्व लाभलेली दिशा अत्यंत अभ्यासपूर्ण बोलल्या. एका वेगळ्या गूढ आणि उपेक्षित जीवन जगणाऱ्या समुदायाची वेदना आणि अनुभव ऐकून मी खूपच अस्वस्थ झालो. स्त्री आणि पुरुष ह्यांच्यात भेदाभेद केला जावू नये अशी शिकवण दिली जाते. परंतु स्त्री आणि पुरुष यांच्याशिवाय तृतीयपंथीय ही तिसरी व्यक्ती आहे. त्याविषयी काय? असा प्रश्न उपस्थित करून आम्हालाही समानतेची वागणूक द्या असा टाहो त्या फोडतात.

या प्रश्नाची सल मनात खदखदत होती. त्यातूनच २०१८ चा नाताळ आम्ही तलासरी येथील येशुसंघिय फादर व कनोसा सिस्टरांनी तृतीय पंथीयांच्या सोबत साजरा करावयाचे ठरविले.

तलासरी परिसरात, चारोटी व विरार टोलनाक्यावर उभे राहून पैसे मागणाऱ्या काही तृतीयपंथीय भगिनींना भेटून त्यांना कार्यक्रमाचे निमंत्रण दिले.

ठरलेल्या दिवशी त्या कार्यक्रमासाठी उपस्थित झाल्या. प्रार्थनेने सुरुवात केली व नंतर एकमेकांची ओळख करून घेतली. त्यांनी त्यांचा परिचय देताना आम्हा सर्वांना अगदी भावूक केले. त्यांनी आम्हा समोर त्यांचे मन मोकळे केले. त्यांचे अनुभव कथन ऐकून आम्हाला एका वेगळया जगात जगणाऱ्या विश्वाची ओळख झाली. तृतीयपंथीय व्यक्ती म्हणजे एक नकोशी वाटणारी आपत्ती हा पूर्वग्रह दूर झाला व आम्हांत एक प्रेमाचे व आपुलकीचे नाते जुळून आले. केवळ पैसे देवून त्यांच्याविषयी आपुलकी व्यक्त करता येणार नाही तर त्यांच्याशी बरोबरीच्या अथवा समानतेच्या पातळीवर जाऊन स्नेहभाव आणि बंधुभाव वाढविला पाहिजे.

देव पुत्राचा जन्मच मुळी आमच्यातील द्वेष, वैर, पूर्वग्रह दूर सारून प्रत्येक व्यक्तीचा आदर करण्यासाठीचा आहे. हाच खरा नाताळचा संदेश आज बाळ येशू आम्हास देत आहे.

एक व्यक्ती म्हणून आम्ही तृतीयपंथीयांना स्वीकारावे व आमच्यातील त्यांच्याप्रती असलेली भीती व दुरावा दूर सारावा, म्हणून एकजुटीने एकदिलाने प्रयत्न करूया.

# आयना- एक देवदुत - **कल्पना रॉड्रिग्ज**

माझ्या अमेरिकावारीत अलिशा शोएब ह्या स्त्रीशी माझी ओळख झाली. तिच्याकडे बघुन विश्वासच बसला नाही की ती चार मुलांची आई आहे. एक अनोखं तेज तिच्या चेहऱ्यावर दिसतं होतं. हसतमुख आणि प्रेमळ अलिशाशी मैत्री व्हायला मला जास्त वेळ नाही लागला. भारतात परत आल्यावर फेसबुक आणि फोनच्या माध्यमातुन आम्ही एकमेकांची विचारपुस करत राहीलो.

अलिशाच्या चार मुलांपैकी मोठी आयना व्हिलचेअरला खिळली होती. तिच्या हालचाली खुपच मर्यादित होत्या. पण आयनाची काळजी घेत असताना अलिशाने कधीच कुरकुर नाही केली. आपली जबाबदारी ती विनातक्रार पार पाडत होती. देवाकडे आपल्या लाडक्या लेकीच्या आरोग्यदायी आयुष्याची मागणी करत होती. आयनालाही भेटण्याचा योग मला लाभला होता. आणि आईसारखेच तिच्याही डोळ्यात एक अनोखे आणि विलक्षण तेज होते. तिचा चेहरा खुपच हसरा आणि बोलका वाटत होता. तिला पाहताक्षणी कोणीही तिच्या प्रेमात न पडले तर नवलच समजायचे, एवढी गोड होती आयना.. त्यानंतर रोज प्रार्थनेत आयनाची आठवण ही एक सवय बनुन गेली.

पण एक दिवस बातमी मिळाली की आयनाला ह्रदयविकाराचा त्रीव्र झटका आला आहे. ती अत्यवस्थ आहे आणि शेवटचे क्षण मोजत आहे. आयनाचा गोड हसरा चेहरा डोळ्यांसमोर तरळला. रुग्णालयातील खाटेवरही हसत - हसत आयना मृत्युशी झुंज देत होती पण तीन दिवसांनी मिळालेल्या बातमीने डोळ्यात चटकन पाणी आले. आयनाने आपला ह्या जगतातील प्रवास संपवला होता. एकदाच पाहिलेल्या आयनाने माझ्या ह्रदयात घर केले होते . वय अवघे अकरा वर्ष ... तीचा जीवनपट जो तीच्या आईकडून कळला होता तो नजरेसमोरुन जाऊ लागला..

आयना कालालानी लुईचा जन्म २६ सप्टेंबर २००५ रोजी सकाळी ०२:४६ वाजता झाला होता. ती खुप सुंदर बाळ होती, नाजुकशी परीच जणू. तिच्या येण्याने सर्व घरात खुशीचे वातावरण पसरले. अलिशा शोएबला तीने आई बनवले. तीला ह्रदयाशी कवटाळताच अलिशाचे पुरे नऊ महीन्याचे कष्ट, वेदना, सारे चुटकीसरशी गायब झाले होते. घरातील पहिल्याच बाळाच्या आगमनाने घराला घरपणं आले होते. आयनाच्या पहिल्या नावाचा अर्थ शाश्वत बहर, आणि मधल्या नावाचा अर्थ उज्ज्वल आणि उत्साही किंवा स्वर्गीय असा आहे. तिच्या गालावर पडणाऱ्या खळीने ती सर्वांच्या चेहऱ्यावर मोरपीस फिरवल्यागत स्वर्गीय स्मित पसरवायची. तिच्या बाल-लीलांनी सारेच मोहरून गेले होते आणि तिच्या आईसह सर्वच छोट्या आयनाच्या प्रेमात पडले होते.

पण ह्या सर्व सुखाला गालबोट लागल्यागत झाले. अवघी दिड महिन्याची असताना आयनाला अपस्माराचे (फेफरे) भव्य झटके येऊ लागले. अलिशाच्या कुटुंबातील कोणालाही पुर्वी असा आजार झाला नव्हता म्हणून काय करावे हे कुणालाही कळत नव्हते. अलिशाने पहिल्यांदा डॉक्टरांवर विश्वास ठेवला आणि उपचार चालू केले. आणि त्या नंतर तिने ह्या आजाराविषयी माहीती मिळवण्यास सुरूवात केली. खुप वाचन केले आणि संशोधन करुन तिनं इतर पर्याय शोधले. अलिशाच्या मेहनतीचा आणि डाॅक्टरांच्या उपचाराचा

परिणाम दिसु लागला. उशीरा का होईना पण आयना रेंगाळायला लागली, बोलण्याचा प्रयत्न करु लागली , उभे राहण्यासाठी ती आधार शोधु लागली, ती खोलीभोवती फिरु लागली आणि स्वत: खायला आणि दुधाची बाटली प्यायला शिकली.

तिच्या १८ महिन्यांच्या लसीकरणानंतर तिचा आजार परत बळावला, तिच्या थेरपिस्टने ते सर्व पाहिले आणि नोंद करुन ठेवले. आयनाचे उभे राहणे, रांगणे, मम्मा म्हणणे , हाय आणि इतर अनेक उदयोन्मुख शब्द जे तिने म्हणायला सुरवात केली होती ते सर्व थांबले. तिला मदत करण्यासाठी अलिशाने कंबर कसली. जॉन्स हॉपकिन्स ह्या इन्स्टीट्यूटच्या सल्लयानुसार तिनं आयनाच्या अपस्माराच्या झटक्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तिला केटोजेनीक आहार सुरू केला.तिच्यावर न्यूरोलाॅजिस्टही उपचार करत होतें एक्यूपंक्चर आणि शस्त्रक्रिया एक शक्यता आहे की नाही हे पाहण्यासही सुरवात झाली होती.

आयनाच्या योग्य औषधोपचारांसाठी तिचे कुटुंब हवाईतून मुख्य शहराकडे परत आले. तिच्या मेंदूत असे काही भाग आहेत का की ज्याच्यामुळे तीला झटके येतात हे पाहण्यासाठी तिच्या मेंदुचे मूल्यांकन केले गेले. यू. सी. एल. ए. ( युनिव्हरसीटी ऑफ कॅलिफोर्निया लाॅस एंजेलीस) येथे एमआरआय, व्हिडिओ ईईजी आणि पीईटी स्कॅन केले. आयनाचा एमएजी स्कॅन करुन घेण्यासाठी तिला यू.सी. एस. एफ.(युनिव्हरसीटी ऑफ कॅलिफोर्निया सॅन फ्रान्सिस्को ) येथे नेण्यात आले. केटोजेनिक आहारावर ती काही काळ अपस्मार मुक्त होती, परंतु नंतर मायोक्लोनिक झटक्यांचा त्रास सुरु झाला. आयनासाठी तीचे कुटुंब पर्यायी उपचारांचा शोध घेत राहिले. गांजा आणि भांग ह्यांच्या तेलाने तिचे मालीश सुरु केल्यामुळे वैद्यकीय गांजा चळवळीस लहान मुलाच्या रूपाने आयनाने हातभार लावला. ह्या तेलांमुळे ती काही काळ आजार मुक्त होती. हे तेल तीला मदत करत होते पण जेव्हा ती आजारी होत होती आणि जेव्हा तिला झटके यायचे तेव्हा ती पडायची आणि त्यामुळे तिची हाडे मोडू लागली. हे वेगवेगळया कारणांमुळे होत होते, परंतु मुख्यत: तिच्या फीमरची (मानवी शरीरातील सर्वात लांब आणि जाड हाड जे ओटीपोटापासून गुडघ्यापर्यंत वाढते) योग्यरित्या वाढ न झाल्यामुळे आणि कॅल्शियम उत्पादनास चालना देण्यासाठी तिच्या शरीरात योग्य आणि पुरेसे घटक नसल्यामुळे तिची हाडे खुप नाजुक बनली होती. तिच्या 11 व्या वाढदिवसापर्यंत (तिचा शेवटचा वाढदिवस) ती केटोजेनिक आहारावर राहिली.

तिला सुट्टीवर जायला आवडायचे, नाचणे, संगीत, प्राणी (विशेषत: बकरी) ह्यावर तिचा जीव होता. संगीत सुरु झाले की तिचे पाय आपोआप हलायला लागायचे. पूल थेरपीवर जाण्यासाठी, खरेदी करण्यासाठी, सिनेनट्यांसारखा मोठा गाॅगल घेण्यासाठी तिला नेहमीच आवडायचं . तिचं तिच्या “पपी” नावाच्या मांजरीवर विशेष प्रेम होते. तिच्या दोन भावांपैकी सगळयात छोट्या भावाला ती नेहमी आपल्या वेंगेत घेऊन बसायची. मजेत सर्वजण तो आयनाचा छोटा बाळ आहे असे बोलायचे. चॉकलेट डोनट्सच्या नुसत्या नावानेच आयनाच्या तोंडाला पाणी सुटायचे .अशी ही आयना लहान मुलींच्या शरीरात अडकलेल्या एका 20 वर्षांच्या मुलीसारखी वागायची. तिच्यात उपजत अशी विनोदबुद्धी होती. तिला तिची परिचारिका आणि कुटुंब खुप आवडायचे. शपथ घेऊन बोलणारे लोक तिला हास्यास्पद वाटत होते. ती खरोखरच एक शूर योद्धा होती, जी इस्पितळातील भीषण परिस्थितीतही खंबीर होती आणि आशेचा किरण दाखवत होती. ती तिच्या कुटुंबीयांसाठी आयुष्यातील सर्वात मोठी देणगी आणि आशिर्वाद होती. तिच्याकडुन खुपशा गोष्टी शिकायला

मिळत होत्या. तिच्या आयुष्यात अजून बरेच काही चालले होते. परंतु ते सर्व सांगण्यास मला काही दिवस लागतील. तिच्या आयुष्याचा हा एक अतिशय संक्षिप्त विहंगावलोकन आहे.

११ वर्षीय आयनाला ९ सप्टेंबर २०१७ मध्ये हृदयविकाराचा झटका आल्यानंतर तीचा जीव वाचविण्याच्या प्रयत्नात अलिशाने आपल्या मुलीवर सीपीआर केले, परंतु आयनाचा मेंदू फार काळ ऑक्सिजनपासून वंचित राहिला आणि तिला ब्रेन डेड घोषित करण्यात आले. आयनाचे निधन झाल्यानंतर आयनाच्या आईला वाटले की ज्याप्रमाणे जिवंत असताना आयनाने अनेक लोकांना स्पर्श केला त्याचप्रमाणे ती नसतानाही लोकांना तिच्या प्रेमाचा अनुभव यायला हवा. आयना प्रेम आणि करुणेने भरलेली एक देवदुत होती. आणि म्हणूनच अलिशाने आयनाच्या अवयवांचे दान करण्याचा निर्णय घेतला.

अलिशाच्या वीर कृतीतून तिच्या मुलीचे अवयव प्रत्यारोपणासाठी व्यवहार्य राहण्यास मदत झाली आयनाच्या मूत्रपिंडासाठी रक्तगट जुळणारे प्राप्तकर्ते आढळले - आयनाचा असामान्य रक्त प्रकार पाहिल्यास हे एक कठीण काम होते पण ते सहजरीत्या शक्य झाले. आणि आयनाच्या मूत्रपिंडामुळे दोन महिलांचे प्राण वाचले. मिशिगन आणि न्यूयॉर्कमधील मुलांसाठी तिच्या हृदयाचे वाल्व उपयोगी पडले. तिच्यासाठी लाइफशेअरिंग कर्मचाऱ्यांनी ऑपरेशन रुममध्ये  मौन पाळले व तिला श्रध्दांजली अर्पण केली. अजूनही आयना आपल्या अवयवांच्या माध्यमातुन अनेक जीवनाला स्पर्शून जात आहे .

आयना, ज्या नावाचा अर्थ  "शाश्वत बहर" आहे अशी ती आयना जन्मजात रोगाला बळी पडली. ही एक शोकांतिका आहे . पण जरी ती बोलू शकत नव्हती, तरीही तिच्या हास्याने परीसर उजळुन जात होता. आयनाच्या कुटुंबियांनी तिला "प्रत्येकाचे देवदूत" म्हटले कारण तिने बऱ्याच जिवांना स्पर्श केला. तिची दिलदार वृत्ती, दिलखुलास हास्य आणि गालांवरील मोहक खळी अविस्मरणीय आहे. तिच्या शौर्याने अनेकांना प्रेरणा दिली. आई अलीशा आयनाविषयी म्हणते की , "तिने दररोज एक छोटा योद्धा बनुन सर्व स्तरातील लोकांना एकत्र केले."

असं म्हणतात की देवाचे दुत नेहमी ह्या भुतलावर येत असतात आणि खरोखरच एक दुत आयनाच्या रुपात अवतरला होता. तीचे असामान्य जीवन हा एक चमत्कार होता. आयना आणि तिच्या आईपासून प्रेरणा घेऊन अनेक जणांनी अवयव दान करण्याचे ठरवले.

आज आपल्या ईथेही काहीजणांनी त्यांच्या लाडक्या आप्तस्वकीयांच्या निधनांनंतर त्यांचे अवयव दान करुन अनेक लोकांना नवजीवन दिले आहे. आगाशी येथील लोपीस कुटुंबीयांनी घेतलेला अवयवदानाचा निर्णय खुपच स्तुत्य आहे.

अवयवदान दोन्ही जिवंत आणि मृत दात्यांद्वारे  केले जाते. जिवंत दाता दोन मूत्रपिंडांपैकी एक, एक फुफ्फुस किंवा फुफ्फुसांचा काही भाग, त्यांच्या यकृताच्या दोन लोबांपैकी एक, आतड्यांचा एक भाग किंवा स्वादुपिंडाचा काही भाग दान करू शकतो. तर मृत दाता यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुसे, आतडे, स्वादुपिंड, कॉर्निया ऊतक (Tissues) , त्वचेचे ऊतक, कंडरा आणि हृदयाचे झडप दान करू शकतात.







अवयव दानाची प्रक्रिया ही प्रत्येक देशात वेगवेगळी असते .अवयव प्रत्यारोपणाबाबत सगळ्या जगात आता जागृती होत आहे. अवयव प्रत्यारोपण दरवर्षी हजारो मुले आणि प्रौढांना संपुर्ण आणि सक्रीय आयुष्य जगण्याची संधी देऊ शकते.

परंतु आज गरजुंच्या तुलनेत अवयव दात्यांची संख्या अगदीच नगण्य आहे. अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत दरवर्षी जगातील विविध भागात कित्येक लोक मरतात ही वाईट गोष्ट आहे. वेगवेगळ्या देशांची सरकारे अवयवदानाचा पुरवठा वाढवण्यासाठी पाऊले उचलत आहेत आणि काही भागांत दात्यांची संख्या वाढली आहे. तथापि, अवयवांची आवश्यकता एकाच वेळी बऱ्याच वेगवान वेगाने वाढली आहे.

आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की भारतात वार्षिक 200,000 मूत्रपिंडांची वार्षिक मागणी असून केवळ 6,000 प्राप्त होतात. त्याचप्रमाणे, हृदयाची सरासरी वार्षिक मागणी 50,000 आहे तर त्यापैकी कमीतकमी 15 उपलब्ध आहेत.

अवयवदात्यांची संख्या वाढविण्यासाठी अवयवदानाची गरज जनतेत संवेदनशील होणे आवश्यक आहे. सरकारने टीव्ही व इंटरनेटच्या माध्यमातून याबाबत जनजागृती करण्यासारखी काही पावले उचलली आहेत. तथापि, अद्याप आपल्याला खुप मोठा पल्ला गाठायचा आहे.

अवयवदान केल्यास एखाद्याचे आयुष्य वाचू शकते. त्याचे महत्त्व लक्षात घेतले पाहीजे. अवयव दानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी योग्य यंत्रणा ठेवली पाहिजे.

आपल्यापैकी प्रत्येकाने पुढे येऊन मृत्यू नंतर अवयव दान करण्यासाठी नोंदणी केली पाहिजे. “अवयवदान करणारी व्यक्ती व्हा, यासाठी गरज आहे ती दुसऱ्याप्रती फक्त थोड्या प्रेमाची”.

जे प्रेम आयना आणि तिच्यासारख्या इतर दात्यांनी दाखवले... त्याच प्रेमाची ज्या ेत आपण आपल्या हृदयात तेवत ठेवुया. बाळ येशुच्या आगमनाने झालेला हर्ष आणि उल्हास द्विगुणीत करण्यासाठी, जिवंत असतानाच नाही तर मृत झाल्यावरही इतरांना आनंद आणि जीवनदान देण्यासाठी आपण तयारी करुया.

# धोतींग – **वेरोनिका लोपीस, नंदाखाल**

लहानपणी कुठलीही करमणुकीची साधने आमच्यासाठी नव्हती. फक्त खेळ व आजीच्या गोष्टी. संध्याकाळची जेवणे झाली की आजी खाटेवर बसायची. घरातली सगळी मुले आजीच्या अवतीभवती बसायची. प्रथम रोझरी व्हायची व नंतर आजी सगळया नातवंडा-पंतवंडाना गोष्टी सांगायची. यात राजा-राणी असायची, परी असायची, चंद्र व त्याची भूतलावरची बहीण असायची, सानय-कानय या सावत्र बहिणींची कथा असायची (आधुनिक कथेतील सिंड्रेला), भुतांच्या कथाही असायच्या. मी व माझा भाऊ कधीकधी आमच्या समोरच्या आजीच्या गोष्टी ऐकायला जात असू. तिने सांगितलेली ही कथा त्या काळच्या पार्श्वभूमीसह लिहित आहे. भूते होती की नव्हती हा वेगळा विषय. पण आम्ही सर्व मुले मात्र एकमेकाचे हात हातात घेवून या गोष्टी भीतभीतच ऐकायचो. अशीच आजीने सांगितलेली व तिच्या माहेरी घडलेली धोतींग या भुताची ही कथा.

पूर्वी प्रत्येक घरी एक किंवा दोन बैल असत. या बैैलांना ओला चारा द्यावा लागे. तो चारा आणण्यासाठी इथली लोकं रेल्वेच्या पुर्वेकडे किंवा पश्चीमेकडे शेतावर जात. सकाळी चार वाजताच उठून लोकं चारा कापण्यासाठी शेताच्या बांधावर जात व चारा कापून सात पर्यंत घरी परतत, जेणेकरून सकाळीची वाडीतली कामं करायला त्यांना भरपूर वेळ मिळावा. असेच तीन शेतकरी मित्र रोज सकाळी न चुकता चारा कापायला रेल्वेच्या पलीकडे जात असत त्यांची ही कथा.

'बस्त्याव', 'दुमा', व 'फरशा' तिघेही मरीबायच्या पडवीत बसले होते. तिघांचेही दोन दोन ग्लास संपले होते. वाडीतून थकून-भागून आल्यावर हे असं भेटणं हा त्यांचा रोजचा ठरलेला क्रम. भेटायचं , दिवसभरात वाडीत, शेतात काम करताना आलेल्या अडचणी, गावात घडलेल्या काही ठळक घटना यांची चर्चा करायची. एका घोटात ग्लास घश्याखाली रिकामा करायचा. असे दोन किंवा तीन ग्लास घश्याखाली गेले की उठायचे. सकाळी चारा कापायला जायचे आहे, याची आठवण एकमेकाला करून देत घराकडे रवाना व्हायचे.

आजही काही वेगळे नव्हते. मरीबायच्या घरातून उतरल्यावर दुमा उजवीकडे वळला तर बस्त्याव व फरशा डावीकडे. " बस्त्याव जाताना मला उठवा रे. नाहीतर विसराल. " दुमा बस्त्यावला जोरात ओरडून म्हणाला.

" अरे हो रे बाबा, एकदा का फरश्या आला की येतो आम्ही तुझ्या घरी. नाहीतरी तुझ्या दारावरूनच जावं लागणार ना? कसं विसरणार आम्ही?"  हे संभाषणही रोजचेच. जो तो आपापल्या घरी गेला. जेवण करून झोपी गेले.

सकाळी दुमाच्या दारावर थाप पडली. दुमा उठला. ब-याचदा बस्त्याव व फरशा यायच्या अगोदरच त्याला जाग यायची. दातुनाने दात घासून, चुळ भरून तो कब्जा, टोपी चढवून,धोतर नेसून तयार व्हायचा. आज आपल्याला जाग कशी नाही आली? त्याने मनाशी विचार केला. असो. " बस्त्याव, थांबा रे, येतो पाच मिनीटात." घाईघाईतच त्याने सगळे आवरले. फळीवरचा विळा उचलला, दरवाजा उघडून पाहतो तर काय बस्त्याव एकटाच आलेला. "काय रे, काय झाले? फरश्याला हाक दिली की नाही ?" दुमाने विचारले. "हाक दिली रे, पण आज त्याचा वाडीतला शिंपण्याचा वार आहे, त्यामुळे तो येणार नाही. चल आपण निघू, नाहीतर उशीर होईल. मलाही आज सोपारला बाजारात भाजी घेवून जायचे आहे." बस्त्याव उत्तरला.

घाईघाईतच दोघे निघाले. फरश्याचा शिंपण्याचा वार आज नसतो हे दुमाला माहीती होते. मग काय घडले की वार आज आला? पण जाऊ दे, केला असेल काहीतरी बदल त्याने. दुमाने मनातली शंका झटकून टाकली. बाहेर गुडुप अंधार होता. पौर्णिमा जवळ आली आहे. पण आकाशात ढग असावेत बहुधा, त्यामुळे अंधुकसा प्रकाशही नव्हता. कुठेही जाग नव्हती. या वेळी ब-याच घरात  चारा कापयला जाणारे उठायचे. सगळेच गेले की काय ? आपल्याला उशीर झाला बहुतेक. दुमा झपाझप पावले टाकू लागला. बस्त्यावही आज शांत होता. फरश्या अखंड बडबडत राहायचा पण बस्त्याव मात्र मोजकेच बोलायचा. त्यामुळे फरश्याची उणीव दुमाला भासू लागली. काळोखात चालताना बोलणारी सोबत बरी वाटते. नाहीतर मनात भलतेच विचार येतात. दुमाचेही तेच झाले. काही दिवसा अगोदर त्याच्या काकाने सांगितलेली घटना त्याला आठवली.

दुमाच्या गावतला गोंड्या रात्री साधारणपणे नऊच्या सुमारास मामाकडे जात होता. त्याच्या बायकोचा चुलतभाऊ त्याला रस्त्यात भेटला. गप्पा मारत मारत त्याला भलत्याच रस्त्याला घेऊन गेला व सुनसान जागी घेऊन गेल्यावर त्याला खुप मारले. तो गोंड्याला मारून जेव्हा जाऊ लागला, तेव्हा गोंड्याला त्याचे पाय ऊलटे असल्याचे दिसले. घरी येऊन गोंड्याने सर्वांना हे सांगितले होते.

गोंड्याने जरी हे सांगितले व अंगावरच्या माराच्या खुणा दाखवल्या तरी दुमाच्या काकांना ते काही पटले नव्हते. कुणीतरी वादातून त्याला मारले असावे असे काकांचे म्हणणे होते. दुमाला या क्षणी हे सर्व आठवले आणि दुमाचा धीर खचला. दुमा बस्त्यावचे पाय निरखायचे प्रयत्न करू लागला. परंतु अंधार इतका होता की त्याला काही दिसेना. एव्हाना ब-यापैकी रस्ता चालून झाला होता.

दुमाने देवाची करूणा भाकत वर पाहिले. इतक्यात चंद्र हळूहळू ढगांना मागे सारत आपल्या प्रकाशाची पेरणी करू लागला. दुमाने झटक्यात खाली पाहिले. पाहतो तर काय, बस्त्यावचे पाय उलटे होते. बाप रे ! धोतींग. आणि या धोतींगाने हुबेहुब बस्त्यावचे रूप धारण केले आहे. उंची, रंग-रुप अंगकाठी सगळेच बस्त्यावसारखे. दुमाला सकाळच्या त्या गार हवेतही दरदरून घाम फुटला. पाय लटपटू लागले. भीतीने त्याचे सर्वांग थरथरू लागले. त्याची चाल मंदावली. आता आपण आपली सुटका कशी करायची ? दुमा विचार करू लागला. माणसाचे रुप घेतलेला धोतींग माणसाला खुप फिरवतो व नंतर बेदम मारतो हे त्याने ऐकले होते. अचानक त्याला एक युक्ती सुचली. हातातला विळा हळूच रस्त्याच्या बाजूला असलेल्या गवतात टाकत तो बस्त्यावरूपी धोतींगला म्हणाला " अरे बस्त्याव, एक घोटाळा झाला. मी विळा आणायलाच विसरलो. आता चारा कसा कापायचा? चल पटकन घरी जाऊन येऊ. " बस्त्यावच्याही काही लक्षात आले नसावे. वळून ते घराकडे चालते झाले. मोठ्यामोठ्या ढांगा टाकतच त्यांनी घर गाठले. दुमाने बस्त्यावला बाहेरच थांबायला सांगितले व घरात धाव मारली. घरात शिरताच दुमाने पटकन दरवाजा बंद करून कडी लावली व आपल्या खाटेकडे वळला. बाहेरून बस्त्यावच्या हाका चालू होत्या पण त्याकडे दुर्लक्ष करून तो झोपी गेला. रात्रीचे अडीच वाजले होते.

# आएगा आनेवाला - **मॅक्सवेल लोपीस (वसई)**

१९४७-४८ चा तो काळ. स्वतंत्र भारताचे संक्रमण पर्व ! दिग्दर्शक कमाल अमरोहीच्या एका चित्रपटासाठी संगीतकार मास्टर खेमचंद प्रकाश एक गाणे रेकॉर्ड करीत होते. नव्यानेच आलेली एक किशोरवयीन मुलगी... संगीत रेकॉर्डिंगचा अगदीच अल्पसा अनुभव... नूरजहाँ, सुरय्याच्या काळात बारीक म्हणून काही दिग्गजांनी नापसंत केलेला आवाज...

खेमचंदजींनी गायिकेला गाण्यासोबत काही तांत्रिक बाबींची माहिती दिली. गीताचा पहिला मुखडा नायकाला दूरवरून ऐकू येतो असे सीन होते आणि तंत्रज्ञान फारसे विकसित नसल्याने गायिकेला माईकपासून सात-आठ फूट लांब उभे राहून तो मुखडा चालू करावयाचा होता व हळूहळू गात माईकपर्यंत यायचे होते. दहा-पंधरा वेळा तालीम झाली. अंतिमतः गायिकेने ते तंत्र अगदी तंतोतत आत्मसात केले व आरंभीचा मुखडा संपताच माईकवर शब्द सुरांच्या एका नवीन यूगाला सुरूवात झाली.

' आएगा आएगा आएगा आएगा आनेवाला आएगा'... गानसम्राट तानसेन नंतर अजून एक स्वप्नवत कल्पना प्रत्यक्षात साकारली गेली होती. आवाजावर जरी नूरजहाँचा प्रभाव जाणवत असला तरीही आवाजाचा लगाव, चपळ हरकती व चपखल खटके , यांमधून दिसणारी स्वतःची प्रतिभा अशामुळे हे गायन सुगम असून देखील एक अभिजात दर्जा निर्माण करीत होते. अगदी या गीताच्याच शब्दांत सांगायचे तर, दिव्या वाचून रसिकांच्या आशा उजळल्या होत्या व तीरांवाचून त्यांची हृदये घायाळ झाली होती !....

मुळात गीताची रेकॉर्ड बाजारात आली तेव्हा तत्कालीन प्रथेप्रमाणे नायिकेचे चित्रपटातील 'कामीनी' हे नाव गायिकेच्या जागी जोडले गेले होते. परंतु त्या अगाध- अवीट गोड आवाजाचा रसिकांनी शोध घेतलाच ! आणि 'लता मंगेशकर' हे नाव जगाच्या सांस्कृतिक इतिहासात अमर होऊन गेले. हे पर्व न भूतो न भविष्यती असे होते. या पर्वाची मोहिनी आज सत्तर वर्षे उलटल्यावर देखील तितकीच टवटवीत आहे हे त्याचे सामर्थ्य .

वास्तविक या गाण्याच्या रूपाने भारताला त्याची गान सम्राज्ञी व सौदंर्य सम्राज्ञी (मधुबाला) या दोहोंचेही दान मिळाले होते. परंतु त्याही पलिकडे गुढ विश्वाच्या कुतूहलाचे दार्शनिक स्वरूप चित्रजगताला या गीताने दिले. आजही प्रेत आत्म्याचा थरार पडद्यावर चित्रीत करताना आपोआप झुलणारा झुला व लता मंगेशकरांचा गूढ-गंभीर आवाज हे रसायन वापरावेच लागते.

भूताखेताचा एखादा किस्सा सांगताना 'गुमनाम है कोई वा कही दीप जले कही दिल हे गीत ऐकू आले', असे वाक्य हमखास उच्चारले जाते. म्हणजे केवळ मानव लोकांतच नाही तर रहस्यमय विश्वात देखील अजिंक्य झालेला असा हा आवाज ! सर्व लौकिक पाशांतून मुक्त असलेला हा आवाज यापुढेही सदैव मनुष्य जातीला स्व-निर्मित बंधनांतून मुक्त होऊन स्वातंत्र्याच्या असीम विश्वात स्वच्छंद विहार करण्याची प्रेरणा देत राहो इतकेच मागणे!

# गूरूजींस पत्र - इनास तुस्कानो

दि.0/00/0000

प्रिय गूरुजी-: x .y. z.

स.न.वि.वी. ची पद्धत हल्ली पडली आहे .त्यामूळे सरळ हॅलो-हाय नेच सूरुवात करत आहे,

"गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णुः गुरूर्देवो महेश्वरः।गुरू साक्षात् परंब्रह्म तस्मै श्री गुरूवे नमः॥"

गुरू,ब्रह्मा आहे ,गुरू विष्णु आहे,गुरूदेव महेश्वर

आहे, गुरू साक्षात परम ब्रह्म आहेत, त्यांना नमस्कार.असो.

गूरुजी तुम्ही खरोखरीच देवाचे रुप आहात. तुमच्या स्मृतीस अभिवादन,

तुम्ही मला घडवलंत. एका ओबड-धोबड पाषाणाला सुंदर-देखण्या अशा मूर्तित तकदील केलत . आज मी जो आहे, त्यात सर्वस्वी तुमचंच श्रेय आहे. शतशः प्रणाम तूम्हाला.

देवाचं जरी तुम्ही रुप असलात; तरी आहात तुम्ही एक मानवच, हे मलाही तितकंच कळते हो गूरुजी.

स्वभाविकपणे तूमच्यातला तो मानवी स्वभाव कधी-कधी डोकं बाहेर काढायचा प्रयत्न करतो. जरी तुम्ही "त्याला" दाबण्याचा प्रयत्न कसोशीने करता, तरी "तो"कधी-कधी तुमच्या नकळत तुमची प्रतीमा डागाळून टाकतो. त्याचा खेद वाटतो हो गूरुजी.

गेल्याच आठवड्यातली गोष्ट बघा ना गूरूजी...

माझी नात, दूसरी ईयत्तेत शिकते. मला तिची वही दाखवताना म्हणते.! आजोबा, बघा ना माझ्या टीचरने मला एकपण "स्टार" (मार्क) दिला नाही आणि "महेश"ला मात्र "फाईव्ह-फाईव्ह" "स्टार्स"..!!

त्याच्यातला एक-दोन जरी मला दिला असता तर...!

"टीचर" ला "शेअरिंग" करायला येतचं नाही आमच्या..!

खरं सांगू गूरूजी,

कीव आली हो तूमची.

जे त्या शेमड्या पोरीला कळलं "शेअरींग"च महत्व ते तुम्हाला न कळावं .?

देवा शप्पथ सांगतो गूरूजी. तुमच्या विषयी तीच्या मनात असलेल्या आदराला केसाचा देखील धक्का लागू दिला नाही. तुमची प्रतीमा डागाळणार नाही व तिच्याही मनातील भ्रम दूर करत मी माझ्या परीने त्या चीमूरडीला "लाठी न मोडता साप मारला." आणि समजावलं हो गूरूजी.

तुमच्या कंजूस-पणाबद्दल हसू आवरलं नाही हो. काय जातं हो तुमचं, एखाद्या (किंबहूना सगळ्याच)विध्यार्थ्याला प्रोत्साहान द्यायला.

ऊत्तम, सूंदर, छान ,अती-ऊत्तम.अशी विशेषनं द्यायला काय बीघडते हो ? अहो मी काय "मार्क्स " नाही हो मागत तुमच्या कडनं, पण असल्या रिमार्क्सने किती मन सूखावते मुलांच, याची कल्पना करून बघा.

अहो नसेल एखाद्या मुलाचा परफाॅमन्स चांगला, तरीही त्याला "गूड" "बेटर" मूद्दाम म्हणून बघा. आणि पुढच्या वेळेस त्याची झालेली प्रगती बघा.

वाईट वाटून घेऊ नका गूरूजी, पण मला वाटते तुम्हाला थोडे मानसशास्त्र पण शिकून घ्यायला हरकत नाहीये.

आणि हो ! तुमचा तो पक्ष-पात "पार्शालीटी" अजीबात सोडून द्या हो. तुमच्यासारख्या पवित्र पेशाला नाहीच शोभून दिसत हो. तुम्ही ते आपल्या मर्जीतल्या मुलान्नाच (ज्यांच्या आई-वडीलांशी तुमचे चांगले सबंध आहेत) प्रत्येक वेळेला पुढे-पुढे करत असता. नाचण्या-गाण्यात व ईतर प्रोग्राम मधे. अहो द्या की हरेक मुलान्ना संधीं.

ज्यांना आवड नसेल त्यांनाही "एन्करेज" करने ह्यातच तुमची खरी कला जगाला दाखवून द्या. अहो श्रीमंत-धनवानांना कूणीही आपलसं करतं हो .

पण ,

"जे का रंजले गांजले... त्यासीं म्हणे जो आपूला...

तोची साधू ओळखावा... देव तेथेची जाणावा..! हे तूम्हीच नाही का मला शिकवलं.

चांगल्या "वेल-ट्रेंन्ड" घोड्यावर बसून कुणीही रपेट मारू शकतो हो. पण आदी "घोडा मोडून", मग त्यावर बसण्यातच घोड-स्वाराची खरी कला दिसून येते..

आणि हो सर, मी देखील प्रत्येक वेळेला चूकतो. कारण की "ओपन-डे , PTA मीटींग"च्या वेळेला, मी आल्यावर तुमच्याशी हूज्जत घालतो. पण ते भांडण नसते हो. खिलाडीवृत्तीने आणि मोठ्ठ्या मनाने तुम्ही-मी ते घ्यायला शिकलं पाहीजे. ऊगाचचं माझा वचपा "रीवेंज "माझ्या सोनूवर (वड्याचं तेल वांग्यावर) नका हो काढू.

त्याला कळत ही नाही हो तुम्ही काय? अन का ? करता ते. नुसतं हिरमूसून जाते हो पोरगं. मला सांगूही शकत नाही हो ते. बिचाऱ्याची वर्गात तुमच्या कडनं "आई जेवू घाली ना" अन घरी माझ्याकडनं "बाप भीक मागू देईना" अशी अवस्था होते. फार कोवळी, आणि अपरिपक्व मनं असतात हो मुलांची. आपण समजून घ्यायला पाहिजे हो.

त्या दिवशी नाही का हो महेश ला तुम्ही घरी परत पाठवलं . मला मान्य आहे, त्याने वर्गात काही तरी खोडी केली असेल.....! गृह-पाठ केला नसेल...!

वर्गात ऊशीरा आला असेल....! आय कार्ड गळयात लावलं नसेल....!

विधाउट- यूनीफा ॅर्म आला असेल.,..!

काय केलं त्याने, कल्पना आहे का तुम्हाला..? (अहो पोरगा कोलेज ला जातोय. )

तुम्ही घरी पाठवलंत त्याला शिस्त म्हणून. पोरगा चक्क सीनेमाला गेला हो. ईथं-तीथं हूंदडून आला हो का ॅलेज सूटायच्या वेळेला घरात.

अहो आभार मानायचे हो देवाचे, की त्या पीरीयड मधे त्याला कूणी "चरसी-गर्दूल्ला " नाही हो भेटला. चार पैशे खिशाला असतात हो त्याच्या " पा ॅकेट-मनीचे."

"विनाश काली विपरीत बूध्दी" हे तुम्हीच नाही का मला शीकवलं. !

त्याला माघारी घरी परत पाठवण्या पेक्षा, समजावून सांगायचं होतं ना..! की हे बघ बाळया तू नियम मोडला आहे. तूला शिक्षा झालीच पाहीजे. पण आजच्या दिवसा पूरता तूला "excuse" केलं. ऊद्या न चूकता पालकांना घेऊनच का ॅलेज ला यायचं. शक्य नसेल तर हा नंबर घे माझा, पालकांना फोन करायला लाव मला. त्याने दोहोपैकी एक तरी मार्ग अवलंबिलाच असता. जास्तीत जास्त काय झालं असतं

जर त्याने दोन्ही मार्ग नाकारले असते. कमीत कमी पूढच्या वेळेला चूक करताना एक सोडून शंभर वेळा विचार तरी त्याने केला असता..!

वय ऊनाडक्या करण्याचं आहे हो त्यांच; पण मन फार सेंसीटीव असते हो त्यांच. ह्या वयात धाक दाखवल्यावर सरळ बगावत करण्यात ऊतारू होते हो आजची पिढी. तेच प्रेमाने बोलल्यावर बहूतांशी फरक पडतो हो गूरूजी. अनुभवानेच तर सांगतो हो मी "सर".

घरी "दोन" सांभाळायला आमच्या "नाकी नऊ येतात ; तिथे तुम्ही एकाच वेळेला पाच-सह्हाशे , त्याहूनही अधीक ; ती देखील वेग-वेगळया संस्कृतीतून आलेली. कशी सांभाळत असाल ?

माफ करा हो गूरूजी परंतू भरपूर काही बोलायचं होतं.

वेळे अभावी बरंच काही राहून गेलय.

परत एकदा तुमचे आभार मानतो व सच्च्या दिलाने तुमची माफी मागतो. भावनेच्या आहारी जाऊन काही जास्तच लिहिलं असेल तर तुम्हीपण मला समजून घ्याल व खिलाडूवृत्तीनॅ मला क्षमा कराल अशी अपेक्षा बाळगतो.

ता.क.:- आपल्या या "डीस्कशन" चा राग माझ्या मुलावर, वर्गात निघनार नाही याची अपेक्षा बाळगतो.

फार गोंडस छोकरा आहे हो माझा मूलगा.

परत एकदा तूम्हाला नमस्कार

तस्मै श्री गूरूवे नमः।।

कळावे आपलाच शीष्य.....

इनास तुस्कानो

# पाणी पाणी रे....! - **ऑल्विन रॉड्रिग्ज, नानभाट**

मोठे पप्पा... मोठे पप्पा... हे पाणी तुम्ही कसं पिताय... शी ! त्याचा टेस्ट खराब आहे, पीऊ नका!

नातु आपल्या आजोबाला सांगत होता.

अरे बेटा, हे पाणी खराब वगैरे नाही, आम्ही हेच बोरिंग व विहीरींचं पाणी पिऊन लहानाचे मोठे झालो व अजुनही कणखर आहोत, मात्र तुमच्या जनरेशनला बोरिंग, विहीर माहीत नाही तर बिसलेरी, ॲक्वाफिना किंवा आरो फिल्टर माहीत आहेत अन त्यामुळेच तुमची रोगप्रतिकारक शक्ती कमी आहे, तुम्हाला दर १५ दिवसांनी डाॅक्टरकडे घेऊन जावं लागतंय!

हो मंडळी मुद्दा खरचं आजोबा नातवाचा गमतीचा असला तरी आपल्या सर्वांच्या किंबुहना आपल्या वसईकरांच्या (मग ते कुपारी असोत, वाडवळ, ब्राम्हण, भंडारी, आगरी, कोळी वा इतर) आरोग्याचा प्रश्न बनलेला आहे, तो म्हणजे पाणी!

आपण गावचं राहणीमन केव्हा मागे टाकलं व कधी  शहरी झालो हे आपल्यालाही समजलं नाही!

अन आपल्या दैनंदिन जीवनात खाण्या पिण्यात, कामकाजात अमुलाग्र बदल होत गेले, त्या बदलांतील एक सर्वांत महत्वाचा, मात्र तेवढाच दुर्लक्षित व वेळप्रसंगी डोळ्यात पाणी आणणारा घटक म्हणजे आपलं 'पाणी'!

आता तुम्ही म्हणाल त्यात मोठं काय?

पाणी खराब झालंय तर नविन टोक्नांलाॅजीचे आरो फिल्टर लावलेत की सर्वांनी, शेवटी आरोग्याशी खेळ नको, कसं ! तेवढी काळजी घ्यायला नको का !

टिव्ही, मोबाईल, वर्तमानपत्रे ह्या समाजमाध्यमांनी आपल्या सर्वांच्या मनावर हे बिंबवलंय किंबुहना घाबरवुन सोडलंय कि तुमच्या विहीरींतील पाणी सरळ पिऊच नका, तुम्ही प्यायच्या पाण्यासाठी आरो फिल्टर नाही लावलं तर तुमचं व तुमच्या मुलांच्या आरोग्याचं काही खरं नाही!

मग काय ह्या जाहीरातीत ते (बोलण्यासाठी पैसे घेणारे) सेलीब्रेटी, उदा. सचिन, हेमा मालिनी, वगैरे वगैर.... जे काही म्हणतात त्याप्रमाणे आपण १०-२० ते३० हजार रुपये ह्या फिल्टरमागे खर्च करतो व दरवर्षी त्याचं ४-५ हजार मेंटेनंन्सचेही नियमीत भरतो!

मात्र आपल्याकडे १०० पैकी १-२ जण सोडले तर बाकी कुनीही प्रत्यक्ष स्वत:च्या विहीरींचं पाणी तपासुन आरो बसवला नाही, सर्वच्या सर्व लोकांनी निव्वळ भितीपोटी व बाटलीच्या व आरोच्या पाण्याच्या वेगळ्या चवीसाठी फिल्टर्स बसवलेत म्हटलं तरी खोटं नाही ! हीआजची घरोघरीची सत्यपरिस्थिती आहे!

मात्र ही वेगळी हवीहवीशी वाटणारी चव स्लो पाॅयजन सारखी जिवघेणी आहे हे बहुतांश लोकांना माहीतही नाही!

हो! कारण आरो फिल्टर ज्या पध्दतीने काम करतं त्यात निव्वळ पाण्याचे म्हणजेच H2O चे रेणु फिल्टर होऊन पुढे पाठवले जातात व आपण तेच पाणी पितो, मात्र शरिराल आवश्यक असणारे व फक्त पाण्यातुनच मिळणारे अनेक मिनरल्स जसे कॅल्शीयम, लोह, काॅपर, सोडीयम वगैरे ह्या आरोच्या पाण्यामुळे १००% काढुन टाकले जातात, आपल्या शरिराला ते मीळत नाहीत, परिणामी सर्वसामान्यांबरोबरच मुलांच्या, गर्भवती स्रीयांच्या, म्हाताऱ्या व्यक्तींच्या आरोग्याच्या जटील समस्या जसे हातपाय दुखणे, अतिशय जास्त प्रमाणात ॲसिडीटी होणे, भुक मंदावणे, विसरायला होणे, हाडांची वाढ व्यवस्थित न होणे असे अनेक आजार व रोग निर्माण होत आहेत ही सत्यपरिस्थिती नाकारता येणार नाही!

मग नक्की करायचं तरी काय ह्या विहीर-बोरिंगच्या पाण्याचं अन प्यायचं तरी काय?

ह्यावर उपाय अगदी सोप्पा आहे, आपल्या विहीरींतील पाणी आपण तपासुन त्यातील क्षारांचं प्रमाण(Hardness) व TDS तपासुन घ्या. जागतीक आरोग्य संघटना म्हणते ३०० पर्यंत क्षारांचं पाणी पिण्यास सर्वांत उत्तम, जर हे ३००पर्यंतचं पाणी मिळत नसेल तर ५००- ६०० पर्यंत क्षारांचं पाणीही पिण्यास चांगलंच. जर ६०० पर्यंतचंही पाणी उपलब्ध नसेल तर ६०० ते ९०० क्षारांचं पाणीही पिऊ शकता, मात्र १००० पेक्षा जास्त क्षारांचं पाणी आपणही पिऊ नये व आपल्या जनावरांनाही देऊ नये!

पाण्याचा प्रमाणाबाहेर वापर, पाण्याची विक्री, जमिनीत पाणी जाण्याचे-मुरण्याचे मार्ग आपणच बंद करत चाललो आहोत ही आजची सत्यपरिस्थिती आहे, हे नाकारुन चालणार नाही!

आपल्याकडे उमराळे-पिलघर, भुईगावातील काही भाग याठिकाणी पाण्यातील क्षारांचं प्रमाण हे २००० ते ५००० पर्यंतही गेलंय!

बरं मग आरो किती क्षार असल्यावर बसवावा?

आपल्याकडील आरो चे परिणाम आता सर्वत्र दिसु लागल्यानंतर सरकारनेही ५००पेक्षा कमी क्षार असलेल्या बोअर व विहीरींवर आरो लावु नये असा आदेश प्रसारित केला आहे.

त्यामुळे जर आपल्या पाण्याच्या क्षारांची पातळी ५०० च्या दरम्यान असल्यास आरो फिल्टर बिलकुल बसवु नये, वर सांगितल्याप्रमाणे ते शरिराला अपायकारक आहे!

तर त्याऐवजी UV + UF ची फिल्टर्स लावावीत, सुरवातीला विहीरीच्या पाण्याची चव थोडीशी वेगळी वाटेल, मात्र ह्यामध्ये गरजेचे मिनरल्स आहेत हे लक्षात घ्या, सवय व्हायला थोडा वेळ जाईल मात्र त्यामुळे तुमच्या आरोग्यावर पुष्कळ चांगले परिणाम दिसुन येतील ऐवढं मात्र निश्चित. तुमची ॲसीडीटी नाहीशी झालेली असेल, मुलं, स्रीया, शरिराला गरजेचे क्षार व मिनरल्स मिळाल्याने म्हातारी माणसं ह्यांचं हातपाय दुखण्याचं प्रमाण खुपच कमी झालेलं असेल.

ही झाली तात्पुरती उपाययोजना, माझ्या विहीरींतील क्षारांचं प्रमाण कायमस्वरुपी कमी करायचं असेल तर काही करता येईल का?

जरुर! मात्र ह्यासाठी आपल्याला ५-७ वर्षाचा वेळ द्यावा लागेल व खालील काही उपाययोजना अंमलात आणाव्या लागतील.

1. गावातील ज्यांना शक्य आहे त्या सर्वांनी आपलं छपरावरिल पावसाचं पाणी आपल्या विहीरींत सोडायचं जेणेकरुन भुगर्भातील वाढत चाललेल्या क्षारयुक्त पाण्यात हे चांगलं पाणी मिसळलं जाईल व क्षारांचं प्रमाण कमी होण्यात मदत होईल.

2. आपल्या गावांतील बावखालं व तळे ह्यांत सोडलेले सांडपाणी, टाकला जाणारा कचरा, बॅटरी, सेल, औषधे, कलर वगैरे वगैरे बंद करायला हवे, सांडपाण्यासाठी गावाने एकत्र येऊन दुसरा सांडपाण्याचा मार्ग शोधावा लागेल. शोषखड्डा -Soak pit हा ह्यावरील सोपा व अतिशय परिणामकारक उपाय आहे. (यु ट्युबवर शोषखड्ड्याबद्दल अधिक माहीती सहज उपलब्ध आहे) आपल्याकडील पाण्याच्या विहीरींत ह्या बावखालांत टाकलेल्या व सांडपाण्यातील विविध केमीकल्स-रसायनांमुळे पाण्यात विषारी घटक घातकप्रमाणात वाढले आहेत, ते जमीनीखालील पाण्यात सरळ मिसळत आहेत व आपल्या पाण्याच्या विहीरीत येत आहेत हे आम्ही स्वत: रासायनिक चाचण्यांनी तपासले आहे!

3. ज्यानां विहीरीत पाणी सोडायला अडचण असेल अशांनीही छपरावरिल पाणी जमीनीत मुरण्यासाठीही शोषखड्डा बनवु शकता, तसेच छपरावरिल पाणी मोठ्या २००० -५०००, १०००० लिटर सिंटेक्स टाक्यांत जमा करुन बंद करुन त्याला साधा UV+UF फिल्टर - (ज्यामध्ये एक थेंबही पाणी वेस्ट होत नाही ) बसवुन ते वर्षभर सहज वापरु शकता. संपुर्ण कुटुंबाला हे पाणी वर्षभर पुरतं हे विशेष!

4. आपण आपला पाण्याचा वापर परिणामी अपव्यय प्रमाणाबाहेर वाढवला आहे, हात धुताना, दाढी करताना, आंघोळीला-शाॅवर घेताना, कपडे धुताना, भांडी घासताना, टाॅयलेट फ्लश टॅकमध्ये..... सर्वत्रच आपलं प्रमाण चुकलंय, चुकतंय!

5. आपल्या घराच्या आजुबाजुला असलेली मोठी झाडं कापणं टाळा व अतिरिक्त जागेवर कोबा करुन चेकर्स टाईल्स- पेव्हरब्लाॅक् मारणे टाळा, कारण ह्याच जमिनींत मुरुन पाणी भुगर्भात जात असतं, आजकाल घराच्या आजुबाजुच्या अशा मातीच्या जागा घाण - माती- कचरा नको म्हणुन सर्रास कोबा करुन पुरल्या जाताहेत, हे पुढच्या पिढ्यांसाठी घातक आहे!

जाताजाता मी आवर्जुन सांगतो ती गोष्ट-परिस्थिती आपल्यापुढे मांडतो....

गावी राहणाऱ्या म्हाताऱ्या आईवडीलांचा एकुलता एक मुलगा शहरात नोकरीसाठी गेला, जाताना तो त्यांना म्हणाला की बॅकेत तुमच्यासाठी पैसे ठेवले आहेत दरमहिन्याला तुमच्या खर्चासाठी पैसे काढुन घेत चला, प्रत्येक महिन्याला त्यांना बॅकेतुन नियमीतपणे पैसे मिळत असत....

मग अचानक एका महिन्यात बँकेतील पैसेच संपले, म्हाताऱ्या आई-वडीलांनी मॅनेजरकडे विनवणी केली मात्र तुमच्या मुलाने तुमच्या खात्यात पैसेच टाकले नाहीत तर मी तरी कुठुन तुम्हांला देऊ ? असं उत्तर दिलं!

त्या म्हाताऱ्या आई-वडीलांचे अन्न पाण्यासाठी हाल झाले, त्यांना दरदर भटकावे लागले...!

आपणही आजघडीला दररोज जमिनीच्या बँकेतुन ५००, ७५०, १००० तर काही जण २००० लिटरही पाणी काहीही न करता निर्धास्तपणे बेजबाबदारपणे अगदी फुकट काढतोय, मात्र त्या 'जमिनीच्या बँकेत आपण किती पाणी डिपाॅजीट भरतोय? '

हा प्रश्न आज प्रत्येकाने स्वत:ला विचारायला हवा!

आपण आपल्या मुलाबाळासाठी बंगला, कार, जमिन, दुकाने, बँकेत फिक्स डिपाॅजीट ठेवतोय, शक्य त्या सर्व सुखसुविधा आपण करुन ठेवतोय मात्र ज्याशिवाय एक क्षणही आपण राहु शकत नाही असं जीवनाचं दान 'पाणी' मात्र आपण बेजबाबदारपणे वापरतोय, आपल्या भविष्यातील पिढ्यांसाठी काहीही उपाययोजना करत नाही आहोत, ही तुम्हा आम्हासाठी व वसईसाठी फारच धोक्याची घंटा आहे!

आपली ही चुक आताच सुधारली नाही तर ज्या सुजलाम सुफलाम वसईचा आपल्याला अभिमान आहे तीचे वाळवंटात रुपांतर व्हायला वेळ लागणार नाही, व ते आपण आपल्याच उघड्या डोळ्यांनी पाहू!

म्हणुन कळकळीची विनंती करतो....

*आजच निश्चय करुया....*

*पाणी जपुन वापरुया...* *छपरावरिल पाणी विहीरींत सोडुया!*

ह्यासाठी आपणास कोणत्याही प्रकारची मदत लागल्यास कधीही संपर्क साधा.

आॅल्वीन राॅड्रीग्ज, अटोळी नानभाट

मोबाईल- 9049836783

# वेदना जाणावयाला जागवू संवेदना.. - सुनिता बर्नड परेरा , गास

आई असते अंगणातली तुळस
बाबा असतात मंदिराचे कळस ,
आई असते भजनात गुणगुणणारी संतवाणी
बाबा असतात तृष्णा भागवणारे शीतल पाणी ||

जगातील कोट्यावधी बालकांपर्यंत देव पोहचू शकत नाही म्हणून त्याने आई बाबांची निर्मिती केली . आई बाबा शिवाय जीवन म्हणजे शिडाशिवाय जहाज ! मीठाशिवाय जेवण ! इतके आईबाबाचे माहात्म्य आहे . आपल्या ख्रिस्ती धर्मात संत अन्ना व जॉकीम ह्यांच्या सणाचे औचित्य साधून २६ जुलै रोजी मातृ पितृ दिन साजरा केला जातो . पवित्र मारिया त्यांची एकुलती एक मुलगी .मारियेला त्यांनी अतिशय प्रेमाने व सुसंस्कारात वाढवले . त्यामुळेच ती प्रभू येशूची माता आदर्श माता झाली . मारियेचे संगोपन करण्याऱ्या तिच्या आई वडिलांना आदर्श माता पिता संबोधले जाते . म्हणून ह्या दिवशी आई बाबा प्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते .

आमच्या शाळेत दरवर्षीप्रमाणे ह्या वर्षी देखील देखणा मातृ-पितृ दिन साजरा करण्यात आला .जवळजवळ ५०० विदयार्थी , १५ शिक्षक आणि २०० पालक ह्या कार्यक्रमासाठी उपस्थित होते . मुलांनी सुंदर सुंदर ग्रीटिंग्ज कार्ड बनवले होते .माता पित्या विषयींच्या भावना शब्दबद्ध केल्या होत्या . एक एक विदयार्थी आपापल्या माता पित्या विषयी भरभरून बोलत होते . चिमुकल्यांचे ते बोबडे बोल मनाला स्पर्शून जात होते . नुकतीच चौथीत प्रवेश घेतलेली माझ्या वर्गातली' नेत्रा ' आपले सुंदर कार्ड घेऊन पुढे गेली आणि बोलू लागली ," आई माझी माऊली , प्रेमाची सावली | आई माझा गुरु, मायेचा कल्पतरू || " अतिशय समर्पक शब्दात तिने आईची महती वर्णन केली . नंतर पुढच्या पानावर ह्या बछडीने बाबांविषयी लिहिले होते . पण ...पण तिनें "बाबा " शब्द उच्चारताक्षणी ती घाय मोकलून रडू लागली . तिच्या रडण्याने हॉल मध्ये निरव शांतता निर्माण झाली . नंतर स्वतःला सावरत तिनें रडत रडत आपल्या वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली . तिचे हुंदके , तिच्या डोळ्यातून वाहणारे अश्रू पाहून समस्त प्रेक्षकवर्ग भारावून गेला . मुख्या. सि .लॉरेटा ह्यांनी तिला सावरले . नेत्राचे शेवटचे वाक्य माझ्या मनाला चटके लावून गेले . ती म्हणाली ,"बाबा देह रूपाने तुम्ही आमच्यात नसलात तरी आमच्या अंत:करणात सदैव वस्ती करत आहात".

त्या चिमुरडीच्या भावना माझ्या हृदयाला अगदी चिरडून गेल्या होत्या . तिच्या स्वर्गवासी वडिलांची तिला फार उणीव भासत होती . दुसऱ्या दिवशी तिची आई मला भेटायला आली तेव्हा तिच्या कडे विचारणा केली असता कळले की नेत्रा अगदी ४ वर्षाची असताना तिचे बाबा रेल्वे अपघातात मरण पावले . तेव्हा पासून नेत्रा एकलकोंडी झाली आहे . सतत ती बाबांच्या आठवणीने व्याकूळ होते . पण मीच तिचे आई आणि बाबा ह्या दोन्ही भुमिका निभावत आहे . चार घराची धुणी भांडी करून माझ्या दोन्ही मुलींना शिकवत आहे . नेत्राची बहीण ९ वीत शिकत आहे . दोघी मुली खूप अभ्यासू व मेहनती आहेत . मी खूप मेहनत घेऊन त्यांना भरपूर शिकवणार आहे . आईची ती जिद्द बघून मी भारावून गेले . असे किती तरी विदयार्थी शाळेत शिकत आहेत . आई बाबांच्या भांडणामुळे , अकाली निधनामुळे मुले निराधार जीवन जगत आहेत .कोणाची आई देवाघरी तर कोणाचे बाबा सोडून गेले आहेत . ह्या मुलांचे मायेचे पंख छाटले गेले आहेत , तरीही दुःख मनात ठेवून ते आनंदी आणि आशादायी जीवन जगत आहेत . अश्या मुलांच्या वेदना जाणावयाला आपल्या संवेदना जागवणे गरजेचे आहे... तरच ' वसुधैव कुटुंबकम ' निर्माण होऊन आपण सारी एकाच देवाची लेकरे बनू .

# मेरी ख्रिसमस! - फ्रॅंक डॉ. मिरांडा उमराळे, जोसघर

२५ डिसेंबरचा तो दिवस, नेविल आणि त्याचे आई-वडील प्रत्येक वर्षाप्रमाणे कार घेऊन त्यांनी ठरवलेल्या ठिकाणी जाण्यासाठी निघाले. नेविल म्हणजेच ग्रेगरीचा एकुलता एक लाडका मुलगा. ग्रेगरी आणि त्याची पत्नी रेचलची नोकरी भरगच्च पगाराची असल्याने नेविलला घरात ना पैशांची, ना इतर कोणत्या सुख-सुविधांची कमतरता होती. ख्रिसमस हा संपूर्ण जगात साजरा केला जाणारा सण आहे आणि तो अनेक प्रकारे साजरा केला जातो. घरोघरी स्वादिष्ट अन्न, केक बनवले जातात, काही तरुण मंडळी वाईनचा आस्वाद घेतात; पण ग्रेगरी आणि त्याचे कुटुंब मात्र ख्रिसमस जरा वेगळ्या पद्धतीने साजरा करायचे. ह्या दिवशी ते घरात काहीही शिजवत नसत आणि मुलाचा हट्ट म्हणून "पिझ्झा सेंटर" मध्ये जाऊन पिझ्झाचा आस्वाद घेत असत.

काही वेळेत ते ठरलेल्या ठिकाणी पोहचले. पिझ्झा सेंटरच्या समोरच्या भागात लावलेल्या पारदर्शक काचेच्या बाजूला ते सर्व बसले. नेविलने त्यांला खाण्यासाठी काय हवे आहे ते ग्रेगरीला सांगितले आणि त्या काचेतून बाहेर पाहू लागला. ग्रेगरी आणि त्याची पत्नी पिझ्झा टेबलावर येईपर्यंत गप्पा करण्यात गुंतले होते, पण बराच वेळ नेविलची काहीही बडबड कानावर न पडल्याने त्यांनी नेविलवर पाहिले, नेविल त्या पारदर्शक काचेतून बाहेर काही मुलं खेळत होती त्यांना पाहत होता. ती अतिशय गरीब मुलं होती, लांब-विस्कटलेले केस, मळलेली आणि फाटकी कपडे, पायातही काही घातले नव्हते; पण ती मुलं खेळत होती आणि त्यांच्या तोंडावर आनंद होता. त्या मुलांना एकत्र खेळताना, मौज करताना पाहून नेविल फार खुश झाला.

थोड्याच वेळात पिझ्झा तयार झाला आणि टेबलावर आला. नेविल त्याच्या डॅडीच्या बाजूला बसला आणि पिझ्झाची एक स्लाइस त्याने हातात घेतली, पण ती स्लाइस खाण्याची सोडून, त्याने तो पिझ्झा अलगत उचलला आणि बाहेर त्या मुलांच्या दिशेने धावून गेला. आजूबाजूला बसलेली सर्व लोकं नेविलला पाहू लागली. ग्रेगरी तत्काळ नेविलच्या मागे धावत गेला, पण तोवर नेविलने पिझ्झाच्या स्लाइस त्या सर्व मुलांना वाटून टाकल्या. हातातला रिकामा बॉक्स खाली टाकून त्याने भीतीने ग्रेगरीवर पाहिले, पण ग्रेगरीने त्याची पाठ अभिमानाने थोपटली आणि त्याला अलगत उचलून आत आणले.

मध्ये येताच उपस्थित सर्वांनी नेविलसारख्या लहान मुलाच्या थोर कार्याला एक प्रकारे दाद दिली. ग्रेगरी आणि त्याच्या पत्नीचे मन भरून आले. ग्रेगरीने तेथील पैसे चुकते केले आणि बाहेर जाऊन त्या मुलांना केक घेऊन दिले. नाताळचा सण घरात साजरा करायचा सोडून ग्रेगरी त्या गरीब मुलांचा ख्रिसमस यादगार बनवत होता. नेविल उपाशी होता, पण त्या रस्त्यावरील मुलांच्या तोंडावर प्रकट झालेला आनंद पाहून तो फार समाधानी झाला. हातातला उरला केक त्याने एका लहान मुलीच्या हातात ठेवला आणि तिला नाताळ सणाच्या इंग्रजीत शुभेच्छा दिल्या, हातातला केक आपल्या भावाकडे देऊन तिने आपल्या गोड आवाजाने नेविल आणि कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या,"मेरी ख्रिसमस!"

# वसईतील महिला -- अनिशा सुनिल डिमेलो

एक कुतूहल व चिकित्सक वृत्ती म्हणून मी वसईतील महिला ह्या विषयावर विचारण्यास सुरवात केली. आपल्या उत्तर वसईमध्ये कितीतरी कर्तुत्ववान व्यक्ती आहेत ज्यांनी आपल्या समाजासाठी मोठ्ठा आदर्श निर्माण केला आहे. त्यामध्ये किती स्त्रियांचं योगदान आहे? तसं पाहिलं तर, प्रत्येक स्त्रीनं आपल्या कुटुंबासाठी वाहिलेलं तिचं सर्वस्व आणि त्यामधून झालेली समाज बांधणी हे योगदान अनमोल आहे पण तरीही कर्तुत्ववान व्यक्तींमध्ये तिला स्थान आहे का?? दुर्दैवाने ह्याचे उत्तर मला नकारात्मकच मिळाले. लोकांना अशी एखादी कर्तुत्ववान महिला आठवतच नाही. आपल्या समाजाचे हे दुर्दैवच म्हणायचे. का मागे राहिल्या आपल्या महिला??

सिडको हटाव आंदोलन म्हणजे आपल्या वसईचा गौरवशाली इतिहासच!!काय धैर्य होते त्या आंदोलकांचे!!आपल्या हरित वसईला वाचविण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. त्यामध्ये महिला देखील होत्या. आंदोलन करणारे पुढारी आपल्याला सर्वांनाच परिचयाचे आहेत पण पाणीवाल्या बाई कोण होत्या हे मात्र माहिती नाही. पूर्वीच्या काळी आपला समाज अशिक्षित होता आणि पुरुषप्रधान संस्कृती ह्यामुळे स्त्री शिक्षणावर दुर्लक्षच झाले. आणि आपल्या स्त्रिया देखील चूल व मुल सांभाळातच राहिल्या. काहींनी शिक्षण घेतले पण घरच्या जबाबदारीमुळे पुढे काही करता आले नाही. ह्या सगळयाचा परिणाम म्हणजे आपल्या महिला मागेच राहिल्या. आणि जरी कोणी काही कर्तृत्व गाजवलेले असेल तरी त्या अज्ञात राहिल्या.

आता काळ बदलला आहे. आपला समाज आता नुसता शिक्षित नाही तर उच्चविद्याविभूषित होत आहे. आणि त्यामध्ये महिला आघाडीवर आहेत. डॉक्टर्स, इंजिनिअरर्स, प्रोफेसर जवळपास सर्वच ठिकाणी महिला आपला ठसा उमटवत आहेत. पण तरीही काही हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या महिला सोडून बाकी महिला आहेत कुठे??आपला समाज पुरुष प्रधान जरी असला तरी स्त्रियांना त्यामध्ये मानाचे स्थान आहे पण कुटुंबाची मुख्य जबाबदारी अजून देखील स्त्री वरच येते. आपल्या महिलांना त्यांच्या नोकऱ्या सांभाळून घराकडे आणि मुलांकडे लक्ष द्यावेच लागते. घरातील जेवण , स्वच्छता, मुलांचा अभ्यास ह्या सगळयात पुरुषांची मदत जरी मिळत असेल तरी जबादारी ही स्त्रियांकडेच येते. म्हणजे आपण स्त्री पुरुष समानता आता आली आहे असे जरी म्हणत असलो तरी प्रत्यक्षात तसे काही दिसत नाही. आपल्या घरातील कामाची जबाबदारी अजूनही आपण वाटून घेत नाही आणि मग ह्या सर्व कामाच्या व्यापामुळे इच्छा असूनही महिलांना समाज कार्यासाठी वेळ मिळत नाही. आपले युवक व पुरुष मनोरंजनासाठी गावोगावी क्रिकेट फुटबॉल मॅचेस भरवतात, आठवड्यातून एखादा दिवस मैदानी खेळ खेळतात ह्या सर्वांमुळे त्यांची एकमेकांशी ओळख होते विचारांची देवाणघेवाण होते पण आपल्या युवती-महिला ह्या सर्व आनंदाला मुकतात त्यांच्यासाठी असा एकत्र येऊन विचाराची मैफिल रंगवण्यासाठी कोणता मंचच उपलब्ध नाही आणि जरी कोणी असा प्रयत्न केला असेल तरी लोक काय म्हणतील किंवा समाजाच्या लाजेस्तव तो देखील निष्प्रभ झाला असेल. असे महिला मंच स्थापन करणे काळाची गरज आहे.

आपल्या समाजात महिलांची लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त आहे. म्हणजे महिला बहुसंख्य आहेत. आणि ह्या बहुसंख्य वर्गाचा ठसा उमटविण्याची गरज आहे.

# ख्रिस्तायन अंकासंबंधी प्रतिक्रिया -- संदीप रॉड्रिग्ज – राणेकर

प्रती,

मा. ख्रिस्तोफर रिबेलो जी,

संपादक, ख्रिस्तायन परिवार.

सस्नेह नमस्कार |

आपला मराठी साहित्यातील एकमेव ऑनलाईन अंक मिळाला. (PDF मित्राकडून मिळवली, मोबाईल मध्ये काही ऑप्शन्स काम करत नसल्यामुळे). सर्वात जवळची प्रिय व्यक्ती नेमकी दोन अंकाच्या प्रकाशनाच्या तयारीत असताना अनंताच्या प्रवासास निघून जाते व ते दुःख बाजूला ठेऊन आपण संपादनाची कठीण आणि किचकट जबाबदारी प्रामाणिकपणे पार तर पाडलीच. परंतू वाचकांस एक उत्कृष्ट अंक उपलब्ध करून दिला. हीच खरी त्या मातेला श्रद्धांजली आहे. आपले व आपल्या संपादक मंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन. सुरुवातीची अनुक्रमणिका पाहिली आणि ऑनलाईन वाचणास मजा येणार नाही म्हणून सर्व प्रिंट काढून व बांधणी करून अंक वाचू लागलो. संपूर्ण अंक वाचकांना नाताळची मेजवानी देण्यास पात्र ठरला आहे.

निर्मिती उत्सव आहे, आनंद आहे व ह्यामध्ये परमेश्वर स्व:ताला गुंतवून पाहत होता म्हणूनच तो शब्दाद्वारे स्त्री पोटी देह धारण करून भूतलावर अवतरला. म्हणूनच स्त्री देह एक मंदीर आहे. ह्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे ख्रिस्त जन्मोत्सव. हे उत्कृष्टरीत्या नाताळ जीवन महोत्सव ह्या लेखात स्पष्ट केले आहे. 'मोबाईल पिढी' ह्या लेखात श्री.जॉन कोलासो तंत्रज्ञानाची सकारात्मक बाजू सुयोग्य उदाहरणासहीत पटवून देत आहेत. तरुण पिढी बिघडलेली नसते तर ती कालसुसंगत उपलब्ध साधनाने अधिकाधिक स्मार्ट होत चालली आहे. तरी सुद्धा त्याला जेव्हा विधायक दिशा मिळेल तेव्हा ती खऱ्या अर्थाने स्मार्ट ठरणारी असेल. तर ' आभासी जगतातील अस्तित्व ' हा लेख वरील लेखास पूरक आहे. तो ठळकपणे समस्या अधोरेखित करतो.

वसई ही विविध धर्माची नगरी. कोठेही धार्मिक तेढ न होता गुण्यागोविंदाने नांदनाऱ्या वसईकरांचे प्रासंगिक श्री. अनीलराज रोकडे ह्यांनी छान वर्णवीले आहे. तर ख्रिस्त हा सेवा करुन घेण्यासाठी नव्हे तर सेवा करण्यासाठी आला होता म्हणूनच ख्रिस्ती धर्मात सेवेस सर्वोच्च प्राधान्य आहे. हे श्री. सायमन मार्टिन ह्यांनी सूचक शब्दात मांडले आहे. राजकीय परिस्थितीवर मिश्कीलपणे भाष्य करीत श्री. वज्रेश सोलंकी ह्यांचा लेख ' याद ' राहणारा आहे. बाबू मावशाक व नैतिक हे वाचनीय आहेत. वृद्धांची फरफट आधुनिक मेरी जोसेफ ह्या द्वारे छान मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जतन आठवणींसाठी उद्बोधक आहे तर 'मोलकरीण' चे मोल तसूभरही कमी होत नाही. शिवार छानपैकी शिवारात मनाला फिरवून आणते. 'कन्यादान' ही कथा सामाजिक समस्येवर प्रहार करीत असताना लेखिकेने शब्दात हात आखडता घेतला आहे. कथा अपूर्ण वाटते.

प्रशासकीय सेवेत आपल्या तरुणांनी जावे. त्यासाठी दिलेला परिसंवाद हा प्रत्येक तरूणापर्यंत पोहोचला पाहिजे. जेणेकरून जास्तीत जास्त उपयोग होऊन व तेथील सेवेचा व अनुभवाचा फायदा आपल्या समाजातील अनेकांना होऊ शकेल. देहदान चळवळीवरील लेख अत्यावश्यक आहे तर सिंगापूर दर्शनावरील लेख सिंगापूर दर्शन घडवीते.'दंद्व' ही कथा मनात विचारांचे दंद्व निर्माण करते. हे माझ्याच बाबतीत का? हा सर्वांना सतावणारा प्रश्न मेरीच्या बाबतीत ही विचारांचे थैमान घालते. "तू एलिझा खरी पोरी सॉबाता" हे आश्वासक शब्द बाधीतांना नक्कीच उभारी देऊ शकतात. सौ. बर्नादेत रूमाव ह्यांनी वेगळ्या विषयावर सुलभ व भावूक लिहीले आहे.

'वेगळा अर्थ' ही कथा पूर्णपणे उद्बोधक आहे. पती-पत्नीतील नातेसंबंध दृढ करण्यासाठी प्रेरणादायी आहे. फक्त प्रेमविवाह झालेल्या जोडप्यांसाठी नव्हे तर अरेंज मॅरेज केलेल्यासाठी, उभयतात सुसंवाद कसा असावा, साहाय्य कसे असावे? हे ह्या सत्य कथेद्वारे समजते.

परदेशस्थ शिक्षणाचे काही फायदे असले तरी त्याचा स्थानिक समाज्याच्या संस्कृतीवर नकळतपणे परिणाम होत असतो. दोन भिन्न संस्कृतीत वाढलेल्या दोघांची एकत्र येण्याची घटना आता एखादी असली, तरी भविष्यात अशा घटना जास्त प्रमाणात जाणवणार आहेत. ह्या वास्तव्याचा स्वीकार करणे संस्कृती प्रिय स्थानिक समाजाला कितपत स्विकाह्यर्य ठरेल हे काळच ठरवेल. एक भविष्यातील समस्या छानपणे श्री. बाप्तिस्ट वाझ ह्यांनी व्यक्त केली आहे.

मी सेवा करावयास आलो आहे हे ख्रिस्ताने दोन हजार वर्षांपूर्वी सांगितले आहे. आता ह्याच सेवेची गरज प्रत्येक देशाला भेडसावत आहे. टाईम बँके द्वारे आपण आपल्या सेवेचे आदानप्रदान करू शकतो. अशी ही नाविन्यपूर्ण गरजेची सेवा जगात प्रगत देशात आढळून येत आहे हे प्रथमच श्री. सॅबी परेराच्या लेखाद्वारे समजले.

' तू क्रोध की मशाल बन' मधील तीनही घटना डोक्याची शीर उभी करतात. या घटनांवर लेखिकेने ज्याप्रकारे सादरीकरण केले आहे. ते संवेदनशील वाचकास क्रोधाची मशाल बनण्यास प्रवृत्त करत आहे. एक उत्तम लेख सादर केला आहे पण हा लेख अजूनही दिर्घ स्वरूपात असायला हवा होता. जेणेकरून पेटलेली विचारांची मशाल अजूनही धगधगती राहीली असती.

काही कथा अचूक व सहजसुलभ शब्दात असतात की त्या वाचकावर निमीषार्धात पकड घेतात. 'कोकरू' ही कथाही त्याच पठडीतील आहे. एखादी घडलेली ठराविक घटना त्यातील दुसरी बाजू तितक्याच परिणामकारकरित्या सादर केली आहे. निरपराध व साधी माणसं नेहमी विनाकारण शिकार बनत असतात. जसे लांडगे कोकराची शिकार करतात अगदी तशीच, म्हणून 'कोकरू' हे शिर्षक जास्त समर्पक आहे. अंक उघडल्या वाचलेली पहिली कथा ज्यामुळे संपूर्ण अंक वाचण्यास भाग पाडले.

ख्रिस्त जन्मोत्सवाने सृष्टी उजळून निघाली. ख्रिस्ताची शिकवण परिवर्तनवादी होती. दुःखाचे सुखामध्ये, निराशेचे आशेमध्ये परिवर्तन. असेच परिवर्तन चेतन ह्या निराशेच्या गर्तेत अडकलेल्या तरुण उद्योजकात पाहायला मिळते. अचूक वेळी घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे नवीन जीवनाला उभारी देण्यासाठी तो सज्ज झाला आहे. अशी प्रेरीत करणारी कथा अनेकांना ' जिदंगी का सफर ' योग्य प्रकारे मार्गक्रमण करण्यास उपयुक्त ठरो.

काही लेखकांची भाषाशैली ही अच्युत दर्जाची असते. त्यामुळेच त्यांनी मराठी भाषेला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले आहे. अशाच साहित्यिकांच्या शैलीशी मिळतील जुळती भाषाशैली वापरून ' सत्य हाच ईश्वर' आहे. हा अप्रतिम लेख श्री. मॅक्सवेल लोपीस ह्यांनी लिहीला आहे. लेखाचे एक एक उतारे हळूहळू फूलत जाऊन ईश्वर म्हणजे सत्य आहे. सत्य नेहमी अमर असते. हे उत्कृष्टरीत्या लिहीले आहे.

चारोळ्या, कविता ह्यामध्ये आमच्या दोन गावकऱ्यांचे नाव पाहून बरे वाटले. नामवंतांनी फुलवलेला हा शब्द सृष्टीचा मळा आहे.

एक वाचनीय तसेच वाचकांच्या पसंतीस उतरणारा हा नाताळ अंक 'ईस्टर'नंतर वाचून पूर्ण झाला. तरीही मनाला तोच नाताळचा टवटवीतपणा महिन्या-महिन्यानंतर जाणवतो.

आपलाच वाचक

श्री. संदीप रॉड्रिग्ज - राणेकर.

# कविता / चारोळ्या विभाग

## वास्तवाशी लढा

वास्तवाशी लढा देताना
थकतात मित्र
शेतकरी
आत्महत्या
विनाशाचा मार्ग
मनात विचार आणताना

वास्तवाशी लढा देतात
आमचे बंधू
शेतकरी
हाल
त्यांचे बघून
ह्रदयाला पाझर फुटतात

वास्तवाशी लढा देते
वसई विरारची
जनता
जागोजागी
साचल्या पाण्यात
नगरी धुवून निघते

## चारोळी

वास्तवाशी लढा देता देता
मुंबईकरांचे जीने मुश्कील
झाले
निसर्गाशी नाते तोडून
यमदेवताला जवळ केले..

## बाबा सोडा ते व्यसन

बाबा सोडा ते व्यसन
सिगारेट अन दारूचे
का आणता आपल्या घरी
कायम मित्र व्यसनाचे

त्या व्यसनापायी होई घरात
भांडण तुमचे अन आईचे
अन लोक हे शेजारचे
काम करी तेव्हा बघायचे

होत नसे सहन मजला
वास त्या सिगारेटचा
होई कधी मधी हा
त्रास श्वास घेण्याचा

रोज मोठाले ग्लास ग्लास
पिऊनी बाटली दारूचे
पोखरुनी निघाले हे
निरोगी शरीर तुमचे

कधी नाही विचार केला
तुम्ही आमचा अन या घराचा
अहो द्या व्यसन सोडुनी
अन फुलवा मळा संसाराचा

## मुलगी प्रगतीचा आधार

एक तरी मुलगी असावी
प्रत्येकांच्या घरा घरात
मिळते आंतरीक सुख
समाजात अन जीवनात

चार भिंतीच्या तुरुंगातून
ती आता बाहेर पडली
स्वेच्छेने आनंदी जीवन
मोकळे पणाने जगू लागली

ती गेली पुढे प्रत्येक क्षेत्रात
त्रास सहन करून समाजाचा
घेतली गगनचुंबी भरारी
विचार करुन भविष्याचा

वंशाचा दिवा म्हणूनी
मान मिळे त्या मुलाला
पण कायम तेवावे लागते
घरासाठी त्या पणतीला

काट्यातून वाट काढत मुलीने
एक उच्चभ्रू स्थान मिळवलं
शेवटी मुलगीच प्रगतीचा
आधार
हे तिने दाखवूनच दिलं

**(मेल्सीना तुस्कानो,
नंदाखाल
9028606631)**

# लिहताना

लिहताना कोणत्या रंगाच्या पेनाने लिहताय
ह्याने लिहण्याला काही फरक पडत नाही,
पेनाला नाही, पानालाही नाही

तसेच आयुष्याचे आहे.

मग फरक पडतो कुणाला, वाचकाला.
थोडं आत जाता आलं तर डोळ्यांना,
अजुन थोडं आता जाता आलं तर मेंदूला,
मेंदूचा दरवाजा उघडा असेल तर अहंपणाला.

जिवन कसय ना, बीजगणितासारखं,
प्रत्येकाला मोजुन क्षण दिलेले असतात,
त्यात ज्यांना अधिक वजाबाकी गुणाकार भागाकार
जे जमतंय ते करायचं,
उत्तर बरोबर असण्यापेक्षा मान्य असावं अन
मनोमन हसावं

पेनाच्या शाईला दोष देऊ नये,
लिपीलाही नाही.

अहंपणातला थोडासा पणा इथे उचलावा ,
अन स्वताला स्वीकारावे मनापासून,

लिहता येते यापेक्षा शाईचा रंग महत्वाचा नाही,
हस्ताक्षरही नाही
शाई पेनाच्या शाईने सदऱ्याचा खिसा
माखण्याआगोदार हे कळलं तर उत्तम

# देवमाणुस

देव असो की नसो
पण मला स्वर्गच मिळणार
उगाच नाही लोक मला देवमाणुस म्हणत,

हो हो मी देवमाणुस आहे, हो हो गर्वच,
गर्वच लागतो असं म्हणायला,
रक्त आणि श्वासापुरतं धडधडणं इतकंच
काम नाही माझ्या हृदयाकडे,

जगातल्या प्रत्येक डोळ्यातून ओघळणाऱ्या
अश्रूला
पुसण्याची धमक आहे माझ्यात
फुकट नाही लोक मला देवमाणुस म्हणत

माझे देवमाणुस असण्याचे नफे तोटे खुप जण मला
समजावून सांगतात,
काही सांगत नाहीत, सरळ वार करतात,

पण विसरतात की मी माणूसच नाही, तर देव ही
आहे.

--- ब्रायन मेंडिस

# न्याय

कधीतरी...

संपतोच ना पारिजातकाचा

तो निस्वार्थी सडा

तेव्हा..

पारिजातकाने भक्ताला

अवमानित न करता

बाभळीगत जहाल काटे द्यावेत

अन भक्ताने काहीही खंत

न बाळगता, न जाणवता

आपले रक्तच देवाला अर्पावे

कधीतरी...

शुष्क होतात नयन

गाळूनी आसवे भडाभडा

तेव्हा...

त्या रिक्त नयनात

एकवटूनी सारी आग

अन्यायग्रस्तांनो तुमच्या दु:खास

कारणीभूत हे जग

तुम्ही बेशक पेटवून द्या...

तुम्ही बेशक पेटवून द्या...

- **जीम (फिलिप) रॉड्रिग्ज**

# सांताक्लॉजच्या पाठीवरील गिफ्टसची थैली

या तांबड्या झग्यातल्या
जख्खड बख्खड सफेद दाढीवाल्या थेरड्या म्हाताऱ्याच्या पाठीवर
कुबडाप्रमाणे लटकलेल्या माझ्यात
कोंबलेली आहेत चॉकलेटस गिफ्टस
आणि सगळयांना जे जे काही हवं ते ते

होउदे जगातल्या सगळयांच्या इच्छा पूर्ण
म्हणून याने पांघरलाय
जो काही वेडेपणाचा तांबडा झगा
त्याच्यासोबत मलादेखील जावे लागते फरपटत
गावागावांतून आळी-आळीतून
शहरबोळांतून नाहक

त्याच्या लाल टोपीवरचा
सफेद गोंडादेखील हिंदकळतो
माझ्याबरोबर अविरत
त्याच्या दुडूक दुडूक चालीच्या लयीत
मीदेखील पुटपुटू लागलीये एकच प्रार्थना
हे देवा या म्हाताऱ्याच्या सगळ्या इच्छा
लवकरात लवकर पूर्ण कर

- **इग्नेशियस डायस**

# पुस्तकांची पिस्तोल

गप्पा गप्पा
गप्पा गप्पा
ब्लाह ब्लाह
ब्लाह ब्लाह
टाळ्या टाळ्या
टाळ्या टाळ्या
टीका टीका
टीका टीका

बौद्धिक मैथुन
बौद्धिक मैथुन

ये ले!
तुभी ये ले!
और ये ले!
तुभी ये ले!

कादंबरी
कविता
कथा
नाटक
ललित
वैचारिक
सैद्धांतिक
दर्शन
आयडियालॉजी
ये ले!
तुभी ये ले!
और ये ले!
तुभी ये ले!

पुस्तकांची पिस्तोल
डोक्याला लाऊन
ते म्हणाले
बोल किती पुस्तके वाचालीयात तू
बोल काय आहे तुझी भूमिका
बोल कधीपासून काय किती लिहिलंय

त्याला ऐकू आलं
बोल किती पिस्तोली आहेत तुझ्या कडे
बोल कोणत्या खुंट्याचा बैल आहेस तू
बोल खुंट्याला घिरक्या घेत  किती जिलेब्या
पाडल्यास
तो संभ्रमात
खेळायचं कि पाळायचं

पुस्तकांची पिस्तोल
डोक्याला लाऊन
ते म्हणाले
ढीशक्याऊ ढीशक्याऊ
ढीशक्याऊ ढीशक्याऊ

आणि तो
ठार थारोळ्यात

ते बरबट खुश

■ **महेश लीलापंडित**

## 'आगमन'

कारण सापडलं नाही म्हणजे
ते नसतं असं नाही...
माझ्या येण्याचं कारण
त्यानं ठरवलं असेलंच...

माझ्या घासातील प्रत्येक शीत
माझ्या ओठातील प्रत्येक गीत
माझ्या वागण्याची हरेक रीत
माझी लढाई... माझे तह
अगदी माझी हारजीत...
सगळयांचं काहीतरी कारण असेलंच

मृत्यूच्या जबड्यातही
फुलागत झेलणं
फुलांच्या पाकळयांतही
असतं कधी विव्हळणं
असणारच काहीतरी योजना

माझ्या वाटेत पेरलेले काटे
असावी एक्युपंचर थेरेपी
कदाचित डोक्यात गेलेली
अतिरिक्त हवा काढण्यासाठी

तुझं येणं...तुझं जाणं
स्थितप्रज्ञपणे स्विकारायला हवं
कुठल्याही झाडाच्या सावलीत
नाही विसावता येत पांथस्थाला
ऊन्हं झेलण्यासाठी वृक्षच लागतात

कल्पवृक्ष भले देईल सारं
सावलीची कमतरता मात्र कायम
एखादं कारण असतंच...
कारण सापडलं नाही म्हणजे
ते नसतं असं नाही...

■ संगीता वाझ

## रांड

तीन बहिणीनंतरचा माझा जन्म होता
माझेही "स्त्रीलिंग", मोठा दोष होता
जन्म घेतला, 'नकोशी' भाळी लिहिलं गेलं
बापाचं सोडा, आईचं ही प्रेम आटोक्यात आलं

तल्लख बुद्धीची देणगी लाभली
सौंदर्यासह पर्सनेलिटीही स्मार्ट लागली
शाळा-कॉलेज दणाणून सोडलं
लाईफला 'नस्तर' तिकडेच लागलं

तो एक बॅच सिनियर होता
मागेपुढे लाळ घोटत होता
ना ना करता आमचं घोडं नादी लागलं
घरचं अधुरं प्रेम बाहेर शोधू लागलं

कॉलेजची 'ओव्हरनाईट' कॅम्प होती
टास्कसाठी आमची एकच टीम होती
गप्पात मश्गूल, परतीची वाट विसरलो
काळोख्या रात्रीत एकमेकांत विसावलो

'पिरियड' चुकला, धुंदी झरकन उतरली
त्याने नाकारले, माझीच चूक सांगितली
'कुलटा' ठरली, घरीही ढुंगणावर लाथ बसली
घर ना दार, भटकत भटकत दुर पोहोचली

आश्रम भेटला, 'माई' मिळाली
तिने माझी 'सासरी' रवानगी केली
'फ्रेश स्टॉक' म्हणून प्रेफरन्स होता
रोज दलाल नवीन नवरा आणत होता

बोली माझी रोज लागत होती
गिधाडं अधाशी लचके तोडत होती
काळीज आता दगड झालं आहे
'मढं' झालेलं शरीर 'रांड' म्हणून जगत आहे.

■ **सुनिल सोकाळकर**

# कललेली उन्हं

आरामखुर्चीत बसलेले
हातात कॉंफीचा मग नि 'आवडतं पुस्तक'
सगळंच परफेक्ट...
इतक्यात...
बेल वाजली...
मी चारफडत दार उघडलं...
पाव्हणा अनोळखी आणि थोडासा आगाऊ..
मला वाटलं घर चुकलंय... पण नाही...
पत्ता 'माझाच'..
म्हटलं 'आपली ओळख'...
'ओळख जूनीए...अधनं मधनं भेटत असायचो...
पण बरेच दिवस भेट नाही"
गोड हसत म्हणाला तो... सोफ्यावर आरामात
विसावलाही...
काहीश्या नाखूशीनंच विचारलं...
"'काही घ्याल का?.'"
"'अं..नको ..काही... जवळ बस... बोलू निवांत"'..
अरे काय बोलू निवांत...
पुस्तक तसंच पडलंय..
कॉंफी थंड होतेय...
अंधारेल एवढ्यात....
माझी चिडचिड पण तो निवांत...
त्याच्या थंडगार चेहऱ्यामागं काहीतरी
ओळखीचं...
"बरेच दिवस दिसली नाहीस... आमच्या ईथनं...
म्हणून आलो...
हरवली बिरवलीस की काय असं वाटलं"
मिश्कील चेहऱ्यामागं कसलीतरी वेदना...
"वाटलं बिझी असशील.. पण इतकी...???
इतकंही हरवू नये की परतीचा रस्ता सापडणार
नाही...
ओळखीच्या खूणा दिसणार नाही...
नेहमीच्या माना डोलणार नाहीत..."
त्याच्या चेहर्यावरच्या आठ्यांमागे उदासी , राग
,आणि कीव...
अरे काय बोलतोय हा...
मी सारं तपासून पाहिलं...थांगपत्ता लागत नाहीए...
नक्की कुठल्या रस्त्यावर ,कधी भेटलेली स्वारी
असेल..?
साऱ्या खाणाखुणा ही बिनचूक सांगतोय...
मी रस्ताही बदललेला नाही...आणि माणसंही....
"अगं थांब थांब...अजून किती हरवशील?"...
त्याच्या खोचक प्रश्नामागं टवाळकी आणि
चिंताही...
अगं बाई ...माझ्या मनातलंही कळतं याला...
जादूटोणावाला तर नसेल ना...
"चल भित्री...अगं खूप जवळचे आहोत आपण"
जूने मित्र आठवले...सोयरे आठवले ...
सारे अल्बम झरझर सरकवले...पण ना ...
स्म्रृतिभ्रंश झाला असेल का मला... ईतकं कसं
विसरतेय मी?
"चल बराच वेळ घेतला...निघतो...
बघ मला करमत नव्हतं म्हणून भेटायला आलो...
येत जा ग...जराशी निवांत बसत जा...
जूनं उगळू ...नवं चघळू...
बोलली नाहीस काही तरी चालेल...
पण येत जा....
तू हरवू नयेस एवढंच....."
आठवलं.... सारं आठवलं...
'निवांत'च तो....मिटल्या डोळ्यांनी...
ओघळत्या कडांनी... झुलत्या आरामखुर्चीत....
जोरात पूकारलं ...
"अरे थांब रे....आलेच"......

- डॉ. रिबेका दोडती

## तू आलास

==========

तू आलास मन आनंदे भरले
तू आलास आम्हांमध्ये राहण्यासाठी
अधुऱ्या गोष्टी पूर्ण करण्यासाठी.

ती शांत निशेची वेळ
आकाश-पृथ्वी तुझी वाट पाहत होती
तुझीच जरुरी होती
तुझ्याच चरण स्पर्शाची आस धरली होती.

ती वाट पाहाटेची संपली
अंधूक नजर साफ करण्याची
अज्ञानमती ज्ञानी करण्याची
तुझ्याच शब्दाची आस धरली होती.

दिस आला आनंदाचा
तुझे आभार स्तवन वदण्याचा तुझ्या प्रीतीचे गीत गाण्याचा
तुझ्याच प्रकटीकरणाचा ध्यास धरला होता.

कारण,
येशू  तू आलास
आमच्या अधुऱ्या गोष्टी पूर्ण करण्यासाठी.

**-फा. आयझॅक डिसोझा (O.F.M.Cap.)**

**संकलक:कु. सबिना फोस, गास**

# निर्मिती....

दिवसभर प्रवास करून दमलेला सूर्य सांजवेळी निघतो रात्रभराच्या विश्रांतीसाठी...
किती मोहक आणि सुंदर दिसतो तो..
दिवसभर उन्हात भटकून प्रकाश पसरलेला असतो
त्याने चराचरामध्ये...
आणि त्याच्या समाधानाचं तेज पसरत जातं
संपूर्ण क्षितिजाला कवेत घेत......
आसमंतात सोनेरी, गुलाबी गुलाल उधळत....

कधीतरी बसावं घटकाभर शांत, सांजवेळी...
एखाद्या समुद्रकिनाऱ्यावर....
सोनेरी संधीप्रकाशात चमचमणाऱ्या नितळ, शांत पाण्याकडे नजर लावून...
पाहात राहावं वर उंच आकाशात भिरभिरणाऱ्या पाखरांकडे...
सुप्त समाधानाने...
आपणच भरलेलं असतं बळ कधीतरी त्यांच्या पंखांमध्ये...
समुद्रात डौलात डोलणाऱ्या नौकेकडे पाहावं न्याहाळून क्षणभर..
आपणच भरलेली असते हवा कधीतरी
तिच्या शिडांमध्ये....
घ्यावी उचलून वाळू मूठभर...
थंड, लुसलुशीत, हवीहवीशी...
आणि मग सोडून द्यावी तशीच हळू हळू जमिनीवर... आपल्याच गत आयुष्यासारखी...
सोनेरी संधीप्रकाशात चमकत जातील
काही वाळूचे कण...
आपल्या आयुष्यातील हेच ते सोनेरी क्षण....
त्यांना आठवून पुन्हा उठावे उभारी घेऊन...
नव्याने सोनेरी क्षणांची निर्मिती करण्यासाठी...

ॲलेक्स मच्याडो.
7208161213.

## बापाचे दुःख मला कळलेच नाही!

माझा बाप - दिवसा मजुरी करी
रात्री उशिरा घरी येई
थकून घरी आला तरी
कायम तो हसत राही
बापाचे दुःख मला कळलेच नाही!

खिशात पैसे नसले तरी
आम्हाला तो समाधानी ठेवी
आम्हाला पोटभर अन्न देई
आणि स्वतः मात्र उपाशी राही
बापाचे दुःख मला कळलेच नाही!

आम्हाला शिक्षण देऊन
चांगल्या नोकरीचे तो स्वप्नं पाही
शरीराला थकवा जाणवला तरी
तो मेहनत करत राही
बापाचे दुःख मला कळलेच नाही!

फ्रँक डॉ. मिरांडा, उमराळे, जोसघर

## बायबल वाचन

वाचन, म्हणजे बायबल वाचन नव्हे नुसतंच वाचन,
ते आहे त्या सर्व शक्तिमान ईश्वराचे सर्वसमर्थ वचन,
शब्दा-शब्दांचे व्हावे त्याचे मनन,
देहबोलीतून प्रकटावे त्याचे चिंतन

दुःख-कष्टाच्या, भयंकर क्लेषाच्या,
सुवार्ता आहेत त्या परम पित्याच्या,
निस्सीम प्रेमाच्या, अनंत त्यागाच्या,
सुवार्ता आहेत त्या निष्कलंक मरियेच्या

मनी देती अपूल्या ते अविचल सामर्थ्य
जीवना देती अपूल्या ते परिपूर्ण अर्थ,
करिती असे अपूल्या ते आयुष्यास सार्थ,

बायबल वाचन म्हणजे, श्रद्धा बांधणी
करिती अपूल्या मनी ते आध्यात्माची पेरणी
देती भंगलेल्या हृदयास ते विश्वासाची जोडणी


देवाचा संवाद मनुजासी, ते बायबल वाचन,
मनुजा बोले ईश्वरासी, ते प्रार्थना-मनन-चिंतन,
सुंदर हे मिलानच्या संत अंब्रोजचे वचन..!

- राजन व्ही. डीमेलो

# कलाकुसर :-

**पॉल डिमेलो:-**










## ऑस्टिन डाबरे :-






Austien


HOTEL
Austien Dabre

**अर्नेस्ट रॉड्रिग्ज :-**






Earnest
R


Earnest
R

रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज :-




Royal



**लिओनार्ड रिबेलो :-**














ऑल्विन कोरिया :-






23 10 2008


(C)Allwin Correia

**मॅक्सवेल गोम्स :-**






**ॲलिस्टन डायस :-**







